**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ. शी.** :जागतिक महिला दिन साजरा होत असताना महिलांच्या व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होणे

**मु. शी.** : :जागतिक महिला दिन साजरा होत असताना महिलांच्या व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा होणे, जागतिक महिला दिन साजरा होत असताना महिलांच्या व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असणे, कामाच्या ठिकाणी होणारे लैगिंक शोषण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राज्यातील गुन्हे २००८ या अहवालात स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये ५.४ टक्क्यांनी वाढ झालेली धक्कादायक बाब निदर्शनास येऊनही अद्याप याप्रकरणी कोणतीही कार्यवाही अथवा ठोस उपाययोजना करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी महिला वर्गात पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, सबब याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, महिलांवर खास करून मुलींवर अत्याचार करण्याच्या घटना घडत आहेत. बलात्कार करणारे,अत्याचार करणारे संशयित आहेत त्यांना तिथल्या तिथे मारहाण करण्याचे, कायदा हातात घेण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. एवढेच नव्हे तर यामध्ये देखील वेगवेगळे प्रकार आहेत. छेडछाडीची तक्रार पोलिसांनी स्वत:हून दाखल करून घेतली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

प्रत्येक ठिकाणी हा अदखलपात्र गुन्हा आहे असे समजून पोलीस पीडित मुलीची तक्रार आली तर ती नोंदवून घेण्यास टाळाटाळ करतात. 12 एप्रिल रोजी एक घटना घडली. 9 वर्षाच्या मुलीवर अत्याचार करण्यात आला. पोलीस ठाण्यावर ग्रामस्थ केल्यानंतर, वादावादी केल्यानंतर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंद करण्यात आली. त्यामुळे माझी सर्वात पहिली मागणी अशी आहे की, शाळा, कॉलेजमधील मुलींची तक्रार आली तर ती लगेच पोलिसांनी नोंदवून घेतली पाहिजे. कु.माधुरी शेवाळे हिची गेल्या वर्षी छेडछाड झाली होती. जळगाव पेठ पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करून देखील त्याची दखल घेण्यात आली नाही. शेवटी, त्या मुलीला रॉकेल टाकून जाळून टाकण्यात आले. रायगड जिल्ह्यात देखील छेडछाडीची घटना घडली. त्यामुळे त्या मुलीचे नाव जिल्हा परिषदेच्या शाळेतून काढून टाकण्यात आले. गणेशपुरी, उलवे, ता.पनवेल, जिल्हा रायगड येथे घटना घडल्यानंतर दिनांक 5.3.1010 रोजी पनवेल एनआरआय सागरी पोलीस ठाणे, बेलापूर, नवी मुंबई येथे फिर्याद दाखल करण्यात आली. श्री.सदानंद केशव पाटील या शिक्षकाने शाळेत शिकणाऱ्या 4 मुलींची वर्गामध्ये सातत्याने छेडछाड केली. यासंबंधातील तक्रार गावकऱ्यांनी दाखल केलेली आहे. संबंधित शिक्षकाला निलंबित करावे म्हणून शिक्षण विभागाने वारंवार कळवून देखील बदली मिळवून संबंधित शिक्षक रहात आहे.

सभापती महोदय, छेडछाड हा अदखलपात्र गुन्हा आहे. यासंबंधी मी व सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी चार वर्षा पूर्वी हा विषय अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी शासनाच्या वतीने सदर गुन्हा दखल पात्र करण्याची शिफारस करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी शासनाने जाहीर केले की,नजरचुकीने असे जाहीर केले. आता केंद्र शासन बलात्कार विषयी कायद्यामध्ये सुधारणा करीत आहे. त्यामुळे हा गुन्हा दखल पात्र होण्यासंबंधी विचार केला करावा अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ KGS/ प्रथम श्री.भारवि 10:50

डॉ.नीलम गो-हे...

सभापती महोदय, अल्पवयीन मुलींवर ॲसिड फेकण्याच्या प्रकारामध्ये सुध्दा दिवसेदिवस वाढ होत आहे.तेव्हा ॲसिड फेकलेल्या पीडित मुलींचे वा महिलांचे आयुष्य पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले असते.त्यामुळे अशी प्रकारची प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालविले गेले पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, दिवसेंदिवस अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचे प्रमाण वाढत चालले आहे.बलात्कार करणा-या लोकांमध्ये काही गैरसमज आहेत असे आमच्या निदर्शनास आलेले आहे. त्या व्यक्तिला जर गुप्तरोग झाला असेल व त्याने जर अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवले तर गुप्तरोग बरा होऊ शकतो अशा प्रकारचा गैरसमज समाजातील एका घटकामध्ये मोठया प्रमाणावर निर्माण झाला आहे. त्यामुळे मुंबईच्या काही भागात वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत असतात त्या मागे हीच कारणमिंमासा असू शकेल असे मला वाटते.मला या ठिकाणी कोणत्याही धर्माचे नाव घ्यावयाचे नाही परंतु समाजातील एका घटकामध्ये निश्चितपणे अशा प्रकारचा गैरसमज आहे त्यामुळे या रोगावर वैद्यकीय उपचार करण्या ऐवजी अल्पवयीन मुलींवर बलात्कार होण्याचे प्रकार वाढत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी मुंबईचे एक उदाहरण देऊ इच्छिते. असा प्रकार घडल्यानंतर सबंधित मुलीची माहिती घेण्यासाठी अनेक तास तिला पोलीस स्टेशनमध्ये बसविले जाते. दोन तीन घटनामध्ये ही बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर व त्याबाबतीत मी सबंधित पोलीस अधिका-याशी विचारणा केल्यानंतर त्यांनी माफी मागितली होती त्यामुळे मी त्या पोलीस स्टेशनची नावे जाहीरपणे सांगत नाही. परंतु माननीय गृह मंत्र्यांना मी निश्चितपणे सांगू इच्छिते की, एका पोलीस स्टेशनमध्ये सकाळी तक्रार घेऊन गेल्यानंतर दुस-या दिवशी सकाळपर्यंत एफ.आय.आर.सुध्दा नोंदविण्यात आला नव्हता.मी स्वत: त्या पोलीस स्टेशनमध्ये गेले होते त्यावेळी त्या मुलीची आई रडत होती . महिला पोलिसासांठी जी रुम होती त्यामध्ये आई आणि मुलगी होती .तेथील पोलिसांनी मला असे सांगितले होते की, या मुलीकडून थोडे फार काम सुध्दा करवून घेतले होते. आठ दहा तास तेथे बसविल्यानंतर त्यांना पोलिसांनी स्वत:च्या खर्चाने जेवणखाण दिले होते परंतु तिला दिलासा वा समुपदेशन दिले गेले नाही. आठ नऊ वर्षाच्या मुलीवर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

बलात्कार झाल्यानंतर ती घाबरलेली असते त्यावेळी संपूर्ण पोलीस स्टेशनमध्ये आश्वासक वातावरण असावयास पाहिजे परंतु पोलिसांवरील कामाच्या व्यापामुळे वा अन्य कारणामुळे तेथे आश्वासक वातावरण नाही. त्या ठिकाणी मुली बरोबर बोलण्यासाठी चाईल्ड कौन्सिलरची मदत घ्यावयास पाहिजे होती परंतु ती मदत घेतली जात नाही. सबंधित पोलीस अधिका-याची जी काही संवेदनशीलता आहे त्या नुसार शक्य तेवढे ते पोलीस अधिकारी सबंधित मुलीबरोबर बोलत असतात परंतु महिला पोलीस अधिका-यांना वा महिला पोलिसांना या मुलीबरोबर कसे बोलावयाचे याचे फारसे प्रशिक्षण नसल्यामुळे दोन तीन तासामध्ये ही मुलगी पूर्णपणे कोलॅप्स होण्याची वेळ आलेली असते.

सभापती महोदय, अत्याचार मुक्ती प्रकल्प आम्ही 16 पोलीस स्टेशनमध्ये राबविला होता त्यावेळी आमच्या एक बाब निदर्शनास आली होती. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये वरच्या अधिका-यांच्या बदल्या होत असतात परंतु तेथील रायटर्सच्या फारशा बदल्या होत नाहीत. तेथील व्यक्तिमध्ये संवेदनशीलता वाढविण्याचा आम्ही प्रयत्न केला तेव्हा असे निदर्शनास आले की प्रत्येक पोलीस स्टेशनमधील रायटर्सना एवढे शिकवले गेले आहे की, ठराविक शब्दामध्ये जोपर्यंत बलात्काराची व्याख्या लिहिली जात नाही तोपर्यंत बलात्कार झाल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे ठराविक शब्दात लिहून घेण्यासाठी रायटर्स वेगवेगळया पध्दतीने त्या मुलीशी बोलतात परंतु त्या शब्दांचा अर्थ त्या मुलीला कळत नाही. तेव्हा रायर्टस,महिला पोलीस वा वरिष्ठ अधिकारी यांनी चाईल्ड रेपच्या संदर्भातील अनेक इंग्रजी आणि मराठीतील मागदर्शक पुस्तकांचा उपयोग करुन त्या मुलीशी विचारपूस करण्याची एक कार्यपध्दती निश्चित केली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, महिलांच्या तक्रारीबद्दल जाणीव जागृती निर्माण व्हावी आणि कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी राज्य सरकारने राज्य महिला आयोग निर्माण केला आहे . परंतु खेदाची गोष्ट अशी आहे की, गेल्या पाच वर्षापासून राज्य महिला आयोगातील तीन जागा रिक्त आहेत. त्यामुळे या संदर्भात राज्य महिला आयोगाचे जे काही काम व्हावयास पाहिजे होते ते सुध्दा झालेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 13 ऑगस्ट 1997 रोजी विशाखा मार्गदर्शक तत्वात काही तत्वे सुचविली आहेत आणि या संदर्भात सगळीकडे सूचना देण्यात येतील.

3...



VTG/ ST/ KGS/ प्रथम श्री.भारवि 10:50

डॉ.नीलम गो-हे...

असे सन्माननीय गृह मंत्र्यांनी पुण्याच्या बैठकीत सांगितले होते. मला असे नमूद करावयाचे आहे की मंत्रालयातील तक्रार निवारण समिती असून महिलांचे हक्क आणि कल्याण समितीने त्यांची साक्ष घेतली होती त्यावेळी असे निदर्शनास आले की, ज्या ज्या महिलांनी अधिका-यासंबंधी तक्रारी केल्या होत्या त्या महिलांच्या बदल्या झाल्या आणि अधिका-यांच्या मात्र बदल्या झाल्या नाहीत हा उल्लेख या सामितीच्या अहवालामध्ये सुध्दा करण्यात आला होता. काही अधिका-यांना बढत्यासुध्दा देण्यात आल्या होत्या. या ठिकाणी मी कामगार कल्याण मंडळातील श्री.धोत्रे यांचे उदाहरण देते त्यांचे प्रकरण कोर्टात गेल्यानंतर आता त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली होती परंतु त्या काळात महिला सातत्याने त्यांच्याविरुध्द तक्रार होत्या परंतु त्याच्याविरुध्द कारवाई केली गेली नाही तसेच विधान परिषदेत हा मुद्दा माडल्यानंतर त्या महिलांवर दबाव आणला गेला होता. या महिलांना समाजाची देखील सहानुभूती मिळाली नाही...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

काठेवाडीसारख्या ठिकाणी "हक" नावाचे एक चांगले सरकारी अधिकारी होते. त्यांची मुलीबरोबर बोलण्याची इच्छा होती. परंतु ज्यावेळी ते एका छोटयाशा गावामध्ये जातात, त्यांच्याबरोबर दोन-तीन पोलिसांच्या गाडया वेगाने गावात जातात, त्यावेळी गावातील 300 ते 400 लोक एकत्र जमतात. त्यावेळी एक वरिष्ठ पोलीस अधिकारी त्या मुलीबरोबर एका झोपडीमध्ये बोलत असेल तर जणू काही तिनेच काहीतरी चूक केली आहे असे वातावरण गावामध्ये तयार होते. मी बीडला गेल्यानंतर त्या पोलीस अधिकाऱ्यांना विनंती केली की, तुम्ही त्या गावामध्ये जाऊन मुलींची विचारपूस करण्यापेक्षा सुरक्षितपणे त्या मुलींना बोलता येईल, त्यामध्ये एखादी शाळा असेल, एखादे कार्यालय असेल, एखादे प्राथमिक आरोग्य केंद्र असेल त्याठिकाणी मुलीबरोबर कमी गर्दीमध्ये बोललात तर चांगले होईल. त्याचप्रमाणे कोर्टामध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या केसेसमध्ये सरकारी वकिलांनी मुलीबरोबर कसे बोलले पाहिजे याचे ट्रेनिंग फार थोडया सरकारी वकिलांना देण्यात आले आहे असे मला याठिकाणी नम्रपणे नमूद केले पाहिजे. सातत्याने ठराविक वकिलांना बोलाविण्यापेक्षा एखादी मोठी टीम त्याठिकाणी असणे गरजेचे आहे. तसेच या केसेसमध्ये इनकॅमेरा इन्व्हेस्टिगेशन झाले पाहिजे. याबाबत सारांशाने सांगावयाचे झाले तर छेडछाडीचा गुन्हा अजामीनपात्र केला पाहिजे, पोलिसांनी स्वतःहून छेडछाडीच्या तक्रारींची दखल घेतली पाहिजे,. ॲसिड फेकण्यासारख्या घटनांच्या बाबतीत गंभीर स्वरुपाची कलमे लावली पाहिजेत, कुटुंबामध्ये ओळखीच्या व्यक्तीकडून बलात्कार केला जातो त्यावेळी समुपदेशकाची मदत घेऊन कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल कल्याण विभागाची मदत घेतली पाहिजे. राज्य महिला आयोगाची रिक्त पदे भरली पाहिजेत. त्यासोबत विशाखा निकालपत्राची अंमलबजावणी केली पाहिजे. त्याचबरोबर पोलिसांमार्फत संवेदनशील पध्दतीने इन्व्हेस्टिगेशन होण्यासाठी सरकारने एक कृती कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. जेणेकरुन या प्रकरणांमध्ये निकाल लागल्यानंतर त्यामधील काही मुली स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतील. शेवटी मी एकच सांगते की, ज्यावेळी अनेक मुलींना न्याय मिळाल्यानंतर त्यांना विचारले जाते की, तुम्हाला काय व्हायचे आहे? तेव्हा त्या मुली आम्हाला महिला पोलीस व्हायचे आहे असे सांगतात. त्यामुळे अजूनही महिलांचा पोलिसांवर विश्वास आहे, ही यामधील चांगली घटना आहे. त्यांचे जे काही पुनर्वसनाचे कार्यक्रम राबवावयाचे असतील त्याबाबतीत देखील आपल्याला त्या त्या विभागाचे सहकार्य मिळणे गरजेचे आहे याकडे मी लक्ष वेधते. धन्यवाद.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, राज्यामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संदर्भात माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. या राज्याने महिलांच्या बाबतीत नेहमीच पुरोगामी भूमिका स्वीकारली आहे . आणि त्याबाबत अन्य कोणत्याही राज्यापेक्षा आपल्या राज्यामध्ये खूप मोठी परंपरा आहे. महिलांचे सक्षमीकरण, महिलांचे सबलीकरण करण्यावर आपल्या राज्याने नेहमी जोर दिला आहे. असे असले तरीसुध्दा कायदा हातात घेणाऱ्या गुंड प्रवृत्ती वेळोवेळी आणि जागो जागी महिलांवर अत्याचार करतांना सापडतात ही गोष्ट कुणालाही नाकबूल करता येणार नाही. जोपर्यंत समाजामध्ये या पाशवी प्रवृत्ती आहेत, तोपर्यंत कायद्याच्या माध्यमातून नैतिक बंधन स्वीकारुन यावर कठोर कारवाई करण्याची भूमिका सुध्दा राज्य सरकारने स्वीकारली आहे.

सभापती महोदय, अलिकडच्या काळात समाजातील थोडीशी नैतिक घसरण हे सुध्दा अशा केसेस घडण्याच्या पाठीमागे प्रमुख कारण आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बाबतीत बारकाईने विश्लेषण केले तर बलात्काराच्या घटनेमध्ये जास्तीत जास्त बलात्कार हे ओळखीच्या व्यक्तीकडून होतात ही गोष्ट यामधून स्पष्ट होते. याचे विश्लेषण माझ्या विभागाने गेले आहे. त्याबाबतीत जी उपाय योजना करणे शक्य आहे ती करण्याचा राज्यसरकारने वेळोवेळी प्रयत्न केला आहे. परंतु दुर्दैवाने अशा काही घटना घडत आहेत, अशा प्रत्येक ठिकाणी पोलीस बंदोबस्त देणे कोणत्याही शासकीय यंत्रणेला शक्य होत नाही. उदा. शिक्षकाने विद्यार्थीनीवर बलात्कार केल्याची एखादी घटना बघावयास मिळते. या महाराष्ट्रामध्ये एक तर अशी घटना रजिस्टर झाली आहे की, एका न्यायाधीशाने एका महिला वकिलावर बलात्कार करण्याची घटना घडली आहे. वडिलांनी आपल्या मुलीवर बलात्कार केल्याची घटना या राज्यामध्ये दुर्दैवाने नोंद झाली आहे. त्यामुळे नैतिक घसरणीचा हा परिणाम आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. नैतिक घसरण होते म्हणून राज्य सरकारने बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ SST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:00

श्री.आर.आर.पाटील . . . .

याबाबतीत अगोदर कायदा करुन या घटनांवर नियंत्रण आणण्याची आवश्यकता विचारात घेऊन, त्या अनुषंगाने उपाययोजना केल्या आहेत. एखाद्या महिलेवर बलात्कार होणे ही गोष्ट अतिशय वाईट आहे किंवा महिलांवर अन्याय होणे ही गोष्ट देखील तेवढीच वाईट आहे. म्हणून यासदंर्भातील गुन्हे संख्येने कमी झाले म्हणजेच त्याची तीव्रताही कमी झाली असे मी स्वत: मानत नाही. सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे की, राज्यातील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. पण प्रत्यक्षात आकडेवारी तशी नाही.

सभापती महोदय, यासंदर्भात राज्यातील जनतेसमोर वस्तुस्थिती जावी म्हणून महिलांच्या बाबतीत ज्या काही प्रमुख घटना घडलेल्या आहेत, त्यासंदर्भात सांगावयाचे तर 2008 मध्ये राज्यामध्ये बलात्काराच्या 1440 केसेस रजिस्टर झाल्या. 2009 मध्ये 1440 वरुन हे प्रमाण 1370 पर्यंत कमी झालेले आहे. विनयभंगाच्या घटनांच्या बाबतीत सांगावयाचे तर या घटना 3437 वरुन 3116 पर्यंत खाली आलेल्या आहेत. छेडछाडीच्या 1489 घटना घडल्या होत्या, त्या 1473 पर्यंत कमी झालेल्या आहे. मात्र एका घटनेच्या बाबतीत मात्र वाढ झालेली आहे, ते म्हणजे कलम 498 (अ) खाली नोंदविलेल्या हुंडाबळीच्या एकंदर 6853 घटना होत्या, त्यावरुन या घटनांमध्ये 7215 पर्यंत वाढ झालेली आहे. तसेच हुंडाबळीचे प्रकार 279 वरुन 282 पर्यंत वाढलेले आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, बलात्कारच्या घटना, विनयभंगाच्या घटना, छेडछाडीच्या घटना कमी होत आहेत आणि दुसरीकडे कलम 498(अ) खाली नोंदविलेल्या घटना आणि हुंडाबळीच्या घटना याबाबतीत राज्यात थोडीशी वाढ झाल्याचे दिसत आहे. यावर कुठेतरी जरब बसावी म्हणून इंडियन पिनल कोडमध्ये आणि आज पर्यंतचा जो प्रस्थापित कायदा आहे, त्यामध्ये यासाठी शिक्षेसाठी ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये सुध्दा राज्य शासनाने बदल करण्याची भूमिका स्विकारली असून, इंडियन पिनल कोड मध्ये कडक शिक्षा करण्याच्या संबंधातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केलेला आहे. कलम 323 अंतर्गत "दुखापत करणे" या गुन्ह्यासाठी आतापर्यंत 1 वर्षासाठी तुरुंगवास किंवा 1 हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा" अशी तरतूद होती. मात्र आता याबाबतीत असा निर्णय घेतलेला आहे की, यातील "1 हजार रुपये दंड" करण्याबाबत जी शिक्षा सुचविण्यात आली आहे,ती वगळण्यात यावी आणि जर "दुखापत" केली तर एक वर्षापर्यंत तुरुंगवास झाला पाहिजे. तसेच राज्यामध्ये विनयभंगाच्या केसेस देखील वाढत आहेत. त्यासाठी 354 कलम

. . . .डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. त्यामध्ये 2 वर्षासाठी तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा असे म्हटलेले आहे. आता याठिकाणी देखील "दोन वर्षासाठी तुरुंगवास" या शिक्षेऐवजी "तीन वर्षासाठी तुरुंगवास" अशी शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे. कलम 509 अंतर्गत 1 वर्षासाठी तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतूद आहे. याठिकाणी देखील "1 वर्षासाठी तुरुंगवास" या शिक्षेऐवजी "दोन वर्षासाठी तुरुंगवास" अशा शिक्षेची शिफारस केलेली आहे. मला निश्चितपणे खात्री आहे की, राज्य शासनाने यासंदर्भात केंद्र शासनाकडे ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्याला केंद्र शासनाकडून मान्यता मिळेल आणि अशा प्रकारे इंडियन पिनल कोडमध्ये बदल झाल्यावर, देशातील इतर कोणत्याही राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्यामध्ये अशा प्रकारच्या घटनांच्या बाबतीतील शिक्षेच्या तरतुदी थोड्याशा कडक असणार आहेत. अशा प्रकारे कायद्यातील तरतुदींमध्ये बदल करण्याबरोबरच गृह विभागाने आणखी काही सक्षम पावले उचलली आहेत. त्यानुसार 2006 मध्ये महिला सहाय्यक कक्ष सुरु करण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. काही ठिकाणी महिला सहाय्यक कक्ष अतिशय चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. काही ठिकाणी याबाबतीत उणीवा असल्याचे आढळून आलेले आहे. ज्या-ज्या ठिकाणी उणीवा आहेत, तेथे त्या दूर करुन, प्रसंगी या कक्षामध्ये काम करणाऱ्या लोकांना "यशदा" सारख्या ठिकाणी सामाजिक संघटनांच्या मदतीने चांगल्या प्रकारे ट्रेनिंग देऊन महिला सहाय्यक कक्ष अधिक सक्षम करण्याच्या बाबतीत विचार केलेला आहे. आयुक्तालयामध्ये आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा मुख्यालयात पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रत्येक पोलीस स्टेशनला "महिला सहाय्यक कक्षाची" निर्मिती केलेली आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी महिला सहाय्यक कक्षामध्ये 1 पोलीस निरीक्षक, 1 पोलीस उप निरीक्षक, 5 हवालदार, 5 पोलीस शिपाई असतील. जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या महिला सहाय्यक कक्षास 1 सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, 3 पोलीस हवालदार, 3 पोलीस शिपाई नेमून या कामाच्या संबंधात त्यांच्यावर वेगवेगळया जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत. अशा वेळी महिला सहाय्यक कक्षाकडे ज्या तक्रारी येतील.

यानंतर कु.थोरात . . ..

श्री. आर.आर.पाटील....

त्याबाबतीत संयुक्तपणे समुपदेशन असेल, किंवा बाकीच्या गोष्टी सुध्दा असतील. तंटे मिटवणे असेल किंवा त्यांच्यावरच्या अन्यायाची दखल घेणे असेल या गोष्टी या महिला सहाय्य कक्षामार्फत केल्या जात आहेत. प्रत्येक जिल्हयात महिला सुरक्षा समित्या गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामध्ये जिल्हा किंवा आयुक्तालय पातळीवर, पोलीस स्टेशनच्या पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करणे - यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, महिला प्राध्यापक, महिला डॉक्टर्स, महिला वकील वेगवेगळया एन.जी.ओ.मध्ये काम करणाऱ्या महिला प्रतिनिधी यांचाही या अधिकाऱ्यांबरोबरच समावेश करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, बलात्कारासारख्या गंभीर घटना अधून-मधून होत असताना आपल्याला दिसतात. यासंबंधीचे खटले त्वरित फास्टट्रॅक कोर्टात शीघ्रगतीने चालवून लवकरात लवकर आरोपीना शिक्षा होईल अशा पध्दतीने राज्य सरकारने प्रयत्न केलेले आहेत. सभापती महोदय, बलात्काराच्या घटनेमध्ये जास्तीत जास्त 60 दिवसाच्या आत कोणत्याही परिस्थितीत दोषारोपपत्र दाखल करावे अशा पध्दतीच्या सूचना दिलेल्या आहेत. सभापती महोदय, पुरावा भक्कम करण्यासाठी वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे काही नमुने तपासावयाला दिले तर बलात्काराच्या घटनांच्या बाबतीतील नमुने तीन आठवडयाच्या आत त्यांनी तपासून द्यावेत अशा पध्दतीच्या सूचना राज्य सरकरने दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, हुंडाबळीकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जनजागृती करणे त्याचबरोबर अशा घटनेवर बारकाईने लक्ष ठेवणे त्याचप्रमाणे बालविवाहाच्या बाबतीत राज्य सरकारने बालविवाहाचे प्रमाण सक्षमतेने कमी करण्यामध्ये चांगल्या पध्दतीचे यश मिळविले आहे. महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्याच्या बाबतीत अनेक गुन्हे महाराष्ट्रात नोंदवलेले आहेत आणि आरोपींना गजाआड केलेले आहे. प्रत्येक पोलीस स्टेशन अशा घटनेकडे अतिशय गांभीर्याने बघत आहे. सभापती महोदय, पूर्वीच्या काळी चूल आणि मूल इतकेच महिलांचे काम होते पण आता मुली शिकत आहेत. वेगवेगळया आस्थापनांमध्ये चांगल्या नोकऱ्या करीत आहेत. चांगली कामे करीत आहेत. त्या जेथे कामाला जात आहेत तेथे सुध्दा त्या सुरक्षित असल्या पाहिजेत. त्यांचा अवमान होता कामा नये म्हणून कामकरी महिलांच्या लैंगिक शोषणाबाबत सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

प्रतिबंधात्मक उपाययोजना करायच्या दृष्टिकोनातून तक्रार समित्या सगळीकडे निर्माण केलेल्या आहेत. या तक्रार समित्या कार्यवाहीमध्ये कमी पडत असतील तर जरुर या सगळया गोष्टीचा एकदा रिव्हयू घेतला जाईल. आणि या समित्या देखील सक्षम केल्या जातील.

सभापती महोदय, एकंदरीतच मुलींकडे आणि महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन दिवसेंदिवस बदलत आहे पण असे असले तरी सुध्दा मुलींच्या बाबतीतील गुन्हे कमी नोंदले जात आहेत असे नाही. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी राज्यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये या वर्षीचे गुन्हे जरी कमी असले तरी नोंद झालेले गुन्हे हे सुध्दा महाराष्ट्राच्या पुरोगामीपणाला कलंकीत करीत आहेत. इतक्या मोठया प्रमाणात या घटना घडता कामा नये. यासाठी समाजाचा दृष्टिकोन खऱ्याअर्थाने बदलण्याची आवश्यकता आहे. एकेकाळी सासू-सासऱ्याकडून महिलांवर अन्याय केले जावयाचे पण आज मुलांचे जन्माचे प्रमाण आणि मुलींचे जन्माचे प्रमाण व्यस्त होत आहे. त्यामुळे आई-वडीलच आता अन्याय करीत आहेत की काय अशी एकंदर स्थिती निर्माण झालेली आहे. परके अन्याय करीत होते आता आई-वडीलच अन्याय करीत आहेत की काय? यामुळे मुली जन्माला येऊ द्यायचे प्रमाण हे धक्कादायक पध्दतीने कमी होत आहे, यासाठी खूप मोठया प्रमाणात सामाजिक जागृती करण्याची आवश्यकता आहे. अलीकडच्या काळात काहीही घडले की, आपण फक्त पोलिसांनाच जबाबदार धरतो आणि सामाजिक सुधारणासुध्दा पोलिसांनी कराव्यात, त्यांनी मॉरल पॉलिसिंग करावे, अशा पध्दतीच्या मागण्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यासाठी पोलीसदल अपुरे आहे. ही कामे सामाजिक कार्यकर्त्यानी करण्याची आवश्यकता आहे, त्यांचे अपयश हे पोलिसांवर लादले जात आहे. आज राज्यामध्ये ज्या घटना घडत आहेत त्याबाबतीत असलेले कायदे अधिक कडक करुन, या घटनांकडे पोलीस अधिक सक्षमतेने बघतीलच पण ज्या पध्दतीने जन्मदर विसंगत होत आहेत, महिलांवर ज्या पध्दतीने अन्याय होत आहेत ते पहाता तरुणांना उद्दीपीत करणाऱ्या टी.व्ही.वरील मालिका असतील, सिनेमा असतील मोठया प्रमाणात पाश्चिमात्य सांस्कृतिक अतिक्रमण होत असताना एका संक्रमण अवस्थेतून आपण जात असताना तरुण पिढीकडे सगळयांनी चांगले लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

यामध्ये पालक, शाळा, सामाजिक नेते, राजकीय नेते यांच्यापासून जबाबदारी सुरु होते. या सर्वांनी ही बिघडत चाललेली परिस्थिती थोडीशी नियंत्रित करण्याच्या बाबतीत आपापली भूमिका पार पाडली तर अतिशय संवेदनशीलपणे महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत पोलीस बघतील एवढेच मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो. पोलीस स्टेशनला एखादी महिला तक्रार नोंदविण्यासाठी आल्यानंतर कमी वेळेमध्ये तक्रार नोंदविली पाहिजे, तिला ताबडतोब घरी किंवा हॉस्पिटलमध्ये पाठविले पाहिजे, पोलीस स्टेशनमध्ये बसविता उपयोगाचे नाही याची मी अतिशय गंभीरपणे दखल घेईन. तक्रार देण्यासाठी ती मुलगी कधी आली आणि तक्रार नोंदवून तिला घरी कधी जाऊ देण्यात आले इथपर्यंतची नोंद या पुढच्या काळामध्ये घेण्याच्या सूचना गृह विभागामार्फत पोलीस स्टेशनला देण्यात येतील. जे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले आहेत ते निश्चितपणे गंभीर आहेत आणि शासन सुध्दा त्या प्रश्नांच्या बाबतीत तितकेच गंभीर आहे. आपण सगळ्यांनी मिळून महिलांवरील अत्याचार आणि अन्याय कमी होतील असा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर महिला कार्यकर्त्यांनी तसेच या क्षेत्रामध्ये ज्या स्वयंसेवी संस्था काम करतात त्यांनी सुध्दा वेळेत तक्रार करणे आवश्यक आहे. या सगळ्या गुन्ह्यांमध्ये पाहिले तर हुंडाबळीसाठी नातेवाईकांनी मग पती असेल, सासू-सासरे असतील, दीर असेल यांनी महिलांचे खून करण्याचे प्रमाण, महिलांना मारण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. माझ्या मताशी सन्माननीय सदस्य सहमत होतील की, प्रत्येक घरी एक एक पोलीस सुरक्षेसाठी ठेवणे हे कोणत्याही शासन यंत्रणेला शक्य नाही. पण जर असा घातपाताचा संशय आला आणि त्या महिलेने योग्य वेळी पोलिसांना कळविले तर निश्चितपणे ताकीद देणे, पुढचा प्रकार होणार नाही याची दक्षता घेणे या गोष्टी पोलिसांना सुध्दा करणे शक्य होतील. परंतु अनेक वेळा परिस्थितीमध्ये बदल होईल म्हणून अन्याय सहन करण्याची भूमिका स्वीकारली जाते आणि त्यातून मोठे गुन्हे जन्म घेतात. जी शोषिकता आहे ती इतकी असता उपयोगाची नाही की, ज्यातून बळी जाण्याचे प्रसंग महिलावर येतील. मला एका गोष्टीचे समाधान आहे. हे सगळे गुन्हे कमी होत असताना काही बाबतीत गुन्हे अत्यंत कमी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

करण्यामध्ये यश मिळाले आहे. मुलींचा शारीरिक व्यापार करण्याचे जे गुन्हे राज्यामध्ये घडतात त्यामध्ये चांगल्या पध्दतीची घट आहे. या ट्रॅपिकिंगमध्ये पोलीस सक्षमतेने आणि दक्षपणे काम करीत आहेत त्याचे हे परिणाम आहेत.

सभापती महोदय, आणखी एक बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. पूर्वीच्या तुलनेमध्ये आता कोर्टामध्ये बलात्कारासारखे खटले सुध्दा लवकर निकाली निघत आहेत. तो कालावधी आपल्या राज्यामध्ये कमी झालेला आहे. यामध्ये माननीय हायकोर्टाने सुध्दा अतिशय चांगल्या पध्दतीची भूमिका, महिलांचे प्रोटेक्शन करण्याची भूमिका घेतलेली आहे. राज्य सरकारला शिघ्रगती न्यायालय करणे, बलात्काराच्या घटना, महिलांवरील अन्याच्याच्या घटना यासंदर्भातील प्रकरणांचे लवकरात लवकर निकाल लागतील अशी भूमिका न्यायालयाने सुध्दा घेतलेली आहे. शिक्षणाचे प्रमाण अत्यंत वाढत आहे. पूर्वीच्या काळी अन्याय सहन केले जात होते परंतु आता तक्रार करण्यासाठी महिला धडाडीने पुढे येत आहेत. त्यांच्यासाठी काम करणाऱ्या गाव पातळीपासून मोठ्या शहरापर्यंत अनेक महिला संघटना अत्याचारित महिलांच्या पाठीमागे उभ्या राहात आहेत ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे महिलांवरील अन्यायाला निश्चितपणे मर्यादा येऊ शकतील. काही त्रुटी आहेत. शासकीय यंत्रणा ही शासकीय यंत्रणेच्या पध्दतीने जाते परंतु काही गोष्टी मानवतेच्या दृष्टीने हाताळाव्या लागतात. पिडीत महिलेचे चांगले समुपदेशन करणे यासाठी असलेली जी पदे रिक्त आहेत ती पदे रिक्त राहणार नाहीत याबाबत माझ्याकडून पूर्णपणे दक्षता घेतली जाईल.. अत्याचारित महिलांसाठी अत्यंत चांगल्या पध्दतीच्या समुपदेशनाची व्यवस्था असेल. सभापती महोदय, मी या अर्धा-तास चर्चेला सविस्तर उत्तर दिलेले आहे. जे प्रश्न, ज्या घटना सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या आहेत त्याची दखल मी स्वत: घेईन. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझे समाधान झालेले आहे पण एक छोटी सूचना करते. अल्पवयीन मुलींच्या नावाच्या संदर्भात तसेच जेव्हा सभागृहामध्ये चर्चा होते किंवा आम्ही नियम 93 अन्वये सूचना देतो तेव्हा आपण विधानसभा सदस्य तसेच विधान परिषद सदस्य यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांच्या हक्कावर अतिक्रमण न येता जसे मिडियामध्ये नाव छापण्यास बंदी आहे तशा पध्दतीने, विशेषत: अल्पवयीन मुलगी बलात्कारानंतर जिवंत असेल तर शक्यतो पेपरवर तिचे नाव येऊ नये यादृष्टीने माननीय अध्यक्ष तसेच माननीय सभापती यांच्याशी बोलून त्यावर निर्णय करावा. कारण त्यांच्या आयुष्याचा प्रश्न आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात केसरी, फणसवडेमधील विविध सर्व्हे नंबरमधील जमिनीवर वन कायद्याचे उल्लंघन करुन केलेले बांधकाम

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात केसरी, फणसवडेमधील विविध सर्व्हे नंबरमधील जमिनीवर वन कायद्याचे उल्लंघन करुन केलेले बांधकाम यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात केसरी फणसवडे मधील केसरी सर्वे नं. 13, हिस्सा नं. 2 वॉचमन केबिन, सर्वे नं.20, हिस्सा नं.3 वॉचमन केबिन, मौजे फणसवडे सर्वे नं. 44, हिस्सा नं. 0 वॉचमन केबिन, सर्वे नं. 54, हिस्सा नं. 0 शेततळी अशा ठिकाणी वनजमिनीत वनकायदा 1980 चे उल्लंघन करुन बांधकाम करणे, सदर जमिनी 35 सेक्शन खाली असणे व या जमिन खनिज उद्योगासाठी वापर करण्यासाठी करार करण्यात येणे, तसेच खंदक न खोदता बिले काढणे, दोरखंड न लावता बिले सादर करणे, हत्तींना बेशुध्दीचे इंजेक्शन देवून हत्तींना परत पाठविण्याकरिता 31 लाख रुपये खर्च होणे, बेशुध्दीचा जादा डोस दिल्याने दोन हत्तींचा झालेला मृत्यू, तसेच दोडामार्ग तालुक्यातील उंडिल आणि शिंरगे येथे मोठया प्रमाणात परप्रांतीयांकडून वन जमिनीतील झाडांची तोड होऊनही कारवाई न होणे, तसेच बांदा येथे बेकायदेशीररित्या सागवानी लाकूड वाहतूक करतांना परवान्यापेक्षा जास्त 42 सागवानी लाकडाचे ओंडके सापडणे, त्या ओंडक्यावरतील बेकायदेशीररित्या बोगस सिल मारुन घेणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वन विभागात अशा प्रकारच्या गैरकारभाराची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. परशुराम उपरकर .....

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये केसरी, फणसवडे या ठिकाणी हिरानंदानी नावाच्या मोठ्या बिल्डरने जमिनी घेतलेल्या आहेत आणि त्या जमिनीवर 1980 च्या वन कायद्याचे उल्लंघन करुन सर्व्हे नंबर 13, हिस्सा नबर 2 या ठिकाणी वॉच केबिन, सर्व्हे नंबर 20, हिस्सा नंबर 3 या ठिकाणी वॉच केबिन, सर्व्हे नंबर 44, हिस्सा नंबर शून्य या ठिकाणी वॉच केबिन,

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ पूर्वी श्री. बरवड 11:15

(श्री. परशुराम उपरकर....

सर्व्हे नं. 54 हिस्सा नंबर 0, शेततळी 4 अशा ठिकाणी बांधकाम केलेले आहे. या संदर्भात मी सातत्याने पत्रव्यवहार केला असता या विभागाच्या अधिका-यांकडून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगितले जाते. हे प्रकरण जमिनीच्या वादातून एमआरटी कोर्टातून हायकोर्टात गेलेले आहे असे सांगून या मोठ्या माणसाला वाचविण्याचा प्रयत्न चालू आहे. या ठिकाणीच्या ब-याचशा जमिनी या 35 सेक्शनच्या आहेत., 61(1) कलमच्या आहेत. या हिरानंदानीने स्वत:च्या 5 कंपन्या तयार करुन शेतक-यांकडून जमिनी घेतलेल्या आहेत. सदर जमीन ही खनिज उत्खननासाठी घेतली जाईल अशा प्रकारचा करारामध्ये उल्लेख करुन या जमिनी शेतक-यांकडून घेतलेल्या आहेत. वास्तविक कलम 161 मध्ये वनोत्तर कोणतीही कारवाई करु नसे अशी तरतूद आहे. जो पर्यन्त सेक्शन 35चा निर्णय होत नाही तोपर्यन्त कोणताही निर्णय करु नये. तरी पण या ठिकणी 5 कंपन्या स्थापन करुन मालवणकर नावाच्या मुखत्याराकडून 5 कंपन्याद्वारे जमीन खरेदी करण्यात आलेली आहे. हा जमिनीचा व्यवहार शासनाला पूर्णपणे खिशात ठेवून केलेला आहे. या जमिनीमध्ये वनस्पती आणि वनौषधी आहेत. यासंबंधी स्थानिक वनाधिका-याने रिपोर्ट पाठविल्यानंतर मुख्य वनसंरक्षक तस्लिम यांनी याठिकाणी भेट दिली व त्यांनीही याठिकाणी मौल्यवान, वनस्पती आणि वनौषधी असल्याचा रिपोर्ट दिला. अशा प्रकारचा रिपोर्ट दिल्यामुळे हा प्रकल्प रद्द होणार अशा बातम्या आल्यानंतर लगेस केसरी फणसवड्याच्या डेम्पो मायनिंगच्या जोशी नावाच्या अधिका-याने प्रेस कॉन्फरन्स घेऊन या वन जमिनी असल्या तरी आम्ही प्रकल्प सुरु करणार असे जाहीर केले. म्हणजे वन विभागाला पूर्णपणे अंधारात ठेवून किंवा वन विभाग माझ्या खिशात असल्यासारखे दाखवून हा प्रकल्प सुरु केलेला आहे. या जमिनी घेऊन 1980च्या वन जमिनी कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. या वन जमिनींची खरेदी कशी काय होते ? या जमिनी मायनिंगसाठी कशा काय वापरल्या जातात ? 1961 कायद्यांतर्गत या जमिनी खरेदी करीत असताना करारावर स्पष्टपणे कसे काय नमूद केले जाते ? याचा शासनाने खुलासा करण्याची गरज आहे.

दुसरे असे की, उडेली आणि शिरंगे या ठिकाणी परप्रांतीयांनी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडलेली आहेत. शिंरगे येथील वृक्षतोड प्रकरणी चौकशी झाल्यानंतर जवळ जवळ 9 लाख झाडे तोडल्याचे निदर्शनास आले. 1400 एकरवरील झाडे तोडलेली आहेत. खरे म्हणजे एवढी प्रचंड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

(श्री. परशुराम उपरकर...

वृक्षतोड झालेली असताना त्याचे अजूनही मूल्यमापन झालेले नाही. जमिनीच्या सीमारेषा परप्रांतीयानी उखडून नष्ट केलेल्या आहेत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला. त्याठिकाणी धरणाच्या पलीकडे ज्या जागा आहेत तेथे दोन केरळीय गटांमध्ये एकमेकांना मारहाण करणे, एकमेकांवर जिलेटीन फेकणे असे प्रकार सुरु झालेले आहेत. ज्याप्रमाणे गडचिरोलीमध्ये नक्षलवादी कारवाया होत आहेत त्याप्रमाणे हे केरळ राज्यातील लोक या ठिकाणी नक्षली कारवाया करु शकतील अशा प्रकारची भीती निर्माण झालेली आहे. या दोडामार्ग तालुक्यामध्ये केरळी लोक मोठ्या प्रमाणावर आलेले आहेत. या केरळी लोकांच्या माध्यमातून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उपद्रव सुरु असून याची देखील चौकशी व्हावी.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

सभापती महोदय, हत्तींबाबत सातत्याने सभागृहात गेली 5-6 वर्षे चर्चा होत आहे. हत्तीबाबत अनेक उपाययोजना झाल्या. दोरखंड लावण्यात आले, सौरउर्जेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला, खंदर खोदण्यात आले. परंतु यामध्ये फार मोठा भ्रष्टाचार झाला आहे. खंदक किती खणण्यात आले याची फेरतपासणी कोणी करण्यास तयार नाही. ती तपासणी होण्याची गरज आहे. आजही माणगाव खोऱ्यात परराज्यातून हत्ती येत आहेत. भविष्यकाळात कर्नाटकामध्ये पाण्याची कमतरता निर्माण होईल त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्हयात उपलब्ध असलेल्या तलावातील पाण्याचा फायदा घेण्यासाठी हत्ती येण्याची शक्यता आहे. त्या भागात असलेल्या फळबागांचे नुकसान होत आहे, मनुष्यहानी होत आहे त्याबाबत कोणतीही उपाययोजना केली जात नाही. हत्तींना बेशुध्द करण्यासाठी इंजेक्शनचा प्रयोग करण्यात आला. 31 लाख रुपये खर्च करण्यात आले. दोन हत्तींना जादा डोस दिल्यामुळे दोन हत्तींचा मृत्यू झाला. सातत्याने त्या भागात हत्ती येतात, त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, त्या भागात सरकारी वनक्षेत्र फार अल्प आहे. खाजगी वनक्षेत्र असले तरी वनाची मोठ्या प्रमाणात तोड होत आहे. तेथील वन अधिकाऱ्यांच्या कृपेने ही वन तोड होत आहे. बांदा येथे मागील महिन्यात एक ट्रक पकडण्यात आला. त्या ट्रकमध्ये सुमारे 42 सागाचे ओंडके सापडले. 16 ओंडक्यांचा पास होता, परंतु 26 ओंडके विनापास असलेले आढळून आले. मात्र त्या ओंडक्यांवर शिक्के मारलेले होते. वन अधिकाऱ्यांकडे असलेले शिक्के त्या ओंडक्यावर मारल्याचे आढळून आले. म्हणजे बोगस शिक्क्यांचा वापर केल्याची शक्यता नाकारता येत नाही. बोगस पासच्या माध्यमातून ओंडके आणण्यात आले होते. वन अधिकारी श्री.पुराणिक यांच्यावर खुनी हल्ला झाला. चाकू हल्ला झाला. वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. परंतु पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल झाली नाही. लाकूड व्यापा-यांशी संगनमत झाले होते का? वन अधिकाऱ्यांवर चाकू हल्ला झाला आणि रात्री 10.00 वाजता तक्रार करण्यासाठी ते पोलीस ठाण्यावर गेले, परंतु तक्रार का दाखल झाली नाही? लाकडाचे व्यापारी आणि पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी संगनमत करुन तक्रार दडपण्यात आली. काही लाकडे पकडली गेली. डेपोमध्ये आणण्यात आली. त्या लाकडांवर असलेले शिक्के कोणी मारले याची चौकशी का झाली नाही? वन अधिकाऱ्यांच्या क्षेत्रातील सागाच्या लाकडांवर बोगस शिक्के कोणी मारले? बोगस शिक्के मारुन पास तयार





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

करण्यात आले. देवगड तालुक्यापासून चार तालुके ओलांडून ही लाकडे बांदा येथे कशी आली? देवगड तालुक्यापासून बांदा येथे जात असताना कणकवली, कुडाळ, सावंतवाडी येथे तीन चौक्या आहेत. त्या तीन चौक्यांच्या ठिकाणी वन अधिकाऱ्यांनी या लाकडाची चौकशी केली नाही का? त्यांच्या अधिकार क्षेत्रातून ही लाकडे कशा प्रकारे पास झाली? अशा प्रकारे बोगस शिक्के मारलेली लाकडे पास होत असतील तर त्या संदर्भात कठोर कारवाई करण्याची गरज आहे. चार दिवसांपूर्वी अशा प्रकारे बोगस पास प्रकरणाची याठिकाणी चर्चा झाली. कुडाळ वन क्षेत्रपाल आणि कणकवली वन क्षेत्रपाल यांच्या अधिकार क्षेत्रातील प्रकरणांची चौकशी झाली. तेथे असलेल्या भरारी पथकामार्फत चौकशी केली असताना कणकवली येथील 12 प्रकरणांपैकी 10 प्रकरणे बोगस असल्याचे आढळून आले. झाडे वेगळयाच ठिकाणची तोडण्यात आली आणि वेगळ्याच झाडांचे पास दिले गेले. कुडाळ वन क्षेत्रपाल यांच्या क्षेत्रातील 14 प्रकरणांपैकी 13 प्रकरणे बोगस आहेत. झाडे तोडली गेली नाहीत. परंतु चोरट्या झाडांचे पास दिले गेले. या बोगस प्रकरणांबाबत कारवाई होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा सृष्टीसौंदर्याने नटलेला आणि निसर्गरम्य असल्याचे म्हटले जाते. तेथे झाडे तोडली जात असल्यामुळे पर्यावरणावर परिणाम होत आहे. आज त्या जिल्हयात भूगर्भातील पाण्याची पातळी 200 फुटापेक्षा जास्त खाली गेली आहे.

नंतर आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

तेथे मोठया प्रमाणावर झाडांची तोड होत असल्यामुळे गेल्या महिन्यामध्ये कोकणातील तापमान 44-45 अंशांवर पोहोचलेले आहे. आंबे गळून पडत आहेत, काजूचे नुकसान होत आहे. अशाप्रकारच्या वातावरणामुळे कोकणातील पर्यावरण नष्ट होत आहे. त्यामुळे वन विभागाने यासंदर्भात कठोरपणे कार्यवाही केली पाहिजे. त्याचप्रमाणे मौजे केसरी येथे वन खात्याचे उल्लंघन करुन बांधकाम होत असल्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी वन विभागाच्या अंतर्गत येणा-या विविध 5 विषयाच्या संदर्भात ही अर्धा तास चर्चा उपस्थित करुन त्याबाबतचा उहापोह केलेला आहे. त्यातील प्रत्येक विषयाबाबत मी खुलासेवार उत्तर देण्याचा सुध्दा प्रयत्न निवेदनाद्वारे केलेला आहे. त्यांचा पहिला आक्षेप असा आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सावंतवाडीमधील मौजे केसरी येथे सर्व्हे क्रमांक 5 आहे त्याठिकाणी वन कायदा, 1927 च्या कलम 35 चे उल्लंघन झालेले आहे. तेथे वेगवेगळया प्रकारचे बांधकाम सुरु आहे. त्याला प्रतिबंध करण्यात यावा. हिरानंदानी ग्रूप ऑफ कंपनी, पवई, मुंबई या कंपनीचे श्री.सुरेश सुखमल यांनी या परिसरामध्ये जमीन खरेदी करुन विविध ठिकाणी बांधकाम केलेले आहे. त्याठिकाणी पाईप लाईन टाकण्याचे काम केलेले आहे, काही ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम केलेले आहे, चर काढण्याचे काम केलेले आहे, अशाप्रकारची कामे या क्षेत्रात केलेली आहे. कलम 35 मधील तरतुदीनुसार एखादी जमीन खाजगी असेल परंतु ती जमीन वन सदृश्य असेल तर त्याठिकाणी कोणतेही काम करण्यापूर्वी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते अशाप्रकारची त्या कायद्यात तरतूद आहे. अशी तरतूद असताना सुध्दा त्यांनी कोणतीही परवानगी घेतली नाही. परवानगी न घेताच त्यांनी हे बांधकाम सुरु केलेले आहे. म्हणून वन विभागाच्या अंतर्गत हायकोर्टाच्या निर्णयानुसार वनक्षेत्रपाल, सावंतवाडी यांनी 474 अंतर्गत दिनांक 13.2.2008 अन्वये पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे, वन विभाग केवळ फौजदारी गुन्हा दाखल करुन थांबलेले नाही तर उच्च न्यायालयामध्ये त्यांनी 4163/06 अंतर्गत याचिका दाखल केलेली आहे. हायकोर्टाचा त्यांनी अवमान केल्यामुळे याचिका दाखल केली आहे. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविलेला आहे. त्याचप्रमाणे डीएफओ यांनी पीसीसीएफ, नागपूर यांना कळवून त्या जागेला प्रत्यक्षात भेट दिलेली आहे. याचा अर्थ त्यांना सहाय्य करण्याऐवजी कायद्याची अंमलबजावणी होत आहे. विभागीय स्तरावर जी काळजी घेणे आवश्यक आहे ती घेतली जात आहे, कायदेशीर बाबींची पूर्तता केली जात आहे. सभापती महोदय, कागदोपत्री कार्यवाही झाली म्हणजे सरकारचे कर्तव्य संपले असे समजत नाही. या उपरही या खात्याला जे अधिकार आहेत त्याचा वापर करुन पुढील काळामध्ये बांधकामावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने जरुर प्रयत्न केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी वर्तमानपत्राचा दाखला दिला आहे.

यानंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ..........

त्यामुळे या कंपनीचा डायरेक्टर म्हणतो की कितीही बंधन आले तरी सुध्दा आम्ही हे करणार त्याला अर्थ नाही. कारण कोण काय म्हणतो आणि कोण काय करतो यापेक्षा आपण काय करतो याला महत्व आहे. मला सन्माननीय सदस्यांना अवगत केले पाहिजे की, आमच्या विभागाकडून यासंदर्भात दिरंगाई अथवा निष्काळजीपणा होत असेल तर आजपासून अधिक गांभीर्याने पाहिले जाईल. तसेच जे अधिकार आम्हाला या कायद्यानुसार मिळालेले आहेत त्यांचा वापर करुन ही कंपनी जर नियमांचे उल्लंघन करुन अशा प्रकारे मस्तीत वागत असेल तर त्याला लगाम घालण्याचे काम सुध्दा शासनाच्या वतीने करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा मुद्दा म्हणजे मौजे केसरी व फणसवडे येथील जमीन खनिज उद्योगासाठी वापरण्यास सुरु केली आहे व तशी परवानगी सुध्दा देण्यात आली आहे, तसा करार केलेला आहे असेही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार अशा प्रकारचा कुठलाही करार करण्यात आलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी जर तशी माहिती दिली तर सेक्शन 35 अंतर्गत जी प्रिकॉशन घेणे आवश्यक आहे, कायद्याची बूज राखण्याची आवश्यकता आहे ती राखली जाईल असेही मी आश्वासन देत आहे.

त्यानंतर हत्तींच्या बाबतीत सुध्दा त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. या सभागृहात मागील आठवड्यातच नियम 93 अन्वये हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्या सूचनेला मी अतिशय विस्ताराने उत्तर दिले होते. मी सांगितले होते की, हत्तींचे जे सुळे कापण्यात आले होते त्यांची लांबी तसेच डायामीटर किती आहे येथून तर दोन हत्ती मेले एवढी माहिती सुध्दा मी दिली होती. यातील एक हत्ती अतिसारामुळे मरण पावला. त्यावेळेस विभागामार्फत जवळपास 400 सलाईन्स लावण्यात आल्या होत्या. एवढी काळजी घेतल्यानंतर सुध्दा यातील दोन हत्ती मेले. हे हत्ती गोव्याकडून आले होते. त्यात एक पिल्लू असून ते जखमी अवस्थेत होते. कुठेतरी शिकारी लोकांनी गावठी बॉम्ब वगैरे ठेवला असावा आणि तो त्या पिल्लाने खाल्ल्यामुळे त्याच्या तोंडात जखम आढळून आली होती. त्यांना वाचविण्यासाठी 18 दिवस विभागाकडून शर्थीचे प्रयत्न करण्यात आले तरी देखील हे दोन हत्ती मरण पावले. उर्वरित दोन हत्तींमधील एक हत्ती प्रशिक्षीत केला आणि तेथील प्रशिक्षीत करुन आणलेल्या हत्तींकडून, रानटी हत्ती, जे हैदोस घालतात, पिकाचे

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ........

नुकसान करतात, आज सुध्दा वर्तमानपत्रात मी अशा प्रकारे नुकसान केल्याचे फोटो पाहिले, त्यात हत्तींनी नारळाची झाडे, पोफळीची झाडे पाडली, अशा हत्तींना पळवून लावण्यासाठी तसेच या परिसरात ते पुन्हा येऊ नयेत म्हणून असे प्रशिक्षीत हत्ती चांगल्या प्रकारे काम करतात. हा प्रयोग सुरु केल्यानंतर आपण पाहिले तर गेल्या वर्षीपर्यंत 2.50 कोटीचे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले होते ते यावर्षी 25 लाखापर्यंत आले. अशा प्रकारे आपण काही अंशी यामध्ये यशस्वी झालो आहोत.

त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी यावर 31 लाख रुपये वन विभागाने खर्च केला असाही मुद्दा उपस्थित केला. त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या कामासाठी 1.04 कोटी एवढा खर्च शासनाने केलेला आहे. तो यासाठी की हत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी बाजारातून दोरखंड विकत आणावे लागतात. या दोरखंडांचे बंडल प्रत्येकी 4800 रुपये एवढया किमतीचे असते. त्यानंतर तिखट व मसाला व ऑईल सुध्दा लावावे लागते. त्याच्या वासामुळे हत्ती येत नाहीत. अशा प्रकारचा कर्नाटक आणि आंध्र प्रदेश सरकारचा अनुभव असल्यामुळे हे मटेरियल आपण विकत घेतले, त्याचबरोबर रोप वगैरे आणावे लागले. अशा प्रकारे हत्तींचा बंदोबत्त करण्यासाठी आणखी आपण सौर उर्जेचे कुंपण तयार केले. हत्तींना प्रथम बंद करण्यासाठी खंदक खणावे लागले. अशा प्रकारे हत्ती येऊ नयेत म्हणून मोठ्या प्रमाणावर कंपाऊंड वॉल सुध्दा घालावे लागले आहे......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

अशा वेगवेगळया उपायांसाठी 37.43 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेले असून असा एकंदर खर्च 1.4 कोटी रुपये झालेला आहे. हा जो खर्च झालेला आहे तो शेतक-यांच्या जिवितापेक्षा, मालमत्तेपेक्षा किंवा सर्वसामान्य माणसाच्या जीवनापेक्षा जास्त नसल्यामुळे हा खर्च करण्यात आलेला आहेत हे मी येथे सांगू इच्छितो. जो खर्च झालेला आहे तो आपल्याला डोळयाने दिसून येतो आहे. या खर्चामध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही.

तेथील वन अधिकारी गेल्या 3-4 वर्षापासून रांत्रदिवस हत्तींना रोखण्याच्या संदर्भात काम करीत आहेत. या अधिका-यांजवळ मोबाईल नाही, वॉकीटॉकी नाही किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक सामान नसतांनाही हे अधिकारी, कर्मचारी काम करीत आहे. हे हत्ती फार हुशार आहेत. समजा एखाद्या गुप्त ठिकाणी, हत्ती आसपास येऊ नये यासाठी पहारा ठेवला जातो व त्या घरात हत्तींवर चर्चा होते परंतु ज्याच्या घरात हत्तींना रोखण्यासाठी चर्चा झालेली असते त्यानंतर चार पाच दिवसांनी ज्याच्या घरात चर्चा झालेली असते त्याच्या शेताचे नुकसान हत्ती करतात. किंवा एखाद्या गुप्त ठिकाणी हत्तींना रोखण्यासाठी चर्चा सुरु असते त्या घराचे छप्पर हत्ती सोंडेने भिरकाऊन देतात. भानामती झाली की, काय अशी शंका मग सुरु होते. अशा असंख्य संकटांना शेतक-याला सामना करावा लागतो आहे. त्यामुळे हत्तीवर उपचार करण्यासाठी आपल्याला काही गोष्टी कराव्या लागतात. हत्तींना रोखण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे कारण आपण लोकप्रतिनिधी असल्यामुळे तुमची, माझी आणि सर्वांचीच ही जबाबदारी आहे.

दुसरा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी केरळी लोकांनी रबर प्लँटेशनच्या नावाखाली खूप मोठया प्रमाणात जंगलाची तोड केलेली आहे. मागच्या वेळी नियम 93 च्या निवेदनात हा विषय होता. मागच्या वेळेस मी सभागृहात कबूल केलेले आहे की, या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात जंगलाची तोड झालेली आहे. या लोकांनी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता तोड केलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. या लोकांडकून कधी 21,44,170 रुपये, तर कधी 1,95,668 रुपये एवढा दंड वसूल केलेला आहे. या लोकांकडून एवढा दंड वसूल केलेला असला तरी आम्ही त्यामध्ये समाधानी नाही. याचे कारण असे आहे की, 500 झाडे तोडण्याची परवानगी घ्यायची, या 500 झाडांचे घनमिटर साधारणत: 500 ते 1000 घनमिटर होते. 1000 घनमिटरची परवानगी घेतली जाते परंतु प्रत्यक्षात वाहतूक पास 10,000, 5,000, 3,000

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

घनमिटरचा निर्गमित होतो. ज्यांना 1000 घनमिटर लाकूड नेण्याची परवानगी दिलेली आहे ते प्रत्यक्षात खूप मोठया प्रमाणात लाकूड बाहेर नेतात. या लोकांना जादा घनमिटरचे पास कसे मिळतात हे आम्ही शोधलेले आहे. हजारो झाडे तोडल्यानंतर जी गोष्ट फ्लाईंग स्कॉडच्या लक्षात येते ती पूर्वीच तुमच्या लक्षात का येत नाही? आमच्या खात्यातील असलेला हा दोष आता आमच्या लक्षात आलेला आहे. यामध्ये आम्ही अधिका-यांना आधी समज देऊन संधी दिलेली आहे. यासंदर्भातील विषयाची चर्चा मागे झालेली असल्यामुळे आता तेच उत्तर देणे मला उचित वाटत नाही. अधिका-यांनी कितीही गुळमुळीत उत्तरे दिली असली तरी आम्हाला यामध्ये काय प्रकार झालेला आहे हे समजत असते. पुढील काळात यासंदर्भात पुन्हा चर्चा झाली किंवा अधिका-यांनी चूक केली तर मी आज आपल्याला आश्वासीत करतो की, अशी चूक करणा-या कोणत्याही अधिका-याला माफी दिली जाणार नाही, किंवा त्यांना सुधारण्याचीही संधी दिली जाणार नाही. या अधिका-यांवर कठोरपणे जी काही ॲक्शन घेणे आवश्यक आहे ती ॲक्शन घेतली जाईल अशी मी या ठिकाणी आपल्याला ग्वाही देतो.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, त्या भागात खनीज असल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात खनिजाचे उत्खनन होत आहे. या विषयावर अगोदर चर्चा झालेली आहे. ज्या जमिनीवर उत्खनन झालेले आहे ती जमीन वन विभागाची नाही.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

या जिल्ह्यातील वन विभागाची जमिनी बघितली तर एकूण क्षेत्रफळाच्या 10 टक्के एवढी आहे. त्यामुळे आमच्या विभागानाने या क्षणापर्यंत वन विभागात उत्खनन करण्याची परवानगी दिलेली नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे 1927 च्या कायद्यातील कलम 35 प्रमाणे नियमाचे उल्लंघन होत असेल तर आमच्या विभागाला देखील डोळेझाक करता येणार नाही. त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. म्हणून आमच्या विभागाला देखील सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. आपल्या कर्तव्यामध्ये कसूर करू नका अशा सक्त शब्दांमध्ये सूचना निदेश दिले जातील अशा प्रकारची ग्वाही मी येथे देतो.

आता राहता राहिला पाचवा प्रश्न. तो सावंतवाडी तालुक्यातील आहे. सावंतवाडी तालुक्यातील बांदा-पणजी रस्त्यावर टाटा कंपनीचा मॉडेल नंबर 608 चा टेम्पो पकडला. यात एकूण 29 झाडे सागवानाची आणि 2 झाडे शिवणीची मिळाली. यात काय झाले हे मी आपल्याला थोडक्यात सांगातो. संबंधिताने 7 सागवान झाडांचा आणि 3 शिवणीच्या झाडांचा परवाना घेतला आहे. जेवढ्या झाडांचा परवाना घेतला होता त्यापेक्षा अधिकची झाडे तोडलेली आहेत, हे मान्य करावे लागेल. संबंधिताने निर्गमित पास घेतला आहे, परवाना घेतला आहे. झाडे तोडताना इकडे-तिकडे हात जातो. मी नाही असे म्हणत नाही. संबंधिताला वाहतूक पास देण्यापूर्वी शिक्का मारावा लागतो. ते शिक्का मारण्याचे कामसुद्धा झालेले आहे. हा प्रकार नुकताच उघडकीस आलेला आहे. त्यामुळे या विभागाचे जे वनपाल आहेत त्यांना जबाबदार धरून त्यांच्याविरूद्ध कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मी येथे असेही सांगेन की, केवळ वनपालाची जबाबदारी आहे, अशातला भाग नाही. वन क्षेत्रपालाची देखील जबाबदारी आहे. पासेस निर्गमित करणे ही त्याची देखील जबाबदारी आहे. त्यामुळे त्याने याकडे दुर्लक्ष केले आहे म्हणून तिथल्या वन क्षेत्रपालाने चुक केली की काय हे देखील आम्ही निश्चितपणे तपासून बघू. यात वनपाल दोषी ठरत आहे, त्याप्रमाणे वन क्षेत्रपाल दोषी ठरत असेल तर त्याला सुद्धा त्याच न्याय दंडाने मोजले जाईल अशा प्रकारची ग्वाही सन्माननीय सदस्यांना देतो. वन विभागात काही सुधारणा करणे आवश्यक आहे, काही गोष्टींची दखल घेणे आवश्यक आहे. माननीय वन मंत्र्यांनी नुकतीच एक घोषणा केली की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

कोकणामधील एकही झाड तोडले जाणार नाही. आज कोकणामध्ये खूप मोठा हाहाकार माजला आहे. तेथे खूप मोठ्या प्रमाणावर आंदोलने व्हायला लागली आहेत. सन्माननीय सदस्यांना त्रास होतो की नाही हे मला माहित नाही. मी काल जिल्ह्यामध्ये गेलो होतो. मी रेल्वे स्टेशनला आल्यानंतर हजारो लोक तेथे होते. दोन दिवसापूर्वी मी जिल्ह्यामध्ये गेलो होतो. त्यावेळी हजारो लोक मला भेटायला आले आणि म्हणाले आपण करताय काय ? आपण कोकणातील वन राज्यमंत्री आहात. बंधने जरूर आणा. बंदी आणा. पास जिल्ह्याच्या बाहेर निर्गमित करायचे की नाही हा निर्णय करा. माझ्या रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 0.8 टक्के वन जमीन आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 10 टक्के वन जमीन आहे. उर्वरित सगळी जमीन ही खाजगी आहे. आमच्या घरादाराकरिता, आमच्या दैनंदिन वापराकरिता, गरजेकरिता आपण लाकड्याच्या एका तुकड्याला हात लावू देणार नसाल तर आम्ही आपल्याला कोकणामध्ये फिरणे अवघड करू. म्हणून याचा देखील आपण सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे. मी येथे सन्माननीय सदस्यांच्या पाचही प्रश्नाला येथे उत्तर दिलेले आहे. यासंबंधात योग्य ती दखल घेण्याचे काम माझा विभाग करीत आहे, एवढेच मी सभागृहाला आश्वासित करतो.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणावर खनिज प्रकल्प होत आहेत. त्या निमित्ताने जनसुनावण्या होत आहेत. त्यामध्ये दुर्मिळ झाडे तोडली जात आहेत. त्यामुळे यासंबंधात देखील वन विभागाने माहिती काढण्याची गरज आहे. तशा प्रकारची माहिती वन विभाग घेणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जे जे म्हणून आमच्या अखत्यारित येते त्यासंबंधी आम्ही काळजी घेऊ.

...............

...

**(सभापतीस्थान माननीय उप सभापती)**

**पृ. शी.** :राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाकालावधीतील सेवाखंड सेवानिवृत्त होताना क्षमापित करणे

**मु. शी.** : :राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाकालावधीतील सेवाखंड सेवानिवृत्त होताना क्षमापित करणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :- " "

"राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाकालावधीतील सेवाखंड सेवानिवृत्त होताना क्षमापित करुन सेवाखंड पूर्वीची सेवा ग्राह्य धरण्याची तरतूद असणे, सेवाखंड क्षमापनाचे प्रस्ताव शिक्षण उपसंचालक व सचिव पातळीवर क्षमापित करण्याची पध्दत असणे. सन १९७४ नंतर चे सेवाखंड शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर क्षमापित करण्याची तरतूद असणे, सचिव स्तरावर मंजूर होणारे १९७४ नंतरचे सेवाखंड क्षमापनाचे प्रस्ताव नामंजूर करुन सेवाखंड क्षमापित करताना भेदभाव करणे. सेवाखंड क्षमापनाबाबत मा.न्यायालयाने निर्णय देवूनही त्याची अंमलबजावणी न होणे. सेवाखंड क्षमापनाच्या शासन निर्णयातील त्रुटी दूर करण्याचा निर्णय मा.मंत्री महोदयांच्या बैठकीत होऊनही त्याची अंमलबजावणी न होणे व जाणीवपूर्वक बैठकीचे इतिवृत्त न देणे. सेवाखंड क्षमापनाच्या बाबतीत शासनाने शिक्षकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सेवाखंड क्षपापनासंबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. अनुदानीत संस्थामधील जे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आहेत, यांच्या सेवेमध्ये काही अपरिहार्य करणामुळे खंड पडला असेल तर

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ....

त्या सेवाखंडा पूर्वीची सेवा सबंधित शिक्षकाच्या सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राहय धरण्याच्या संदर्भात तो सेवाखंड क्षमापित होणे आवश्यक आहे. या सबंधी शासनाने जो आदेश काढलेला आहे त्या आदेशानुसार हा सेवाखंड क्षमापित होत असतो. दिनांक 14 ऑक्टोबर 1971 रोजी शासनाने जो जी आर काढला होता त्या जी आर च्या अनुषंगाने सेवा खंड क्षमापनाचे अधिकार जो अधिकारी पेन्शन मंजूर करतो त्या अधिका-याला आहे. दिनांक 14 ऑक्टोबर 1971 च्या जी.आर.मध्ये असे म्हटलेले आहे की, "As the Regional Deputy Director of Education is the Pension sanctioning authority, the breaks should be condoned by the Regional Deputy Director of Education only." परंतु या संदर्भात शासनाने बदल केला आहे आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी पेन्शन मंजूर करण्याचा अधिकार शिक्षण उप संचालका ऐवजी शिक्षणाधिका-यांना देण्यात आलेला आहे. या चर्चेच्या अनुषंगाने मला माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. आतापर्यंत सेवा खंड क्षमापनाचे जे अधिकार शिक्षण उप संचालकांना दिलेले आहेत त्यात बदल करुन, त्याचे विकेन्द्रीकरण करुन पेन्शन सॅक्शनिंग ॲथारिटी शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांनाच हे अधिकार देण्यात येणार आहे काय ? सेवा खंड क्षमापनाच्या बाबतीत दिनांक 13.4.2000 रोजी या सभागृहात चर्चा झाली होती त्या चर्चेला उत्तर देतांना मला असे सांगण्यात आले होते की, "आपण उपस्थित केलेली प्रकरणे माझ्याकडे द्यावीत आणि आपण उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात या सर्व प्रकरणाची पडताळणी करुन आम्ही त्याचा निर्णय घेऊ." या संदर्भात मी दिनांक 20.6.2006 रोजीशासनाला पत्र पाठविले होते. गेल्या चार वर्षापासून सेवा खंड क्षमापनासबंधीचा एकच विषय मी सातत्याने सभागृहात मांडत आहे. सभापती महोदय, या संदर्भात शासनाडून मला एकच उत्तर देण्यात आले आहे की, ही बाब नियमामध्ये बसत नाही . वास्तविक शिक्षण राज्य मंत्र्यांकडे या संबंधी दिनाक 8 ऑगस्ट 2007 रोजी एक बैठक घेण्यात आली होती. सतत चार वर्षे मागणी करुन देखील त्या बैठकीचे इतिवृत्तसुध्दा मला मिळाले नाही. त्याचबरोबर या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली होती हे देखील सांगण्यात आले नाही. माझ्या पत्राला उत्तरसुध्दा दिले नाही.

त्यामुळे माहितीच्या अधिकाराचा उपयोग करुन आणि त्याचे पैसे भरल्यानंतर मला ही माहिती मिळाली आहे.दिनांक 8 ऑगस्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ....

2007 रोजी माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी जी बैठक घेतली होती त्या बैठकीत दोन निर्णय घेण्यात आले होते. श्री कुलकर्णी नावाच्या मुख्याध्यापकांचे प्रकरण मान्य करण्याचा एक निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला होता. त्याचबरोबर शासनाचे सेवा खंड क्षमापनाचे दिनांक 10 मे 1989 चे परिपत्रक असून त्यामध्ये काही त्रृटी आहेत त्या त्रृटी माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी या त्रृटी मान्य केल्या होत्या व दिनांक 10 मे 1989 च्या परिपत्रकामध्ये ज्या त्रृटी आहेत त्यामध्ये तातडीने बदल करावेत असे निदेश माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी संबंधित अधिका-यांना दिले परंतु गेल्या चार वर्षापासून या परिपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. त्या विभागात श्री.लुबाड नावाचे एक कक्ष अधिकारी आहेत त्यानी असे सागितले की हे काम माझे नसून दुस-या उप सचिवांचे आहे. त्यामुळे यासबंधीची टिप्पणी मी तयार करणार नाही दुस-या उप सचिवांनी ही टिप्पणी तयार करावी. आजही त्यांनी हे प्रकरण दाबून ठेवलेले आहे.सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना अधिका-यांनी जी माहिती दिली असेल त्या माहितीच्या आधारावर माननीय मंत्री महोदय उत्तर देतील हे मला माहीत आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये श्रीमती शुभदा कर्वे यांचे एक प्रकरण गेले होते त्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे जो निकाल दिला होता त्याची प्रत माझ्याकडे आहे.या प्रकरणाच्या संदर्भात शासनाच्या वतीने जे प्रतिज्ञापत्र दाखल केले होते ते चुकीच्या पध्दतीने आणि चुकीची माहितीच्या आधारे केले होते आणि सर्वोच्च न्यायालयाची दिशाभूल करुन शासनाने आदेश मिळवला आहे. त्या आदेशाचा संदर्भ घेऊन शासनाकडून आम्हाला सांगितले जाते परंतु या राज्यातील अनेक प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णय दिलेले आहेत पण त्याची दखल मात्र घेतली जात नाही.

नंतर श्री.सरफरे s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर माननीय मुंबई उच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्या अनुषंगाने सेवाखंड क्षमापनाच्या बाबतीत आपण निर्णय घेणार काय? याठिकाणी हा विरोधाभास कसा निर्माण झाला? सभापती महोदय, सेवाखंड दोन स्तरावर क्षमापित होतात. एक म्हणजे शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर एक वर्षापेक्षा कमी कालावधी असेल तर होतात, आणि दुसरे म्हणजे एक वर्क्षापेक्षा जास्त कालावधी असेल तर सचिव पातळीवर सेवाखंड क्षमापित होतात. सेवाखंड क्षमापित करण्याच्या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. 1974 नंतरचे सेवाखंड क्षमापित करु नयेत यासंबंधीचा पूर्वीचा असलेला आदेश शासनाने रद्द केला. 11 ऑगस्ट 1988 ला आपण त्यासंबंधीचा जी.आर. काढला. 1974 नंतरचे सेवाखंड क्षमापित करावेत असे आपल्या आदेशामध्ये म्हटले आहे. शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर शिक्षकांच्या बाबतीत 1974 नंतरचे सेवाखंड, शिक्षकेतरांच्या बाबतीत 1975 नंतरचे सेवाखंड क्षमापित होतात. परंतु सचिव स्तरावर जे सेवाखंड क्षमापनासाठी सादर होतात. त्यामध्ये शिक्षकांच्या बाबतीत 1974 नंतर व शिक्षकेतरांच्या बाबतीत 1975 नंतरचे आहेत ते सचिवांच्या स्तरावर क्षमापित होत नाहीत. म्हणजे एक वर्षाच्या आतील सेवाखंड शिक्षण उपसंचालक क्षमापित करु शकतात. 1974 नंतरचे सेवाखंड क्षमापित करण्याचे आदेश आपण दिले आहेत. केवळ दि.10.5.1989 च्या जी.आर. मध्ये तशाप्रकारचा क्लॉज नाही. हा जी.आर. आपल्या विभागाने काढलेला आहे. तो क्लॉज चुकून राहिला आहे हे मंत्रिमहोदयांनी बैठकीमध्ये मान्य केले आहे. तो जी.आर. दुरुस्त करण्याचे मान्य केलेले असतांना मागील 4 वर्षामध्ये त्या जी.आर. मध्ये दुरुस्ती होऊ शकली नाही. या दरम्यान आमचे अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्त झाले. परंतु केवळ 1974 नंतरचा सेवाखंड आहे म्हणून ते सेवाखंड क्षमापित होऊ शकले नाहीत. या अनुषंगाने दि.10.5.1989 च्या जी.आर. मध्ये शासन स्तरावर सेवाखंड क्षमापित होऊ शकतात. त्यामध्ये शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर शिक्षकांच्या बाबतीत 1974 नंतर व शिक्षकेतरांच्या बाबतीत 1975 नंतरचे सेवाखंड क्षमापित होऊ शकतात त्याप्रमाणे् सेवाखंड क्षमापित करण्यासंबंधी जी.आर.मध्ये दुरुस्ती करण्यासंबंधीचे आदेश आपण काढणार काय? तिसरे असे की, सचिव पातळीवर येणाऱ्या प्रस्तावांची छाननी न करता 1974 नंतरचे प्रस्ताव रिजेक्ट केले जातात. परंतु त्यामध्ये जे पाच निकष दिले आहेत. त्या पाच निकषांमध्ये बसत नसलेले सेंवाखंड क्षमापनाचे प्रस्ताव आपण जरुर फेटाळावेत. त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. परंतु या अटीमध्ये बसणारे प्रस्ताव असतांना सुध्दा सचिव पातळीवरील हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. रामनाथ मोते....

प्रस्ताव नाकारले जात आहेत. हा पैश्याचा प्रश्न नाहीतर ही एक तांत्रिक बाब आहे. आणि म्हणून हे सर्व विषय आपण गांभीर्याने घेऊन त्यामध्ये सुधारणा करणार काय? तसेच, या विषयासंदर्भात चार वर्षापूर्वी चर्चा उपस्थित केली असतांना आजही मला याठिकाणी चर्चा उपस्थित करावी लागत आहे हे माझे दुर्दैव आहे. या विषयाची मंत्रिमहोदयांना जाणीव असल्यामुळे आपण हा विषय तातडीने मार्गी लावावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

अधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी अर्धा तास चर्चा उपस्थित करीत असतांना एक गंभीर बाब आपल्या निदर्शनास आणली आहे. सभागृहाच्या दृष्टीने ती अतिशय महत्वाची बाब आहे. त्यांनी सांगितले की, मी वारंवार पत्र दिल्यानंतर त्याची पोच दिली जात नाही, उत्तर दिले जात नाही, आणि कार्यवाही झ ााल्याचेही सांगितले जात नाही. त्यासाठी त्यांना माहितीच्या अधिकाराचा वापर करावा लागतो. सभापती महोदय, आपण पत्र दिल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांकडून देखील त्याचे उत्तर तात्काळ दिले जाते, त्याची पोच आपल्याला मिळते, आणि कार्यवाही सुध्दा आपल्याला समजते. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांकडून एखादे पत्र दिल्यानंतर शासनाकडून त्याची पोच दिली जात नसेल तर ती गंभीर बाब आहे. आणि म्हणून या गंभीर विषयाची शासनाने तात्काळ दखल घ्यावी हे मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

-*-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सेवानिवृत्ती वेतन मिळण्यासाठी सेवाखंड क्षमापन करण्याचा विषय माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे.

यामध्ये उपसंचालकांच्या पातळीवर एक सेवाखंड क्षमापन होते, त्याचप्रमाणे सचिवांच्या स्तरावर दुसरे सेवाखंड क्षमापन होते. यामध्ये त्यांनी मुख्य मुद्दा असा उपस्थित केला की, 1974 व 1975 नंतर ज्यांची सेवा आहे, त्यांना हा नियम लागू नाही असा शासनाचा आदेश आहे. तसे शासनाचे परिपत्रक आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

सभापती महोदय, 1973-74 नंतर शासनाने शिक्षकांना काही सुविधा दिलेल्या आहेत. त्यानुसार त्यांचे पगार बँकांच्या मार्फत होतात. तसेच त्यांना 20 वर्षानंतर रिटायर झाल्यानंतर पूर्ण पेन्शन मिळते. त्यांना जॉब सिक्युरिटी देण्यात आलेली आहे आणि सर्व्हीस कंडोनेशन ही नियमित झ ालेली आहे. त्यामुळे 1974-75 नंतरच्या प्रस्तावास मंजूरी देऊ नये असे शासनाचे धोरण आहे आणि त्यानुसार याची अंमलबजावणी होत आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये सुप्रीम कोर्टाच्या जज्जमेंटचा उल्लेख केला आहे, तो खूप स्पष्ट आहे. मी तो वाचून दाखवते. त्यामध्ये म्हटलेले आहे की, "On the basis of the Government Notification dated 10-5-1989 whereunder the power to condone the break in service exceeded the period of 2 years does not vest with the Government. The High Court has committed error in issuing the aforesaid directions that being the case the appeal is allowed. The order passed by the High Court is set aside." म्हणजे शासनाला हा अधिकार नाही आणि यामध्ये चूक केलेली आहे असे हाय कोर्टाकडून सांगण्यात आले आहे. पुढे असे म्हटलेले आहे की ",..and this Court further ordered that this order be punctual, observed and carried into execution by all concerned." म्हणजे अशा प्रकारचे स्पष्ट आदेश असताना 1974-75 नंतर सेवाखंड क्षमापनाच्या प्रस्तावास मंजूरी द्यावी ही बाब चुकीची आहे असे मला वाटते . . . .

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदया जे उत्तर देत आहेत, त्याला काही अर्थ नाही. आम्ही यामधील जो मूळ मुद्दा आहे, त्यासाठी गेल्या चार वर्षापासून भांडत आहोत आणि शासनानेही ही बाब मान्य केलेली आहे,त्यांचेच परिपत्रक आहे.परंतु याठिकाणी खोटी माहिती देण्यात आलेली आहे.माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये एवढे काही सांगण्याची गरज नाही.शासनाचे दि.10-5-89 रोजीचे परिपत्रक आहे.त्यातील मुद्दा क्र.2 मधील मुद्दा हा सचिव पातळीवरील आहे. यामध्ये शिक्षण उप संचालकांच्या स्तरासंबंधात म्हटलेले आहे. "शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बाबतीत सेवाखंड अनु.74 व दिनांक 31-12-1975 नंतरचे असू नयेत असे सचिव पातळीवरच्या सेवा खंड क्षमापनाच्या संदर्भात म्हटलेले आहे. पण याठिक्ाणी शासनाचेच दि.11 ऑगस्ट 1988 चे पत्र आहे. 1974 नंतरचे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 1975

. . . .ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतरचेही सेवाखंड क्षमापित करण्यात यावेत. मी हा आदेश घरी तयार केलेला नाही, तर शासनाने काढलेला आहे. तो या जी.आर.मध्ये इन-कॉर्पोरेट केलेला आहे. माझा विषय फक्त एवढाच आहे की, शिक्षण उप संचालकांच्या स्तरावर 1974 नंतरचे सेवाखंड क्षमापित होऊ शकतात. तर सचिव पातळीवर ते का होऊ शकत नाहीत ? असा माझा प्रश्न असून, त्यानुसार शासन यामध्ये दुरुस्ती करणार आहे काय ? याचे मला उत्तर हवे आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचा निर्णय एवढा स्पष्ट आहे की, हा अधिकार शासनाला नाही. जर ते सर्क्युलर आहे . . . .

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मग शासन आपले निर्णय रद्द करणार आहे काय ? कारण शासनाने 1974 नंतरचे सेवाखंड क्षमापित करण्याबाबतचा जी.आर.काढला आहे आणि तुम्ही हे मान्य केलेले आहे की, दि.10-5-89 ज्या जी.आर.मध्ये सुधारणा करीत आहोत. मग शासनाने हे सर्व जी.आर.रद्द केलेले आहेत काय ? की, फक्त शिक्षकांची फसवणूक करणार आहात ? असा माझा प्रश्न आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना याबाबत वेळोवेळी कळविलेले आहे. त्यांच्या सोबत बैठकाही झालेल्या आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माहितीच्या आधाराअंतर्गत मी पैसे भरल्यानंतर माहिती दिलेली नाही . . . .

**उपसभापती** : याठिकाणी जुगलबंदी सुरु आहे काय ?

श्रीमती फौजिया खान :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत विभागाकडे पत्र पाठविलेले आहे. अशा प्रकारे लोकप्रतिनिधींनी माहिती मागविल्यानंतर जर अधिकारी माहिती देत नसतील तर त्याची जरुर दखल घेतली जाईल आणि अशा अधिकाऱ्यांवर देखील . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, आम्ही अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करु. कारण सन्माननीय सदस्यांना माहितीच्या अधिकाराचा वापर करण्याची वेळ येऊ नये.जर असे झाले तर ..

ओ-3



श्रीमती फौजिया खान . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्ही संबंधित अधिकाऱ्यांवर जरुर कारवाई करु. याशिवाय सन्माननीय सदस्यांनी कक्ष अधिकाऱ्याबद्दल उल्लेख केलेला आहे की, त्यांच्याकडे चार वर्षापासून एक प्रकरण प्रलंबित आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फोजिया खान....

त्याबाबतीत माहिती घेऊन ते तपासून घेण्यात येईल्. जर त्यामध्ये ते दोषी आढळून आले तर त्याबाबतीत सुध्दा कारवाई करण्यात येणार आहे. पण सन्माननीय सदस्यांनी जी परिस्थिती सांगितली आहे त्याबाबतीतील सत्यता तपासून घेण्यात येईल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य जेव्हा सभागृहात एखादी गोष्ट सांगतात तेव्हा ती शासनाला सत्य मानावीच लागते, सत्य मानायची असते. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे सांगितलेले आहे ते सगळे ग्राहय धरुन अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्याकडे याबाबतचे सगळे पुरावे आहेत. त्यांनी याठिकाणी सगळे कागदपत्र दाखविले आहेत. माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी सगळी माहिती मागविलेली आहे.

प्रा. फौजिया शान : सभापती महोदय, याबाबतची चौकशी करुन कारवाई करण्यात येइल.

**उपसभापती** : अनेकवेळा चौकशी करण्यामध्ये खूप वेळ जातो.

प्रा. फौजिया खान : यामध्ये दुसरी काही कारणे आहेत काय? तसेच कायदेशीर बाबी काय आहेत? याबाबतची चौकशी करावी लागेल. 1974-75 नंतरचे शिक्षक शिल्लकच राहिलेले नाहीत. ते सगळे सेवानिवृत्त होऊन खूप वर्षे झालेली आहेत. परंतु काही वैयक्तिक प्रलंबित प्रश्न असतील तर सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या लक्षात आणून द्यावेत त्याबाबतीत काय कार्यवाही करता येईल या दृष्टिकोनातून ती बाब तपासून निर्णय घेण्यात येईल्.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, यासंदर्भातील चर्चेसाठी माननीय मंत्रिमहोदया वेळ देतील काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, चर्चेसाठी जरुर वेळ देण्यात येईल.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ 12:00

**पृ.शी.**: कोल्हापूर, सांगली जिल्हयांतील अनेक बँकांनी चुकीच्या पध्दतीने दिलेल्या कर्जामुळे अडचणीत आलेल्या बँका.

**मु.शी.**: कोल्हापूर, सांगली जिल्हयांतील अनेक बँकांनी चुकीच्या पध्दतीने दिलेल्या कर्जामुळे अडचणीत आलेल्या बँका या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 901 ला दिनांक 14 डिसेंबर,2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. चंद्रकांत पाटील वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "कोल्हापूर,सांगली जिल्हयांतील अनेक बँकांनी चुकीच्या पध्दतीने दिलेल्या कर्जामुळे अडचणीत आलेल्या बँका" य विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 902 ला दिनांक 14 डिसेंबर,2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, गेल्या काही वर्षापासून सांगली आणि कोल्हापूर या दोन जिल्हयामध्ये अनेक बँका नियमबाहय कर्ज दिल्यामुळे आणि त्या कर्जाची वसुली न झाल्यामुळे बंद पडलेल्या आहेत. त्यासंदर्भात मी मागच्या अधिवेशनात एक प्रश्न उपस्थित केला होता परंतु त्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, कुठल्याही जिल्हयामध्ये प्रामुख्याने सामान्य माणसे एकत्र येऊन त्यांच्या आर्थिक गरजांच्या आवश्यकतेपोटी काही बँका स्थापन करतात. कालानुक्रमे राजकीय मंडळी त्यांचे व्यक्तिगत हितसंबंध जपण्यासाठी या बँकावर संचालक म्हणून येतात. त्यावेळेला ते त्यांच्या संबंधातील लोकांना कोणत्याही प्रकारचे नियम न पाळता, आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण न करुन घेता आवश्यक तो मॉर्गेज न करता लोन देतात. मग ते लोन वसूल होत नाही. त्यानंतर काळाच्या ओघात या बँका बंद करण्याची वेळ येते. या दोन जिल्हयामध्ये गेल्या काही वर्षात अशा सामान्य माणसाच्या 19 बँका बंद पडल्या आहेत. या बँका बंद पडल्यानंतर या बँका ज्यांच्यामुळे अडचणीत आल्या त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. सुरुवातीला एक फार्स केला जातो की, त्यांची चौकशी करण्यात येणार आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. पण

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील....

त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न होता ती माणसे उजळ माथ्याने समाजात फिरत असतात. त्या बँकामध्ये सामान्य माणसाच्या ठेवी अडकलेल्या असतात ती माणसे अडचणीत येतात. अशा बँका मोठया मल्टी नॅशनल बँका किंवा प्रायव्हेट बँका ताब्यात घेतात. त्यामुळे सामान्य माणसाला आपल्या बँकेतून ज्या सहजतेने कर्ज मिळते त्या सहजतेने कर्ज मिळत नाही. याचे साधे उदाहरण असे की, कोल्हापूरची अत्यंत जुनी आणि चांगली असलेली मराठा बॅक सारस्वत बँकेने घेतली त्यामुळे मराठा बँकेत शिवाजी पेठेतील माणूस सहजतेने जाऊन दहा हजार रुपये कर्ज घेऊ शकत होता तो त्या सारस्वत बँकेत जाऊन कर्ज मागण्याचे धाडस करु शकत नाही. अशा प्रकारचा त्या बँकेचा अपिअरन्स असतो. अशा प्रकारची तेथील अधिकाऱ्यांची वागणूक असते. त्यामुळे सगळयात महत्वाचा मुद्दा असा की, जे संचालक आपल्या स्वार्थापोटी नियमबाहय कर्ज देतात त्यांच्यावर कारवाई होत नाही, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. तसेच या बँका नॅशनलाईज्ड बँकामध्ये मर्ज करता आल्या पाहिजेत. मी आता म्हटल्या प्रमाणे मराठा बँक सारस्वत बँकेने घेतली. शाहू बँक वैश्य बॅकेने घेतली. सांगली बँक आयसीआयसीआयने घेतली. युनायटेड वेस्टर्न सारखी बँक आयडीबीआयने घेतली. या बँकाना प्रायव्हेट बँकांच्या हातामध्ये सोपवण्यापेक्षा प्रामुख्याने नॅशनलाईज्ड बँकांकडे या बँका सोपवल्या तर तेथील सामान्य माणूस ज्या सहजतेने मराठा बँकेत,शाहू बँकेत जात होता तेवढया सहजतेने तो या नॅशनलाईज्ड बँकेमध्ये जाईल.

सभापती महोदय,दुसरा महत्वाचा मुद्दा मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे तो असा की, अलीकडच्या काळात सगळयात मोठा भ्रष्टाचार किंवा नियमबाहय कर्जाचा विषय जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचा आहे. महाराष्ट्रात एकूण 31 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत त्यापैकी 10 बँका अडचणीत आहेत हे शासनानेच मान्य केलेले आहे. नियमबाहय कर्ज दिल्यामुळे या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचा एनपीए 26 टक्के आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला 1640 कोटी रुपये तोटा झालेला आहे हे शासनानेच मान्य केलेले आहे. त्यामुळे त्यांचा एनपीए 42 टक्के जातो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या 1209 शाखांपैकी 59 शाखा तोटयात चाललेल्या आहेत हे शासनाच्या लक्षात आलेले आहे.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

माझ्या कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे एक फार मोठे प्रकरण गाजत आहे. रिझर्व्ह बँकेला त्या ठिकाणी प्रशासक नेमावा लागलेला आहे. सन 2003 ते 2006 या काळामध्ये एकूण 65 सहकारी संस्थांना नियमबाह्य कर्ज दिल्याची तक्रार झाली होती. त्यामध्ये 265 कोटी रुपयांची कर्जे आहेत. गेल्या काही दिवसात प्रशासकाने सर्व प्रकारची छाननी केल्यानंतर एकूण 33 संस्थांना विनातारण कर्ज दिल्याचे लक्षात आले आहे. 17 संस्थांना अपुरे तारण घेऊन कर्ज दिल्याचे लक्षात आले आहे. 15 संस्थांना नियमबाह्य कर्ज दिल्याचे लक्षात आले आहे. अशा एकूण 49 जणांवर जबाबदारी निश्चित केलेली आहे. यातील नावे वाचल्यानंतर आपणा सगळ्यांनाच धक्का बसेल. आजचे कामगार मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांचे नाव त्यामध्ये आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे खासदार श्री. सदाशिवराव मंडलिक यांचे नाव त्यामध्ये आहे. यामध्ये 45 माजी संचालक तसेच आताचे सी.ई.ओ. आणि 3 अधिकारी अशा 49 जणांवर 117 कोटी 68 लाख 24 हजार 450 इतक्या रकमेचे त्यांनी नियमबाह्य कर्ज दिले याबाबत शासनानेच नेमलेल्या प्रशासकाने जबाबदारी निश्चित केलेली आहे. येत्या आठवडाभरात त्यांच्यावर कारवाई करावी लागेल. मला हे माहीत आहे की, ही चर्चा अर्ध्या तासात संपवावयाची आहे त्यामध्ये मी नावे वाचण्यामध्ये वेळ घालविणार नाही पण इतक्या मोठ्या प्रमाणावर राजकारणामधील आजचे आमदार, आजचे मंत्री, आजचे खासदार यामध्ये इन्व्हॉल्व आहेत. त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहोत ? आपणच नेमलेल्या प्रशासकाने 117 कोटीच्या बाबतीत जबाबदारी निश्चित केलेली आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा आताचा जो तोटा आहे तो 650 कोटी रुपयांचा आहे आणि 42 टक्के एन.पी.ए. प्रशासकाने घोषित केलेला आहे. एखाद्या बँकेचा 42 टक्के एन.पी.ए. निर्माण होईपर्यंत आपण स्वस्थ का बसतो ? दोन मिनिटामध्ये मी त्या बँकेशी संबंधित आणखी एक गैरव्यवहार मांडणार आहे. 1976 ते 1999 या कालावधीमधील कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी भरला गेलेला नाही. एखादी साधी कंपनी एखादा माणूस चालवित असेल आणि त्यांनी दोन वर्षाचा भविष्य निर्वाह निधी भरला नाही तर आपण त्याच्या बाबतीत कारवाई करतो. 1976 ते 1999 एवढ्या कालावधीचा भविष्य निर्वाह निधी भरलेला नाही. कोल्हापूर जिल्हा देखरेस संघाने 600

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

जणांची 3250 रुपये पगारावर नियमबाह्य भरती केली. गेली अनेक महिने हे 600 लोक काहीही काम न करता त्या ठिकाणी स्वस्थ बसून आहेत. एकूण 1600 संस्था अशा आहेत की ज्या मतदानासाठी रजिस्टर झालेल्या आहेत पण प्रत्यक्षात नाहीत. या संस्था रद्द कराव्यात याबाबत वारंवार तक्रारी होतात पण जिल्हा सहकारी बँकेमध्ये एक-एक मत महत्वाचे असते त्यामुळे या 1600 संस्था त्यांचा कोणत्याही पध्दतीचा कारभार चालू नसताना सुरु आहेत. अशा अनेक गोष्टी एखाद्या बँकेमध्ये घडलेल्या असताना, एखाद्या जिल्ह्याची मध्यवर्ती सहकारी बँक ही त्या जिल्ह्याच्या सामान्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बँक असताना, इतक्या मोठ्या प्रमाणावर मोठमोठी राजकीय मंडळी अडकलेली असताना शासन काय करणार ? मी आताच म्हटल्याप्रमाणे राज्यातील 10 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणीत आहेत. आमच्या दोन जिल्ह्यामध्ये कोल्हापूरची वसंतदादा सहकारी बँक आहे, या ठिकाणी किती तरी छोट्या बँकांच्या आणि पतसंस्थांच्या ठेवी अडकलेल्या आहेत. आपण वसंतदादा सहकारी बँकेवर काय कारवाई केली ? त्यांच्या संचालकांवर काय कारवाई केली ? प्रामुख्याने या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने या सगळ्या छोट्या बँका ज्या सामान्य माणसांनी निर्माण केल्या त्या अडचणीत चाललेल्या आहेत आणि काळाच्या ओघात त्यातील कोणावरही कारवाई होत नाही. सामान्य माणूस सरकार दरबारी त्याच्या डिपॉझिटसाठी चकरा मारुन थकतो. यावर सरकार काय कारवाई करणार आहे ? कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे याचे उत्तर शासनाने द्यावे अशी विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

श्री. प्रकाश सोळंके ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील ज्या बँका अडचणीत आलेल्या आहेत अशा बँकांच्या संदर्भातील ही अर्धा-तास चर्चा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली आहे. या निमित्ताने मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, सांगली जिल्ह्यामध्ये एकंदरीत 29 अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका आहेत आणि कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 58 बँका आहेत. या 87 बँकांपैकी 12 बँका आर्थिक दृष्ट्या अडचणीत आलेल्या आहेत किंवा त्या ठिकाणी अवसायक नेमले गेलेले आहेत, रिझर्व्ह बँकेने त्यांचा परवाना रद्द केलेला आहे अशा अर्बन कोऑपरेटिव्ह मधील कोल्हापूर जिल्ह्यातील 6 बँका आणि सांगली जिल्ह्यातील 6 बँका अडचणीत आल्यामुळे त्या बँकांवर अवयायक नेमले गेले आहेत. मुख्य जो प्रश्न आहे त्यामध्ये या अवसायानात ज्या काही बँका गेलेल्या आहेत त्यामध्ये ठेवीदारांचे जे पैसे आहेत त्यामध्ये जवळजवळ 3 लाख 94 हजार 872 इतके ठेवीदार आणि अंदाजे 583.27 कोटी इतकी रक्कम या बँकांमध्ये ठेवीच्या स्वरुपात जमा आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

या ठेवीची वर्गवारी काढलेली आहे. 1 लाख रुपयापर्यंतच्या ठेवींना डीआयसी, जीसीचे संरक्षण आहे अशा छोटया ठेवीदारांची संख्या 74406 इतकी असून त्यांची अंदाजे 243.36 कोटी इतकी रक्कम अडकली आहे. त्यापैकी 206.88 कोटी इतकी रक्कम मिळविली आहे आणि त्यापैकी 35 ते 36 कोटींचे वाटप चालू आहे. सगळयात महत्वाची अडचण 1 लाखावरील ठेवींच्या रकमांबाबत आहे. 1 लाखावरील ठेवीदार व सहकारी संस्था आहेत. त्याची रक्कम 208 कोटी इतकी आहे. त्यामध्ये 2547 संस्था आहेत. 98.53 कोटी इतकी रक्कम सहकारी संस्थांची आहे. 1 लाखाच्या वरील रकमेला संरक्षण नसल्यामुळे ती चिंतेची बाब झाली आहे. यासाठी उपाययोजना करण्यासाठी 12 बँकांवर अवसायक नेमलेले आहेत. त्यापैकी 5 बँकांची सहकार कायद्याच्या कलम 88 नुसार चौकशी करुन अधिकारी व संचालकांची चौकशी चालू आहे. रवि को-ऑप.बँकेची चौकशी सुरु आहे, या बँकेबाबत लेखा परीक्षण अहवाल आलेला आहे. या बँकेच्या जवळजवळ 18 अधिकारी व संचालकांवर 16.61 कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार केल्याचा गुन्हा दाखल करण्याचे काम केलेले आहे. त्याचप्रमाणे एस.के.पाटील को-ऑप.बँक या संस्थेवर सुध्दा जबाबदारी निश्चित केली असून या बँकेच्या संचालकांवर, अधिका-यांवर 16.19 कोटींची जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही सुरु केलेली आहे. उर्वरित संस्थांची अद्याप चौकशी सुरु आहे. ही चौकशी अंतिम टप्प्यात असून येत्या 2-3 महिन्यामध्ये सर्व चौकशी पूर्ण करुन त्या संस्थांच्या संचालकांना व अधिका-यांना गैररितीने कर्ज वाटपाबाबत जबाबदार धरुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून वसुलीची कारवाई सुरु केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे या बँकेत अपूर्ण तारण, विनातारण, संस्था संचालकांच्या नातेवाईकांना कर्ज देणे, त्यांच्या संस्थांना कर्ज देणे असे अनेक गैरप्रकार या बँकेच्या माध्यमातून झाले असल्यामुळे सहकार खात्याने खास करुन आरबीआयकडे कलम 110 अन्वये त्याचा रिपोर्ट करुन बँकेवर कारवाई केलेली आहे. या बँकेवर आता प्रशासक नेमलेले आहेत. प्रशासकांच्या माध्यमातून कर्ज वाटपामध्ये व नोकर भरतीमध्ये जे गैरव्यवहार झाले असतील, त्याबाबत संबंधितांना जबाबदार धरुन त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

(श्री. प्रकाश सोळंके...

त्यामध्ये कोण व्यक्ती आहे, कोण आमदार आहे, कोण मंत्री आहे याचा विचार न करता कायद्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई कोणत्याही व्यक्तीचा राजकीय संबंध लक्षात न घेता निश्चितपणे केली जाईल अशी मी ग्वाही देतो. दुसरी महत्वाची गोष्ट या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली ती म्हणजे 1600 संस्था ह्या कोणत्याही प्रकारचे कामकाज न करता केवळ मतदानासाठी नोंदलेल्या संस्था असल्याचे त्यांनी सांगितले. या चर्चेच्या माध्यमातून या प्रश्नाची देखील गंभीरपणे देखल घेऊन जिल्हा उपनिबंधकांना असे आदेश देण्यात येतील की येत्या महिन्याभरामध्ये अशा प्रकारे ज्या ज्या संस्था कोणत्याही प्रकारचे काम करीत नाहीत आणि केवळ मतदानासाठी नोंदल्या गेलेल्या आहे त्यांच्यावर कारवाई करावी. ज्या ज्या बॅंकानी चुकीचा कारभार केलेला आहे त्या सर्व बॅंकावर कारवाई चालू असून ती कारवाई वेगाने पूर्ण केली जाईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील वरसोली व चाळमळा येथील ग्रोयन्स बंधा-याची करावयाची दुरुस्ती

**मु. शी.** : अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील वरसोली व चाळमळा येथील ग्रोयन्स बंधा-याची करावयाची दुरुस्ती यासंबंधी श्री.जयंत प्र. पाटील वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील वरसोली व चाळमळा दरम्यान मच्छिमारांच्या नौकांसाठी ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा सन २००५ मध्ये बांधून त्या ठिकाणी खाडी निर्माण होणे, यामुळे दोन्ही गावांतील मच्छिमारांना पकडलेल्या मच्छीची वाहतूक करणे सोईचे होणे, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे-खडकवासला यांनी सन २००५ पूर्वी सर्वेक्षण करणे, तांत्रिक सल्ल्यानुसार बंधा-याचे पुढील बांधकाम सुरु करण्याचे प्रस्तावित करणे, सध्या या बंधा-याच्या संरक्षणासाठी निधी उपलब्ध न करणे, त्यामुळे समुद्राच्या तीव्र लाटांनी बंधा-याच्या दोन्ही बाजूकडून धूप होणे व बंधा-याचे मूळ स्वरुप नष्ट होणे,पर्यायाने बंधा-याच्या चॅनेलमध्ये गाळ साचणे, पाण्याचा निचरा होऊ न शकल्याने वरसोली व चाळमळा गावांना समुद्राच्या पाण्यापासून पुराचा धोका निर्माण होणे, यामुळे येथील परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होणे, या प्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

सभापती महोदय हा ग्रोयन्स पध्दतीचा बंधारा मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून बांधण्यात आलेला आहे. या बंधा-यामुळे कोळी बांधवाना पकडलेल्या मच्छीची वाहतूक करणे सोईचे होते, तसेच मच्छिमारांच्या होड्या ठेवण्याची देखील सोय होते. परंतु या बंधा-याची आता दोन्ही बाजूकडून धूप होऊ लागल्याने बंधा-याचे मूळ स्वरुप नष्ट होत आहे. या बंधा-यासाठी मेरिटाईम बोर्डाने ६ कोटी रुपये खर्च केले होते. या बंधा-याचा उपयोग केवळ मच्छिमारांच्या होड्या लावणे,

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

(श्री. जयंत प्र. पाटील...

मच्छिची वाहतूक करणे एवढ्यापुरताच मर्यादित नसून हा बंधारा नष्ट होऊ लागल्याने वरसोली व चाळमळा या गावांना पुराचा धोका निर्माण झालेला आहे. म्हणून शासनाने तातडीने तरतूद करुन या बंधा-याची दुरुस्ती करणे नितांत गरजेचे आहे. माझ्या माहितीप्रमाणे या बंधा-यासाठी मेरिटाईम बोर्डाने ६ कोटी रु. खर्च केले होते. १०-१५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे. मेरिटाईम बोर्डाकडे पैसे आहेत. मेरिटाईम बोर्डाने या बंधा-याच्या दुरुस्तीचे काम तरातडीने सुरु करावे अशी मी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

----

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (परिवहन व बंदरे मंत्री) : सन्माननीय सदस्यांनी वरसोली व चाळमला या ठिकाणी समुद्रामध्ये साडेआठ कोटी रुपये खर्च करुन 500 मीटर लांबीच्या बांधलेल्या बंधा-याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याठिकाणी मागील प्रवेशाच्या ठिकाणी बंधारा नादुरुस्त झालेला आहे. तेव्हा त्या बंधा-याची म्हणण्यापेक्षा त्या चॅनची दुरुस्ती करण्यासंबंधी प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्या ठिकाणी मच्छिमारांनी पकडलेल्या जवळपास 2000 मे.टना पासून ते साडेपाच हजार मे.टनापर्यन्त मच्छिची वाहतूक होते. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केवळ मच्छिमारांसाठीच नव्हे तर पॅसेंजर बोटींच्या वाहतुकीसाठी देखील त्या बंधा-याचा उपयोग होतो. या बंधा-याच्या दुरुस्तीसाठी 23 ते 24 कोटी रुपये खर्च येणार आहे. या बंधा-यामुळे अलिबागची वाहतूकही जवळची होईल.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

आज मांडवा येथे उतरुन 24 कि.मी.अंतर पार करुन अलिबागला जावे लागते अशी माझी माहिती आहे. परंतु ही सुविधा उपलब्ध झाली तर फक्त 3 कि.मी.अंतर पार करावे लागणार आहे. पूर्वी 32 कोटी रुपयांचे एस्टीमेट होते. सुधारित मान्यता घेतल्यानंतर डिझाईनमध्ये बदल करीत आहोत. नवीन जी कन्सेप्ट आली आहे त्यानुसार आपल्याला सिंथेटीक मटेरियल वापरता येऊ शकते. सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन ताबडतोब मच्छिमारांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी प्रधान सचिव, नियोजन विभाग यांनी सुध्दा साईट व्हिजीट केली आहे. त्यांना भूमिका पटली आहे. या संदर्भात लगेच आवश्यक ती कारवाई करण्याबाबत शासन उपाययोजना करेल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील शिक्षण विभागात राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे

**मु. शी.** : राज्यातील शिक्षण विभागात राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे यासंबंधी श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील शिक्षण क्षेत्रातील राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने शिक्षण विभागात काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांवर नियंत्रण न राहणे तसेच नागपूर, अमरावती व लातूर येथील बोर्ड अध्यक्षांची पदे रिक्त असल्याने बोर्ड परीक्षेच्या कामात येणारे अडथळे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मी या अर्धातास चर्चेच्या प्रारुपामध्ये एका वाक्याचा बदल सुचविला आणि तसे पत्र माननीय सभापती महोदयांकडे दिले होते. त्या पत्रात म्हटल्याप्रमाणे राज्यातील शिक्षण क्षेत्रातील राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने शिक्षण विभागात कर्मचाऱ्यांवर नियंत्रण न राहणे" हा माझा महत्वाचा मुद्दा होता.

सभापती महोदय, शिक्षण खाते हे अतिशय महत्वाचे खाते आहे. माणूस शिकला तरच सक्षम होऊ शकतो हे सर्वांना ज्ञात आहे. म्हणून शिक्षणासारख्या महत्वाच्या खात्याकडे शासनाचे कसे दुर्लक्ष होत आहे हे मी निदर्शनास आणू इच्छितो. महाराष्ट्र राज्यात शिक्षण खात्यामध्ये जी विविध पदे आहेत, त्याबाबत मंत्रालयापासून सुरुवात केली तर मंत्रालयात शालेय शिक्षण विभागात प्राथमिक आणि माध्यमिक असे स्वतंत्र दोन विभाग केलेले आहेत. या दोन्ही विभागांमध्ये फाईल पुटअप करण्यासाठी लिपीक व सहाय्यकाची पदे आहेत. त्यातील 45 पदे रिक्त आहेत. संचालकांकडून एखादा प्रस्ताव आला तर त्या संदर्भात फाईल पुटअप करण्यासाठी सहाय्यक व लिपीक नसतील तर फाईलींचे गठ्ठेच्या गठ्ठे टेबलावर पडून असल्याचे पहावयास मिळतात. कक्ष अधिकारी, उपसचिव व सचिवांची पदे भरली असली तरी त्यांना सहाय्य करणारे जे कर्मचारी आहेत त्यांची पदे भरलेली नाहीत. आम्ही वारंवार विचारणा करतो, यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या पत्राला उत्तर दिले जात नाही. राज्यातील आमदारांना सुध्दा माहितीच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 12:20 श्री.विक्रम काळे .............

अधिकाराचा उपयोग करावा लागतो यापेक्षा लाजिरवाणी कोणती गोष्ट असू शकते? किमान आमदारांच्या पत्राची दखल त्वरित घेणे अपेक्षित आहे. आमदारांच्या पत्राला उत्तर देण्यासाठी अधिकारी नसतील तर आपण कोणत्या प्रकारचे राज्य करीत आहोत याचा सुध्दा गांभीर्याने विचार केला पाहिजे. संचालकाचे पद महत्वाचे आहे. राज्यामध्ये संचालकांची 8 पदे मंजूर आहेत. त्यात प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, एमपीएसपी, बालभारती, परीक्षा आणि प्रौढ शिक्षणासाठी संचालकांची पदे मंजूर केलेली आहेत. परंतु एकूण 8 पदांपैकी जवळपास 6 पदे रिक्त आहेत. फक्त दोन पदे भरलेली आहेत. संपूर्ण राज्याचा शिक्षण क्षेत्रातील कारभार ज्यांच्याकडून पाहिला जातो त्यापैकी फक्त दोन पदावर कायमस्वरुपी संचालक नेमलेले आहेत. इतर सर्व पदांचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. ज्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे ते किती सक्षमपणे काम करतात याची मंत्रीमहोदयांना चांगली माहिती आहे, त्यांनी अनुभव घेतलेला आहे. त्या पदावर काम करणारी व्यक्ती कायमस्वरुपी नसेल तर जाणीवपूर्वक जबाबदारी घेऊन काम करु शकत नाही.

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ....

त्याला वाटते मला जायचे आहे, येथे रहावयाचे नाही त्यामुळे आलेल्या माणसाचे काम पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून ही महत्वाची पदे तातडीने भरली जावीत यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. यापूर्वी देखील सभागृहात तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून मी अनेक वेळा हा विषय उपस्थित केला होता. अशा प्रकारे एकूण 8 संचालकांपैकी 6 पदे राज्यात रिक्त आहेत ती अद्यापही भरलेली नाहीत, ही खेदाची बाब आहे. तसेच उपसंचालकांची एकूण 40 पदे असून त्यापैकी 13 पदे रिक्त आहेत. सहसंचालकांच्या 18 पदांपैकी 6 पदे रिक्त आहेत. महत्वाचा मुद्दा म्हणजे या सभागृहात एकूण 7 शिक्षक आमदार आहेत. त्या सर्व आमदारांच्या मतदारसंघात त्यांना जास्त काम कोणाशी पडत असेल तर ते शिक्षणाधिकारी कार्यालयाशीच पडत असते. ज्यावेळेस आम्ही शिक्षणाधिकारी कार्यालयात जातो तेव्हा तेव्हा आम्हाला ते प्रभारी असल्याचेच दिसून येते. या पदावर नेहमीच उप शिक्षणाधिकाऱ्यांकडेच शिक्षणाधिकाऱ्यांचा कार्यभार सोपविलेला असतो, कुठल्याही ठिकाणी पूर्ण वेळ शिक्षणाधिकारी आढळून येत नाही अशी परिस्थिती आहे. अशा प्रकारे संपूर्ण राज्यात 171 शिक्षणाधिकाऱ्याची पदे मान्य असून त्यापैकी 70 पदे रिक्त आहेत. ज्यावेळेस ही पदे निर्माण झाली त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यात 100-200 शाळा होत्या पण आजच्या परिस्थितीत मात्र 650- 650 माध्यमिक शाळा आहेत. या सर्व शाळांचे संचलन करण्यासाठी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांची पदे भरली नसतील, सक्षम अधिकारी नसेल तर या लोकांनी न्याय कोणाकडे मागायचा हा महत्वाच प्रश्न आहे. आज राज्यात लाखो विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे काम ज्या बोर्डांच्या माध्यमातून होते ते आठ विभागीय बोर्ड असून त्यापैकी जवळपास चार बोर्डांवर अध्यक्षच नाहीत. त्यांचा कार्यभार कोणीतरी चार्ज म्हणून पाहत असतो. अशा प्रकारे परीक्षा बोर्ड लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरविते त्यांना अध्यक्षच नसेल तर कोणत्या पध्दतीने हे बोर्ड परीक्षा घेणार आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य कसे ठरविणार हा महत्वाचा प्रश्न निर्माण होत आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा होत्या त्यावेळेस अनेक वेळा गैरप्रकार होण्याचे प्रकार कानावर येतात, अन्य तक्रारी सुध्दा चालू असतात, त्याचे कारण या बोर्डांना वालीच नाही म्हणून ही अध्यक्षांची पदे लवकरात लवकर भरली पाहिजेत.

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .......

महोदय, मंत्रालय पातळीवर विचार केला तर सचिव, सह सचिव यांची सुध्दा जवळपास 50 टक्के पदे रिक्त आहेत. त्यात सचिवांची आठ पैकी 3 पदे रिक्त आहेत, सह सचिवांची 4 पदे रिक्त आहेत. मंत्रालयापासून जिल्हा पातळीपर्यंत सर्व प्रकारच्या पदांचा विचार केला तर जवळपास 50 टक्क्यांच्या वर पदे रिक्त आहेत त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. असा न्याय मिळत नाही म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर करावा लागतो. कारण आम्ही पत्र दिल्यानंतर त्याची साधी दखलही घेतली जात नाही. मंत्री महोदयांना पत्र दिले तर त्याचे उत्तर किमान आठ दिवसात तरी आम्हाला मिळते. माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राचे उत्तर देखील आठ दिवसात मिळते परंतु शिक्षणाधिकाऱ्यांकडून मात्र चार महिने वाट पाहूनही उत्तर मिळत नाही म्हणून पुन्हा चौकशी करावी लागते. अशा प्रकारे हा कारभार चाललेला आहे. आज महसूल व पोलीस खात्यापेक्षाही वाईट अवस्था शिक्षण विभागाची झालेली आहे असे समाजामध्ये बोलले जाते. या निमित्ताने माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, शिक्षण क्षेत्रात आपण काम केलेले असल्याने अशा सर्व गोष्टींचा आपल्याला अनुभव आहेच. या विभागाचा कारभार आपण हातात घेतल्यानंतर त्यात आमुलाग्र बदल कोणत्या पध्दतीने आपण घडवून आणणार आहात याची आम्हाला अपेक्षा आहे. मी पुन्हा विनंती करीन की, शिक्षण खात्यातील सर्व रिक्त पदे स्पेशल ड्राईव्ह घेऊन भरली जावीत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, हा प्रश्न खूप गंभीर आहे. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. संचालकांपासून मंत्रालयाच्या आस्थापनेवरील जवळ जवळ 40 पदे रिक्त आहेत. त्यामुळे शिक्षण विभागाच्या माध्यमातून ही रिक्त पदे भरण्यासंदर्भात युध्द पातळीवर प्रयत्न केले जातील. काही पदे पदोन्नतीने भरली जाणार आहेत. शासन स्तरावर जी पदे भरली जातात ती पदे येत्या दोन महिन्यात भरली जातील हे मी येथे सांगू इच्छिते. तसेच ऑन गोईंग प्रोसेसने नवीन पदे सुध्दा भरली जातील. पदे भरण्याच्या संदर्भात योग्य प्रकारे नियोजन केले जाईल. एमपीएससी मार्फत जी पदे भरली जातात त्याला 5-7 महिन्यांचा कालावधी लागत असतो. त्यामुळे काही पदे एमपीएससी मार्फत भरली जातील. पदे भरण्याच्या संदर्भात आम्ही गंभीर आहोत. त्यामुळे जी पदे रिक्त आहेत ती पदे लवकरात लवकर भरली जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

**उपसभापती** : अर्धा तास चर्चा संपलेल्या आहेत. सभागृहाची विशेष बैठक संपलेली असून नियमित बैठक 12.45 वाजता पुन: भरेल.

(12.31 ते 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ SBT/ KGS/ MMP/ ST/ 12:45

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

<u>म.वि.प.नियम 289 च्या प्रस्तावाबाबत.</u>

**सभापती** : म.वि.प.नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील यांचा तसेच सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा असे मिळून 2 प्रस्ताव आलेले आहेत. हे दोन्ही प्रस्ताव सार्वजनिक महत्त्वाचे आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांचा कायम शब्द काढून टाकण्याचा धोरणात्मक निर्णय होऊनही विनाअनुदानित ठरलेल्या शाळांचे मूल्यांकन करण्याचे आदेश न होणे, कायम शब्द काढून टाकण्याच्या निर्णयातून राज्यातील उच्च माध्यमिक शाळांना वगळणे, कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांच्या संच व वैयक्तिक मान्यता न होणे, संस्थांचे वेतनेत्तर अनुदान गेल्या 6-7 वर्षापासून बंद असणे, वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत समितीने शिफारस करूनही व माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आदेश देऊनही कार्यवाही न होणे" या आशयाचा प्रस्ताव दिलेला आहे. यासंबंधी मी माझा निर्णय देतो. हा प्रस्ताव मी स्वीकृत केला असून चर्चेसाठी एक तास देण्याचे ठरविले आहे. एका तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी 15 मिनिटांमध्ये आपले मुद्दे मांडावयाचे आहेत. अन्य शिक्षक सदस्य आहेत त्यांनी प्रत्येकाने 5 मिनिटामध्ये आपले विचार मांडावयाचे आहेत. 45 मिनिटामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांचे मुद्दे मांडून झाल्यानंतर 15 मिनिटात माननीय शिक्षणमंत्री महोदयांना आपले उत्तर पूर्ण करावयाचे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रस्ताव चर्चेला कधी घेण्यात येणार हे आपण सभागृहाला अवगत करावे. आपण माझा प्रस्ताव चर्चेसाठी स्वीकारल्याबद्दल धन्यवाद.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागने वाणिज्य शाखेतील मुलांच्या अकाऊंटंसी आणि मॅनेजमेंट या विषयाच्या हॉल तिकिटावर अदलाबदल केल्यामुळे अंदाजे तीन हजार मुलांना परीक्षेपासून वंचित रहावे लागणे व त्यांचे एक वर्षाचे शैक्षणिक नुकसान होणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष पसरणे,गेल्या आठवड्यात

..2

**सभापती**....

टी.वाय.बी.कॉम.च्या परीक्षेच्या वेळी प्रश्नत्रिकेची छपाई न झाल्यामुळे परीक्षा पुढे ढकलावी लागणे,विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून संबंधितांनी दक्षता घेण्याची आवश्यकता" अशा आशयाचा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी 45 मिनिटे देणार आहे. या दोन्ही प्रस्तावावर कधी चर्चा घ्यायची हे मी आजचे कामकाज संपे पर्यं आपणा सर्वांना कळविन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे आपण यासाठी एक तास वेळ द्यावा.

**सभापती** : ठीक आहे. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एक तास वेळ देण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : धन्यवाद.

........

...3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पटसंख्येबाबत संरक्षण मिळण्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(१) * ३५४० श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या शिक्षण खात्यातर्फे पटसंख्येबाबत निर्णय घेऊन शिक्षक कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात आले, मात्र शाळा प्रशासनाचा कणा असलेले शिक्षकेतर कर्मचारी या लाभापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच याबाबत शासनाने शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना हा लाभ देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, पटसंख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांना संरक्षण मिळते ते शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळेल काय ? चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार शाळांसंबंधातील अनेक प्रश्न सुटले. शालेय स्वच्छता, देखरेख,लॅब असिस्टंट या सारख्या पदांच्या कमतरतेमुळे शाळांची दुरवस्था झालेली आहे. सदर दुरवस्था दूर करण्यासाठी शिक्षकेतर पदे चिपळूणकर समितीच्या शिफारशी प्रमाणे भरण्यात येणार आहेत काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधी खूप विचारविनिमय केलेला आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नासंबंधी अनेक वेळा, वर्षानुवर्षे चर्चा झालेली आहे. सदर निर्णय उच्चस्तरिय समिती समोर आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नासंबंधी वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3540...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे वर्ग ज्या शाळेमध्ये असतील त्यांना शिपाई आणि क्लार्क इत्यादी शिक्षकेतरांची 3 पदे दिली जातात आणि पाचवी ते दहावीपर्यंत शाळा असलेल्यांकडे आठ वा त्याहून जास्त तुकडया असल्या तरी त्यांना दोन पदे देण्यात येतात तेव्हा ही विसंगती दूर करण्यात येणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भात चिपळूणकर समितीचे निकष, एस.एस.कोड आणि दिनांक 25.11.चा जी.आर. आहे. त्याचप्रमाणे मध्यंतरी तत्कालीन मंत्री महोदयांनी एक निर्णय घेतला होता आणि याबाबतीत मेळ घालण्याचा प्रयत्न केला होता. माननीय मुख्यमत्र्यांनी सुध्दा एस.एस.कोड नुसार कशा प्रकारची पदे असावी याबाबतीत काही सूचना दिल्या आहेत आणि त्याचा विचार करुन उच्च समितीसमोर हा विषय असल्यामुळे त्या संदर्भात मी वेगळे काही सांगू शकत नाही.

---

2..

15-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात या वर्षीही इयत्ता अकरावी प्रवेश पध्दती ऑन लाईन सुरु ठेवण्याबाबत**

**(२) * ६१५८ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नितीन गडकरी , श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७२७ ला दिनांक ८ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता अकरावीची प्रवेश पध्दती गतवर्षीप्रमाणे याही वर्षी सुरु ठेवण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी ऑनलाईन प्रवेश पध्दतीत झालेला प्रचंड गोंधळ लक्षात घेता, यावर्षी तो त्रास विद्यार्थी व पालकांना होऊ नये यासाठी कोणते बदल वा सुधारणा करण्यात येणार आहेत,

(३) तसेच झोपडपट्टयात वा अल्प उत्पन्न गटांच्या वस्त्या, ज्याठिकाणी संगणकाची वा इंटरनेटची सोय उपलब्ध नाही अशा वस्त्यांतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियेच्यावेळी गैरसोय होऊ नये म्हणून शासन स्तरावरुन कोणती विशेष उपाययोजना करण्यात येणार आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) होय.

(२) गतवर्षी २००९-२०१० या शैक्षणिक वर्षातील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये आलेल्या अडचणी व त्रुटी लक्षात घेऊन त्या दूर करण्यासाठी या वर्षीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(३) ज्या शाळांमध्ये संगणक वा इंटरनेटची सोय उपलब्ध नाही, अशा शाळांतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची व्यवस्था नजिकच्या संगणक व इंटरनेटची सुविधा उपलब्ध असणाऱ्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या वर्षी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमुळे प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेता आला नाही या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफिक असा प्रश्न विचारला होता की, गत वर्षी 2009-2010 या शैक्षणिक वर्षातील इयत्ता अकरावीच्या ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेत झालेला प्रचंड गोंधळ लक्षात घेता या वर्षी विद्यार्थ्यांना वा पालकांना त्रास होऊ नये या दृष्टीने त्या पध्दतीत कोणत्या सुधारणा वा बदल करण्यात येणार आहे ? या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही . मागच्या वर्षी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमुळे जो गोंधळ झाला होता तो गोंधळ पुन्हा होऊ नये म्हणून त्या पध्दतीत कोणती सुधारणा केली होती काय, बदल केला होता काय हा प्रश्न मी विचारला होता परंतु त्याला उत्तर दिले नाही.या प्रश्नाच्या तिस-या उत्तरात असे म्हटलेले आहे की,"नजिकच्या संगणक व इंटरनेटची सुविधाा असलेल्या माध्यमिक शाळांमध्ये त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची सोय करण्यात येईल

3..

.आपला प्रवेश त्याच शाळेत होईल हे त्या विद्यार्थ्यांना कसे समजणार आहे ? ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमुळे गेल्या वर्षी प्रचड गोंधळ झाला होता हे लक्षात घेऊन त्यामध्ये आणखी कोणत्या सुधारणा या वर्षी करण्यात आल्या आहेत वा कोणती उपाययोजना केलेली आहे याचे लेखी उत्तर देण्यात आलेले नाही. तेव्हा याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मागील वर्षी ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. त्यावेळी कमी वेळ मिळाला असल्याने काही प्रश्न निर्माण झाले होते. त्यावेळी दोन अडचणी निर्माण झाल्या होत्या व त्याची प्रामुख्याने दोन कारणे होती .त्यातील एक कारण असे होते की, हे फॉर्म कसे भरावयाचे यासंबंधी विद्यार्थ्यांना जेवढी माहिती असावयास पाहिजे होती तेवढी माहिती त्यांना नव्हती. पर्यायाने अनेक फॅार्म चुकीचे भरल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्याचप्रमाणे दुसरे एक कारण असे आहे की, एम.के.सी.एल. ही राज्य शासनाशी निगडीत संस्था असून त्यांच्या मार्फत या कामाला प्रथमच सुरुवात केली गेली होते परंतु एकाच वेळी अनेक फॉर्म आल्यामुळे कॅपेसिटीचा प्रश्न निर्माण झाला होता या सगळया गोष्टीचा विचार करुन सहा महिन्या पासून यासंबंधीची काळजी शासन घ्ेंत आहे. तसेच माहिती पुस्तिका प्रत्येक शाळेत पोहोचविण्याचे काम केलेले आहे. . शाळेतून प्राधान्याने फॉर्म भरण्याची व्यवस्था करण्यात येत असून त्या संबंधी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आजच हे प्रशिक्षण देखील सुरु केलेले आहे त्याचबरोबर शिक्षकांनीसुध्दा पालकांशी चर्चा करुन फॉर्म भरले तर काही चूक होणार नाही या दृष्टीने काळजी घेण्यात येणार आहे. यासाठी अजूनही दोन महिने वेळ असला तरी सुध्दा 50 टक्क्या पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी माहिती पुस्तिका नेली आहे. हे फॉर्म कसे भरावेत यासबंधी पूर्ण माहिती त्या माहिती पुस्तिकेमध्ये दिली जात आहे विद्यार्थ्यांचा फॉर्म सुटसुटीत करणे, फॉर्म भरत असतांना चुका होऊ नये याची काळजी घेणे,सॉफ्टवेअरच्या दृष्टीने काही सुधारणा करणे तसेच पूर्वी काही त्रृटी राहिल्या होत्या परंतु त्या आता राहता कामा नये या दृष्टीने एम.के.सी.एल. संस्थेने कार्यवाही करणे या दृष्टीने शासन काळजी घेत आहे. मागील वर्षी एकाच वेळी फॉर्म भरण्यात आल्यामुळे सर्व्हरवर ताण पडला होता त्यामुळे आता सर्व्हरसुध्दा वाढविण्यात येत आहेत................

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6158...

श्री. बाळासाहेब थोरात...

त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला फॉर्म भरण्याची तारीख ही विभागनिहाय ठेवणार आहोत. त्यामुळे सर्व्हरवर जास्त लोड येणार नाही. तसेच, या प्रक्रियेमध्ये कालावधी भरपूर ठेवला असल्यामुळे पालकांच्या किंवा विद्यार्थ्यांच्या कोणत्याही शंकेला ताबडतोब उत्तर देण्याची शासनाची तयारी आहे. त्यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहेत. त्यामुळे या वर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचण येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता सविस्तर उत्तर दिले. हेच उत्तर आमच्या प्रश्नाला लेखी स्वरुपामध्ये दिले असते तर सभागृहाच्या वेळेची बचत झाली असती. हे मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गेल्या वर्षी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये बराच गोंधळ झाला. मंत्रिमहोदयांनी सविस्तर उत्तर देतांना गेल्या वर्षी आढळून आलेल्या बऱ्याच त्रुटी दूर केल्याचे सांगितले. तरीसुध्दा एक त्रुटी आहे तिचे मला आपणाकडून उत्तर हवे आहे. ज्यावेळी विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यासाठी दिले जातात, त्यावेळी त्यामध्ये अनेक ऑप्शन्स असतात. त्यामध्ये शक्यतो विद्यार्थी आपल्या विभागातील कॉलेज किंवा शाळांची नावे नमूद करतात. जवळच्या शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश दिला पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. परंतु गेल्या वर्षी प्रवेश फॉर्म भरतांना 3 ते 4 शाळा-कॉलेजची नावे नमूद केल्यानंतर 80 टक्के केसेसमध्ये ऑप्शनल कॉलेजमध्ये प्रवेश दिला गेला. त्या विद्यार्थ्याला जवळच्या शाळेमध्ये प्रवेश दिला गेला नाही. आणि म्हणून अशाप्रकारची परिस्थिती यावर्षी देखील निर्माण होणार आहे, त्यासाठी आपण कोणती पावले उचलली आहेत? विद्यार्थ्यांना जवळच्या शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा यासाठी आपण कोणती यंत्रणा तयार ठेवणार आहात?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये मागील वर्षी ज्या त्रुटी होत्या त्या आपण कमी केल्या आहेत. त्या त्रुटीची एकत्रित यादी तयार करुन ते दोष बाजूला काढून त्या पध्दतीची सिस्टीम तयार करण्याचे काम केले आहे. यावर्षी विद्यार्थ्यांना 25 ऑप्शन देण्याची व्यवस्था केली आहे. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेणे जास्त सोईचे कसे होईल याकरिता एक पुस्तिका तयार करण्यात आली असून त्यामध्ये कोड नंबर नमूद केले आहेत. माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे सुरुवातीला इन हाऊस जागांचा कोटा भरला जाईल. तो कोटा भरण्यासाठी 10



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6158...

श्री. बाळासाहेब थोरात...

दिवसांचा कालावधी राहील. त्यावरील जागा भरल्यानंतर म्हणजे दहा दिवसानंतर रिक्त जागांवरील प्रवेश प्रक्रिया सुरु होईल. त्याचे निकष ठरविण्यात आले आहेत. आणि ही प्रवेश प्रक्रिया सॉफ्टवेअरच्या माध्यमातून बिनचूक कशी होईल याची काळजी घेण्यात येत आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ऑन लाईन प्रवेशाकरिता असणारे अर्ज आणि माहिती पत्रिकेचे वितरण करण्यात येणार आहे त्याचे शुल्क किती असणार आहे? मागील वेळेस ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये खूप गोंधळ उडाला. त्यावेळी या सभागृहातील माननीय सदस्यांनी देखील खूप मदत करण्याचा प्रयत्न केला. तिसऱ्या उत्तरामध्ये "ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची व्यवस्था नजिकच्या संगणक व इंटरनेटची सुविधा उपलबध असणाऱ्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आलेली आहे" असे म्हटले आहे. अशी व्यवस्था ज्या शाळा/कॉलेजमध्ये करण्यात आलेली आहे हे विद्यार्थ्यांना कसे कळणार? याची माहिती आपण विद्यार्थ्यांना अवगत करणार काय? एमएमआरडीएच्या क्षेत्रामध्ये सुध्दा आपण ऑनलाईन प्रवेश देण्याची व्यवस्था करणार आहात. एमएमआरडीएचे क्षेत्र ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये सुध्दा येते. त्याठिकाणी आपण कोणती उपाय योजना करणार आहात?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यावेळी आपण सर्वात मोठा बदल असा केला आहे की, ज्या ज्या विभागामध्ये शाळा/कॉलेजेस आहेत त्या विभागातील शाळा/कॉलेजमध्ये पूर्णपणे प्रशिक्षण व व्यवस्थापन करीत आहोत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी अशा प्रशिक्षित शिक्षक व कर्मचारी असलेल्या शाळांमध्ये जाऊन त्यांच्याकडून फॉर्म भरुन घेतल्यास चूक होणार नाही याची दक्षता विद्यार्थी व पालकांनी घ्यावी असा आमचा आग्रह आहे. त्याचप्रमाणे् काही विद्यार्थ्यांकडे क्रीडा व कलेशी संबंधित प्रमाणपत्रे आहेत त्यांची तपासणी शाळेचे मुख्याध्यापक करु शकतात. याकरिता विद्यार्थ्यांनी त्या शाळेमधूनच फॉर्म भरले पाहिजेत असा आमचा आग्रह आहे. अशा शाळांची संख्या 2523 आहे. त्याचप्रमाणे इंटरनेट व संगणक उपलब्ध असलेल्या शाळा 1669 आहेत, त्याठिकाणी फॉर्म भरण्याची व्यवस्था केली आहे. तसेच, 825 शाळांच्या ठिकाणी इंटरनेट व संगणक नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:00

ता.प्र.क्र.6158 . . . .

श्री.बाळासाहेब थोरात . . . .

त्यांना आपण पूर्णपणे माहिती देणार आहोत की, या शाळेतील विद्यार्थ्यांनी कोणत्या शाळेमध्ये जाऊन फॉर्म भरावयाचे आहेत आणि त्यासंबंधातील व्यवस्थेबाबतची माहिती आपण जाहीर करणार आहोत. त्यामुळे याबाबतीत कोणतीही अडचण येणार नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी पुस्तकांच्या किंमतीबाबत प्रश्न विचारलेला आहे. आपण यावेळेस पुस्तकाची किंमत 150 रुपये आहे. मागच्या वर्षी ती 135 रुपये इतकी होती, म्हणजे त्यामध्ये दहा रुपये पुस्तकाचे आणि 125 रुपये त्याठिकाणी भरावे लागत होते. आता आपण ही पध्दत सोपी केलेली आहे. त्यानुसार शाळा जे फॉर्म भरुन घेणार आहे, त्यासाठी सुध्दा व्यवस्था केलेली आहे. आपल्याला एम.के.सी.एल.ची सेवा घ्यावयाची असेल तर त्यासाठी व्यवस्था आहे, पुस्तके आहेत, एस.एस.सी.बोर्ड आहे आणि सध्या प्रशिक्षण वर्ग सुरु आहे, अशा प्रकारे जास्तीतजास्त कमी किंमतीमध्ये सर्व गोष्टी करुन देण्याच्या बाबतीत प्रयत्न केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननयी मंत्री महोदयांनी उत्तर देताना सर्व प्रश्नांना बगल दिलेली आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी पहिलाच प्रश्न विचारला की, ऑनलाईन प्रवेशाच्या संबंधातील पूर्वीच्या कोणत्या त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत ? यावर माननीय मंत्री महोदयांकडून टेक्नीकल उत्तर अपेक्षित होते. यापूर्वी सदनामध्ये या विषयावर अडीच तासाची चर्चा झाली होती.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण गेल्या वेळेला अमेरिकेमधून सर्व्हर मागविला होता. परंतु मोठया शक्तीचा सर्व्हर असला तरी त्यावेळी अचानक अनेक लोकांनी अर्ज केल्यामुळे तो सर्व्हर क्रॅश झाला होता. त्याची कॅपॅसिटी वाढविलेली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक शाळांना गेल्या वर्षी ऑन लाईन प्रक्रियेच्या संबंधातील पैसे देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे काही शाळांनी ऑन लाईन प्रक्रियेचे काम करण्यासाठी नकार दिला आहे हे खरे आहे काय ? तिसरा महत्वाचा प्रश्न आहे. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "ज्या शाळांमध्ये संगणक वा इंटरनेटची सोय उपलब्ध नाही, अशा शाळांतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची व्यवस्था नजिकच्या संगणक व इंटरनेटची सुविधा उपलब्ध असणाऱ्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ ...

. . . .झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6158 . . . .

डॉ.दीपक सावंत . . ..

महाविद्यालयात करण्यात आलेली आहे." विद्यार्थ्यांना यासंबंधीची यादी कधी प्राप्त होणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांच्या प्रश्नाचे उत्तर देताना त्रुटींच्या बाबतीत सांगितले होते. यामध्ये दोन त्रुटींचे प्रकार होते. एक म्हणजे विद्यार्थ्यांना पुरेशी माहिती नसल्यामुळे अर्ज भरण्यामध्ये झालेल्या चुका व दोष. या सगळया चुकांची वर्गवारी करुन, यापुढे एकही चूक होणार नाही यादृष्टीने काळजी घेण्यात आलेली आहे.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : कॉलेज कोडबाबत काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्यावेळी कॉलेज कोड होते. परंतु एखाद्या कॉलेजबाबत एका विषयाच्या संबंधातील कोड एका पानावर असेल तर त्याच कॉलेजचा दुसऱ्या विषयाच्या बाबतीतील कोड दुसऱ्या पानावर गेला होता. आता सन्माननीय सदस्यांना यासंबंधातील पुस्तक पहावयाचे असेल किंवा तशी मागणी केली तर ते आमची देण्याची तयारी आहे. याबाबतीत काही अडचण नाही. कारण त्यामध्ये सर्व बाबी अत्यंत चांगल्या पध्दतीने देण्यात आलेल्या आहेत. आम्ही त्या पुस्तकामध्ये सर्व चुका दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे हे मी निश्चितपणे सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी सर्व्हरच्या बाबतीत दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे. मागच्या वेळी सर्व्हरवर एकाच वेळी सर्वजण फॉर्म भरु लागल्यामुळे एकदम ताण येऊन तो बंद झाला होता. पण यावेळेस सर्व्हरची कपॅसिटी एका बाजूला वाढवत असताना, दुसऱ्या बाजूला एकाच वेळी सर्व अर्ज भरले जाणार नाहीत यादृष्टीने सुध्दा आपण सूचना देत आहोत आणि माझे असे मत आहे की, आम्ही याबाबतीत पूर्णपणे काळजी घेत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दुसरा प्रश्न विचारला होता की, अनेक शाळांना गेल्या वर्षी ऑन लाईन प्रक्रियेच्या संबंधातील रक्कम देण्यात आलेली नाही. हे बरोबर आहे की, अनेक शाळांना गेल्या वर्षी ऑन लाईन प्रक्रियेच्या संबंधातील रक्कम देण्याचे राहिलेले आहे, तर आम्ही या शाळांना सदरहू रक्कम आठ दिवसामध्ये देऊ.

. . . .झेड-3



APR/ KGS/ ST/ 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रामुख्याने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे काम शालेय शिक्षण विभागामार्फत केले जाते. परंतु मुंबईमध्ये बायफोकल शाळा 5 आहेत आणि त्या अनुदानित शाळा आहेत. त्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत नाहीत. त्यामुळे या शाळा या प्रक्रियेमधून सुटलेल्या आहेत. तेव्हा ऑन लाईनच्या प्रवेश प्रक्रिया करणाऱ्या ज्या शाळा आहेत, त्यांच्यामध्ये या बायफोकल उच्च माध्यमिक शाळांचा समावेश करणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा विषय तपासून घेऊ.

-----

. . . .झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बीसीए व बीबीएच्या प्रथम सत्र परिक्षेचा पेपर 60 गुणांऐवजी 30 गुणांचा करण्याबाबतचे आदेश**

**(3) *3448 श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागाअंतर्गत दिनांक 8 जानेवारी 2010 रोजी घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परिक्षेतील बीसीए व बीबीएच्या प्रथम सत्र परिक्षेचा पेपर संपल्यानंतर सदर पेपर 60 गुणाऐवजी 30 गुणाचा असल्याचे विद्यापिठाचे आदेश प्राप्त झाले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदेश विलंबाने पाठविण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता : (1), (2) व (3) नाही. सदर अभ्यासक्रमाची परीक्षा पूर्वीच्या 60:40 गुण पध्दतीऐवजी 30:20 गुण पध्दती प्रमाणे राहील असे विद्यापीठाच्या दिनांक 8.1.2010 च्या पत्रान्वये त्याच दिवशी सकाळी विद्यापीठाच्या संकेत स्थळाच्या माध्यमातून कळविण्यात आले. तसेच सर्व संबंधित परीक्षा केंद्रांना दूरध्वनीद्वारे बदला संबंधी कळविण्यात येऊन सर्व विद्यार्थी व संबंधितांना सदरील बदल कळविण्यासाठी सूचना देण्यात आली. वरील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा वेळापत्रकानुसार व गुणपध्दतीप्रमाणे घेण्यात येऊन या परिक्षांचे निकालही घोषित करण्यात आले आहेत. अशाप्रकारच्या घटना यापुढे घडू नये याबाबत विद्यापीठाने दक्ष राहण्याबाबत विद्यापीठास सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे, त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांना काही बदल करावयाचा आहे काय ? असे मला माननीय मंत्री महोदयांना आपल्यामार्फत विचारावयाचे आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न क्र.1 आणि उप प्रश्न क्रमांक 2 व 3 तीनही प्रश्नांचे उत्तर "नाही" असे म्हटलेले आहे. परंतु वास्तविक पाहता ज्यादिवशी परीक्षा होती, त्याच दिवशी सकाळी संकेत स्थळावरुन कळविण्यात आलेले आहे असे उत्तरामध्ये दिले आहे. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, विद्यार्थी परीक्षेसाठी जातील की संकेतस्थळ पहात बसतील? उत्तरामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "त्याच दिवशी सकाळी विद्यापीठाच्या संकेत स्थळाच्या माध्यमातून कळविण्यात आलेली आहे की, गुणांमध्ये बदल झालेला आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3448...

श्री. विक्रम काळे......

सभापती महोदय,विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यायची की, सकेंतस्थळ बघायचे? हा माझा महत्वाचा प्रश्न आहे. या सगळया प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे काय? तसेच परीक्षेच्या दिवशी ज्यांनी अशा प्रकारे सकाळी कळविले अशा दोषी असणाऱ्या अधिकाऱ्या विरुध्द कारवाई करण्यात येईल काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, "60 गुणाऐवजी 30 गुणाचा पेपर असल्याचे विद्यापीठाचे आदेश प्राप्त झाले, हे खरे आहे काय"? या पहिल्या प्रश्नाला नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. मॅनेजमेंन्ट कैन्सिलने दिनांक 15-12-2000 रोजी 30:20 या प्रमाणात परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठाला सांगितले होते. त्यामुळे पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. दिनांक 8-1-2010 रोजी परीक्षेच्या दिवशी संकेतस्थळावर म्हणजे वेबसाईटवर आणि ओरली कम्युनिकेशन करण्यात आले आणि मुलांना सांगण्याचा पूर्णत: प्रयत्न केला व त्या दिवशी याबाबत मुलांना सांगण्यात सुध्दा आले. प्रश्न पत्रिकेमध्ये जे पाच प्रश्न होते त्यापैकी फक्त दोन प्रश्न सोडवावयास सांगितले. त्या प्रश्नांना 15:15 मार्क्स देण्यात आले होते. या परीक्षेचा रिझल्ट बघितला तर असे लक्षात येते की, बीबीएचे 95 टक्के विद्यार्थी पास झालेले आहेत.बीसीए चे ए.टी.के.टी. आणि पास असे मिळून 92 टक्के विद्यार्थी पास झालले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, विद्यार्थ्यापर्यंत मेसेज गेला होता. सभापती महोदय, हे बेजबाबदारपणाचे आहे. परीक्षेच्यावेळी विद्यार्थी टेंन्शनमध्ये असतात. अधिकाऱ्यांनी प्रत्येकवेळी अशा प्रकारच्या चूका करावयच्या आणि शासनाने 95 टक्के निकाल लागला असे समर्थन करावयाचे काय? सभापती महोदय, भविष्य काळात असा प्रसंग घडू नये म्हणून या बाबतीत संबंधित विषयावर जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, समर्थन करण्याचा शासनाचा उद्देश नाही. सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे तीच शासनाची भावना आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. या प्रकरणाच्या संदर्भात डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिनांक 6-4-2010 रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे की, "अशा प्रकारच्या चूका झालेल्या आहेत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3448...

प्रा. वर्षा गायकवाड.....

वरील परिस्थिती पहाता हा निर्णय परीक्षेपूर्वी संबंधितांना कळविणे आवश्यक होते." म्हणूनच याबाबतीत शासनाने विचारणा केली असून भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नयेत याबाबतीत त्यांना डायरेक्शन्स सुध्दा देण्यात आलेल्या आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विद्यापीठाची असो की कोणतीही परीक्षा असो हा त्या विद्यार्थ्यांना नैतिक व कायदेशीर अधिकार आहे. तो एक वर्षाचा कोर्स असेल, दोन वर्षाचा कोर्स असेल ज्यावेळी तो त्या कोर्ससाठी प्रवेश घेतो त्यावेळी प्रिंटेड सिलॅबस आणि स्कीम ऑफ एक्झ ाामिनेशन त्याच्या हातात दिली पाहिजे. हा त्याचा पवित्र अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या हातामध्ये सिलॅबस देऊन त्यांना प्रवेश देण्यात आला आणि दर महिन्याला त्यामध्ये एक-एक बदल करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, आश्चर्याची गोष्ट अशी की, दिनांक 8 जानेवारी,2010 रोजी ही परीक्षा चालू झाली आणि त्याच दिवशी संकेतस्थळवर कळविण्यात आलेले आहे हे हास्यास्पद आहे. कोणत्याही एक्झामिनेशन सिस्टिममध्ये हे बसत नाही. म्हणून संबंधितांना याबाबतीत कडक आदेश देण्यात यावेत. विद्यार्थी ज्या वेळी प्रवेश घेतो त्यावेळी त्याला जो सिलॅबस दिला जाईल त्यामध्ये निदान त्या बॅचपुरता मर्यादित तरी बदल करता कामा नये यावेळी अशा प्रकारचा बदल केलेला आहे हा अक्षम्य गुन्हा आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी हे खेळणे आहे. विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी जातो आणि त्याच्या मनामध्ये वेबसाईटवर अभ्यासक्रमात बदल तर होणार नाही ना अशा प्रकारचा धाक असेल तर त्याचे काय होईल? तुम्ही आणि मी जरी परीक्षेला बसलो तर आपले काय होईल? म्हणून ज्यांनी हा बदल केलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख साहेबांच्या मताशी मी सहमत आहे. विद्यार्थ्याच्या भविष्याचा हा प्रश्न आहे.

( काही सदस्य एकाचवेळी बोलतात )

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदया, सगळयांच्या भावनेशी मी सहमत आहे असे म्हणणे सोपे आहे परंतु ती भावना जर योग्य असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर सुध्दा अचूकच दिले पाहिजे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ज्यांच्याकडून चूक झाली त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (बसून) : कारवाई काय करणार?

( उत्तर आले नाही )

---

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या अंधेरी उपनगरातील सेन्ट कॅथरिन्स होम या निवासी शाळांमध्ये अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(४) * ६६४७ श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , डॉ.वसंत पवार , श्रीमती अलका देसाई :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वि.रा.देसाई रोड, अंधेरी (पश्चिम ) येथील सेन्ट कॅथरिन्स होम या निवासी शाळांमध्ये एकूण (वर्ग निहाय ) किती कर्मचारी सद्या कार्यरत आहेत,

(२) त्यापैकी किती कर्मचारी कायम आहेत व किती रोजंदारीवर अथवा अस्थायी आहेत,

(३) त्यातील वर्ग ४ च्या काही कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाची स्लीपही न देता फक्त काही रक्कम देऊन पगार पत्रकावर काहीही न पाहता सह्या करण्याचा आग्रह तेथील सीस्टर (श्रीमती स्नेहा, सुधा) यांच्या मार्फत करण्यात येऊन त्यांना तुम्हाला आम्ही केव्हाही काढून टाकू अशा प्रकारच्या धमक्या प्रशासनामार्फत देण्यात येतात त्यामुळे गेल्या काही वर्षात ५ ते ६ वर्षे सेवा केलेले काही युवक नाईलाजास्तव नोकरी सोडून गेले आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवासी शाळेकडून कर्मचाऱ्यांची होणारी पिळवणूक व छळ थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) सेंट कॅथरिन्स होम ही निवासी शाळा नाही. या परिसरात सेंट कॅथरिन हायस्कूल ही माध्यमिक शाळा असून ३२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) सर्व कर्मचारी कायम आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये फक्त वर्ग 4 मधील कर्मचारीच नाही तर काही ठिकाणी शिक्षकांना सुध्दा अशा प्रकारे रजिस्टरवर सही न करता किंवा सही करीत असताना पगार जास्त दाखववायाचा आणि हातामध्ये कमी पगार देऊन त्यावर सह्या घ्यावयाच्या असे प्रकार होतात. अंधेरी येथे सेन्ट कॅथरिन्स होम माध्यमिक शाळेमध्ये पाच ते सात वर्षापासून वर्ग 4 चे जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांना कोणत्याही प्रकारची स्लिप न देता किंवा कायदेशीर बाबींची पूर्तता न करता, सवलती न देता तेथील सिस्टर श्रीमती स्नेहा सुधा त्यांना धमकावतात की, आम्ही तुम्हाला काढून टाकू. त्यामुळे काही कर्मचारी काम सोडून गेलेले आहेत. या ठिकाणी उत्तरामध्ये सांगितले आहे की, असे काहीही झालेले नाही. काही लोक मला येऊन भेटले. त्यामुळे याबाबतची सखोल चौकशी करुन संबंधितांवर शासन कारवाई करणार काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6647...

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये उल्लेख केलेली सेन्ट कॅथरिन्स होम ही 1966 साली स्थापन झालेली मिशनरी प्रकारातील शाळा आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, तेथील प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेमधील कोणत्याही प्रकारचा कर्मचारी शाळेतून निघून गेलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. या शाळेला लागून त्याच संस्थेच्या माध्यमातून चालविले जाणारे आधारगृह आहे. त्या ठिकाणी कोर्ट कमिटेड अनाथ मुली असतात. आधार नसलेल्या मुली तसेच इतर महिलांना त्या ठिकाणी ठेवतात. अशा एकूण 375 मुली आणि 25 महिला त्या ठिकाणी आहेत. त्यातील काही या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेमध्ये जातात. त्या ठिकाणी जे कर्मचारी काम करतात तो शासनमान्य असा विषय नाही. तेथील लाभार्थ्यांना खर्चासाठी जे 950 रुपये देतो त्यातून त्यांना पगार द्यावयाचा असतो. हा प्रश्न आल्यानंतर त्या ठिकाणी शिक्षण अधिकारी जाऊन आले. त्यांनी जे पाहिले त्यानुसार त्या ठिकाणी जे पेमेंट करतात त्यामध्ये मुंबई कॅथलिक धर्माचे जे बोर्ड आहे ते पेमेंट निश्चित करतात आणि त्या पध्दतीने पेमेंट देतात. पेमेंट बँकेमध्ये केले जाते. त्यांचा प्राव्हीडंट फंड कापला जातो आणि पूर्णपणे कादपपत्रासह व्यवस्थितपणे सर्व दिसून आले. त्या ठिकाणी कोणतीही चूक दिसून आली नाही. वैशिष्ट्यपूर्ण आणि चांगल्या पध्दतीने चालविलेली ही संस्था आहे. शिक्षण अधिकाऱ्यांनी तपासल्यानंतर हे लक्षात आले आहे. यामध्ये कमी पगार मिळतो म्हणून सोडून जाण्याचे एक-दोन प्रकार एक-दोन वर्षात झालेले आहेत. याबाबतीत त्यांच्याकडे स्पष्ट अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ती मिशनरी शाळा असून जुनी शाळा आहे. ही शाळा अनुदानित आहे काय ? या शाळेमध्ये शिक्षकांची संख्या किती आहे ? या शाळेमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे ? त्या सर्वांना शिक्षण अधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे काय ? या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन बँकेमार्फत दिले जाते काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

ता. प्र. क्र. 6647.....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी स्पष्ट केले की, त्या ठिकाणी प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहे. त्या ठिकाणी एकंदर 48 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत. आजच्या तारखेपर्यंत त्यांची कोणतीही तक्रार नाही. ती अनुदानित शाळा आहे. त्या ठिकाणी महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविले जाणारे आधारगृह आहे. त्या आधारगृहाला प्रत्येक लाभार्थ्याचे अनुदान आणि काही पदे दिली जातात. यामध्ये त्यांचे आजारपण वगैरे बघत असताना त्या मदतीमध्ये भागत नाही असे चित्र दिसते. परंतु त्यांचे जे कर्मचारी आहेत त्यांना पेमेंट करण्याची जी पध्दत आहे ती व्यवस्थित आहे. बँकेमार्फत पेमेंट केले जाते. हा विषय शिक्षण विभागाचा नाही. हा विषय महिला व बालकल्याण विभागाचा असला तरी याची काळजी त्यांनी घेतलेली दिसून आली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6647....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये दोन भाग दिसतात. पहिला भाग शिक्षणाच्या संदर्भात आहे आणि दुसरा भाग महिला व बालकल्याणाच्या संदर्भात आहे. उत्तरातील दुसऱ्या भागातील कामकाज महिला व बालकल्याण विभागाने पाहिले पाहिजे. सध्या या संस्थेमध्ये जे कर्मचारी नोकरीवर आहेत त्यांना शासन केव्हा न्याय देणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न उद्‌भवत नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

**राज्यातील ५ विद्यापीठांतील पदव्या व गुणपत्रके बनावट असल्याप्रकरणी करावयाची कार्यवाही**

**(५) * ३५१०     श्री.भगवान साळुंखे , श्री.रामनाथ मोते , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.कमलकिशोर कदम , श्री.विक्रम काळे , श्री.राजन तेली , प्रा.सुरेश नवले , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नितीन गडकरी , श्री.विनोद तावडे , श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.संजय केळकर , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.दीपक सावंत , श्री.दिवाकर रावते , श्री.संजय दत्त , श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.चरणसिंग सप्रा , श्री. एस. क्यु. ज़मा , श्री.एम.एम.शेख , श्री.अमरीशभाई पटेल , श्री.सतीश चव्हाण , श्री.गुरुमुख जगवानी , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.किरण पावसकर , ॲड.अनिल परब , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५ विद्यापीठांतील पदव्या व गुणपत्रके बनावट असल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१० रोजी उघडकीस आली असून राज्यात १६१८ प्रकरणे निदर्शनास आली व शिवाजी विद्यापीठातील ४२ प्रकरणाचा समावेश असल्याचे दिर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

ज्या गुणपत्रिका/पदव्यांच्या झेरॉक्स प्रती बोगस असल्याचे आढळून आले आहे त्यांच्या विरोधात FIR दाखल करण्यासंदर्भात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. राज्यात आढळून आलेल्या बोगस पदव्यांची तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी दलाची (स्पेशल इन्व्हेस्टीगेशन टीम) स्थापना केंद्र शासनाने करावी असे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिले आहेत. त्यानुसार सी.बी.आय. कडून विशेष तपासणी दलाची स्थापना करण्यात आली असून राज्यात आढळून आलेल्या बोगस पदव्यांची तपासणी या दलाकडून करण्यात येत आहे.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुरोधाने मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यामध्ये बनावट पदव्या आणि गुणपत्रिकांचा विद्यापीठांच्या माध्यमातून कारखाना उघडला गेला आहे की काय अशी शंका येते. बनावट पदव्यांची विक्री करुन माया गोळा केली जात आहे. हा गैरप्रकार निरनिराळया व्यक्तींमार्फत विद्यापीठ स्तरावर केले जात आहे. शासनाच्या निदर्शनास 1618 प्रकरणे आलेली आहेत, ही प्रकरणे कोणत्या यंत्रणांनी शोधली आहेत, ही यंत्रणा तात्पुरती स्वरुपाची आहे की कायम स्वरुपी आहे. याप्रकरणी एफआयआर दाखल केलेली आहे. परंतु संबंधितांविरुध्द खटले दाखल झाले आहेत काय, त्यांना शिक्षा झाली आहे का याचा काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. तो खुलासा करण्यात यावा. तसेच अशाप्रकारची गुन्हेगारी घडू नये यासाठी शासन कोणती कठोर उपाययोजना करणार आहे ? सभापती महोदय, आणखी एक

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.3510........ श्री.भगवानराव साळुंखे.....

बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये एकूण 54 प्रश्न आहेत, त्यापैकी 34 प्रश्न केवळ शिक्षण विभागाचे आहेत. म्हणजे शासन शिक्षणासारख्या विषयाकडे दुर्लक्ष करीत आहे. शिक्षणाच्या बाबतीत शासन उदासीन असल्याचे दिसत असल्यामुळे आपण शासनाला समज देणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी 3 प्रश्न विचारले आहेत. राज्यात बोगस गुणपत्रिका व सर्टिफिकेटसची प्रकरणे शोधणारी कोणती यंत्रणा आहे असा पहिला प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, पदवी सर्टिफिकेट व गुणपत्रिका ही दोन महत्वाची डॉक्यूमेंटस आहेत. पदवी सर्टिफिकेटवर विद्यापीठाचे सिक्युरिटी फिचर्स असतात. त्यामुळे त्याची 99.9 टक्के नक्कल होऊ शकत नाही. पण 0.1 टक्के नक्कल झाली असेल तर ती बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. बोगस सर्टिफिकेट म्हणजे मूळ सर्टिफिकेटची झेरॉक्स काढून नोकरी मिळविली जाते, त्यावेळी जे एम्प्लॉयर असतात ते उमेदवाराने खरोखर ती पदवी घेतली आहे किंवा नाही ते व्हेरिफाय करण्यासाठी विद्यापीठाकडे पाठविली जाते. विद्यापीठाकडून त्याची व्हॅलिडिटी घेतली जाते. त्यावेळी विद्यापीठाच्या अशा प्रकारची पदवी वा प्रमाणपत्र या या नावाने इश्यू झालेले नाही असे लक्षात आलेले आहे. म्हणजे विद्यापीठाकडे व्हॅलिडिटीसाठी प्रकरण आल्यावर ही प्रकरणे लक्षात आलेली आहेत. सन्मानननीय सदस्यांनी प्रश्नात विचारलेली संख्या तंतोतंत बरोबर नाही, ही संख्या 1134 अशी आहे, परंतु ही गंभीर बाब आहे. नागपूर विद्यापीठामध्ये 76, पुणे विद्यापीठामध्ये 729, शिवाजी विद्यापीठामध्ये 42, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यामध्ये 15, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यामध्ये 18, मुंबई विद्यापीठामध्ये 237 आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये 17 अशी एकूण 1134 बोगस प्रकरणे आढळली आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 3510.... (श्री. राजेश टोपे...

या सगळया प्रकरणी हायकोर्टामध्ये याचिका दाखल झाली होती. सीबीआयला चौकशी करण्यासाठी नेमले होते. सीबीआयने या प्रकरणी चौकशी करण्यासाठी स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम तयार केलेली आहे. या टीमने प्रत्येक विद्यापीठाच्या एक्झामिनर कंट्रोलर आणि अन्य अधिकारी अशा दोन दोन अधिका-यांना बोलावले. 13 विद्यापीठाच्या अधिका-यांना बोलावून काही ठोस निर्णय घेतले. त्यावेळी असे सांगण्यात आले की, जेथे जेथे बोगस सर्टिफिकेट सापडले त्या त्या ठिकाणी पोलीस केस दाखल करावी. त्याप्रमाणे संबंधित विद्यापीठांनी पोलीस केस दाखल केलेली आहे. पुढील तपास पोलीस खाते करीत आहे. या संदर्भात कोणती उपाययोजना करणार असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे.. अशा पध्दतीने कोणी शिक्षण न घेता बोगस सर्टिफिकेटच्या आधारे योग्य व्यक्तीचा हक्क हिरावून घेऊन नोकरीला लागत असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे. झेरॉक्सच्या माध्यमातून असे प्रकार केले जातात आणि व्हॅलिडिटीच्या वेळी ते उघडकीस येतात. आता इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे युग आहे. तेव्हा कॉम्प्युटरच्या माध्यमातून याबाबतीत खूप चांगल्या पध्दतीने काम करता येणे शक्य आहे. प्रत्येक एम्प्लॉयर आणि बाहेरच्या देशातील एम्प्लॉयर देखील एका विशिष्ट एजन्सीच्या माध्यमातून सर्टिफिकेट खरी की खोटी आहेत हे पडताळून पाहतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्टिफिकेटची वैधता तपासणे शक्य आहे. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला स्मार्टकार्ड देऊन त्यामध्ये सर्टिफिकेट आणि मार्क्स मेमोचा अंतर्भाव करणे शक्य आहे. असे केले तर जो नोकरी देणारा आहे त्याला खरे खोटे तपासायचे असेल तर विद्यापीठाच्या वेबसाईटवरुन पोर्टलमध्ये जाऊन क्रेडिट कार्डाच्या किंवा डेबिट कार्डाच्या माध्यमातून ॲक्सेस करुन सर्टिफिकेटची व्हॅलिडिटी तपासून पाहणे शक्य होईल. तेव्हा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजिचा वापर करुन अशा प्रकारच्या गोष्टींना आळा घालता येईल. यासंदर्भात राज्य शासनाचे अधिकार वापरुन सेक्शन 8(4) अंतर्गत सर्व विद्यापीठांना अशा प्रकारचे आदेश देण्यात येतील. व्हॅलिडिटीची अशा प्रकारची पध्दत सॉर्ट आऊट करावी आणि प्रत्येक विद्यार्थ्याला स्मार्टकार्ड देण्यात यावे, असे सर्व विद्यापीठांना बंधनकारक करण्यात येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सीबीआयकडे किती प्रकरणे पाठविली आणि किती प्रकरणी निर्णय लागलेला आहे ?

==2==



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 3510....

श्री. राजेश टोपे : 1134 प्रकरणे आहेत. या प्रकरणी त्या त्या पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यास सांगितलेले आहे. काही ठिकाणी प्रक्रिया झालेली आहे. पोलीस स्टेशन इन्व्हेस्टिगेशन करीत आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : विद्यापीठ कायद्याने शासनास जे अधिकार मिळालेले आहेत त्याचा वापर करुन ज्यांनी बोगस सर्टिफिकेट दिली त्यांच्या बाबतीत कारवाई करण्यात येत आहे ही समाधानाची बाब आहे. या प्रकरणी विद्यापीठाचा दोष असेल तर त्यांच्यावर जरुर टीका केली पाहिजे. मागे नागपूर विद्यापीठामध्ये कोहचाडे प्रकरण झाले. ही जी प्रकरणे पुढे आलेली आहेत त्यामध्ये या 8 विद्यापीठांपैकी कोणत्याही विद्यापीठाचा सहभाग नाही ही गोष्ट खरी आहे काय ? ही प्रकरणे पकडण्यासाठी आठ विद्यापीठांनी मदत केलेली आहे. म्हणून या प्रकरणी विद्यापीठस्तरावर काही सहभाग नाही, हे खरे आहे काय ?

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3510....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्याकडील प्राप्त माहितीप्रमाणे विद्यापीठाकडून दोष घडलेला नाही. त्या त्या विद्यार्थ्यांचा दोष आहे. स्वत:ला नोकरी मिळण्यासाठी अशा पध्दतीने प्रमाणपत्राची झेरॉक्स काढून त्यावर स्वत:चे नाव टाकून नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठाच्या ही गोष्ट लक्षात आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात आली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी चांगले उत्तर दिले आहे. स्मार्टकार्डचा उल्लेख करण्यात आला आहे. बायोमेट्रिकचा वापर होणार का हा महत्वाचा भाग आहे. त्याबाबतीत कोणत्या प्रकारचा वापर करणार आहात हे महत्वाचे आहे. स्मार्ट कार्डबाबत फिंगर प्रिंट किंवा रेटिनाची नोंद केली तर त्याचे डुप्लिकेशन होत नाही. त्यामुळे या गोष्टींचा अंतर्भाव करणार आहात का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, स्मार्ट कार्ड स्वाईप करुन ॲक्सेस करता येते. बायोमेट्रिक पध्दतीने या गोष्टी अंतर्भूत करता येणे शक्य असेल तर सजेशन फॉर ॲक्शन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बोगस प्रमाणपत्रे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा वापर करुन तयार केली जातात. अनेक बोगस विद्यापीठे 'आमच्याकडे या आणि डिग्री मिळवा' अशा जाहिराती वृत्तपत्रात देत असल्याचे दिसून येते. या वृत्तपत्रातील जाहिरातींच्या आधारे ज्या ज्या विद्यापीठांनी मेडिकल, इंजिनिअरिंग, बीपीएड शिक्षणाची डिग्री देण्याबाबत जाहिरात दिली आहे त्या संदर्भात सुमोटो विचार करुन त्यांची व्हॅलिडीटी काय आहे याबाबत ॲक्शन घेणार का? माझी शासनाला विनंती आहे की, यासाठी स्वतंत्र सेल निर्माण करुन अशा प्रकारच्या जाहिराती तपासून पाहून विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक होऊ नये म्हणून सुमोटो ॲक्शन घेण्यात येईल काय? विद्यार्थी बळी पडण्याअगोदर ही कारवाई अपेक्षित आहे. कायद्यामध्ये सक्षम सुधारणा करणे आवश्यक आहे. सध्याच्या कायद्यातील शिक्षा आणि दंडाची तरतूद वाढविण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, बोगस डिग्री देण्याचे काम काही विद्यापीठे जाहिरातीच्या माध्यमातून करतात असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. हा विषय निश्चितपणे शासनाने गंभीरपणे घेतला आहे. मी याठिकाणी हेही सांगू इच्छितो की, शासनाचा प्रयत्न होता की, अधिवेशन संपण्यापूर्वी अशा ज्या बोगस संस्था प्रवेश देऊन पैसे उकळण्याचे काम करतात, अशा बोगस संस्थांवर आळा घालण्यासाठी प्रिव्हेन्शन ऑफ अनऑथोराईज इन्स्टिटयूट

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3510.... श्री.राजेश टोपे.....

ॲक्ट असा नवीन कायदा तयार करावा. विद्यापीठाकडून जर काही असे केल्याचे निदर्शनास आले आणि विद्यापीठाकडून जाहिरातीच्या माध्यमातून फसवणूक होत असेल तर शासन त्या संदर्भात आज कायदा अस्तित्वात नसला तरी या संदर्भात ठोस कारवाई करण्यात येईल. प्रचलित कायद्यांतर्गत जे काही बदल करण्याचे सन्माननीय सदस्यांना अपेक्षित आहे, काही दंडात्मक कारवाई करण्याच्या तरतुदीमध्ये बदल करण्याचे अपेक्षित आहे तो सुध्दा विचार करता येईल.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबई विद्यापीठाचा नॅककडून मिळालेला पंचतारांकित दर्जा गमावल्याबाबत

**(६) * ६३३० डॉ.दीपक सावंत, श्री.रामदास कदम, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर :**
सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाची जगातील दोनशे विद्यापीठांमध्ये उत्तम दर्जेदार शिक्षण देणारे विद्यापीठ म्हणून गणना आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातील शैक्षणिक सुविधा पाहून केंद्र शासनाच्या नॅक या स्वायत्त संस्थेने पंचतारांकित दर्जा दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मुंबई विद्यापीठाचा पंचतारांकित दर्जा माहे जानेवारी, २०१० मध्ये नॅकने काढून घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, देश-परदेशात उत्कृष्ट विद्यापीठ म्हणून मुंबई विद्यापीठाची प्रसिध्दी असतांना नॅकने दिलेला सर्वोत्कृष्ट पंचतारांकित दर्जा मुंबई विद्यापीठास न मिळण्याची कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय. जगातील ख्यातनाम विद्यापीठांपैकी मुंबई विद्यापीठ एक दर्जेदार विद्यापीठ आहे.
(२) नॅक संस्थेकडे विद्यापीठाकडून मुल्यांकनासाठी अर्ज करण्यात आल्यानंतर त्या संबंधातील बाबी तपासण्यात आल्यानंतर नॅक संस्थेकडून विद्यापीठास पंचतारांकित दर्जा देण्यात आला आहे.
(३) नॅक संस्थेकडून ५ वर्षाकरीता दर्जा दिला जातो. सदर कालावधी समाप्त झाल्यावर विद्यापीठांनी पुनर्मुल्यांकनासाठी नॅक संस्थेकडे अर्ज/प्रस्ताव करणे आवश्यक असते. त्यामुळे विद्यापीठास आजमितीस दर्जा नाही.
(४) नॅक संस्थेने विद्यापीठास दिलेला पंचतारांकित दर्जाचा ५ वर्षाचा कालावधी समाप्त झालेला असल्याने नॅक या संस्थेकडून विद्यापीठाचे पुनर्मुल्यांकन करुन घेण्याबाबत मुंबई विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याच प्रश्नासंबंधी लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली होती. दुर्दैवाने लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊन देखील पदवीदान समारंभाची जी जाहिरात देण्यात आली त्यामध्ये मुंबई विद्यापीठाने नॅक दर्जा प्राप्त असे नमूद केले होते. या सभागृहात या विषयावर गंभीर चर्चा होऊन देखील दुर्दैवाने दखल घेण्यात आली नाही. मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले होते की, अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. त्या कारवाईला सुरुवात झाली का? उत्तरामध्ये म्हटले आहे की, नॅक या संस्थेकडून विद्यापीठाचे पुनर्मूल्यांकन करुन घेण्याबाबत मुंबई विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे. नक्की कोणत्या तारखेला कार्यवाही सुरु झाली? याची सद्यस्थिती काय आहे? मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, चार महिन्यात नॅक दर्जा पुनर्प्रस्थापित करु. याबाबत निश्चित भूमिका काय घेण्यात आली आणि त्याबाबत सद्यस्थिती काय आहे?

नंतर 2एफ.1...

अग्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6330......

श्री. राजेश टोपे : महोदय, सभागृहात यासंबंधी सविस्तर चर्चा झालेली आहे. मी कोणत्याही चुकीच्या गोष्टीला संरक्षण देण्याचे कारण नव्हते. मी त्यावेळेस स्पष्टपणे सांगितले होते की, मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा नाही. यासंबंधीची नोंद वर्तमानपत्रांनी सुध्दा चांगल्या प्रकारे घेतली आहे. ठीक आहे की, पदवीदान समारंभामध्ये अशा प्रकारची घटना घडली असेल पण मी स्वत: ज्या प्रभारी कुलगुरु श्रीमती चंद्रा कृष्णमुर्ती आहेत त्यांना स्पष्ट सांगितले की, अशा प्रकारे नॅकचा दर्जा काढल्यानंतर त्याचा वापर आपल्याला करता येणार नाही. वास्तविक तशाच स्वरुपाचा दर्जा मिळविणे आपल्याला शक्य आहे. त्यामुळे पुन्हा आपण रिॲक्रीडेशन करुन घ्यावे. आता प्रश्न राहिला तो म्हणजे विद्यापीठाच्या स्टेटससंबंधी. याबाबतीत स्पष्ट सूचना दिल्या आहेत व पुढील दोन महिन्यात एसएसआर आल्यानंतर त्यांचे काम पूर्ण होईल व पुढील काम म्हणजे हा दर्जा पुन्हा प्राप्त करण्यासंबंधीचे असून ते चार महिन्यात पूर्ण होईल.

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराच्या माध्यमातून अत्यंत गंभीर बाब निदर्शनास आली आहे. ती म्हणजे सभागृहात एवढी सविस्तर चर्चा झाली व मंत्री महोदयांनी स्पष्ट सूचना दिल्यानंतर देखील प्रभारी कुलगुरु जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे असा वापर करीत आहेत. त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? तसेच त्यांच्याकडिल प्रभारी चार्ज काढून अन्य व्यक्तिला तो देणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, तशा सूचना मी दिलेल्या आहेत. नवीन कुलगुरुच्या संदर्भात जाहिरात दिली असून त्यांची जी सर्च कमिटी आहे ती गठित झालेली आहे. येत्या दोन तीन महिन्याच्या काळात नवीन कुलगुरु येणारच आहेत.....अडथळा.......मी हे मान्य केले आहे की, पदवीदान समारंभाच्या वेळेस "फाईव्ह स्टार" कॅटेगरीचा वापर त्यांनी केला असेल परंतु त्यांनी यासाठी पुनर्मान्यते काम चालू केले आहे त्याबाबत सुध्दा कडक सूचना देण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : महोदय, मघाशी उत्तर देताना मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आणि त्याची वर्तमानपत्राने दखल घेतल्याचेही त्यांनी सदनात सांगितले. विद्यापीठाचे प्रशासन सुशिक्षीत असावे असे मी समजतो. ते सुशिक्षीत असल्यामुळे यासंबंधी सभागृहात ज्या तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या हात्या व त्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी सुस्पष्ट अशा सूचनाही दिल्या त्या

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....... ता. प्र. क्र. 6330 .....

त्यांनी वाचल्या असतीलच. तरी सुध्दा ते आठवड्यातच अशा फाईव्ह स्टार दर्जाचा वापर करीत आहेत. याचा अर्थ माननीय मंत्र्यांनाही ते मानत नाहीत. यासंदर्भात मंत्री महोदय संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहेत ? त्याचबरोबर मुंबई विद्यापीठाचे अनेक अडचणींबाबत सभागृहातील सिनेटचे सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ मागतात, तो मिळत नाही. राजाबाई टॉवरच्या लोकांना भेटण्यासाठी सुध्दा मुख्यमंत्र्यांकडे वेळ नाही. कारण या विद्यापीठाचे अनेक प्रश्न आहेत, त्यामुळे मंत्री म्हणून आपण तरी मुख्यमंत्र्यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यासाठी पुढाकार घ्यावा व ही बैठक लवकरात लवकर घेण्यात यावी यासाठी प्रयत्न करणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मी स्वत: वैयक्तिकरित्या तशा सूचना दिलेल्या आहेत. मी एवढी खात्री देऊ शकतो की, येथून पुढे अशा प्रकारे कुठल्याही वेळेस वापर होणार नाही. या विषयाच्या संदर्भात माझे म्हणणे असे आहे की, सिनेटचे काही सदस्य तसेच ज्यांना ज्यांना विद्यापीठाच्या कारभाराविषयी आस्था आहे त्या सर्वांनाच मी सांगितले होते की, आपण मला फक्त पत्राने कळवावे, त्यानुसार 23 एप्रिल, 2010 नंतर म्हणजेच अधिवेशन संपल्यानंतर केव्हाही माझ्या दालनात बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यास तयार आहे.

यानंतर श्री जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :6330......

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा मूळ प्रश्न माननीय मंत्रीमहोदय मान्य करतात. माननीय मंत्रीमहोदयांनी स्वत: कुलगुरुंना बोलावून सांगितले, त्यांच्या पर्यंत या सभागृहात झालेली चर्चा देखील पोहचलेली आहे. या सभागृहाला सुध्दा प्रभारी कुलगुरु जुमानत नाही. या विद्यापीठात प्रभारी कुलगुरु आल्यापासून प्रचंड गोंधळ सुरु झालेला आहे. या विद्यापीठात परीक्षांचे पेपर छापले जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. या सभागृहाला न जुमानणारे जे प्रभारी कुलगुरु आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? या प्रभारी कुलगुरुंचा प्रभार काढून घेतला जाणार आहे काय ? तुम्ही जर हे सर्व मान्य करता तर मग प्रभारी कुलगुरुंना शिक्षा का करीत नाहीत?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मला एवढेच सांगण्यात आले की, या ठिकाणच्या पदवीदान समारंभ झाला त्याची जी जाहिरात आली त्यामध्ये त्यांनी फाईव्ह स्टार कॅटॅगरी वापरली. त्यामुळे या सर्व बाबींची चौकशी करुन माननीय कुलपतींना यासंदर्भातील रिपोर्ट सादर केला जाईल.

**सभापती** : आता पुढील प्रश्न चर्चेला घेतला जाईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या सर्वांच्या आग्रहानिमित्त शेवटी असे सांगितले आहे की, "याबाबतीत संपूर्ण चौकशी करुन माननीय कुलपतींना याबाबतीत शासनाकडून रिपोर्ट सादर केला जाईल. "त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तरात सर्व काही आलेले आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : कुलगुरुंच्या अनुषंगाने जी काही कारवाई करावयाची असेल ती कारवाई माननीय कुलपतींच्या माध्यमातून होत असते. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर बरोबर आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :6330......

श्री. रामदास कदम : माननीय सभापती महोदय, मंत्रीमहोदयांचे दालन या सभागृहापेक्षा मोठे नाही. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तरामुळे आमचे समाधान झाले नसल्यामुळे आम्ही निषेध करुन बर्हिगमन करतो.

(विरोधीपक्षाचे काही सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

**सभापती** : आता तारांकित प्रश्न क्रमांक 3407 चर्चेला घेण्यात येईल.

-------

...3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विविध शाळांचे थकीत वेतनेत्तर अनुदानाबाबतची सुनावणी**

**(७) * ३४०७ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ६५ ला दिनांक १५ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विविध अनुदानित शाळांचे थकित देय वेतनेत्तर अनुदान किती आहे,
(२) सदर संस्थेच्या संदर्भात तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणी केव्हा घेण्यात आली आहे,
(४) उपरोक्त प्रकरणी सुनावणी झाली असल्यास, सदर संस्थेच्या शाळांचे रोखुन धरण्यात आलेले वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत किती कालावधी लागणे अपेक्षीत आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) व (२) सदर संस्थेस वेतनेतर अनुदान रु.७,८१,८९१/- देय असून सदर रक्कम संस्थेमध्ये वाद असल्याने अद्याप अदा करण्यात आलेली नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी तत्कालीन मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्तरावर दि.६.८.२००९ रोजी सुनावणी झालेली असून नव्याने प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने पुन्हा सदर प्रकरण तपासण्यात येत आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या संस्थेच्या २० ते २२ शाळा आहेत. या संस्थेचे १९९४-९५ पासूनचे वेतनेतर अनुदान विनाकारण रोखून धरण्यात आलेले आहे. यासंदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांकडे दिनांक १२.५.२००४ रोजी बैठक झाली होती. तातडीने यासंदर्भातील वेतनेतर अनुदान अदा करण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आदेश सुध्दा दिले होते. परंतु असे असतांनाही या संस्थेस वेतनेतर अनुदान अदा करण्यात आले नाही. ३० डिसेंबर रोजी हा प्रश्न पुन्हा सभागृहात चर्चेला आला होता त्यावेळी शासनाने सांगितले होते की, यासंदर्भातील सर्व अहवाल प्राप्त झालेले असून या संस्थेस वेतनेतर अनुदान देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. असे असतांनाही या संस्थेस अद्यापपर्यंत वेतनेतर अनुदान देण्यात आलेले नाही. या प्रश्नाच्या उत्तरात शासनाने असे म्हटले आहे की, "वस्तुस्थिती जाणून घेऊन नंतर निर्णय घेण्यात येईल." परंतु माझ्या हातात या विषयाच्या संदर्भातील माननीय शिक्षण अधिका-यांचा अहवाल आहे. त्या अहवालात कोणत्याही प्रकारची तक्रार नाही, कोणत्याही प्रकारची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित नाही, धर्मादाय आयुक्तांकडे अधिकृतपणे ही मॅनेजमेंट नोंदवलेली आहे अशी माहिती आहे. या संस्थेचे विनाकारण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.  :3407......

श्री. रामनाथ मोते...

रोखून धरण्यात आलेले १९९४-९५ पासूनचे वेतनेतर अनुदान १५ दिवसाच्या आत तातडीने अदा केले जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन २००२ पासून या संस्थेस देण्यात येणारे अनुदान संस्थेच्या मतभेदामुळे थांबलेले आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3407....

श्री.बाळासाहेब थोरात....

त्या संस्थेस काही अनुदान देणे बाकी आहे. यासंबंधातील संचालकांचा अहवाल 15 दिवसात मागवून घेण्यात येईल. तो अहवाल तपासल्यानंतर 15 दिवसामध्ये त्यावर कारवाई केली जाईल.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, हा प्रश्न अनेकदा चर्चेला आलेला आहे. ही संस्था जुनी आहे. पण तिला वंचित ठेवले जाते आहे. वैधतेसंबंधी याचिकेमध्ये सर्व मांडण्यात आले होते. याचिका क्रमांक 2215/2 चा निर्णय हा कधीच झालेला आहे. कुठल्याही प्रकारचे वैधतेसंबंधी काहीही राहिलेले नाही. आपल्याकडे संचालकांचा अहवाल देखील प्राप्त झालेला आहे. यासंबंधी संस्थेने शासनाला वेळोवेळी माहिती दिलेली आहे. त्यावर सुनावणी देखील झालेली आहे. दिनांक 6.8.2009 रोजी तत्कालीन शिक्षण मंत्री यांनी सुनावणी घेतली आहे. त्यांनी वेतनेत्तर अनुदान अदा करण्याची माहिती दिली होती. तेव्हा याबाबतीतील चौकशी किती दिवसात पूर्ण होईल आणि किती दिवसाच्या आत हा अनुदानाचा प्रश्न सुटेल ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हे खरे आहे की, 31.12 ला प्रस्ताव आला. परंतु, पुन्हा एकदा 11 जूनला तक्रार अर्ज आला. तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी सुनावणी देखील घेतली होती. त्यांनी तक्रारीची तपासणी करावी अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. आम्ही संचालकांचा अहवाल 15 दिवसामध्ये मागवून घेऊ आणि त्यानंतरच्या 15 दिवसामध्ये वेतनेत्तर अनुदान देण्याच्या दृष्टीने योग्य कारवाई केली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. अहवाल मागवून घेण्यात येईल असे मंत्रिमहोदय बोलत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे हा अहवाल आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे जबाबदारीने सांगत आहेत. अन्याय झालेला आहे हे आपण मान्य केलेले आहे. अहवालाची जी काही फॉर्मालिटी आहे ती आपण पूर्ण करावी. पण 15 दिवसात हे पैसे त्यांना देण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सुरूवातीला अहवाल आला होता. पण त्यानंतर पुन्हा तक्रार आली. त्यामुळे सदर तक्रार तपासणीसाठी पुन्हा खाली पाठविण्यात आली. या संबंधातील निर्णय एक महिन्यात घेऊ हे मी सांगितलेले आहे.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3407

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी प्रश्न विचारलेला आहे. एकदा चौकशी झाली. ती पूर्ण होत आल्यानंतर लांबविण्यासाठी पुन्हा तक्रार करण्यात येते आणि त्याची आपण दखल घेता. ज्यावेळी चौकशी झाली त्यावेळी त्यांनी तक्रारी का दिल्या नाहीत? हे प्रकरण जाणीवपूर्वक लांबणीवर टाकण्यासाठी प्रयत्न सुरू आहे, हे माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात येत आहे काय ? पुन्हा तक्रार आली तर प्रकरण लांबेल. त्यामुळे आता मंत्रिमहोदयांनी आम्ही वेतनेत्तर अनुदान देऊ असे घोषित केले पाहिजे. उगाच लांबविण्याचे कारण नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी अत्यंत स्पष्टपणे सांगितले आहे की, एक महिन्यामध्ये निर्णय घेऊ.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण उप संचालकांचा, शिक्षण अधिकाऱ्यांचा, शिक्षण संचालकांचा म्हणजेच सर्वांचा अहवाल अनुकूल आहे. या सर्वांचे असे म्हणणे आहे की, न्यायालयीन कुठलेही प्रकरण नाही. मंत्रिमहोदयांनी आता उत्तर दिले की, तक्रार करणार एकच माणूस आहे. श्री.नरेंद्र भास्कर पाटील असे त्या माणसाचे नाव आहे. या माणसाने एक नव्हे तर जवळ जवळ पाच तक्रारी केलेल्या आहेत. या सगळ्या तक्रारी जाणीवपूर्वक केल्या आहेत, त्या खोट्या आहेत, त्यांच्या विरूद्धच फौजदारी गुन्हा दाखल करावा अशा प्रकारचा अहवाल गुन्हा अन्वेषण विभागाने दिलेला आहे. तेव्हा अशा नटोरियस माणसाच्या तक्रारीची दखल न घेता तातडीने शासन अनुदान अदा करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संचालकांचा अहवाल तपासून पाहिल्यानंतर एक महिन्यात अनुदान देऊ असे सांगितले आहे. आता मी अलीकडे येतो. संचालकांचा अहवाल प्रलंबित आहे. तो जास्तीतजास्त 8 दिवसामध्ये मागवून घेतो आणि त्यानंतरच्या आठ दिवसामध्ये आम्ही निर्णय घेतो.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, तो अहवाल आलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे समजून जी काही कारवाई करायची आहे ती आपण तातडीने करावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय,आपल्या सूचनेनुसार कार्यवाही होईल.

=====

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या शिवाजीनगर, गोवंडी, मानखुर्द उपनगरातील बैंगणवाडी झोपडपट्टीमधील मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत**

**(८) * ६५७४ श्रीमती अलका देसाई , श्री.संजय दत्त** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रथम या सेवाभावी संस्थेने मुंबई विजन २०१५ हा अहवाल प्रसिध्द केल्यानुसार मुंबई येथील शिवाजीनगर , गोवंडी, मानखुर्द, बैंगणवाडी झोपडपट्टीमधील ३५ टक्के मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण मिळावे व ती शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री.बाळासाहेब थोरात : (१) नाही, असा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) मुंबई येथील शिवाजीनगर, गोवंडी, मानखुर्द, बैंगनवाडी परिसरात एकूण ३४ शाळांमधून २३८६१ विद्यार्थी शिखण घेत आहेत.

म.फुले शिक्षण हमी योजनेंतर्गत शिवाजीनगर भागात १३ वर्गातून २६०, बैंगनवाडी भागात १०२ वर्गातून २१४० , गोंवडी भागात ६० वर्गातून १२६० आणि मानखुर्द भागात १३८ वर्गातून २६७८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, विविध भागांमध्ये २, ६७८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत याची माहिती उत्तरामध्ये सांगण्यात आलेली आहे. मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या पैकी किती मुले पटावर आहेत, किती मुलांना लिहिता वाचता येते ?त्याचबरोबर प्रथम ही मुंबई शहरामध्ये प्रतिथयश संस्था म्हणून मानली गेली आहे. ३५ टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहे असे त्या संस्थेने अहवालात म्हटलेले आहे परंतु सदरहू अहवाल प्राप्त झालेला नाही असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. माननीय मंत्री महोदयांकडे हा अहवाल आल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय,प्रथम ही संस्था शिक्षण क्षेत्रात काम करीत असून देश पातळीवर काम करणारी ती संस्था आहे. या संस्थेकडे आम्ही अधिका-यांना पाठविले होते व अशा प्रकारचा अहवाल तुमच्याकडे आहे काय या बाबतीत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी लेखी असे सागितले की ,अशा प्रकारचे सर्व्हेक्षण केलेले नाही. त्यांनी तसे स्पष्टपणे लिहून दिलेले आहे असे असले तरी सुध्दा मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.६५७४... श्री.बाळासाहेब थोरात

सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत राज्यामध्ये जे काम सुरु करण्यात आलेले आहे त्यामध्ये या अनधिकृत वस्त्यांमध्ये देखील शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. त्या ठिकाणी बरेच विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. २० विद्यार्थ्यामध्ये एक शिक्षक याप्रमाणे शिक्षक देण्यात येत असून त्या साठी अनुदानाची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा नाही. परंतु एक बाब मला सांगावयाची आहे की, प्रथम ही संस्था मान्यता प्राप्त आहे. टी.आय.एस. एस. नंतर या संस्थेचे नाव घेतले जाते. त्या संस्थेने अहवाल देण्या पेक्षा शासनाने त्यांच्याकडून अहवाल मागवून घेतला पाहिजे.आय.डी.बी.आय आणि आय.सी.आय.सी.आय.सारख्या बॅन्का आणि केन्द्र सरकारमधील एच.आर.डिपार्टमेन्ट देखील या संस्थेला सर्व्हेक्षण करण्याचे काम देत असते . अशा प्रकारे प्रथम ही संस्था अतिशय नि:पक्षपातीपणाने काम करीत असताना त्या संस्थेने दिलेला अहवाल जर आपल्याकडे आलेला नसेल आणि आपल्या अधिका-यांनी जर तो मागितला नसेल तर माननीय मंत्री महोदयांनी अधिका-यांना आदेश देऊन हा अहवाल मागवून घ्यावा. या अहवालामध्ये अनेक बारीकसारीक बाबीचा उल्लखं करण्यात आलेला आहे.मुंबईमधील शाळांमध्ये चांगल्या प्रकारची शौचालये नाहीत त्यामुळे मुलींना विकार होतात त्यामुळे मुली शाळेत जात नाहीत व मुलींच्या गळतीचे प्रमाण वाढत आहे अशा बारीक सारीक बाबी प्रथम या संस्थने त्या अहवालात नमूद केलेल्या आहेत. त्यामुळे हा अहवाल माननीय मंत्री महोदयांनी वाचावा तसेच त्यानुसार अंमलबजावणी करण्यास देखील अधिका-यांना सांगण्यात यावे असे मला वाटते.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय , प्रथम ही देश पातळीवरील मान्यताप्राप्त संस्था आहे हे खरे आहे परंतु या विशिष्ट विषयाच्या बाबतीत त्यांच्याकडे अहवाल नाही बाकीच्या विषयासबंधीचा अहवाल मी स्वत: वाचला आहे. त्यांच्या एका कार्यक्रमाला मी सुध्दा उपस्थित होतो आणि त्यांच्या अहवालाचा उपयोग पुढच्या काळात करण्यात येईल.

------

**सभापती :**नियम २८९ च्या प्रस्तावाच्या संदर्भात निदेश देतांना प्रश्नोत्तराच्या तासामधील ४ मिनिटांचा वेळ गेला असल्यामुळे मी प्रश्नोत्तराच्या तासासाठी तो वेळ वाढवून दिला आहे.



VTG/ KGS/ SBT/ ST/ MMP/ प्रथम श्री.भारवि 13.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत**

**(९) * २५८३ प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे : दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक २९९२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० एप्रिल, २००२ च्या शासननिर्णयाने व त्यानंतर दिनांक ८ नोव्हेंबर, २००५ च्या शासननिर्णयान्वये शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या अनेक हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्यात आल्या असल्या तरी त्यातून राहून गेलेल्या शासकीय महाविद्यालयातील तत्सम अर्हताधारक हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करुन झालेला भेदभाव दुर करण्याच्या विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड,श्री. राजेश टोपे यांच्याकरिता: (१) नाही.

(२) व (३) हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्यासंदर्भात उमादेवी वि. कर्नाटक शासन आणि व्ही. चंद्रशेखर विरुध्द कर्नाटक शासन या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने या प्रस्तावावर काही मार्ग निघेल का यासंबंधी प्रकरण विचाराधीन आहे.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, हंगामी अधिव्याख्यातांच्या सेवा नियमित करण्याच्या संदर्भात उमादेवी वि. कर्नाटक शासन आणि व्ही. चंद्रशेखर विरुध्द कर्नाटक शासन या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याबद्दल कोणाचेही दुमत होण्याचे कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर अनेक हंगामी कर्मचा-यांच्या वा अधिका-यांच्या सेवा नियमित केल्या गेलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? त्यासंबंधीचे शासन निर्णय माझ्याकडे आहेत. तेव्हा इतरांच्या सेवा जर नियमित केल्या गेल्या असतील तर त्याप्रमाणे हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित केल्या जाणार आहेत काय ? दिनांक २० एप्रिल २००२ च्या शासन निर्णयानुसार अनेकांच्या सेवा नियमित केल्या आहेत. दिनांक ८ नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयानी देखील काही सेवा नियमित केल्या आहेत. परंतु काही वरिष्ठ आणि उच्च शिक्षित लोक वगळले गेले आहेत तेव्हा याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, इतर विभागांनी आणि आपल्या विभागांनी ज्या सेवा नियमित केल्या आहेत त्या प्रमाणे या हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित केल्या जातील काय ? आणि ८ नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयाने ज्याच्या सेवा नियमित केल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत परंतु  त्यांच्या पूर्वीचे आणि काही वरिष्ठ , उच्च शिक्षित हंगामी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याचे राहून गेलेले आहेत.  त्यांना २००५ च्या शासन निर्णयाचे संरक्षण देण्यामध्ये शासनाला काय अडचण आहे ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2583...

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छिते की, 35 हंगामी अधिव्याख्याते आणि 33 कंत्राटी अधिव्याख्याते आहेत. याबाबत उमादेवी आणि व्ही. चंद्रशेखर, ए. उमराणी यांच्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. याबाबत माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपल्याकडे बॅक डोअर एंट्री नाही, सर्व अधिव्याख्यात्यांना एम.पी.एस.सी. मार्फत जावे लागते. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होऊ नये अशी शासनाची सुध्दा इच्छा आहे. त्याबाबत विधी व न्याय विभागाला विचारण्यात आले असता, त्या विभागाने सुध्दा आपल्या ओपिनिअनमध्ये म्हटले आहे की, "In the instant case appointment appears to have been made purely on contract basis and therefore, their services will be governed as per the terms and conditions of the contract till availability of the candidates made from M.P.S.C."त्यामुळे त्या विभागाचे सुध्दा ए.पी.एस.सी. मार्फत झाले पाहिजे असे मत आहे. त्याशिवाय सामान्य प्रशासन विभागाचे मत घेण्यात आले असता, त्या विभागाने सुध्दा विधी व न्याय विभागाच्या मताशी सहमती दर्शविली आहे. त्यानंतर वित्त विभागाने सुध्दा बॅक डोअर एंट्री नाहीतर फ्रंट डुअर इंट्री यासंबंधी विधी व न्याय विभागाने व सामान्य प्रशासन विभागाने व्यक्त केलेले मत बरोबर असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे या सर्व विभागांचे एकच मत आहे की, ॲडहॉक बेसिसवरील प्राध्यापक असल्यामुळे त्यांना यायचे असल्यास एम.पी.एस.सी. मार्फतच फ्रंट डोअर एंट्रीनेच यावे लागेल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एम.पी.एस.सी. मार्फत जावे याबद्दल माझे दुमत नाही. तुम्ही त्यांना दि.8 नोव्हेंबर, 2005 च्या शासन निर्णयाने नियमित केले आहे. त्यामधील सिनियर आणि वेल क्वॉलिफाईड लोक सोडून गेले आहेत. आपण सांगितलेल्या उत्तराशी माझे दुमत नाही. एम.पी.एस.सी. मार्फत जावे याबद्दल दुमत नाही.परंतु तुम्ही दि.8 नोव्हेंबर, 2005 च्या शासन निर्णयाने त्यांना रेग्युलराईज्ड केले. माझे असे म्हणणे आहे की, हा भेदभाव ठेवणे बरोबर नाही. सिनियर लोक सोडून गेले आहेत. म्हणून मी प्रश्न विचारला आहे की, त्यामधून जे लोक सुटले आहेत त्यांना तुम्ही नियमित केले. त्यामुळे जे सुटले आहेत त्यांच्या बाबतीत दि.8 नोव्हेंबर, 2005 चा शासन निर्णय लागू केला जाईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, त्यानंतरच सुप्रिम कोर्टाचा निर्णय लागला आहे. आणि म्हणून बॅक डोअर एंट्री असल्यामुळे आपण त्यांना घेऊ शकत नाही. त्यांना आपण एम.पी.एस.सी. मार्फतच घेऊ शकतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2009 चा चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2009 चा चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 16 एप्रिल, 2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठराव व पुर:स्थापनार्थ असलेले एक विधेयक यांस द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 15 एप्रिल, 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 145 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>**अशासकीय विधेयक**</u>

सन 2010 चे वि.प.वि. क्र. 2 डॉ. दीपक सावंत, वि.प.स. 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(शुक्रवार दिनांक 9 एप्रिल, 2010 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले ठराव) (अनुक्रमांक 1 ते 3)

1) ठराव क्रमांक 3 श्री.रामनाथ मोते, वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

2) ठराव क्रमांक 15 श्री. रामदास कदम, वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

3) ठराव क्रमांक 67 श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

<u>**बॅलेटव्दारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**</u>

1) ठराव क्रमांक 6 श्री. जयंत पाटील, वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

2) ठराव क्रमांक 43 श्री.संजय दत्त, वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

3) ठराव क्रमांक 65 श्रीमती अलका देसाई, वि.प.स. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावांचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता याठिकाणी माननीय सदस्यांनी अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त वाचून दाखविले. हा प्रस्ताव मांडण्यासंदर्भात मला एक हरकतीचा मुद्दा मांडावयाचा आहे यासंबंधी मी आपणाकडे एक पत्र दिले आहे. संविधानातील कलम 245 व 246 नुसार मला तो मुद्दा मांडण्याची आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती केली आहे. आपणाकडून त्यासंबंधी रुलिंग येणे महत्वाचे असल्यामुळे मला तो हरकतीच्या मुद्याव्दारे उपस्थित करावयाचा आहे. हा मुद्या घटनात्मक असल्यामुळे तो पाच मिनिटामध्ये मांडून संपणार नाही. त्याकरिता आपण मला वेळ ठरवून द्यावी अशी विनंती करतो.

**सभापती** : आपण मला येऊन भेटलेले आहात, तसेच आपण मला लेखी पत्र दिले आहे. आपण त्याकरिता 15 ते 20 मिनिटांचा वेळ लागेल असे म्हटले आहे. माझे म्हणणे असे आहे की, आपण 10 मिनिटांच्या आत आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, घटनात्मक बाब असल्यामुळे दहा मिनिटामध्ये संपणार नाही.

**सभापती** : ठीक आहे.

अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:55

## औचित्याच्या मुद्याबाबत

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती की, मुंबईच्या जॉईंट डायरेक्टर यांनी स्वत:च वेगळा जी.आर.काढल्यामुळे फेब्रुवारी महिन्याचे वेतन अजूनपर्यंत झालेले नाही. त्यावेळी आपण पहिल्या शुक्रवारी निवेदन करावे अशा प्रकारचे आदेश दिले होते. पण नंतर दुसरा शुक्रवारही निघून गेला आणि उद्या तिसरा शुक्रवार आहे. तेव्हा याबाबतीत ताबडतोब निवेदन होणे आवश्यक होते, तसे ते झालेले नाही.याठिकाणी संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय आणि माननीय राज्य मंत्री महोदय उपस्थित आहेत. दोन शुक्रवार निघून गेले असून, अजूनपर्यंत याबाबतीत निवेदन करण्यात आलेले नाही.

**सभापती** : मी सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, त्याचे निवेदन खरे म्हणजे सहा दिवसामध्ये करावयाचे होते. पण दोन आठवडे होऊन सुध्दा संबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदयांकडून अजूनपर्यात निवेदन झालेले नाही.

श्रीमती वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सदरहू निवेदन उद्या केले जाईल.

----

**सभापती** : मी या अनुषंगाने सन्माननीय मंत्री महोदयांना पिठासीन अधिकारी किंवा सभापती म्हणून माझी अशी सूचना आहे की, 93 अन्वये देण्यात आलेल्या ज्या सूचनांच्या बाबतीत निवेदन करावे असे सांगितलेले आहे, ती निवेदने याठिकाणी सहा दिवसाच्या आत येणे जरुरीचे आहे. त्या दृष्टीने आपण त्याची नोंद घ्यावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यापूर्वी मी सभागृहामध्ये औचित्याचा मुद्दा मांडला होता. आणि त्याचे उत्तर तातडीने मिळणे अपेक्षित होते. परंतु दोन आठवडे झाले तरी अजूनपर्यंत त्याचे उत्तर मिळालेले नाही.

**सभापती** : ठीक आहे.

----

. . . .2 के-2

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ इन्फोरमेशन है.सभागृह के कामकाज के नियम के अनुसार सभी कॉरपोरेशन्स, बोर्ड के वार्षिक अहवाल पटल पर रखे जाते हैं. 10 साल के बाद 2001-02 के अहवाल अभी हमारे सामने आ रहे हैं.मुझे ऐसा लगता है कि इसकी कोई समय सीमा होनी चाहिए. अगर 10 साल के बाद अहवाल हमारे सामने आता है तो इस अहवाल का कोई लॉजिक नहीं है, यह वेस्टेज ऑफ मनी और वेस्टेज ऑफ पेपर है. मेरा कहना यह है कि एक या 2 साल के अन्दर यह अहवाल आना चाहिए और अगर समय पर अहवाल नहीं आता है तो इसको राइट ऑफ करना चाहिए.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी जो पॉईंट ऑफ इन्फर्मेशनचा मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो बरोबर आहे. आपली इच्छा आणि सदनाची अपेक्षा अशी आहे की, त्या-त्या विभागाने जी मंडळे किंवा अन्य संस्था असतील, त्यांचे अहवाल याठिकाणी सदनासमोर लवकरात लवकर सादर करणे गरजेचे आहे. यादृष्टीने त्यांना विधीमंडळ कार्यालयामार्फत पुन्हा लेखी कळविण्यात येईल आणि माझ्याही त्यांना अशाच प्रकारच्या सूचना आहेत.

----

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही सभागृहामध्ये औचित्याचे मुद्दे मांडतो. पहिल्या आठवड्यामध्ये मी याठिकाणी कॅन्टीनमध्ये खाद्य पदार्थांचे दर लावण्यात येत आहेत त्याबाबत एक औचित्याचा मुद्दा मांडला होता. पण त्याबाबतीत आमच्याकडे अजूनही उत्तर आलेले नाही. तसेच शुक्रवारी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी काही पोलीस पत्ते खेळत आहेत,जुगार खेळत आहेत यासंबंधात देखील औचित्याचा मुद्दा मांडला होता. त्याबाबतीत संध्याकाळपर्यंत उत्तर देण्यात येईल असे माननीय उप सभापती यांनी सांगितले होते. त्याचे देखील उत्तर आलेले नाही. त्यामुळे सभापती महोदय, आपले याबाबतीत संरक्षण मिळावे अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

----

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, . . . .

**सभापती** : खरे म्हणजे उद्या औचित्याचे मुद्दे मांडावयाचे आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा नाही. पण आपण वारंवार ...

. . . .2 के-3



APR/ SBT/ MMP/ 13:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सभागृहामध्ये समोरच्या बाकांवरील माननीय मंत्री महोदयांना निर्देश दिलेले आहेत. मात्र त्याचे पालन होत नाही. मागील हिवाळी अधिवेशनामध्ये "दाई कीट" या विषयाच्या संबंधात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. या विषयाच्या संबंधात सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येणार होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री.सुरेश शेट्टीसाहेबांनी सांगितले होते की, यासंबंधीचा अहवाल पुढील अधिवेशनामध्ये सदनाच्या पटलावर ठेऊ. तसेच माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी देखील सांगितले होते.आता हे अधिवेशन संपण्यासाठी एक आठवड्याचा अवधी राहिलेला आहे. आजही याबाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही आणि सभापती महोदय, आपणही मध्यंतरी या विषयाच्या संबंधात सांगितले होते. तेव्हा कृपया आपण या विषयाच्या संबंधात लक्ष घालावे.

**सभापती** : ठीक आहे.

----

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी कोकणातील मच्छिमारांच्या संदर्भात सांगावयाचे आहे की, फयान वादळामुळे जे नुकसान झाले आहे, त्या अनुषंगाने राज्य शासनाने जे अनुदान देण्याचे जाहीर केलेले होते, त्याचे वाटप अजूनही झालेले नाही. या विषयाच्या संदर्भात सदनामध्ये एक लक्षवेधी सूचना देखील मांडण्यात आली होती.

यानंतर कु.थोरात . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

या लक्षवेधी सूचनेचे उत्तर राखून ठेवण्यात आले होते. ते उत्तर या सभागृहात देण्यात येणार होते. ही लक्षवेधी सूचना होऊन दोन-तीन दिवस झालेले आहेत. अद्यापपर्यंत या लक्षवेधी सूचनेचे उत्तर आलेले नाही. त्याबाबत शासनाने खुलासा करावा.

**सभापती** : या लक्षवेधी सूचनेचे उत्तर आज आले नाही तर उद्या जरुर देण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ठीक आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा

**सभापती** : मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खेरवाडी पोालीस ठाणे, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना दिनांक 5 एप्रिल,2010 रोजी भारतीय दंड संहितेच्या कलम 141,142,143,145,147,149,341 तसेच मुंबई पोलीस अधिनियम,1951 च्या कलम 37(1) सह 135 अन्वये खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई येथे 19.05 वाजता अटक करण्यात आली असून त्यांना त्याच दिवशी 19.15 वाजता वैयक्तिक जातमुचलक्यावर मुक्त करण्यात आले आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ 14:00

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते,भगवानराव साळुंखे,विनोद तावडे,संजय केळकर,चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील आठवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुमारे दहा हजार विद्यार्थ्यांना गेल्या दोन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर,किरण पावसकर यांनी "कोल्हापूर येथील अपंगांच्या सर्वांगिण पुनर्वसन काम करीत असलेल्या हेल्पर ऑफ दि हँडिकॅप या संस्थेच्या समर्थ विद्यामंदिर शाळेच्या मान्यतेसाठी 40 अपंग विद्यार्थी व संस्थेचे पदाधिकारी यांनी मंत्रालय,मुंबई येथे बेमुदत उपोषणास बसण्याचा दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे,जयंत प्र.पाटील,कपिल पाटील यांनी "दिनांक 12 मार्च,2010 रोजी शहाजेराजे भोसले क्रिडा संकुलनातील जलतरण तलावामध्ये कु.कासम सिध्दीकी या 7 वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे,भगवानराव साळुंखे,रामनाथ मोते यांनी " प्रदुषणाच्या नावाखाली कणकवली तहसीलदार कार्यालयाने तेथील वाळूचे काम बंद केल्याने फौड्री उद्योग अडचणीत येऊन सुमारे 25 हजार मजुरांना रोजगारास मुकावे लागल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब,सर्वश्री किरण पावसकर,डॉ.दिपक सावंत,श्री. परशुराम उपरकर यांनी " शासनाने गरीब व गरजू लोकांना माफक दरात घरे उपलब्ध व्हावी म्हणून मुंबई उपनगरात अनेक ठिकाणी एसआरए योजनेअंतर्गत अनेक सोसायटींची कामे रहिवाशी व कमिटी विकासक यांच्या मतभेदामुळे व अंतर्गत वादामुळे कामे प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी " ठाणे जिल्हयातील शहापूर येथील लिबर्टी ऑईल मिलला दिनांक 13.4.2010 रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागून या आगीत कोटयवधी रुपयांचे नुकसान होऊन 600 कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धन्यवाद.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "सांगली जिल्हयातील आरुळे-बांबवडे गावात पोट कालव्यांच्या अपुऱ्या कामामुळे शेतकऱ्यांना शेती व पिण्याच्या पाण्यासाठी निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई,त्यामुळे तेथील नागरिकांनी दि.15-4-2010 रोजी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा घेतलेला निर्णय " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर,चंद्रकांत पाटील यांनी " राष्ट्रीय अंधत्व प्रकल्पासाठी राज्यात पूर्णवेळ अधिकारी नसणे,समितीचे अध्यक्षपद रिक्त असणे, तांत्रिक माहिती असलेले तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसणे,नेत्रदानाची सेवा 24 तास उपलब्ध नसणे,इ.कारणांमुळे नेत्र संकलनाचे प्रमाण गेल्या पाच वर्षाच्या तुलनेने कमी असल्याचे निदर्शनास आल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बरवड...

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी " गिरणी कामगारांच्या वारसांना जागा देण्याबाबत शासनाने घोषणा करुन देखील मुकेश मिल, बॉम्बे डाईंग, स्प्रिंग मिल (नायगाव), बॉम्बे डाईंग टेक्स्टाईल मिल (प्रभादेवी), फिनिक्स मिल, रघुवंशी मिल, व्हिक्टोरिया मिल, कमला मिल, सेंच्युरी मिल, प्रकाश कॉटन मिल, या मिलच्या विकासकाने कामगार तसेच त्यांच्या वारसांना जागा देण्याचे नाकारल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**पृ. शी.** : राज्यातील ऊस तोडणी व वाहतूक कामगारांचे शेजारच्या राज्यांमध्ये होत असलेले स्थलांतर

**मु. शी.** : राज्यातील ऊस तोडणी व वाहतूक कामगारांचे शेजारच्या राज्यांमध्ये होत असलेले स्थलांतर याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. पद्‌माकर वळवी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी "राज्यातील ऊस तोडणी व वाहतूक कामगारांचे शेजारच्या राज्यांमध्ये होत असलेले स्थलांतर " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या पहिल्या ओळीमध्ये 'ऊसतोड कामगारांच्या' या शब्दाऐवजी 'साखर कारखान्यातील कामगारांच्या' असे वाचावे. तसेच निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये सुरुवातील 'तसेच'या शब्दाच्या अगोदर ' ऊसतोड वाहतूक कामगारांच्या मजुरीच्या दरात तसेच मुकादमांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत दिनांक 30 जून, 2009 रोजी ऊस उत्पादक प्रतिनिधी व ऊस तोडणी वाहतूक कामगारांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये सामंजस्य करार झ ालेला आहे त्यात 2008-09 ते 2011-12 या कालावधीसाठी दर निश्चित करण्यात आले आहेत' असे वाचावे.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ऊस तोडणी कामगारांचे भवितव्य खूप अंधारात आहे. त्याचे असलेले वेतन, त्यांना मिळणाऱ्या बाकीच्या सुविधा, त्यांना वैद्यकीय सुविधा न मिळणे, अशा कोणत्याही सुविधा त्यांना मिळत नाहीत. या राज्यामध्ये वेगवेगळी महामंडळे केलेली आहेत. जसे माथाडी बोर्ड आहे, खोका कामगारांचे बोर्ड आहे, गोदी कामगारांचे बोर्ड आहे त्याप्रमाणे ऊस तोडणी कामगारांचे बोर्ड शासन करणार काय ? माथाडी कामगार बोर्डाप्रमाणे त्या बोर्डाला सर्व सुविधा देणार काय ? सर्व साखर कारखान्यांना या बोर्डामार्फतच कामगार घेण्याचे बंधन शासन घालणार काय ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या बोर्डाला मान्यता देण्याची शासनाची तयारी आहे काय याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांचे बोर्ड तयार करण्याच्या बाबतीत शासन विचार करीत आहे. बोर्ड बनविण्याच्या बाबतीत शासन पॉझिटिव्ह आहे. याबाबत निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल्.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, म्हातारपणामध्ये त्यांना कोणताही आधार उरत नाही. अशा सर्व ऊसतोडणी मजुरांसाठी पेन्शन योजना सुरु करणार काय ? ऊस तोडणी मजुरांच्या मुलांचा मोठा प्रश्न असतो. मजूर गेल्यानंतर मुलांची शाळा तुटते. या मुलांसाठी निवासी शाळांची योजना शासन सुरु करणार काय ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदस, असंघटित कामगारांसाठी केंद्र शासनाची जनश्री विमा योजना आहे. ऊसतोड कामगार हे असंघटित कामगार आहेत त्यामुळे जनश्री योजनेचे सर्व लाभ त्यांना लागू केले. त्यासंदर्भामध्ये शासनाचा सर्व ॲक्शन प्रोग्राम तयार झालेला आहे. निश्चितपणे सर्व प्रकारच्या सवलती या जनश्री योजनेमध्ये देण्यात येतात. दुसरी बाब अशी की, आपली जी राष्ट्रीय विमा योजना आहे ती सुध्दा या कामगारांना लागू आहे. त्या योजनेचेही फायदे त्यांना देण्यात येतील. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या शाळेचा जो विषय आहे त्याबाबत निश्चितपणे शासन कार्यवाही करील.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये गेली 7 ते 8 वर्षे ऊसतोड कामगारांच्या प्रश्नावर वेगवेगळ्या घोषणा झालेल्या आहेत. आज माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले सांगितले की, बोर्ड तयार करण्याबाबत शासनाची सकारात्मक भूमिका आहे. माझा प्रश्न असा आहे की, ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शाळेबद्दल विचार केला जाईल असे आपण सांगितले. पण यापूर्वी सरकारने असा दावा केलेला आहे की, ऊसतोड कामगार ज्या जिल्ह्यातून येतात त्या जिल्ह्यांमध्ये त्यांच्यासाठी समाजकल्याणतर्फे वसतिगृह सुरु करु. दुसरी सूचना अशी होती की, ती मुले आई-वडिलांबरोबर ज्या ठिकाणी जातात

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्याठिकाणी शाळा बांधण्याची जबाबदारी साखर कारखान्यावर टाकू, याबद्दल शासनाची काय योजना आहे हे शासन स्पष्ट करील काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांची मुले आई-वडिलांबरोबर जातात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ती स्थिर नसतात. या कामगारांची मुले ज्या गावाहून विस्थापित झाली आहेत त्या मूळ गावामध्ये समाजकल्याण विभागामार्फत वसतिगृहे बांधण्याबाबत सभागृहात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. या प्रश्नाबाबत प्रगती कशी होईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे. साखर खाळा या संकल्पनेबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ऊसतोड कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्याबात अनुकूल असे उत्तर दिलेले आहे. या कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा तयार करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय, त्याचा फायदा त्यांना मिळणार आहे काय ? निवासी शाळा बांधल्यावर हा प्रश्न 50 टक्के सुटू शकतो. तसेच वसतिगृहे बांधण्याचा प्रश्न राहणार नाही. याबाबत निर्णय घेणार आहे काय ?

श्री.पद्माकर वळवी : ऊसतोड कामगारांबाबत कामगार विभागामार्फत कामगार कल्याण योजना राबविण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याच पध्दतीने या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सहकार विभाग सुध्दा सहभागी होत आहे. सहकार विभाग आणि कामगार विभाग या दोन्ही विभागामार्फत यासंबंधी संयुक्तपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हया साखर शाळा म्हणजे अनौपचारिक शाळा आहेत. या मुलांना शाळाबाहय मुले मानले पाहिजे. अशा मुलांची संख्या किती आहे ? निवासी शाळांचा प्रश्न मागील 4 अधिवेशनामध्ये येत आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळांची व्यवस्था केली जाईल काय, शाळा बाह्य मुले राहणे हे शासनाला भूषणावह नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्याचे कारण हेच आहे की, या मुलांचा निश्चित आकडा समोर यावा. या मंडळामध्ये कामगारांची नोंदणी होऊ शकते. ऊसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी सर्व्हे होऊ शकतो.

श्री.कपिल पाटील : जून महिन्यापूर्वी निवासी शाळा सुरु केल्या जातील काय आणि एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली जाईल काय ?

श्री.पद्माकर वळवी : एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून केंद्र सरकारने निर्णय घेतलेला आहे आणि तो निर्णय राज्य सरकारांना बंधनकारक आहे. त्यामुळे शिक्षणापासून कोणतेही मूल वंचित राहणार नाही. केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे सर्व मुलांना शिक्षण दिले जाणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांच्या शाळांचा प्रश्न, वसतिगृहांचा प्रश्न, निवासी शाळांचा प्रश्न मागील 4 अधिवेशनामध्ये विधानसभेत व विधानपरिषदेत विचारला जात आहे. याबाबतची माहिती संकलित करुन शासन नकारात्मक भूमिकेतून यासंबंधी काम करीत आहे त्याबाबतची पुस्तिका छापली जाईल काय ?

श्री.पद्माकर वळवी : होय.

--------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कणकवली तालुक्यातील ओसरगांव मधील विविध गटातील जमीन वनसंज्ञेत मोडत असताना बिनशेती परवाना दिल्याचे उघडकीस येणे

**मु. शी.** : कणकवली तालुक्यातील ओसरगांव मधील विविध गटातील जमीन वनसंज्ञेत मोडत असताना बिनशेती परवाना दिल्याचे उघडकीस येणे याबाबत सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "कणकवली तालुक्यातील ओसरगांव मधील विविध गटातील जमीन वनसंज्ञेत मोडत असताना बिनशेती परवाना दिल्याचे उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ओसरगांव मधील गट क्र. 10/30, 10/29,11/93 मधील गट क्र. 10/30 या श्री. प्रभू आणि श्री. तळेकर यांच्या जमिनीवर वनसंज्ञा लागलेली असून 7/12च्या उता-यामध्ये हक्क नोंद केलेली आहे. निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, फेरफार क्रमांक 565 दिनांक 18.9.1989 चे इतर हक्कात खाजगी वन अशी नोंद ठेवण्यात आलेली होती. सन 2005 मध्ये 7/12चे इतर हक्कात "वन" अशी नोंद घेण्यात आलेली आहे. गट क्र.10/20मधील क्रशर सील केलेला आहे. भूमी अभिलेख विभागाने वन जमिनीचे आकारफोड पत्रक तयार केलेले आहे. वन विभागाला विश्वासात न घेता हे आदेश कोणी दिले ? या प्रकरणी संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे काय ? 1980च्या वन कायद्याचे उल्लंघन झालेले आहे. परंतु क्रशर जप्त झालेला नाही. तो जप्त करण्यात येणार आहे काय ? त्या भागातील सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी याबाबतीत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. एकाचे नाव दुस-याच्या 7/12वर दाखवून झाडे तोडलेली आहेत. कणकवली वन अधिका-याच्या बाबतीत वारंवार तक्रारी केलेल्या असताना देखील त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. तेव्हा कणकवली येथील वन अधिका-याला शासन निलंबित करील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहे. पहिला प्रश्न टीएलआरसंबधी विचारला. भूमी अभिलेख खात्यातील अधिका-याने जमिनीचे दोन भाग केले. सर्व्हे नं. 193 येथे एकूण 10.95 हेक्टर जमीन आहे. त्यातील 7.76 एकरचा तुकडा त्या अधिका-याने पाडला. अधिकार नसताना त्या अधिका-याने तो तुकडा वेगळा करुन दिला. इंडियन फॉरेस्ट ॲक्ट 1975च्या कलम 35 अन्वये अशी वनसंज्ञा लागलेल्या जमिनीचे तुकडे पाडण्याचे अधिकार त्या अधिका-याला नव्हते. याबाबतीत त्या अधिका-याला निश्चितपणे जबाबदार धरुन त्याच्यावर कारवाई करण्याचे आदेश डीआयएलआरला दिलेले आहेत. ही कारवाई अत्यंत कठोरपणे केली जाईल. त्या ठिकाणी दोन क्रशर आहेत. त्यापैकी एक क्रशर सर्व्हे नं. 10/29मध्ये आहे आणि तो बंद करण्यात आलेला आहे. त्याला सील ठोकण्यात आलेले आहे. दुस-या क्रशरच्या बाबतीत प्रांत अधिका-यांनी जिल्हाधिका-यांकडे परवानगी मागितलेली आहे. अशा प्रकारचा व्यवसाय करण्यापूर्वी संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक होते. ही सर्व 1989ची जुनी प्रकरणे आहेत. वनसंज्ञा 2005 साली लागू झाली. एका क्रशरला शील ठोकण्यात आलेले आहे. दुस-या क्रशरबाबत काय कारवाई

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...

करावयाची यासंबंधी जिल्हाधिका-यांकडे परवानगी मागितलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न विचारला. सकाळी या संदर्भात अर्धा-तास चर्चा झाली. कणकवलीचे रेंज ऑफिसर कायद्याचा चुकीचा अर्थ लावून आपल्या अधिकाराचा खूपच दुरुपयोग करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

----

....श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 14:20

**पृ. शी.** : अंधेरी (पश्चिम) लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथील ले-आऊटमध्ये मे.ओबेरॉय कन्स्ट्रक्शन कंपनीकडून अतिरिक्त एफएसआय वापरला जाणे

**मु. शी.** : अंधेरी (पश्चिम) लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथील ले-आऊटमध्ये मे.ओबेरॉय कन्स्ट्रक्शन कंपनीकडून अतिरिक्त एफएसआय वापरला जाणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंधेरी (पश्चिम),मुंबई येथील न.भू.क्र.१/३८/२ व्हिलेज ओशिवरा, प्लॉट नं.१२०, लोखंडवाला कॉम्प्लेक्य येथील स्वामी समर्थ प्रसन्न ले-आऊटमध्ये मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम केलेल्या ओबेरॉय स्काय हाईट व ऑबेरॉय स्प्रिंग या इमारतीत जादा चटईक्षेत्र वापरले असल्याचे मार्च, २०१० मध्ये निदर्शनास येणे, सीआरझेड-२ च्या कायद्यानुसार समुद्राच्या २०० मीटरपासून आत बांधकाम करता येत नसतांनाही मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने ३० टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करणे, या अनधिकृत बांधकामाबाबत मुंबई महानगरपालिकेच्या "के" वार्डच्या कार्यकारी अभियंत्याकडे तक्रारी दाखल झाल्या असता त्यांनी याबाबतचा अहवाल शासन स्तरावर सादर करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी बांधलेले अनधिकृत बांधकाम त्वरीत तोडण्याबाबत तसेच या बांधकामास परवानगी देणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यापूर्वी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली होती. आम्ही काही महत्वाचे प्रश्न उपस्थित केले होते, त्या प्रश्नाला उत्तर मिळाले नव्हते. ओबेरॉय स्काय हाईट ही इमारत न.भू.क्र.1/38/2, मौजे ओशिवरा या भूखंडावर असून हा भूखंड सीआरझेड अंतर्गत येतो. नियमापेक्षा 10 टक्के अधिक जागा लॉबीसाठी ठेवल्यास त्याची गणना एफएसआयमध्ये करावयास हवी. परंतु या इमारतीबाबत तसे घडलेले नाही. अतिरिक्त बांधकाम 30 टक्के झाले म्हणजे एकूण 40 टक्के बांधकाम अतिरिक्त झालेले आहे. या अतिरिक्त 40 टक्के बांधकामास परवानगी देण्यात आली होती का? नसल्यास विनापरवानगीने बांधकाम केले असेल तर कोणती कारवाई करण्यात येणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, एकूण 2 इमारती आहेत. दोन्ही इमारतींच्या संदर्भात मूळ लक्षवेधी सूचना आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये सीआरझेडच्या नियमाचे उल्लंघन करण्यात आले आहे का असा प्रश्न होता. सीआरझेडच्या नियमाचे उल्लंघन झालेले नाही. या संदर्भात खुलासेवार उत्तर निवेदनामध्ये देण्यात आलेले आहे. प्रत्यक्षपणे 40 टक्के बिल्टअप एरिया व कार्पेट एरिया असे दोन प्रकार असतात तो त्या बांधकामासाठी वापरला का असा दुसरा प्रश्न आहे. निवेदनामध्ये शासनाने स्पष्ट म्हटले आहे की, त्यांना जेवढी बांधकामाची परवानगी होती, जे शक्य होते, त्याच्या 99 टक्के जागेचा त्यांनी वापर केला आहे. तो वापर करीत असताना सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुलभूत प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, वाढीव एफएसआय दिला जातो तो देत असताना मुंबई महापालिका कायद्याप्रमाणे आयुक्तांना अधिकार देण्यात आले आहेत, त्यामध्ये ओपन स्पेस, गॅलरी, लिफ्ट, स्टेअरकेस यांचा एरिया त्यात कन्झ्यूम करु नये असे अधिकार दिले आहेत. त्या अधिकाराचा वापर करुन हा एरिया धरण्यात आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. हे सर्व अधिकार कायद्यानुसार मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना देण्यात आलेले असल्यामुळे त्याचा उपयोग करुन घेण्यात आला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई महापालिका आयुक्तांच्या अधिकारानुसार जिने, गॅलरी या संदर्भात अधिकार दिल्याचे मंत्रीमहोदयांनी सांगितले. त्यासाठी प्रिमियम किती वसूल केला?

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मला याठिकाणी एक गोष्ट सांगितली पाहिजे, साधारणपणे ज्या ठिकाणी सीआरझेड अंतर्गत एरिया येतो त्याला 1 एफएसआय बांधकामासाठी दिला जातो. त्या विभागात टीडीआर लोड केला जात नाही. एरिया वापरासाठी त्यांना दिला त्याचा प्रिमियम किती आकारला याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु पुढील प्रश्नाच्या वेळेला याचे उत्तर दिले जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यापूर्वी महत्वाच्या प्रश्नांना उत्तरे मिळाली नाहीत म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात आली होती. मार्चच्या परीक्षेला नापास झाल्यानंतर ऑक्टोबरच्या परीक्षेला बसले जाते. ऑक्टोबरच्या परीक्षेत पास होता आले नाही तर पुन्हा मार्चची परीक्षा दिली जाते. त्याप्रमाणे ऑक्टोबरची परीक्षा मंत्रीमहोदय नापास होणार अशी परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री असोत किंवा राज्यमंत्री असोत, खाते कोणाकडे आहे? कोण खाते आम्हाला माहिती नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटले की, हा भूखंड सीआरझेड-2 मध्ये येतो का? ते शासनाने मान्य केले आहे. 30 टक्क्यापेक्षा जास्त बांधकाम केले आहे. याचे कारण असे की, महापालिका आयुक्तांच्या अखत्यारित ज्या गोष्टी येतात, त्यामध्ये लॉबी, कॉरिडॉर, फ्री पॅसेज असेल, हे सर्व बांधकाम आऊट ऑफ एफएसआय करुन घेतले. ते अशा पध्दतीने बांधण्यात आले की, प्रत्यक्ष फ्लॅटधारकाला त्याचा उपयोग होतो.

नंतर 2क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आणि विकताना ते सेलमध्ये दाखविलेले आहे त्याचे उत्तर दिलेले नाही. उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो की, श्री. हिमेश रेशमीया यांच्या फ्लॅटला बाहेरुन गार्डन आहे ते त्यांनी पूर्णपणे बंद करुन टाकले आहे. एखाद्याच्या घरात लिफ्ट उतरत असेल अशा वेळेस ती जागा फ्री एफएसआय मध्ये धरली जाते. अशा सर्व गोष्टींचे व्हायोलेशन झालेले आहे. त्याचबरोबर ज्या तक्रारी वेळोवेळी करतो त्याच्या आधारे मंत्री महोदय कारवाई करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या प्रश्नाला मी उत्तर नंतर देतो म्हणून सांगितले होते त्याबाबत मी आपल्या परवानगीने सभागृहाला सांगू इच्छितो की, यामध्ये जो प्रिमीयम वसूल करण्यात येतो तो रेडिरेक्नरच्या आधारे वसूल केला जातो आणि हे रेडिरेक्नरचे दर या भागात 25 टक्के इतके आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो नवीन प्रश्न उपसिथत केला आहे त्या अनुषंगाने मी असे सांगू इच्छितो की, लक्षवेधी सुचनेच्या निवेदनात या सर्व बाबींचे शब्द नि शब्द सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे. त्यात पार्किंगसंबंधी, चुकीचे नियोजन, एफएसआयचे उल्लंघन अशा सर्वच बाबींची उत्तरे दिली आहेत. त्यांच्याकडे आणखी काही बाबी असतील तर त्या त्यांनी आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात, त्यानुसार योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, या व्यतिरिक्त हिमेश रेशमीया आणि लिफ्टच्या संदर्भात जे उल्लंघन झालेले आहे त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेच नाही.

श्री. भास्कर जाधव : महोदय, 64 (ब) प्रमाणे तसेच डी.सी. रुलनुसार हे सर्व अधिकार महापालिका आयुक्तांना आहेत हे उत्तर मी दिले आहे. अन्य प्रश्न असतील तर आमचे ट्रान्सपरंट सरकार ते देण्यास तयार आहे.

श्री. विनोद तावडे : आपण जो रेडिरेक्नरचा उल्लेख केला त्याच्या व्यतिरिक्त दुसरा रेडिरेक्नर सुध्दा या ठिकाणी वापरला जातो.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे आणखी काही प्रश्न अथवा तक्रारी असतील तर त्यासंदर्भात देखील चौकशी करण्यात येईल.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, पुन्हा चौकशी आलीच. परंतु ज्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे व्हायोलेशन केले आणि सीआरझेड कायद्याचे उल्लंघन केलेले आहे, चुकीचा एफएसआय वापरलेला आहे त्यासंबंधीची उच्चस्तरीच चौकशी करुन दोषी असतील तर कारवाई करणार काय ? कारण तशी माहिती आम्ही मंत्री महोदयांकडे देण्यास तयार आहोत.

श्री. भास्कर जाधव : ठीक आहे, माननीय सदस्यांकडे जी माहिती आहे ती घेऊन पुढील चौकशी कोणाकडून करणे आवश्यक आहे हे ठरविता येईल.

-------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी</u>**

प्रा. सुरेश नवले : महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या अनुषंगाने मला अशी माहिती पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे धीरगंभीरपणे प्रश्न विचारत असतात आणि त्या प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदय देत असतात. परंतु मनात शंका व कुशंका निर्माण होतात की, त्यांना चौपाटीवर अटक करण्यात आली व त्यांची सुटकाही करण्यात आली असे सभागृहात समजले. सन्माननीय सदस्य चौपाटीवर कशाला गेले होते हे मात्र समजले नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, माझे नाव घेतले म्हणून मला स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, चौपाटीवर जाण्यासाठी मला वेळच मिळत नाही पण दुसऱ्या राज्यातील लोक येथे येतात. राजीव गांधी फाऊंडेशनच्या वतीने गुजरातचे माननीय मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांना पुरस्कार दिला गेला. त्या सोहळ्यात माननीय श्री. मोदीजी माननीय सोनियाजींच्या अहवालावर बोलले त्यावेळी निदर्शने केली म्हणून आम्हाला अटक झाली. अशा प्रकारे सोनियाजींच्या वक्तव्याला समर्थन देण्यासाठी आपण रस्त्यावर उतरत नाही, आम्ही उतरुन लोकांचे प्रश्न मांडले तर आम्हाला अटक होते.......

-------

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील कोळशाच्या उत्खननामुळे गोवारी गावांना निर्माण झालेला पुराचा धोका

**मु.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यातील कोळशाच्या उत्खननामुळे गोवारी गावांना निर्माण झालेला पुराचा धोका याबाबत सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चरणसिंग सप्रा, सय्यद जमा, संजय दत्त, प्रा. सुरेश नवले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात वेकोलिच्या बल्लारपूर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या राजुरा तालुक्यात वेकोलिच्या मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असून, गोवारी गावालगत असलेल्या नाल्याच्या किनाऱ्यावर कोळसा उत्खननासाठी मातीचे महाकाय ढिगारे टाकले असल्याने पावसाळ्यात या मातीच्या ढिगाऱ्याला नाल्याचे पाणी अडून ते गोवारी गावाच्या दिशेने जाणे, त्यामुळे वेकोली परिसरात असलेल्या गोवारी गावाला पुराचा मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता, गत दोन वर्षांपूर्वी आलेल्या पुरामुळे गोवारी गावातील कुटुंबियांवर उघड्यावर राहण्याची ओढवलेली वेळ, परिणामी त्यांच्यात पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, वेकोलि येथे पुराचा संभाव्य धोका लक्षात घेता,, वेकोली प्रशासनाने या गोष्टीकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी व पहाणी करुन गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री. सचिन अहिर (खणिकर्म राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MMP/ 14:30

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, हा चंद्रपूर जिल्हयातील माईन्सच्या संदर्भातील प्रश्न आहे. या प्रश्नावर ब-याचवेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, चंद्रपूर जिल्हयात वेकोलिच्या बल्लारपूर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या राजुरा तालुक्यात वेकोलिच्या मोठया प्रमाणात कोळसा खाणी असून गोवारी गावालगत असलेल्या नाल्याच्या किनाऱ्यावर कोळसा उत्खननासाठी मातीचे महाकाय ढिगारे टाकले असल्याने पावसाळयात या मातीच्या ढिगाऱ्याला नाल्याचे पाणी अडून ते गावाच्या दिशेने जाने त्यामुळे गावक-यांना त्रास होतो व आर्टीफिशिअली पूर येऊन जनतेच्या शेतीमालाचे, घरांचे तसेच जनतेच्या जिविताला धोका निर्माण होतो. यासंदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत हे खरे आहे काय, तसेच यासंदर्भात शासनाने संबंधितांविरुध्द दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई केलेली आहे काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आता चंद्रपूर जिल्हयात 50 च्या वर खाजगी ओपन माईन्सची परवानगी शासनाने दिलेली आहे. या ठिकाणी मातीचे ढिगारे टाकले जातात त्यासंदर्भात खाणीचे मालक कायद्याला व जिल्हा प्रशासनाला मानत नाही व नियमबाहय कामे करतात. यासंदर्भात शासनाकडे तक्रारी आलेल्या आहेत काय ? यासंदर्भात उत्तरात अशी माहिती दिली आहे की, "यासंदर्भात संबंधितांना सूचना देऊ व संबंधित कंपनीची पाहणी करु." त्यामुळे संयुक्त पाहणीच्या बाबतीत काय निर्णय घेतला गेला आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माईनिंगची जी काही माती असते ती माती डम्प केली जाते. डम्पीग केल्यानंतर अतिवृष्टी किंवा पावसाळयात ही माती वाहून जाते त्यामुळे त्या ठिकाणी पूर येतो व त्यातून बाकीच्या गोष्टी निर्माण होत असतात. त्यामुळे डम्पींगच्या संदर्भात संबंधितांना वेळोवेळी नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी सन 2007-08 मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे शासनाने वेस्टर्न कोल फिल्डसला तसेच विशेष करुन ज्या लिमिटेड कंपनीचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे, त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ओपन माईनींग करीत असतांना कोल बेअरींग ॲक्टच्या अंतर्गत निरंतन करण्याचे काम हे केंद्रशासनाच्या अखत्यारित असल्यामुळे यासंदर्भात राज्यशासनास मर्यादित अधिकार आहेत. असे प्रश्न ज्या ज्या वेळी निर्माण होत असतात त्या त्या वेळी राज्य शासन त्यांना सूचना देत असते. भविष्यकाळात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी राज्य शासनाची कार्यवाही करण्याची भूमिका राहणार आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, माईन्सच्या संदर्भात जे नियम आहेत त्याची पडताळणी जिल्हाधिकारी तसेच इतर अधिकारी करीत असतात. परंतु लोकांचे जिविताचे व मालमत्तेचे जे नुकसान होते त्यासंदर्भात आपण संबंधिताविरुध्द कारवाई करणार आहे काय ? तसेच या ठिकाणी मोठया प्रमाणात पोल्यूशन सुध्दा होत असते त्यामुळे माननीय मंत्रीमहोदय स्वत: या ठिकाणी भेट देणार आहे काय तसेच संबंधित माईन्स विरुध्द फौजदारी गुन्हे नोंदविले जातील काय ? या माईन्समधून जो काही ओव्हर बर्डन निघत असतो तो नदी,नाले,रोड व गावापासून 500 मिटर अंतरावर टाकला पाहिजे असा नियम असतांना हे कंपनीवाले 50 फूटावर सर्व मातीचे ढिगारे टाकत असतात त्यामुळे आपण संबंधिताविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणार आहात काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात आपण 50 ओपन माईन्सला परवानगी दिलेली आहे. या माईन्सची संयुक्त पाहणी केली जाईल. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, केंद्रीय माईनिंग नियोजन विज्ञान संस्था व सेट्रंल इन्स्टिटयूट ऑफ माईनींग फ्यूअल एजन्सी या दोन्ही एजन्सी केंद्र शासनाच्या आहेत. या संस्थेकडून माईन्स एक्झामिन करण्याचे काम करु. व त्यांच्या कडून आलेल्या अहवालावरुन अशा गोष्टी निदर्शनास आल्या तर संबंधित कंपन्याविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल. मी या पूर्वी माईनिंगला भेटी दिलेल्या आहेत व चर्चाही केलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या ठिकाणच्या माईनिंगची सर्व सदस्यांबरोबर पाहणी करण्यास मी तयार आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, 6 मीटर उंच म्हणजे जवळ जवळ 18 फूट माती तेथे टाकली आहे. तेथे झाडे लावली तर झाडांमुळे माती कशी काय थांबणार आहे ? तेथे मोठ मोठी झाडे नाहीत की ज्यात माती अडकून राहील. तेव्हा माती अडकून राहण्यासाठी व पूराला पायबंद घालण्यासाठी कोणती विशेष उपाययोजना केली जाईल ? पूरामुळे गोवारी गावाचे पुष्कळ नुकसान झाले आहे. या गावातील लोकांना नुकसान भरपाई दिली आहे काय ? शासन कंपनी बरोबर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार आहे. तेव्हा शासनाची विशेष उपाययोजना कोणती आहे हे देखील सभागृहाला सांगावे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, उपाय योजना करण्याच्या दृष्टीने वेस्टर्न कोल लि.कंपनीला स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. आम्ही त्यांना सांगितले आहे की, त्यांच्या परिसरामध्ये हे नाले येता कामा नये म्हणून त्यांनी हे नाले त्यांच्या क्षेत्राच्या बाहेरून डायव्हर्ट केले पाहिजेत. त्यामुळे पवनी नाला, चिंचोली नाला असेल तो त्यांनी त्यांच्या एरियाच्या बाहेर डायव्हर्ट करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे त्यांनी प्रिकॉशन घेण्याचे काम केले आहे. सहा मीटर संरक्षण भींत याचा अर्थच असा आहे की, जो मातीचा ढिगारा आहे, तेथे वृक्ष लागवड करणे. म्हणजे भविष्यकाळामध्ये पावसाळ्यामध्ये ती माती काली जाता कामा नये. ही त्या मागची भूमिका आहे. त्यामुळे पुढे सुद्धा अशीच सूचना देण्याची राज्य शासनाची भूमिका राहणार आहे. आधी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणामध्ये संस्थेला काम देऊन त्याची संयुक्त पाहणी केली जाईल. अतिवृष्टीमुळे सन 2008-2008 मध्ये ज्यांचे नुकसान झाले होते अशांना साडेतीन लाख रूपयांची नुकसान भरपाई दिली आहे.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, चंद्रपुर जिले में बड़ी संख्या में कोयला खदानें हैं, जिसके कारण वहां पर कई समस्यां पैदा हुई हैं. इन खदानों से प्रदूषण भी हो रहा है. नदी-नालों की वजह से बरसात में बाढ़ आती है जिससे लोगों का भारी नुकसान होता है. सरकार ने अनुदान दिया है लेकिन समस्याओं के प्रति अभी भी उदासीनता है.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, डब्ल्यू.सी. एल. के कारभार की जांच का प्रश्न है और सम्माननीय सदस्य कुछ दूसरी ही जानकारी दे रहे है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा : मैंने खदान में काम किया है इसलिए मुझे वहां की जानकारी है.

**उप सभापति** : आप दोनों सदस्य बाहर जाकर आपस में इस संबंध में चर्चा कर लीजिए.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, मेरे दो प्रश्न हैं. पिछले अधिवेशन में इस विषय पर चर्चा हुई थी. यह गंभीर मसला है. चंद्रपुर और यवतमाल जिले में बाढ़ से बहुत लोगों का नुकसान हुआ है. इसलिए नुकसान के बारे में मुआवजा देने के संबंध में क्या सरकार की ओर से उच्च स्तरीय चर्चा करके कोई नीति बनाई जाएगी ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि बड़े एरिया में कोयला खदानें हैं. इसलिए वहां के समग्र विकास के लिए क्या सरकार अलग से कोई अथॉरिटी किएट करेगी ? क्योंकि वहां पर खदानों की वजह से प्रदूषण की समस्या, बाढ़ की समस्या, यातायात की समस्या इत्यादि समस्याएं पैदा हो रही है इसलिए जिस प्रकार से मध्य प्रदेश सरकार ने क्षेत्र सुधार के लिए एरिया डेवेलपमेंट अथॉरिटी किएट की है, क्या उसी तर्ज पर महाराष्ट्र सरकार यहां के लिए अलग से एरिया डेवेलपमेंट अथॉरिटी क्रिएट करेगी ?

यानंतर श्री.गायकवाड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यु.जमा माझ्या बाजूला बसतात. ते प्रश्न विचारत असतांना सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन जव्हेरी अडथळा आणत होते तेव्हा दोघांनीही सभागृहाबाहेर जावे असे आपण सागितले होते सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यु.जमा यांना आपण प्रश्न विचारण्याची परवानगी दिली होती व सन्माननीय सदस्य अडथळा आणत होते त्यामुळे त्यांना आपण सभागृहाबाहेर जाण्यास सांगावयास पाहिजे होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे त्यावर मला एवढेच सांगावयाचे आहे की, हा काही सानियां मिर्झाचा मुद्दा नाही की दोन मियाँ झगड़ा कर रहे है. तेव्हा दोन्ही सन्माननीय सदस्यांनी सभागृहात न भांडता सभागृहाबाहेर भांडावे

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यु.जमा यांनी सांगितल्याप्रमाणे आपण नवीन धोरण सुध्दा अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. फार वर्षापूर्वी मायनिगला परवानगी देण्यात आली होती त्यावेळी त्या भागात लहान प्रमाणात वस्ती होती परंतु आता वस्ती वाढत चालली आहे. लोकसंख्या देखील वाढत चालली आहे अशा प्रकारे गावे आणि लोकसख्या वाढत चाललर असल्यामुळे मायनिगचे क्षेत्र आता जवळ येत आहे आणि तेथे राहणाऱ्या लोकांना मायनिगचा त्रास होत आहे.तसेच त्या ठिकाणी पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत तेथील लोकांना दूषित पाणी प्यावे लागत आहेत. तेव्हा मायनिगच्या क्षेत्रातून या लोकांचे दुसरीकडे जवळपास स्थलांतर करता येईल काय .जेणेकरुन भविष्य काळात या अडचणी भासणार नाही या दृष्टीने देखील राज्य सरकार विचार करीत आहे. अर्थात असे करीत असतांना स्थानिक लोकांशी चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोल मायनिगमधील खनिज निधी ज्याला आपण म्हणतो ते वापरण्याचे काम राज्य शासनाच्या मार्फत केले जात असते त्याचा वापर त्याच परिसरात करणे क्रमप्राप्त आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यासाठी एखादे प्राधिकरण निर्माण करण्याच्या दृष्टीने देखील राज्य सरकार प्रयत्न करील. जेणेकरुन त्यातून जो काही पैसा येईल त्यातील जास्तीत जास्त पैसा स्थानिक लोकांना मिळून त्या परिसराचा विकास करता येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : मुंबईतील भारतमाता चित्रपटगृहाची जागा खरेदी करण्यासाठी राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने केलेला अर्ज

**मु. शी** मुंबईतील भारतमाता चित्रपटगृहाची जागा खरेदी करण्यासाठी राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने केलेल्या अर्जासबंधी सर्वश्री .दिवाकर रावते,किरण पावसकर,डॉ.नीलम गो-हे,वि.प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मराठी चित्रपटगृहे यांचे जतन करणे ही राज्य शासनाची भूमिका असून जर कायदेशीर अडचण नसेल तर मुंबईतील भारतमाता चित्रपटगृहाची जमीन शासन खरेदी करील अशी मुख्यमंत्र्यांनी खात्री दिलेली असतांनाही राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने या संदर्भात अर्ज करणे माननीय उच्च न्यायालयाने त्याचे समर्थन करणे, सुमारे 72 वर्षापासून मराठी माणसाला करमणुकीचे साधन उपलब्ध करुन देणारे भारतमाता चित्रपटगृह काळाच्या पडद्याआड जाण्याची निर्माण झालेली शक्यता,परिणामी लोकांच्या मनामध्ये निर्माण् झालेली तीव्र असंतोषाची भावना,याबाबत तेथील जनतेने तसेच लोकप्रतिनिधींनी केलेले आदोलन तसेच निर्माण झालेली स्फोटक परिस्थिती, कायदा आणि सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न , या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्रीमती फौजिया खान (सांस्कृतिक कार्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



VTG/ SBT/ MMP/ KGS/ ST/

- निवेदना नंतर -

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भारतमाता या चित्रपटगृहाचा वाद गेले वर्षभर मुंबईमध्ये गाजत आहे. मराठी माणसाची अस्मिता म्हणून या चित्रपटगृहाकडे पाहिले जाते. भारत माता चित्रपटगृह नष्ट होणार आहे याबाबतीत अनेक वर्तमानपत्रांनी अग्रलेखातून विचार मांडले आहेत. मराठी माणसांचे मराठी चित्रपटाचे एकमेव आधार असलेले हे चित्रपटगृह आहे.केवळ मराठी माणसांचे ते एकमेव आधार आहे अशतला भाग नाही तर सर्वसामान्य आणि गरीब माणसाला चित्रपट पाहण्याचे एकमेव स्थान असलेले हे चित्रपटगृह असून वस्त्रोद्योग मंडळाच्या वतीने तोडण्यात येणार आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले होते ते आजही नाहीसे झालेले नाही म्हणून त्या संदर्भात मी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे.या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार हे चित्रपटगृह राहू शकत नाही. हे चित्रपटगृह तोडण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालमत्ता अधिका-यांनी दिनांक 26.8.2002 रोजी ही जागा खाली करण्याचे आदेश दिले होते.सदर निष्कासन आदेशाविरुध्द भारतमाता चित्रपटगृहाच्या वतीने नगर दिवाणी न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. नगर दिवाणी न्यायालयाने दिनांक 7.1.2010 रोजीच्या निर्णयान्वये वरील अपील खारिज केले आहे." त्यामुळे आता हे चित्रपटगृह नष्ट करण्यास मुभा दिली आहे. त्या निवेदनात पुढे असे म्हटलेले आहे की, "त्या निर्णयाच्या विरुध्द उच्च न्यायालय मुंबई येथे भारत माता चित्रपटगृहाच्या वतीने ` याचिका क्रमांक 1317 / 2010 दाखल करण्यात आली ती सुध्दाखारिज करण्यात आली आहे याचा अर्थ असा की त्या ठिकाणी सुध्दा अपयश आलेले आहे.सदर याचिका माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 22.2.2010 रोजी खारीज केली आहे " अशा प्रकारे ही याचिका खारिज केल्यानंतर चित्रपटगृहाला भवितव्य राहिले नाही. या निवेदनात असे म्हटलेले आहे की, "दरम्यान इंडियन युनायटेड मिल्सच्या संयुक्त भागिदारीच्या मार्गाने पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय केन्द्र शासनाने घेतला असून संयुक्त भागिदारी कंपनीची स्थापना करण्यात आली आहे " भारत माता चित्रपटगृहाच्या संदर्भात त्या भागात तीव्र आंदोलन करण्यात येत आहे त्या ठिकाणी उपोषण व निर्दशने सुरु आहेत त्यामुळे पोलिसांचा फौजफाटा द्यावा लागला आहे. या दडपणाखाली संबंधित कंपनीने असे सागितले की आम्ही या चित्रपटगृहाला हात लावणार नाही. परंतु कायम स्वरुपी त्यांची अशाप्रकारची भूमिका राहील अशातला भाग नाही.

नंतर श्री.सरफरे

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तो त्यांचा अधिकार राहील. कालांतराने कंपनी असे सांगेल की, आम्हाला मराठी चित्रपट स्वस्तात दाखविणे परवडत नाही, आम्ही फायद्यामध्ये नाही. त्यामुळे न्यायालयाने त्यांना मुभा दिलेली आहे, त्यांना वाट मोकळी केली आहे. अशा परिस्थितीत "वार्ताहर" मध्ये छापून आलेला अग्रलेख मी याठिकाणी आपणास वाचून दाखवितो."भारतमाता काळाच्या पडद्याआड जाऊ देणे हे कोणालाच आवडणार नाही आणि पटणारही नाही. तेथे भव्य असे, दिमाखदार असे थिएटर पुन्हा उभे राहिले पाहिजे. त्या थिएटरचे तिकीट दरही सामान्यांना परवडतील असेच ठेवायला हवेत. गिरणगावचा आज गुर्जरगाव होऊ लागलाय. त्यांना फक्त पैशाचीच झळाळी भुरळ घालते. सांस्कृतिक मन हे फक्त मराठी माणसाकडेच आहे. व्यापारवृत्तीपुढे मराठी वृत्ती झुकता कामा नये. मराठी बाणा, मराठी कणा, मराठी ताठा हा झोकातच राहिला पाहिजे. विद्यमान भारतमाता थिएटर पाडून तेथे असे नवे भारतमाता उभे राहिले पाहिजे. मराठी अस्मितेचे, संस्कृतीचे प्रतिक असलेले भारतमाता टिकलेच पाहिजे. त्यासाठी हवा एकच ध्यास, एकच श्वास व एकच आवाज तो म्हणजे भारतमाताचा झेंडा डौलाने फडकू दे" हे करीत असतांना न्यायालयाने त्यांना मुभा दिली असल्यामुळे त्यांना केव्हाही हे थिएटर पाडता येईल. अशा परिस्थितीत माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत की, वेळ पडल्यास सरकार तेथील भूखंड खरेदी करील, परंतु भारतमाता थिएटर टिकवील. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, भारतमाता कंपनी हे थिएटर यापुढे चालवील या शब्दावर आणि विश्वासावर हे भारतमाता थिएटर यापुढे चालू राहील असा विश्वास हे सभागृह व्यक्त करावयास तयार नाही. कंपनी ॲक्टप्रमाणे त्यांचे नुकसान होत असल्यामुळे व न्यायालयाने त्यांना मुभा दिली असल्यामुळे भारतमाता थिएटर केव्हाही नष्ट होईल.आणि म्हणून हे शासन या सिनेमागृहासाठी राखीव असलेला भूखंड स्वत: विकत घेऊन त्याठिकाणी मराठी माणसासाठी नवीन चित्रपटगृह उपलब्ध करुन देणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हे मराठी चित्रपटगृह टिकविण्यासाठी शासन कटिबध्द आहे. मुंबई महानगरपालिकेच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये सिनेमागृहासाठी हा भूखंड राखीव असून तो कधीही बदलणार नाही.दुसरे असे की, माननीय मुख्यमंत्री यांची केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांबरोबर चर्चा झालेली आहे. आणि त्यांनी त्याठिकाणी मराठी चित्रपटगृह राहील अशी दक्षता घेण्यात येईल असे सांगितले आहे. त्याशिवाय त्या कंपनीमध्ये एन.टी.सी. चे 51 टक्के शेअर्स आहेत. त्यांनी भारतमाता थिएटरबद्दल पत्रामध्ये लिहिले आहे की, "Both NTC and JV are



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. फौजिया खान...

committed professionally to run the Bharatmata theatre" असे लेखी कमिटमेंट दिले आहे. त्यासाठी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री मुबईला आले होते त्यावेळी त्यांनी लोकांसमोर जाहीर केले आहे. त्यामुळे त्याठिकाणी भारतमाता थिएटर ठेवण्यास हे शासन कटिबध्द आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मराठी चित्रपटगृहांचे जतन करण्याची शासनाची भूमिका आहे. त्या अनुषंगाने मला विचारावयाचे आहे की, असे किती मराठी चित्रपटगृह शासनाने जतन करण्याचे ठरविले आहे? नागरीकरणामध्ये निर्माण झालेल्या मॉलमधील चित्रपट महाग असतात, ते सामान्य माणसाला परवडत नाहीत. सुदैवाने मराठी चित्रपटांना चांगले दिवस आले आहेत. पूर्वी दोन-दोन महिन्यांनी मराठी चित्रपट लागत असत, आता दर आठवडयाला नवीन चित्रपट मराठी माणसांना पहावयास मिळतात. त्याकरिता हे शासन कोणत्या प्रकारचे नियोजन करणार आहे? या शहराचे निरनिराळया ठिकाणी नागरीकरण झाल्यामुळे त्याठिकाणी मराठी चित्रपट योग्य वेळेला दाखविले पाहिजेत. आणि मराठी माणसाला परवडणाऱ्या दरामध्ये दाखविले गेले पाहिजेत यासाठी आपण काय करणार आहात?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मराठी संस्कृती जोपासण्याची या राज्य शासनाची जबाबदारी आहे. मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे जेव्हा वेळोवेळी परिस्थिती उद्‌भवेल त्यावेळी जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यासाठी जे काही करावे लागेल ते शासन करील.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : म्हणजे काय करील...

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी शांत रहावे...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी "भारतामाता" थिएटरच्या संबंधातील विषय सुरु आहे म्हणून बोलत नव्हतो. पण आता माननयी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, "आम्ही मराठी चित्रपटांसाठी आवश्यक ते करु" पण ते काय करणार आहेत हे मी आपल्याला सांगू इच्छितो की, जे मल्टिप्लेक्स थिएटर्सवाल्यांना सांगितले जाते की, तुम्ही 24 आठवडे मराठी चित्रपट लावावा. मग ते सकाळी 7.00 वाजता आणि जेव्हा परीक्षेच्या काळामध्ये हिंदी चित्रपट चालत नाहीत, त्यावेळी मराठी सिनेमा लावतात ही पहिली गोष्ट आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सर्व मराठी सिनेमे टॅक्स फ्री असताना, मल्टीप्लेक्सवाले टॅक्स फ्री ठेवत नाहीत. त्यांचे असे म्हणणे आहे की, आमच्यासाठी ते टॅक्स फ्री आहे. म्हणजे कर्नाटक मध्ये मल्टीप्लेसमधील जे सर्वात मोठे थिएटर असेल तेथे वर्षभर कानडी सिनेमाच लागला पाहिजे असा तेथे नियम आहे. अशा प्रकारचा महाराष्ट्रामध्ये आपण नियम करणार आहात काय ? नाहीतर सध्या मल्टीप्लेक्स मध्ये मराठी माणसांना 250 ते 300 रुपये भरुन मराठी सिनेमा पहाण्यासाठी जावे लागते. अशा वेळी जो टॅक्स जमा होतो, तो देखील शासनाकडे जमा होत नाही, ती रक्कम मल्टीप्लेक्सवाले खातात. का? तर तो त्यांच्यासाठी टॅक्स फ्री आहे. त्यामुळे मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्याचे जे धोरण आहे, ते म्हणजे 24 आठवडे मराठी सिनेमा लावत असताना, दुपारी 3.00 वाजल्यापासून रात्री 9.00 वाजेपर्यंतचा जो प्राईम टाईम आहे, तो कालावधी मोजणार काय ? सकाळी 7.00 ही वेळ आणि परीक्षेच्या काळामध्ये मराठी सिनेमे लावले जातात, ते मोजावयाचे नाहीत. अशा प्रकारचा शासन नियम करणार आहे काय ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे भारतामाता या थिएटरबद्दल बोलत आहे काय ?

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : नाही. सगळीकडे असेच चालू आहे . . . .

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदया, जर आपण या सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना नीट लक्षात घेतल्या तर . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला बोलावयाचे आहे . . ..

**उपसभापती** : मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी देणार नाही. सॉरी, काही निवडक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले तर ठीक आहे. पण सर्वच माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देता येणार नाही.

. . . .2 व्ही-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.. . .

**उपसभापती** : या सदनामध्ये उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेतल्यानंतर,जरी ही लक्षवेधी सूचना "भारतमाता" थिएटरच्या संबंधात असली तरी......माननीय मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केलेली आहे की, वेळप्रसंगी महाराष्ट्र शासन भारतमाता थिएटरची जागा खरेदी करील. ठीक आहे. माननीय मंत्री महोदयांनी याच्यापुढच्या काही डेव्हलपमेंटस् सांगितल्या आहेत. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, "भारतमाता" थिएटर हे आहे त्याच ठिकाणी, त्याच कॅपॅसिटीमध्ये व्हावे, एवढेच नव्हेतर मल्टीप्लेक्समध्ये मराठी माणसांना रास्त दरामध्ये म्हणजे त्यांना परवडेल त्या दरामध्ये, कारण आता काय दर सुरु आहे हे मला माहिती नाही. त्यामुळे रास्त दरामध्ये आणि प्राईम टाईम . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

एक मिनिट थांबा. मला बोलू द्यावे. मी तिकडे पिक्चरला गेलो नाही किंवा कधी जाण्याचा प्रसंग आलेला नाही. मराठी चित्रपटांसाठी ठरवून दिलेल्या शेड्युलप्रमाणे ते चित्रपट लावतील. परंतु सकाळी 7.00 वाजता किंवा 8.00 वाजता मराठी चित्रपट दाखविणे हे देखील अयोग्य आहे. अशा प्रकारे मराठी चित्रपटांची चेष्टा करणारी जी मल्टीप्लेक्स आहेत, त्यांना तुम्हाला वठणीवर आणण्याचे काम करावे लागेल. कधीतरी सकाळी 7.00 वाजता, 8.00 वाजता मराठी सिनेमा दाखववावयाचा हे काही बरोबर नाही.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : यासाठी नियम बदलले पाहिजेत. शासनाचे नियम असे आहेत की . . ..

**उपसभापती** : तो गृह विभागाचा विषय आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, या बाजूला देखील . . .

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही बाजू आणि ती बाजू असे नाही. आता मी मधून बोललो आहे, त्यामुळे ते दोन्हीकडे आले.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. मराठी चित्रपटाविषयी सगळयांच्या ज्या भावना आहेत, तशा हिंदमाता थिएटरबद्दलही आहेत.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : भारतमाता थिएटर.

.. . .2 व्ही-3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, भारतमाता आणि हिंदमाता ही दोन्ही थिएटर्स् जवळ जवळ आहेत. भारतमाता थिएटरच्या बाबतीत सांगावयाचे तर या थिएटरशी संपूर्ण मुंबईकरांच्या भावना निगडीत आहेत. येथे केवळ मराठी चित्रपट दाखविले जातात. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे माननीय टेक्सटाईल मंत्र्यांनी जाहीरपणे निवेदन केलेले आहे. अशी कितीतरी जाहीरपणे निवेदने केली जातात, पण त्याची अंमलबजावणी होते काय ? माननीय टेक्सटाईल मंत्री महोदयांची आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांची चर्चा झाल्याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले. ती ऑन रेकॉर्ड आहे काय ? एवढाच माझा स्पेसिफीक प्रश्न आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी याठिकाणी आपल्याला लेखी पत्र वाचून दाखविले आहे, ते ऑन रेकॉर्ड आहे आणि ऑन रेकॉर्ड डेव्हलपमेंट प्लॅनमध्येही हे थिएटर मराठी चित्रपटांसाठी आहे. आणखी काय पाहिजे ? आणि याच्यासाठी शासनाची कमिटमेंट आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, "भारतमाता" हे मराठी अस्मितेचा मानबिंदू असलेले आणि मुंबईतील कामगार चळवळीचे ऐतिहासिक वास्तू असलेले चित्रपटगृह आहे. राज्य संरक्षित स्मारक म्हणून ते ताब्यात घेण्याचा राज्य सरकार प्रयत्न करील काय? हे चित्रपटगृह भोपटकर कुटुंबियांनी नियमितपणे चालविले त्यामुळे त्यांच्याकडे ते कायम राहील यासाठी शासन प्रयत्न करणार काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न या प्रश्नाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. त्यासाठी वेगळा प्रश्न विचारण्यात यावा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेब मी आपल्याबद्दल योग्य आदर राखून सांगतो की, आपण जेव्हा प्रश्न विचारता तेव्हा आपले समाधान होणारे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडे नसेल आणि वस्तुस्थितीवर आधारित जर त्यांचे उत्तर असेल तर तुमचे समाधान होईल अशाच प्रकारचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा तुम्ही कां करता?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे ऑन रेकॉर्ड संगितलेले आहे त्यातच धोका आहे. ते व्यासायिकपणे चालविणार आहेत. त्यामुळे हा धोका प्रचंड मोठा आहे. "भारतमाता" चित्रपटगृह तेथे राहाणार नाही. म्हणून उद्या मराठी चित्रपट तेथून हद्दपार केला जाईल सर्वसामान्य कामगाराला तेथे चित्रपट पहाता येणार नाही. "भारतमाता" हे चित्रपटगृह ऐतिहासिक वास्तू आहे. ती वास्तू शासन राज्य संरक्षित स्मारक म्हणून ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणार काय? असे प्रयत्न केले नाहीत तर ते चित्रपटगृह राहाणार नाही.सभापती महोदय, मी याठिकाणी "भारतमाता" या चित्रपटगृहा संबंधीचा प्रश्न विचारलेला आहे. बाहेरचा प्रश्न विचारलेला नाही. सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न नाही. मी अन्य चित्रपटासाठी कुठली वेळ असावी असाही प्रश्न विचारलेला नाही. मी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे सभापती महोदय आपण मला संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. कृपाकरुन आपण माझ्याबद्दल गैरसमज करुन घेऊ नये, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : आपल्या बद्दल माझ्या मनात बिलकुल गैरसमज नाही.

...2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदावरुन याठिकाणी सगळे प्रश्न निर्माण होत आहेत. संयुक्त भागीदारी कंपनी ही केंद्र नियंत्रित होणार आहे. आपण येथे म्हटले् आहे की, बृहन्मुंबई शहराच्या विकास योजनेमध्ये हे चित्रपटगृह राखून ठेवले आहे. या मुंबईमध्ये राखीव असलेल्या चित्रपटगृहांच्या भूखंडावर मॉल्स उभे राहिले आणि तेथे लहान लहान 50 सिटचे केवळ नावापुरती चित्रपटगृहे बांधण्यात आली. या चित्रपटगृहांचे प्रचंड दर असतात. त्यांनी मराठी चित्रपट दाखविण्याची बांधिलकी स्वीकारली आहे असे म्हटले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी संगितल्याप्रमाणे सकाळी 7.00 वाजता एक शो दाखविला की आमची बांधिलकी संपली. म्हणून या चित्रपटगृहातील सगळे शो मराठीतच असतील आणि उद्या भारतमाता हे चित्रपटगृह पाडून तेथे मॉल बांधला जाणार नाही आणि लहान चित्रपटगृह निर्माण केले जाणार नाही याबाबतीत आश्वासन देण्यात येईल काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती वेगवेगळी आहे. काही प्रकरणाचा संबंध गृह विभागाशी येतो. तेव्हा ही सगळी प्रकरणे तपासून त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : "भारतमाता" चित्रपटगृह राहणार आहे काय?

**उपसभापती** : भारतमाता चित्रपटगृह राहाणार आहे काय? याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय.

श्री. दिवाकर रावते : भारतमाता चित्रपटगृहाच्या ठिकाणी मॉल होणार नाही ना?

प्रा. फौजिया खान : अजिबात नाही.

----

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह,नेहरुनगर, सोलापूर, शासकीय मुलांचे वसतिगृह, माढा आणि गोदाबाई हरहरे आश्रमशाळा माढा, या ठिकाणी आढळून आलेल्या त्रुटी.

**मु. शी.** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह,नेहरुनगर,सोलापूर, शासकीय मुलांचे वसतिगृह, माढा आणि गोदाबाई हरहरे आश्रमशाळा, माढा या ठिकाणी आढळून आलेल्या त्रुटी यासंबंधी सर्वश्री दीपक साळुंखे,प्रा.सुरेश नवले,सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील,संजय दत्त,मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दीपक साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह नेहरुनगर सोलापूर, शासकीय मुलांचे वसतीगृह माढा आणि गोदाबाई हरहरे आश्रमशाळा माढा या वसतीगृहास व आश्रमशाळेस सोलापूर जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे सभापती आणि श्री.एस.एल. हरिदास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.के.डी.बोने उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिनांक 31 जानेवारी, 2010, 18 फेब्रुवारी, 2010 आणि 2 मार्च, 2010 रोजी अचानक भेटी देणे, सदर वसतिगृहाची सभापती व संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता त्यांना अनेक त्रुटी आढळून येणे, त्यात प्रामुख्याने वसतीगृहातील मुलांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाणे, हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना सकाळी नाष्टा न देणे, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी न होणे, विद्यार्थ्यांना दिलेली गादी, उशीचे कव्हर, ब्लॅकेट, चादर आणि वस्तू निकृष्ट दर्जाचे आढळून येणे, सदर तपासणीचा अहवाल सभापती जिल्हा परिषद सोलापूर यांनी जिल्हाधिकारी सोलापूर, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी सोलापूर यांना पाठविणे, तसेच याबाबत जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सदर वसतीगृहातील अनागोंदी कारभार व आजपर्यंत खरेदी केलेल्या वस्तूची

..4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपक साळुंखे.....

खातेनिहाय चौकशी करावी, असा ठराव होणे, तसेच अतिरिक्त मुख्य अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी सदर प्रकरणाचा सविस्तर अहवाल संचालक समाजकल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडे कारवाईसाठी पाठविणे, अद्यापही याबाबत सोलापूर जिल्ह्यातील संबंधित अधिकारी व शासनाने कोणतीही कारवाई न करणे, परिणामी जिल्ह्यातील नागरीक विद्यार्थी, पालकांच्या मनात निर्माण झालेली संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने करावायाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपक साळुंखे : सभापती महोदय, एका गंभीर विषयावर ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागावर्गीय मुलांचया वसतिगृहाची अचानकपणे केलेली तपासणी तसेच गोदाबाई हरहरे आश्रमशाळा, माढा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतीगृह सोलापूर या ठिकाणी खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार यासंदर्भात ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. या ठिकाणी निवेदनामध्ये शासनाने तेथील वस्तुस्थिती अतिशय चांगली आहे असे रेडीमेड उत्तर दिलेले आहे. तेथील वस्तुस्थिती अतिशय वेगळी आहे. मागच्या दोन चार दिवसांपूर्वी या सभागृहामध्ये दुसऱ्या एका प्रश्नावर चर्चा झाली होती त्यावेळी माननीय राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांनी उत्तर देताना सांगितले की, या राज्यामध्ये कुपोषित बालके जन्माला येऊन नयेत म्हणून गरोदर मातांना काही आहार देण्यासंबंधीची सरकारची योजना आहे. परंतु शासनाच्या गोदाबाई हरहरे आश्रमशाळेमध्ये चांगली मुले कुपोषित करण्याचे काम सध्या सुरु आहे. एवढी गंभीर बाब त्या ठिकाणी आहे. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीच्या सभापतींनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांनी त्या ठिकाणी भेट देण्याचे काम केले. या सर्व मुलांच्या वैद्यकीय तपासणीसाठी फार मोठा निधी मिळतो. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, एका विद्यार्थ्याला आजारी असल्यामुळे दवाखान्यामध्ये जावे लागले. वास्तविक पाहता त्या वसतिगृहाच्या रेक्टरने त्याला दवाखान्यात न्यावयास पाहिजे होते परंतु कोणीही त्याची दक्षता घेत नसल्यामुळे तो विद्यार्थी स्वत: दवाखान्यात गेला. तपासणीसाठी दोन-तीन दिवस ॲडमिट झाला परंतु डॉक्टरला देण्यासाठी पैसे नव्हते त्यामुळे त्या डॉक्टरने त्याच्याकडून चार दिवस कंपाऊंडरचे काम करुन घेतले. एवढी भयानक परिस्थिती आहे. त्या ठिकाणी सरकारच्या माध्यमातून गाद्या, बेडशीट, चादरी, सतरंज्या अशा वस्तू दिल्या जातात. या सगळ्या वस्तू अतिशय निकृष्ट दर्जाच्या आहेत. त्याचा अहवाल संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला आहे. यामध्ये ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची साखळी आहे. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, पुन्हा वरच्या अधिकाऱ्यामार्फत याची चौकशी करावी तसेच त्यामध्ये सभागृहातील सदस्यांना समाविष्ट करुन यासंदर्भात पूर्ण चौकशी करावी. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा जपणाऱ्या या महाराष्ट्रामध्ये कोट्यवधी रुपयांची खरेदी करीत असताना त्याचा उपयोग होत नसेल तर ते योग्य नाही. त्या ठिकाणी बोगस

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. दीपक साळुंखे ....

विद्यार्थीसंख्या दाखविली जाते. त्या ठिकाणी वस्तूंच्या बाबतीत जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याची चौकशी करण्यासाठी शासन समिती नेमणार काय तसेच त्या समितीमध्ये सभागृहातील सदस्यांना घेणार काय ? या वसतिगृहातील ज्या बोगस गोष्टी आहेत त्यबाबत कारवाई करणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याबाबत मी सांगू इच्छितो की, खरेदीच्या संदर्भात अगोदर जी प्रक्रिया होती ती आपण डिसेंट्रलाईज केली होती. त्यामध्ये स्थानिक स्तरावर त्याची खरेदी व्हावयास पाहिजे असा विचार होता. परंतु स्थानिक स्तरावर खरेदी योग्य होते की नाही, दर्जा व्यवस्थित राहतो की नाही यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर मागणी आल्यानंतर ही प्रक्रिया सेंट्रलाईज करण्याचे काम केले. ही प्रक्रिया सेंट्रालाईज करताना वीरमाता जिजाबाई टेक्निकल संस्था, मुंबई आणि विशेषकरुन महाराष्ट्र स्टेट मार्केटिंग आणि को-ऑपरेटिव्ह फेडरेशनमार्फत खरेदी करण्याचा निर्णय घेतला. त्या माध्यमातून आपण हा सर्व पुरवठा करण्याची भूमिका घेत आहोत. अशा पध्दतीने पुरवठा करण्याचे काम केले आहे. त्या ठिकाण्ी ज्यावेळी तक्रार आली ती खरेदी एक वर्ष अगोदर केलेली होती. त्या एक वर्षामध्ये निश्चितपणे यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या. त्याबाबतीत शासनाने नकारात्मक भूमिका घेतलेली नाही. ज्या त्रुटी आढळून आल्या त्याबाबतीत संबंधित गृहपाल किंवा संबंधित लोकांवर कारवाई करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तूर्त तरी अशा चौकशीची कोणतीही गरज नाही परंतु अशी बाब ज्या ज्या वेळी लक्षात येईल त्याबाबतीत अशी कारवाई करणे अभिप्रेत आहे आणि ती कारवाई करण्याचे काम राज्य शासन वेळोवेळी करीत आहे.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह सोलापूर आणि गोदाबाई हरहरे आश्रमशाळा, माढा या आश्रमशाळेमध्ये आणि वसतिगृहामध्ये चाललेल्या भ्रष्टाचाराबाबत जिल्हा परिषदेचे समाजकल्याण समितीचे सभापती, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशीसाठी भेटी दिल्या. शासकीय आश्रमशाळांच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या सभापतींना अशा प्रकारे चौकशी करता येते काय ? हे जरी खरे असले तरी तेथील विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी याबाबतीत अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. त्यांनी काय चौकशी केली आणि त्याचा अहवाल काय आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील....

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, समाजकल्याण संचालक, पुणे हे गलथान कारभाराबद्दल अतिशय प्रसिध्द आहेत. त्यांनी यासंबंधी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.दीपक साळुंखे यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाला न्याय मिळावा म्हणून समाजकल्याण संचालक यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, जिल्हा परिषदेचे सभापती हे अधिकार कक्षेबाहेर जाऊन वसतिगृहाला भेट देऊ शकतात काय असा मुलभूत प्रश्न निर्माण करण्यात आला आहे. काही अनुदानित, काही शासकीय आणि काही संस्थांमार्फत ही वसतिगृहे चालविली जातात. या वसतिगृहांना एक लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी भेट दिली असेल आणि त्या भेटीमध्ये त्यांना त्रुटी आढळल्या असतील तर त्याची चौकशी करणे हे शासनाचे काम आहे आणि त्यादृष्टीने शासनाने ते काम केलेले आहे. दुस-या प्रश्नाबाबत सांगतो की, शासनाकडे चौकशी अहवाल आलेला आहे. समाजकल्याण विभागाचे सभापतींनी भेट दिली त्याच्या दुस-या दिवशी चौकशी केली असता जे गृहपाल होते त्यांच्याकडे प्रभारी पदभार दिला होता पण त्यांनी तो पदभार स्वीकारला नव्हता, त्याबाबत त्यांच्याकडून खुलासा मागविला होता. त्यांचा खुलासा समाधानकारक न वाटल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचे काम केलेले आहे. या चौकशीमध्ये विद्यार्थ्यांना सुखसोयी दिल्या नसल्याचे आढळले आहे, वेळोवेळी पुरेसे जेवण दिले जात नाही, कर्मचारी उपस्थित नाहीत आणि अस्वच्छता अशा त्रुटी आढळल्या होत्या. त्याची चौकशी करण्याचे काम करण्यात आलेले आहे. प्रथम गृहपालांची जबाबदारी होती, नंतर समाजकल्याण अधिका-यांची जबाबदारी होती. त्यानंतर विभागीय आयुक्तांची जबाबदारी होती, पण गृहपालांची प्रथम जबाबदारी होती म्हणून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याचे काम केलेले आहे. समाजकल्याण संचालक सुध्दा याला जबाबदार आहेत असे आढळले तर त्यांच्यावर सुध्दा निश्चितपणे कारवाई केली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला दिलेले उत्तर विपर्यस्त आहे. या निवेदनात असे नमूद केले आहे की, "सभापती, समाजकल्याण, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी लोकप्रतिनिधी या नात्याने केलेल्या तपासणीचा अहवाल जिल्हाधिकारी, सोलापूर यांना तसेच विशेष समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांना अद्याप मिळाला नसल्याचे दिसून येते." सभापती महोदय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सभापती, समाजकल्याण यांनी संयुक्तपणे या वसतिगृहाला भेट दिली आहे. विशेष समाजकल्याण अधिकारी असे सांगतात की, सभापतींना वसतिगृहांना भेट देण्याचा अधिकार नाही, हे स्टेटमेंट अतिशय गंभीर आहे. हे स्टेटमेंट चुकीचे आहे. सभापतींना वसतिगृहांना भेट देण्याचा अधिकार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण संचालक यांनी विशेष समाजकल्याण अधिका-यांबाबत 11 गंभीर आरोप करुन ते शासनाला कळविले आहेत. विशेष समाजकल्याण अधिकारी अज्ञानी आहेत काय, या अधिका-यांना सर्व गोष्टींची माहिती नाही का, ते अंधारात आहेत काय ? शासन या अधिका-यांवर काय कारवाई करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सभापतींना भेट देण्याचा अधिकार आहे की नाही हा डिबेटचा प्रश्न आहे. त्यांना अधिकार नाही असे निवेदनात कोठेही म्हटलेले नाही. तसेच कोणीही तसे स्टेटमेंट केलेले नाही. एक लोकप्रतिनिधी या नात्यांनी त्यांनी भेट दिली असेल तर त्याची दखल घेतली गेली पाहिजे आणि दखल घेण्याचे काम शासनाने केलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्तपणे भेट दिली होती. सभापतींना अधिकार नाही असे शासन म्हणत नाही. त्यामुळे त्यांच्या अहवालानुसारच शासनाने कारवाई करण्याचे काम केलेले आहे. हा अहवाल त्यांनी विभागीय आयुक्त किंवा समाजकल्याण अधिकारी यांना द्यावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी थेट शासनाकडे अहवाल दिला आहे. शासनाने त्याची दखल घेऊन तेथे एक टिम पाठवून त्रुटी शोधल्या आहेत. केवळ त्रुटी शोधून थांबलेलो नाही तर संबंधितांवर कारवाई करण्यास सुरुवात केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:10

(श्री. सचिन अहिर...)

या प्रकरणी केवळ गृहपालाला जबाबदार धरुन चालणार नाही. या गृहपालाव्यतिरिक्त जे जे कोणी चौकशीत दोषी आढळतील त्यांनाही शासन पाठीशी घालणार नाही. चौकशीमध्ये जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : एस.टी.महामंडळामध्ये 180 दिवस काम करणा-या कर्मचा-यांना कायम वेतनश्रेणीवर घेण्याची आवश्यकता

**मु.शी.** : एस.टी.महामंडळामध्ये 180 दिवस काम करणा-या कर्मचा-यांना कायम वेतनश्रेणीवर घेण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, जैनुद्दीन जव्हेरी, उल्हास पवार, मोहन जोशी, सय्यद जमा, सुभाष चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजन तेली व भाई जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये राज्यात हजारो कर्मचारी ५-१० वर्षापासून हंगामी वेतनश्रेणीवर कार्यरत असून, काही कामगारांचे वय पन्नास वर्षे असून त्यांना अद्याप सेवेत कायम करण्यात न येणे, हंगामी वेतन श्रेणीवरील सदरहू कामगारांना एस.टी.मध्ये सापत्नभावाची वागणूक मिळत असणे, अनेक सोयीसुविधांपासून त्यांना वंचित रहावे लागणे, कामगार कायद्यातील तरतुदीनुसार सलग १८० दिवस काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम वेतन श्रेणीवर घेणे आवश्यक असताना, गेली अनेक वर्षे हंगामी वेतन श्रेणीवर काम करणारे चालक-वाहक कायम वेतन श्रेणीवर घेण्यात न येणे, परिणामी उपरोक्त कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र नाराजीची भावना, यापूर्वी सन १९९८-९९ मध्ये एसटीच्या संचालक मंडळाने नियम संख्येचा विचार न करता नोकरीची तीन वर्षे पूर्ण करणाऱ्या हंगामी वेतनश्रेणीवरील कामगारांना कायम केले असणे, त्याप्रमाणे राज्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये सलग १८० दिवस काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम वेतन श्रेणीवर घेण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..३..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत छाजेड :एस.टी.महामंडळामध्ये जवळपास 1 लाखापेक्षा जास्त कर्मचारी आहेत. महाराष्ट्ररच्या दृष्टीने हे एस.टी.महामंडळ अतिशय महत्वाचे आहे. निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, कर्मचा-यांना संबंधित आरक्षित प्रवर्गात आरक्षणानुसार रिक्त असलेल्या पदी नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येते. माझा प्रश्न असा आहे की, मुंबई डिव्हिजनमध्ये हा नियम अद्याप लागू केलेला नाही, हा नियम तेथे केव्हा लागू करणार ? ज्या अधिका-यांनी हा नियम लागू करण्यास टाळाटाळ केलेली आहे त्या अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? कायद्यानुसार 180 दिवस काम केलेल्या कर्मचा-याला सेवेत कायमस्वरुपी सामावून घेतले पाहिजे. या कायद्याची अंमलबजावणी एस.टी.महामंडळ करणार आहे काय ?एस.टी.महामंडळाने कनिष्ठ कर्मचा-यांना पाच पाच वर्षे वेठबिगा-यासारखे 3 हजार रुपयावर राबवून घेतले आहे. या कनिष्ठ कर्मचा-यांना कायम करण्याची सरकारची भूमिका काय आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : एस.टी.महामंडळामध्ये 65178 कर्मचारी कार्यरत आहेत. मुंबई विभागामध्ये कर्मचा-यांना समावून घेण्याबाबत काय कारवाई करणार, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. याबाबतीत मुंबई विभागासाठी या पध्दतीचा नियम लागू केला जाईल. त्यामध्ये कोणताही भेदभाव असणार नाही. 180 दिवस काम केलेल्या कर्मचा-यांना कायम करणार काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. एस.टी.महामंडळामध्ये जे कर्मचारी आता काम करीत आहेत त्यामध्ये हंगामी कर्मचारी म्हणजे 180 दिवस काम केलेले कर्मचारी शिल्लक राहिलेले नाहीत. सर्व कनिष्ठ कर्मचा-यांना कनिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे. त्यामुळे 180 दिवस काम केलेल्याचा प्रश्न आता राहिलेला नाही. कनिष्ठ कर्मचा-यांना 3 हजार रुपयावर राबविले जाते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. विषय असा आहे की, यामध्ये दोन भाग आहेत. 3 वर्षे कर्मचारी कनिष्ठ वेतनश्रेणीवर काम करतात. त्यांना कनिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली असली तरी त्यांना गणवेश, धुलाई भत्ता, वैद्यकीय सवलती, कौटुंबिक मोफत पास, नियतकालीक वेतनवाढ अशा सवलती देण्यात येतात आणि 5 वर्षाच्या पुढे उच्च वेतनश्रेणीमध्ये सामावून घेतले जाते.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5... श्री.गुलाबराव देवकर....

अशा पध्दतीने हा वेतनश्रेणीचा नियम एसटी महामंडळामध्ये चालत आहे. त्यामुळे कोणताही कर्मचारी आज हंगामी कर्मचारी राहिलेला नाही. 180 दिवसानंतर सेवेत कायम करावे असा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, हंगामी आणि कनिष्ट कर्मचारी यामध्ये फरक आहे. तात्पुरत्या वेतनश्रेणीवर आणि 180 दिवस पूर्ण झालेला एकही कर्मचारी राहिलेला नाही असे मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले आहे. 180 दिवस पूर्ण झालेले कमीत कमी 15 ते 20 हजार कर्मचारी महामंडळामध्ये काम करीत आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना 180 दिवस सेवा झाल्यामुळे कायम करणार का? निवेदनातील पृष्ठ क्रमांक-2 वर म्हटले आहे की, मानवतावादी दृष्टीकोनातून समय वेतनश्रेणीवर घेण्यात आले आहे. हा मानवतावादी दृष्टीकोन स्वीकारुन या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेतले जाईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मानवतावादी दृष्टीकोन स्वीकारुन एसटी महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना कायम केलेले आहे. सगळ्यांनाच सहानुभूती दाखविली आहे. एकही कर्मचारी याठिकाणी हंगामी राहिलेला नाही. प्रश्न हंगामी कर्मचाऱ्यांविषयी होता. तो प्रश्न याठिकाणी उपस्थित होत नाही. कनिष्ट श्रेणीपासून सर्वच कर्मचारी कायमस्वरुपी सेवेत लागले आहेत.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ 15:15

**पृ. शी.** : वागदे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील गोपुरी आश्रम पू.आप्पासाहेब पटवर्धन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणे

**मु. शी.** : वागदे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील गोपुरी आश्रम पू.आप्पासाहेब पटवर्धन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

देशातील व महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण स्वच्छता अभियानाचे खरेखुरे जनक कोकण गांधी पू.आप्पासाहेब पटवर्धन यांनी कणकवली जवळील वागदे गावात ओसाड माळरानावर निर्भंगी, निर्गंधी शौचालयाची स्वत:च्या कल्पकतेने निर्मिती केली. महाराष्ट्रातील पहिल्या गोबर गॅस प्लँटचा प्रयोग केला. विविध प्रकारच्या फळपिकांच्या लागवडीचा प्रयोग, अन्नधान्य व तृणधान्य पिकांच्या लागवडीचा प्रयोग, सेंद्रिय खतांची निर्मिती, ग्रामोद्योग, गो-शाळा असे विविध प्रयोग करुन ग्रामीण गरीब समाजाच्या आर्थिक विकासाचे मॉडेल म्हणून गोपुरी आश्रम विकसित केला. याशिवाय आश्रमात बालसंस्कार, युवा व्यक्तिमत्व विकास, पंचायत राज, महिला सक्षमीकरण, खादी ग्रामोद्योगाचा प्रसार, गो-शाळेचा खासकरुन शेतकऱ्यांसाठी प्रसार असे उपक्रम राबविले जात आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, नाबार्ड,पुणे, बायफ, पुणे या संस्थांच्या सहकार्याने 2001 सालापासून काजू प्रक्रियेच्या स्वयंरोजगाराचा प्रयोग मांडला. या प्रयोगातून कोकणातील गावागावात घरगुती काजू प्रक्रिया उद्योगाचा प्रयोग पोहोचवला. अशाप्रकारे गेली आठ वर्षे गोपुरी आश्रम स्वत:च्या हिंमतीवर हे प्रकल्प सुरु ठेवून अनेक उन्हाळे, पावसाळे भोगत अनेक अडचणींवर मात करीत विशिष्ट तत्वाने हा आश्रम उभा आहे. परंतु हा आश्रम अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने गोपुरी आश्रम आप्पासाहेब पटवर्धन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करावे अशी तेथील ग्रामस्थांची मागणी आहे. या स्मारकासाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे न्या.धर्माधिकारी यांनी सातत्याने मागणी केली

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

आहे. शासनाने गोपुरी आश्रम पू.आप्पासाहेब पटवर्धन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करुन पर्यटनाच्या माध्यमातून इको-टूरिझमला चालना द्यावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला सूचना करीत आहे.

--------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन करण्यासाठी मंजूर केलेल्या भूखंडाचा त्वरेने विकास करणे

**मु. शी.** : ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन करण्यासाठी मंजूर केलेल्या भूखंडाचा त्वरेने विकास करणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, 400 वर्षापेक्षा जूना ऐतिहासिक दस्तऐवज जतन करण्याचे काम पुराभिलेख संचालनालय करीत असते. एल्फिस्टन महाविद्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील एका कोपऱ्यात छोट्याशा जागेत राज्याचे पुराभिलेख संचालनालय शेकडो वर्षापूर्वीच्या ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन करीत असून दुर्मिळ कागदपत्रांच्या अभ्यासासाठी जगभरातून अभ्यासक येत असतात. तसेच भावी पिढीला मुंबई, महाराष्ट्र व पर्यायाने देशभरातील ऐतिहासिक घटनांचे अवलोकन करता यावे व दिवसेंदिवस वाढत जाणारा पसारा पाहून राज्य सरकारने मालकी हक्काच्या इमारतीसाठी 1.50 लाख चौ.फुटाचा भूखंड वांद्रे-कुर्ला संकूल परिसरात उपलब्ध करुन दिला. 21 कोटी रुपयांचा निधी देखील यासाठी मंजूर केला. परंतु विकासकामुळे परिसराचे रुप पालटून भूखंड प्राईम लोकेशन ठरत असल्याने या भूखंडावर परप्रांतीयांचे अतिक्रमण होत असून कारवाई झाल्यावर पुन्हा काही दिवसांनी त्या जागेवर झोपड्या उभ्या राहतात. सरकारचे या भूखंडाकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र असून सरकार हेतुपुरस्सर याकडे दुर्लक्ष करीत आहे. शासनाने भूखंड मंजूर करुन विकासासाठी निधी देखील उपलब्ध करुन दिला आहे. परंतु जाणुनबुजून प्रकल्प थांबविण्यासाठी काही अधिकारी किंवा राजकीय पुढारी यांचा अडथळा येत असेल तर त्यांच्यावर कारवाई व्हावी, त्याचप्रमाणे हा ऐतिहासिक दस्तऐवज नवीन इमारतीमध्ये नेऊन त्याचे जतन व्हावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

--------

नंतर 3बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील इंग्रजी रेल्वे स्थानकांची नावे बदलून मराठीत करणे

**मु. शी.** : मुंबईतील इंग्रजी रेल्वे स्थानकांची नावे बदलून मराठीत करणे याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्य शासनाचा सर्व कारभार मराठी भाषेत होतो. "बॉम्बे" चे "मुंबई" "पुनाचे" पुणे असा सगळीकडे बदल करण्यात आला आहे. परंतु अद्यापपर्यंत काही ठिकाणी बॉम्बे, पुना असा उल्लेख करण्यात येतो. त्यांचेविरुध्द कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच मुंबईतील इंग्रजी नावे असलेली (उदा. एलफिस्टन, मुंबई सेंट्रल, सायन, सॅडहर्स्ट रोड, ग्रँट रोड, लोअर परेल, चर्नी रोड, मरीन लाईन्स, चर्चगेट) रेल्वे स्थानकांची नावे ही मराठी करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याबाबत तात्काळ निवेदन करावे".

महोदय, अत्यंत निर्लज्जपणाने हा विशेष उल्लेख मी सभागृहात मांडत आहे. सरकारने आपली सोडली नाही त्यामुळे मला बेशरम होऊन हा विशेष उल्लेख येथे मांडावा लागत आहे. आणखी तिखट शब्दात बोलण्याची इच्छा आहे पण मी बोलत नाही, कारण आपण मला न्याय देऊ शकता काय हे जमल्यास पहावे.

यापूर्वी या सभागृहात हा विशेष उल्लेख मी मांडला होता. त्यात मुंबईमध्ये असलेल्या इंग्रजी उपनगरी रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याबाबतचा विषय होता. त्याच्या माध्यमातून मी या शहरात असलेल्या इंग्रजांच्या काळातील रेल्वे स्थानकांची नावे उदा. एलिफिस्टन रोड, ग्रँट रोड अशी नावे दिलेली असून स्वतंत्र भारतात ही नावे बदलण्याची गरज आहे. त्यानुसार एलिफिस्टन रोडचे नाव प्रभादेवी करावे अशी मागणी मी सन 1992-93 पासून करीत आहे. ग्रँट रोडचे नाव "ऑगस्ट क्रांती", चर्नी रोड स्थानकाचे नाव "मुंबादेवी" करावे असा प्रस्ताव सभागृहात मांडल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना पत्र लिहिले होते. त्याचबरोबर या सभागृहात

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.......

विविध माध्यमातून मांडलेले प्रस्ताव देखील त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावेळेस मी त्यांना असेही सांगितले होते की, चर्चगेट स्थानकाचे नाव "चिंतामणराव देशमुख" असे करण्याबाबतचा प्रस्ताव विधानसभेत आला आहे, सँडहर्स्ट रोडचे नाव "विनायक दामोदर सावरकर" असे करावे असा प्रस्ताव खालच्या सभागृहात आला आहे. रे रोडचे नाव "बाबू गेनू" असे बदलण्यात यावे, चर्नी रोडचे नाव "मुंबादेवी" तर एलिफिस्टन रोडचे नाव "प्रभादेवी" करावे अशा प्रकारचे प्रस्ताव विधानसभेत सुध्दा आले होते. पण अजूनही त्यासंदर्भात कोणतीही हालचाल शासनाकडून झालेली नाही. हा विशेष उल्लेख मांडत असताना मी सुरुवातीलाच खेदाने असा शब्द वापरला होता. याचे कारण तत्कालीन माननीय मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी मला जे उत्तर दिले होते. त्यात ते म्हणाले होते की, "विधानपरिषदेत मुंबईतील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याबाबत" असा विशेष उल्लेख दि. 22.4.2008 रोजी उपस्थित केला असता त्याबाबत मी असे कळवित आहे की, केंद्रशासनाच्या गृह विभागाने गावांची, शहरांची घोषणा केली आणि स्थानकांची नावे बदलण्याच्या संदर्भातील पत्र क्र. 130/53/पब्लिक, दिनांक 11.9.1953 अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. आपण केलेली सूचना सदर मार्गदर्शक तत्वांशी सुसंगत नाही त्यामुळे आपले म्हणणे मान्य करता येत नाही, त्याबद्दल दिलगीर आहे." असेही त्यांनी कळविले आहे.

महोदय, हे सरकार कोणत्या काळात काम करीत आहे असे मला पुन्हा खेदाने विचारावेसे वाटते. सन 1953 चा संदर्भ घेऊन मंत्री महोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी पत्र दिले म्हणून मी त्यांच्याविरुध्द हक्कभंग दाखल केला पण त्याचीही दखल घेतली जात नाही, त्याबद्दलही मी खेद व्यक्त करतो. यासंदर्भात मी गृह मंत्रालय, नवी दिल्ली या विभागाशी पत्रव्यवहार केला असता त्यांनी सन 1953 चा उल्लेख करुन माझ्या दि. 21.11.2008 च्या पत्राच्या अनुषंगाने मला कळविले आहे की, "Dear Sir, Please refer to your letter dated 4.11.2008 regarding the furnishing list of Railway Stations, whose names were changed since 1950, are available in the record of this Ministry. The requisite list is enclosed as desired. The Ministry of the Railways may be contacted for the complete list of such Stations." आणि माझ्याकडे आता भारतातील ज्या रेल्वे स्थानकांची नावे बदललेली आहेत त्यांची सन 1950 ची लिस्ट आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

श्री. दिवाकर रावते....

देशामध्ये मोठया प्रमाणात रेल्वे स्थानकांची नावे बदलली असतांना आपले सरकार 1953 च्या कायद्याप्रमाणे असे करता येणार नाही म्हणून दिलगिरी व्यक्त करते. त्यामुळे नावे बदलण्याच्या संदर्भात या शासनाची मानसिकता काय आहे? हे सरकार ब्रिटीशाळलेले आहेत काय, या शासनामध्ये इंग्रजी नावे बदलण्याची हिंमत आहे काय? त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये यासंदर्भातील प्रस्ताव दि .23 एप्रिल,2010 च्या आत आणणार आहात काय ? अन्यथा अन्य मार्गाने निदर्शने करण्याचा प्रयत्न केला तर आम्हाला तुम्ही निलंबित करणार का असा प्रश्न शासनाला विचारतो. तसेच मी माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्यावर जो हक्कभंग मी दाखल केलेला आहे तो सुध्दा आपण स्वीकारा अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात अचानक होत असलेल्या स्फोट सदृष्य आवाजामुळे जनता भयभीत होणे

**मु. शी.** : शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात अचानक होत असलेल्या स्फोट सदृष्य आवाजामुळे जनता भयभीत होणे याबाबत श्री. दिलीपराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिलीपराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यात दिनांक 2.4.2010 रोजी वा त्या सुमारास अचानक स्फोटसदृष्य होणा-या आवाजाने तालुक्यातील जनता भयभीत झालेली आहे. तालुक्यात गेल्या 3 महिन्यापासून दर तिस-या चौथ्या दिवशी केव्हाही कानठळया बसविणारा आवाज होतो. या आवाजाची तीव्रता एवढी भंयकर असते की, घराच्या भिंती हादरतात, भिंतीवरील फोटो पडले जातात तर काहींच्या खिडक्यांच्या काचाही तडकल्या आहेत. हे आवाज कोठे होतात ? का होतात ? याचे उत्तर कोठूनही मिळत नाही. त्यामुळे आवाजाचे गूढ कायम आहे. आवाज ऐकताच नागरिक घराबाहेर येतात. आजुबाजूच्या गावांशी दूरध्वनीद्वारे संपर्क करुन आवाजाबाबत विचारतात. आवाज झाला मात्र तो कोठे झाला हे कोणालाही सांगता येत नाही याबाबत तहसिल प्रशासनही अनभिज्ञ आहे.

शासकीय स्तरावरुन आवाजाचे गूढ शोधले जावे, तशी माहिती मिळावी व नागरिकांच्या मनातील भीती दूर करावी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

----------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**:सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात राज्यातील संतांची तसेच राष्ट्रपुरुषांची केलेली अवहेलना

**मु. शी.** :सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात राज्यातील संतांची तसेच राष्ट्रपुरुषांची केलेली अवहेलना याबाबत श्री.राम पंडागळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. राम पंडागळे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सीबीएसई सेंट्रल स्कूलच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकामध्ये पृष्ठ क्रमांक 87, महाराष्ट्र सॉ अ-ग्रेट नंबर ऑफ संत पोएटस् फ्रॉम थर्टीन टू दि सेवन्टीन सेंच्यूरी दि मोस्ट इम्पॉरटंट अंमग देम वेअर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ अँड तुकाराम ॲज वेल ॲज वुमन लाईक सखुबाई अँड दि फॅमिली ऑफ चोखामेळा हू बिलाँगड् अनटचेबल महार कास्ट, सदर पुस्तकात चोखामेळा हा अस्पृश्य महार असल्याचे नमूद केले असून ही बाब गंभीर, आक्षेपार्ह व जातीय भावना भडकवणारील असून, यामुळे येथील जनमानसात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. अत: या पुस्तकांवर तात्काळ बंदी आणून संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, मुंबईतील सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्ताकाच्या संदर्भात माझा विशेष उल्लेख आहे. इतिहासाच्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 87 व पृष्ठ क्रमांक 113 वर असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, "दि मोस्ट इम्पॉरटंट अमंग देम वेअर ज्ञानेश्वर, नामदेव , एकनाथ अँड तुकाराम ॲज वेल ॲज वुमन लाईक सखुबाई अँड दि फॅमिली ऑफ चोखामेळा हू बिलाँगड् टू अनटचेबल महार कास्ट" ही सीबीएसई शाळा इतिहासाच्या पुस्तकातून जाती व्यवस्था शिकवते की, इतिहास शिकवते. पृष्ठ क्रमांक 87 वर दोन वेळेस छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख फक्त "शिवाजी" म्हणून केलेला आहे. पुढे असे म्हटले आहे की, "मराठा आर्मी शिवाजी

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे.....

युज धीस फोर्स टू चॅलेंज दि मुघल्स" अशा त-हेने शिवाजी महाराजांचा दोनदा "शिवाजी" असा उल्लेख केलेला आहे. आपण आपल्या कुटुंबातील मुलाचे नाव जसे "शिवाजी" ठेवतो तसा उल्लेख सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात एकेरी नावाने करण्यात आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा "शिवाजी" असा एकेरी उल्लेख करतात ? खरे म्हणजे "छत्रपती शिवाजी महाराज" असाच उल्लेख केला पाहिजे. जर छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख या महाराष्ट्रातील मुंबई मध्ये होत असेल तर ते चालणार नाही. या शाळेमध्ये जर अशा प्रकारचे शिक्षण दिले जात असेल आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी नावाने उल्लेख होत असेल, चोखामेळा अनटचेबल आणि महार कम्यूनिटी असा उल्लेख होत असेल तर हा संबंध महाराष्ट्राच्या तमाम जनतेचा तसेच तमाम दलितांचा अपमान आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा सुध्दा अपमान आहे. अशा प्रकारचे शिक्षण देऊन महाराजांच्या बद्दल अनादर निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात प्रथम शिक्षण मंत्र्यांना सभागृहात बोलवा. शिक्षणमंत्री सभागृहात येईपर्यंत सभागृह स्थगित करा. संबंधित शाळेवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. नाही तर या सभागृहाचे काम आम्ही चालवू देणार नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, चोखामेळाला "महार" म्हटल्यामुळे या शाळेवर ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याचा अधिकार यांना कोणी दिलेला आहे ?

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या विभागाचा या विषयाशी काहीही संबंध नाही म्हणून आम्हाला मंत्रिमहोदयांचे म्हणणे ऐकून घ्यायचे नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, यासंबंधी खुलासा करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहाल आले पाहिजे.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते वेलमध्ये येतात, तर विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** :मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.30 ते 4.00 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगिती नंतर

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्याचबरोबर मघाशी सन्माननीय सदस्य श्री राम पडागळे यांनी जी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 4.00 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली )

-----

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता देखील कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत...

(माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात सभागृहात उपस्थित होतात.)

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज सुरु असतांना कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. पुनरावृत्ती होऊ नये याकरिता मी प्रत्येक वेळी दहा-दहा मिनिटांकरिता सभागृह तहकूब करणार नाही. आता यापुढे कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृह तहकूब करण्यात येईल अशी माझी पध्दत राहील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात आले नाहीत ही गंभीर बाब आहे.

**उपसभापती** : आपण कोणत्या बाबीसंबंधी बोलत आहात? विशेष उल्लेखासंबंधी बोलत आहात का? माननीय सदस्य श्री. राम पडांगळे यांनी विशेष उल्लेखाव्दारे सूचना मांडली आहे. ते म्हणाल्याप्रमाणे माननीय शालेय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत...

श्री. बाळासाहेब थोरात (बसून बोलतात) : विधानसभेमध्ये माझ्या विभागाचे कामकाज सुरु आहे...

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. राम पडांगळे यांची विशेष उल्लेखाची सूचना मांडून झाल्यानंतर आपण त्यावर उत्तर द्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**:सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात राज्यातील संताची तसेच राष्ट्रपुरुषांची केलेली अवहेलना

**मु. शी.** :सीबीएसईच्या सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात राज्यातील संताची तसेच राष्ट्रपुरुषांची केलेली अवहेलना याबाबत श्री.राम पंडागळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

(चर्चा पुढे चालू)

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, या पुस्तकामध्ये जो उल्लेख करण्यात आला आहे त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील बौध्द समाजाचा अपमान झाला आहे. या पुस्तकामध्ये विद्यार्थ्यांना जाती व्यवस्था शिकविली जात आहे की, इतिहास शिकविला जात आहे? भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कालच साजरी झाली...

**उपसभापती** : आपण भाषण करु नका. सभागृहाचे काही नियम आहेत. आपणास विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास मी प्रतिबंध केलेला नाही. परंतु आपण याठिकाणी लांबलचक भाषण करु लागला आहात...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विशेष उल्लेख हा अति विशेष असल्यामुळे आपण त्यांना परवानगी दिली पाहिजे...

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व मागासवर्गीयांच्या भावना मी याठिकाणी मांडीत आहे. या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे सर्व दलित समाजाच्या भावना या सभागृहामध्ये मांडण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. या इतिहासाच्या पुस्तकामध्ये "महार" म्हणून उल्लेख करुन विद्यार्थ्यांना शिकविले जात आहे. अशाप्रकारे जर उल्लेख केला जात असेल तर संपूर्ण महाराष्ट्रातील दलित समाज रस्त्यावर उतरुन या सरकारचा निषेध केल्याशिवाय राहणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी संपूर्ण आयुष्य झिजविले. त्यांची कालच जयंती साजरी करण्यात आली. अशापरिस्थितीत या इतिहासाच्या इंग्रजी पुस्तकामध्ये जाती व्यवस्था विद्यार्थ्यांना शिकविली जात आहे ही दुर्दैवाची बाब आहे. त्याचप्रमाणे गरीबातला गरीब माणूस, सामान्य माणूस सुध्दा आजही शिवाजी महाराजांचा उल्लेख आदराने करतो. परंतु या पुस्तकामध्ये "शिवाजी" "शिवाजी" असा सामान्य उलेख करण्यात आला आहे. हा संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान आहे. आणि तो अपमान

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे...

आपण कुणीही सहन करता कामा नये. ज्या अधिकाऱ्यांनी "महार" असा उल्लेख केला असेल त्याला जबाबदार धरुन त्याच्यावर ॲट्रासिटीखाली गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी माझी मागणी आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी केली त्यांच्या बाबतीत फक्त "शिवाजी" असा सामान्य उल्लेख करणाऱ्या अधिकाऱ्याला देखील शिक्षा झाली पाहिजे.त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत उत्तर द्यावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी आपला विशेष उल्लेख मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विशेष उल्लेखाची सूचना दिल्या नंतर 30 दिवसाच्या आत शासनाकडून त्याचे लेखी उत्तर येणे अपेक्षित आहे . . . .

(अने सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : सर्वांनी एक मिनिट थांबावे. या विषयाच्या संबंधात माननीय मंत्री महोदयांना काही उत्तर द्यावयाचे असेल तर ते देऊ शकतील. पण मी त्यांना ते बंधनकारक करणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकावे. विशेष उल्लेखाच्या संदर्भात शासनाकडून 30 दिवसाच्या आत उत्तर यावयास पाहिजे. आता सभागृहामध्ये जर माननीय मंत्री महोदय हजर असतील आणि जर ते याबाबतीत उत्तर देण्यास तयार असतील तर मी "नाही" असे म्हटलेले नाही.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : मग तुम्ही त्यांना सांगावे.

**उपसभापती** : पण सन्माननीय सदस्य पूर्णपणे ऐकत नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.राम पडागंळे यांचे बोलणे झाल्यानंतर आपण एकदम हनुमानासारखे सैन्य घेऊन निघता . . . .

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : माननीय मंत्री महोदय, तुम्ही याबाबतीत सांगावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा कशासाठी उभे आहेत ?

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांना त्यांचा विशेष उल्लेख मांडण्याबाबत सांगितले होते.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलता.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे बोलण्यासाठी उभे राहीले आणि त्यांनी

. . . .3 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे बोलणे पूर्ण केल्यानंतर, मी काही बोलावयाच्या आत आपण सगळे सैन्य घेऊन . . . .ठीक आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे.

**उपसभापती** : आता मी कोणालाही बोलू देणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सभागृहामध्ये अशा प्रकारचा विशेष उल्लेख मांडण्यात आल्याचे मला समजले. खरे म्हणजे विधानसभेमध्ये माझ्या विभागाच्या संबंधातील मागण्यांवर चर्चा सुरु आहे. परंतु असे असतानाही मी याठिकाणी जो विषय उपस्थित झालेला आहे, तो ऐकण्यासाठी विधान परिषदेमध्ये आलो आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना परत विशेष उल्लेख मांडावयास सांगावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, प्रोसीडींगमध्ये या विषयाच्या संबंधात सर्वकाही आहे. आम्ही ते तपासून पाहू आणि विशेष उल्लेखामध्ये . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : प्लीज, अगोदर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याबाबतीत कारवाई व्हावयास पाहिजे . . .

**उपसभापती** : माननीय श्री.रामदास कदमसाहेब, आपण विधानसभेमध्ये एक अत्यंत जबाबदार विरोधी पक्षनेते म्हणून काम केलेले आहे. आपल्याला सभागृहाच्या कामकाजाचे सर्व नियम माहिती आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही बेजबाबदारपणे काम करु काय ?

**उपसभापती** : नाही. मी तुम्हाला बेजबाबदार असे म्हणणे शक्यच नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही बेजबाबदारपणे काम करु काय ? असे विचारले.

**उपसभापती** : काही करु नका. मेहेरबानी करुन आपण काही करु नका.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण न्याय द्यावा.

**उपसभापती** : मी न्यायच देत आहे. माननीय मंत्री महोदयांना जर बोलावयाचे असेल किंवा त्यांची उत्तर देण्याची तयारी असेल तर त्यांनी द्यावे.



(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी पुन्हा विशेष उल्लेखाच्या माध्यमातून त्या विषयाचा उल्लेख केला आहे. असे असताना माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, मी ते प्रोसीडींग पाहून नंतर उत्तर देईन. माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात विशेष उल्लेखाच्या विषयाचा आशय लक्षात आलेला आहे. त्यांनी तो ऐकलेला आहे. त्यामुळे याबाबत नंतर उत्तर देण्याचा काही प्रश्न नाही. त्यांनी याठिकाणी आपले मत व्यक्त केले पाहिजे. याबाबतीत सभागृहाच्या भावना तीव्र आहेत. सी.बी.एस.सी.च्या अभ्यासक्रमामध्ये जर असे लिहीले गेले असेल तर त्यांनी महाराष्ट्राचा अवमान केलेला आहे, महाराष्ट्रातील दोन महान विभूतींचा अवमान केलेला आहे. म्हणून याबद्दल महाराष्ट्र शासनाचे काय मत आहे हे सभागृहाला समजले पाहिजे.

**उपसभापती** : त्यापूर्वी माननीय मंत्री महोदयांना ते तपासून तर पहावे लागेल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी विशेष उल्लेखाच्या व्दारे जे मांडलेले आहे. त्याबाबतीत सांगावयाचे तर ते पुस्तक,त्यामध्ये कोणत्या पध्दतीने लिहिलेले आहे इ.बाबी तपासून पहाव्या लागतील. सभापती महोदय, आपण सुरुवातीला सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या संबंधात 30 दिवसामध्ये उत्तर द्यावे लागते. त्या पध्दतीने त्याचे उत्तर दिले जाईल, यात कोणतीही अडचण नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे. . . .

**उपसभापती** : सदरहू विशेष उल्लेखाचा विषय संपलेला आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी त्यांचा विशेष उल्लेख मांडावा. . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजी, मी जो विषय मांडणार आहे, तो देखील महत्वाचा आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून पुढे येतात.)

. . . .3 जी-4



**उपसभापती** : हे बिलकूल बरोबर नाही. ही प्रथाच चुकीची आहे. सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाव्दारे त्यांना जे म्हणणे मांडावयाचे होते, ते मांडलेले आहे.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, हा विशेष उल्लेख देखील महत्वाचा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर तुम्ही तुमच्या पध्दतीने जाणार असाल तर मी देखील माझ्या पध्दतीने जातो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण विशेष उल्लेखाच्या संबंधात जे निदेश देत होतात, ते अयोग्य आहेत असे मी म्हणणार नाही. नियम 101 (क) प्रमाणे एका सदस्यास एका बैठकीत एका पेक्षा अधिक विषय मांडता येणार नाहीत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथम सौ.रणदिवे.... 16:20

श्री. दिवाकर रावते...

तसेच पाच मिनिटांपेक्षा अधिक खरे म्हणजे ही सात मिनिटे होती ती पाच मिनिटे केली आहेत. पाच मिनिटापेक्षा अधिक होणार नाही इतका वेळ सदस्यास सारांश रुपाने विषय सभागृहात मांडता येईल. श्री. राम पडांगळे यांनी तीन मिनिटात विषय मांडला.जोरजोरात मांडला पण तीन मिनिटात मांडला सभापती महोदय, त्यानंतर विधानपरिषद नियम 101(क) 2 मध्ये असे म्हटले आहे की, "एका बैठकीत सहापेक्षा अधिक होणार नाहीत इतक्या सूचना मांडण्यासाठी घेतल्या जातील." त्याप्रमाणे सभापती महोदय, आपण रोज सहा सूचना मान्य करता.

सभापती महोदय, नियम 101(ड) मध्ये असे म्हटले आहे की,"कोणत्या सूचना सभागृहात मांडू द्यावयाच्या याबाबत सभापतींचा निर्णय अंतिम राहील." ज्याअर्थी आदरणीय सभापती महोदयांनी हा विशेष उल्लेख या सभागृहात मांडण्यास परवानगी दिली आहे त्याअर्थी या विशेष उल्लेखातील विषय गंभीर आहे हे माननीय सभापती महोदयांना पटलेले आहे म्हणून त्यांनी तो येथे मांडू दिलेला आहे.

सभापती महोदय, नियम 101-इ. मध्ये जे म्हटलेले आहे ते सर्वात महत्वाचे आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतर मंत्रिमहोदयांनी लगेच उत्तर दिल्यास त्यावर अनुपूरक प्रश्न विचारता येणार नाहीत किंवा त्यावर चर्चा करता येणार नाही."म्हणजे माननीय मंत्रिमहोदयांनी लगेच उत्तर देणे अपेक्षित आहे हे या नियमामध्येच आहे.

**सभापती** : बरोबर आहे. माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरासाठी एक किंवा दोन मिनिटांचा अवधी राहील असेही म्हटले आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रिमहोदय, सभागृहात बसले होते. संपूर्ण विशेष उल्लेख त्यांनी ऐकला आणि ते म्हणाले आता मला टिप्पणी तपासावयाची आहे. सभापती महोदय, आम्हाला उद्यापासून विचार करावा लागेल की, जर त्यांचा प्रॉब्लेम असेल तर "आम्ही वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता" अशी आमची या सदनात अवस्था निर्माण होईल. सभापती महोदय, हा विशेष उल्लेख गंभीर आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी दोन मिनिटात उत्तर द्यावे असे नियमात म्हटले आहे. नाही तर एक महिन्यात उत्तर द्यावे असे म्हटले आहे. एका महिन्यात काय होते हे आपल्याला माहीत आहे. सभापती महोदय, शासन आपले निर्देश पाळत नाही, हा विषय आणखी दुसराच आहे. सभापती महोदय, या विशेष उल्लेखाचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी आताच या सभागृहात येऊन

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

देणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, महाराष्ट्राच्या दृष्टीने हा विषय गंभीर आहे. हे शासन फुले, आंबेडकर आणि शाहू महाराज्यांच्या नावाने टिळा लावून चालले आहे. आणि त्यांनी निर्माण केलेल्या तत्वाचा अत्यंत दुर्दैवीपणाने, निर्भत्सना निर्माण करणारा हा विशेष उल्लेख आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचा घोर अवमान करणारा आहे. सभापती महोदय, या विशेष उल्लेखाचे उत्तर आज आलेच पाहिजे. या विषयावरुन उद्या वेगवेगळया भागात दंगली उसळल्या, वेगवेगळया भागात निदर्शने सुरु झाली तर त्यावेळी हे सरकार जागे होणार आहे काय? म्हणून आज त्याचे निराकरण आणि निर्णय सरकारने केला नाही तर उद्या होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी कोणावर आहे? सभापती महोदय, आम्ही रस्त्यावर उतरलो तर कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली आम्हला आतमध्ये टाकण्यात येते. माननीय मुख्यमंत्र्यांना आतमध्ये कोण टाकणार?छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला तर आम्ही सुध्दा रस्त्यावर उतरु.

**उपसभापती** : छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आम्हाला देखील आदर आहे. आपल्यापैकी सगळयांना आदर आहे. याठिकाणी बाकीचे देखील विशेष उल्लेख करण्यात आलेले आहेत. मी याठिकाणी नियमानुसार कामकाज करायला बसलो आहे. याठिकाणी विशेष उल्लेख सन्माननीय सदस्यांना जेवढया वेळात मांडावयाचा होता तेवढा वेळ किंबहुना त्यापेक्षा जास्त वेळ त्यांना दिला. मी त्यांना त्यांचा विशेष उल्लेख पूर्णपणे मांडू दिला. सन्माननीय शिक्षण मंत्री सभागृहात आले. एक गोष्ट निश्चित आहे की, सभागृहात काय घडले याबाबतीतील सगळयाच गोष्टी त्यांना माहीत असणे मला अपेक्षित नाही. परंतु हा विशेष उल्लेख निश्चितपणे गंभीर स्वरुपाचा आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे याचे निराकरण ताबडतोबीने होणे हे देखील आवश्यक आहे. परंतु दरम्यानच्या काळामध्ये भलेही एक महिना नाही पण एखाद-दुसरा दिवस किंवा उद्यापर्यंत तरी त्यांना संधी द्यावयाची की नाही?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, कदाचित यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी इलेक्ट्रॉनिक मिडियाला खाली जी मुलाखत दिली ती मी पाहिली आहे. त्यामुळे ती बाब संबंध महाराष्ट्रात जाणार आहे.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : हे बरोबर नाही. एखाद्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु असेल आणि विशेष उल्लेखद्वारे तो विषय या सभागृहात मांडला असेल आणि त्या विषयाच्यासंदर्भात मी सभागृहाचे कामकाज अर्ध्या-तासाकरिता तहकूब केले असेल तर सन्माननीय सदस्यांनी मिडियासमोर जाऊन याबाबतीत वक्तव्य करणे हेच मुळात आक्षेपार्ह आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी, माननीय उपसभापतींनी आता सभागृहाचे कामकाज तहकूब केलेले आहे आम्हाला न्याय मिळणार आहे"अशी भावना व्यक्त केलेली आहे. म्हणून आजच्या आज न्याय मिळाला नाही किंवा याबाबतचा निर्णय झाला नाही तर उद्या त्याचे परिणाम कदाचित आपल्याला वेगळे पहायला मिळतील. ही बाब होऊ नये. म्हणून माननीय सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. मी देखील खालच्या सभागृहामध्ये काम केलेले आहे. आपण थोडयावेळा पूर्वी म्हटल्याप्रमाणे मी जबाबदारीने बोलतो. ही माझी जबाबदारी आहे याची मला पूर्णपणे कल्पना आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे हे आपण कबूल केलेले आहे. माझी आपल्याला पुन्हा विनंती आहे की, पुन्हा दहा मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज तहकूब करावे आणि माननीय मुख्यमंत्र्यांना याठिकाणी बोलवावे. हा विषय छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांचा देखील आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

या दोन्ही समाजाचे लोक जर उद्या रस्त्यावर उतरले तर अतिशय बिकट परिस्थिती निर्माण होईल. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे. या ठिकाणी कोण मोठा आणि कोण लहान याला महत्व नाही. उद्या कायदा व सुव्यवस्थेचा जो प्रश्न निर्माण होईल त्याला अधिक महत्व द्यावे. आपण सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता तहकूब करावे. आम्ही हे पुस्तक माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवतो. त्यांनी 10 मिनिटांमध्ये हे पुस्तक वाचावे. त्यातील गांभीर्य त्यांच्या लक्षात येईल आणि ते योग्य ती भूमिका घेतील अशी माझी अपेक्षा आहे. हा प्रश्न प्रतिष्ठेचा करु नये.

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक दुपारी 4.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे. दरम्यान सन्माननीय सदस्यांनी माझ्या दालनामध्ये यावे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.25 ते 4.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी विशेष उल्लेख सूचनेच्या माध्यमातून " Histry - Our Past - II " या पुस्तकामध्ये संत चोखामेळा व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासंबंधी ज्या पध्दतीने उल्लेख करण्यात आलेला आहे त्यासंबंधी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या पुस्तकातील मजकूर आक्षेपार्ह आहे अशी सर्वांचीच भावना आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्यामुळे अभ्यासक्रमातील पुस्तकामध्ये संतांचा उल्लेख आदरपूर्वक व व्यवस्थितपणे केला गेला पाहिजे. पण ज्या पध्दतीने या पुस्तकात उल्लेख करण्यात आला आहे त्यामुळे महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या भावना निश्चितपणे दुखावल्या गेल्या आहेत हे स्पष्ट आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अशोक चव्हाण...

हे पुस्तक माझ्या निदर्शनास आणून दिल्यानंतर ते मी अतिशय बारकाईने पाहिले. हा विषय कदाचित सीबीएसईच्या अभ्यासक्रमातील असावा असा माझा अंदाज आहे. कारण राज्य शासनाच्या एस.एस.सी. बोर्डाचा याच्याशी संबंध आहे असे मला वाटत नाही. सीबीएसईचे पुस्तक असावे अशी माझी धारणा आहे. त्याबाबतची माहिती घ्यावी लागेल, हा पहिला विषय. दुसरा विषय असा आहे की, या पुस्तकाची मी मघाशी बारकाईने पाहणी केली. त्यामध्ये असे म्हटलेले आहे - "History-Our Past-II - A help book of History". हेल्पबुक म्हणजे हे गाईड असावे असा माझा कयास आहे. ते गाईड आहे की नाही माहीत नाही. परंतु ते बहुतेक गाईड सारखे दिसते. मूळ पब्लिकेशन एनसीईआरटीचे आहे असे वाटत नाही. दुसरे असे की, या पुस्तकावर पब्लिशरचे नाव देखील नाही. ल.न.झेल पब्लिकेशन असा उल्लेख आहे. हे पब्लिकेशन कुठे आहे याचा काहीच उल्लेख नाही. याची ऑथेन्टिसिटी काय आहे, ते कुणी पब्लिश केलेले आहे याबाबतची सर्व माहिती बारकाईने घ्यावी लागेल. जर केन्द्र शासनाच्या एनसीईआरटीच्या माध्यमातून हे पब्लिश झाले असेल तर या सभागृहाची नापसंती आपण जरुर कळवू. हा सर्व उल्लेख ज्या पध्दतीने झालेला आहे तो काढून टाकावा आणि मोठ्या आदराने संतांचा, महाराष्ट्राचा उल्लेख झाला पाहिजे, अशा प्रकारची सभागृहाची भावना त्यांना कळविण्यात येईल. जर खाजगी पब्लिशर कोणी असेल तर त्यांना देखील याच पध्दतीने या सभागृहाच्या भावना कळविल्या जातील. शासन याच्याशी सहमत आहे आणि त्याप्रकारची दुरुस्ती संबंधित पब्लिशिंग हाऊसने केली पाहिजे अशा प्रकारची सूचना आम्ही त्यांना करणार आहोत.

श्री. राम पंडागळे : मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या माहितीसाठी एक गोष्ट सांगू इच्छितो की, 1989ला केन्द्र सरकारने पीसीआर बदलेला असून कुठेही जातीवाचक उल्लेख करु नये असे त्यामध्ये म्हटलेले आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे. "महार कम्युनिटी" म्हणून उल्लेख झाला असेल तर त्याबाबतीत कायदेशीर कारवाई करावी.

श्री. अशोक चव्हाण : याबाबतीत पूर्णपणे दक्षता घेतली जाईल आणि त्याप्रमाणे सुधारणा करण्याविषयी त्यांना निश्चित कळविले जाईल. जेथे जेथे कायद्याचे उल्लंघन झालेले आहे त्या ठिकाणी प्रचलित कायद्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

...2...

**पृ.शी.** : 1 मे रोजी रात्री 12.00 वाजेपर्यन्त लाऊडस्पिकर लावण्याची परवानगी मिळण्याबाबत

**मु.शी.** : 1 मे रोजी रात्री 12.00 वाजेपर्यन्त लाऊडस्पिकर लावण्याची परवानगी मिळण्याबाबत श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"1 मे 1960ला संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी 105 हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले. तेव्हापासून 1 मे हा दिवस "महाराष्ट्र दिन" म्हणून साजरा केला जातो. या सुवर्ण महोत्सवी वर्षात 1 मे "महाराष्ट्र दिनास" पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हा दिवस मोठ्या हर्ष-उल्हासाने आणि जल्लोषात साजरा केला जाणार आहे. त्यामुळे रात्री उशिरापर्यन्त कार्यक्रम चालतील. सध्या शासनाने कोणत्याही कार्यक्रमासाठी व लाऊडस्पीकरसाठी रात्री दहा वाजेपर्यंतच चालवावे असे बंधन घातलेले आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षात येणा-या 1 मे महाराष्ट्र दिनाविषयी संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचा उत्साह पाहता या दिवशी चालणा-या कार्यक्रमाकरिता रात्री 12.00 वाजेपर्यन्त लाऊडस्पिकरसाठी खास बाब म्हणून परवानगी देण्याची गरज आहे. तरी या विशेष उल्लेखाद्वारे या बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सभागृहाची मान्यता असेल तर हा निर्णय आताच या ठिकाणी घेण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

----

...3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**औचित्याचे मुद्दे**</u>

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी जो औचित्याचा मुद्दा मांडत आहे त्याचा सकाळच्या सत्रामध्ये उल्लेख झालेला आहे. शिक्षक आमदार श्री. रामनाथ मोते आणि आमदार श्री.संजय केळकर यांनी सांगितल्या प्रमाणे आम्हाला मुंबईतील आणि कोकणातील काही शिक्षक भेटले. महानगरपालिकेचे कोणतेही काम त्यांना दिले जाणार नाही असे त्या शिक्षकांना सांगितले गेले. त्यामुळे सर्व शिक्षकांनी दोन दोन महिने आधी सुट्टीतील कार्यक्रम ठरवून पर्यटन संस्थांकडे तिकिटे बुक केली, तिकिटाचे पैसे भरले.

....नंतर श्री.भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आठ दिवसांपूर्वी त्यांना पत्राद्वारे कळविण्यात आले की, सर्व शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी जुंपले जाणार आहे. अनेक शिक्षकांनी आपल्या सुट्टीच्या काळातील कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. तो कार्यक्रम त्यांना रद्द करावा लागणार आहे. शिक्षकांना शिक्षणाचे काम वगळता इतर कोणतेही काम देऊ नये असा हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. असे असले तरी किमान दोन महिने अगोदर कळविले असते तर त्याप्रमाणे शिक्षकांना नियोजन करता आले असते. अशा प्रकारे शिक्षकांना हवे तेथे जुंपले जाते हे योग्य नाही. सुदैवाने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. अशा वेळी हा विषय तातडीचा असल्यामुळे सरकारच्या वतीने या विषयावर निवेदन केले जावे, शिक्षकांवर अन्याय होणार नाही अशा प्रकारची ग्वाही दिली गेली तर अधिक उपयुक्त होईल असा मी औचित्याच्या मुद्याद्वारे विषय मांडतो. औचित्याचा मुद्दा मांडल्यानंतर ज्या कॅबिनेट मंत्र्यांनी ऐकले पाहिजे ते सुध्दा ऐकत नाहीत.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : मी आहे. आपण किती तळमळीने बोलत आहात हे मी त्यांना सांगत होतो.

श्री.विनोद तावडे : तावडेंची तळमळ ढोबळे सांगायला लागले हे बरे झाले. ढोबळमानाने उत्तर द्यावे. मुंबई महापालिकेच्या हद्दीतील शिक्षकानी रजेच्या काळात कार्यक्रमाचे नियोजन केले. त्यांनी प्रवासासाठी बुकिंग केले, पैसे भरले आहेत. आठ दिवसापूर्वी शासनाने त्यांना जनगणनेच्या कामासाठी नियुक्त करण्यात येणार असल्याचे कळविले. सगळ्याच शिक्षकांचे सुट्टीतील नियोजन बोंबलले आहे. शिक्षकांना यातून मोकळे करा एवढेच आमचे म्हणणे आहे.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, या मुद्याची निश्चितपणे नोंद घेतली जाईल. त्याचबरोबर हे काम शिक्षकांना का दिले जाते? इतरांना का नाही? शिक्षक म्हणजे सगळ्यांच्या दृष्टीने विश्वासाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी त्यांनी दिलेली माहिती ऑथेंटीक मानावी. थोडेसे आजू बांधले गेले तरी त्यांनी पंतोजींसाठी हाती पाटी धरली हे खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या सूचनेचा आदर केला जाईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल पुण्यामध्ये फार गंभीर प्रकार घडला आहे. आपल्या स्मरणात असेल की, मागील डिसेंबर महिन्यात पुणे पत्रकार संघाचे श्री.योगेश कुटे व श्री.संदीप जगदाळे यांना एका बिल्डरने मुलाखतीसाठी घरी बोलावून मारहाण केली होती. पत्रकारांनी नागपूरच्या विधीमंडळ परिसरात सभागृहाबाहेरच्या पायरीवर बसून आंदोलन केले होते. असे असताना 13 तारखेला पुण्यामध्ये वेगळा प्रकार घडला. चार महिन्यानंतर याच बिल्डरने श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.योगेश कुटे व पत्रकार श्री.प्रकाश भोईटे यांच्याविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाण्यामध्ये क्रॉस तक्रार दाखल केली. पुण्यातील 100 पत्रकारांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दिनांक 12.12.2009 रोजी जी फिर्याद दाखल केली त्याविरुध्द क्रॉस तक्रार दाखल करण्यात आली आहे. विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्री.मोतीचंद राठोड यांनी सकृत्‌दर्शनी तथ्य आहे की नाही हे न पाहता 3 वरिष्ठ पत्रकार आणि 100 पत्रकारांविरुध्द गुन्हा दाखल केला. त्या विरोधात पुढे कोणती कारवाई करण्यापूर्वी पुन्हा बिल्डरने सांगितले की, मला तक्रार करायची नाही. त्याबरोबर श्री.मोतीचंद राठोड सांगतात की, हरकत नाही. पुण्याचे पोलीस आयुक्तालय एखादा बिल्डर चालवितो की कायद्याच्या चौकटीत पोलीस कारवाई करतात असा प्रश्न निर्माण होतो. पुणे पत्रकार संघात 100 पत्रकारांची बैठक झाली. गेल्या वेळी झालेल्या प्रकरणात अद्याप सरकारी वकील नेमलेला नाही. त्याचबरोबर सर्व पत्रकारांनी मागणी केली आणि मी सुध्दा मागणी करते की, पुणे शहराचे पोलीस आयुक्त श्री.सत्यपाल सिंह यांची ताबडतोब बदली करावी आणि त्यांच्यावर कारवाई करावी. औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधू इच्छिते. माननीय गृह राज्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. पुण्याच्या पत्रकारांमध्ये आज प्रचंड अस्वस्थता आहे.

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातील पत्रकार बंधूंवर जो अन्याय झाला याबद्दल वक्तव्य केले आहे. या प्रकरणाची जरुर चौकशी केली जाईल आणि या चौकशीमध्ये जे काही निष्पन्न होईल त्यानुसार रितसर कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी शासन सहमत आहे. चार महिन्यानंतर पत्रकारांवर गुन्हा दाखल करण्याची पाळी का येते? फिर्यादीने फिर्याद मागे घेतली अशी माहिती

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:35

श्री.रमेश बागवे.........

आयुक्तांनी दिली आहे. त्यामुळे पत्रकारांना अटक करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्याचबरोबर आपण सांगितल्याप्रमाणे या प्रकरणाची चौकशी केली जाईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सी.डी.देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या बाबतीतील शासन निर्णय

**मु.शी.**: सी.डी.देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या बाबतीतील शासन निर्णय याबाबत श्री. संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर, यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या वतीने प्रशासकीय सेवेसाठी इच्छुक उमेदवारांची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी अशा प्रकारचा उपक्रम सी.डी.देशमुख या संस्थेच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस तसेच एमपीएससीच्या परीक्षांसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करुन घेण्याचे प्रशिक्षण दिले जाते. खऱ्या अर्थाने या प्रशिक्षणाचा उपयोग झालेला आहे. कारण राज्याच्या तसेच देशाच्या प्रशासकीय सेवेत अनेक चांगल्या अधिकाऱ्यांची गरज असते त्याची पूर्वतयारी या संस्थेच्या वतीने केली जाते. अशा प्रकारे या संस्थेच्या माध्यमातून गेल्या 10 वर्षात 24 विद्यार्थी प्रशासकीय सेवेत आहेत. आपणास याची कल्पना आहेच. कारण आपणही ठाणे महापालिकेचे महापौर म्हणून काम केलेले आहे. ज्यावेळेस ही संस्था सुरु झाली तेव्हापासून चांगले काम सुरु आहे. परंतु आता शासनाने एक जी.आर. काढला असून त्यानुसार निवृत्त अधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या संस्थेमध्ये नियमित पगारावर काम करता येणार नाही असे शासनाने ठरविले आहे. काही वेळा असे असते की, अशा नावाजलेल्या संस्था कर्तृत्ववान माणसांमुळेच नावारुपाला आलेल्या असतात आणि त्यात या संस्थेचा समावेश करता येईल. हा जी.आर. बदलण्याबाबत विशेष बाब म्हणून शासनाने विचार करावा आणि अशा प्रकारच्या संस्थांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने त्यातून सूट देण्यात यावी, जेणेकरुन त्याचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल, अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे मी करीत आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आपण आता कामकाज पत्रिकेवरील विधेयक क्र. 66 चर्चेला घेऊ.

श्री. दिवाकर रावते : महोदय, हे विधेयक उद्या चर्चेसाठी घेण्यात यावे अशी मी विनंती करतो. कारण आता पाच वाजलेले आहेत. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी, अशी मी सूचनाकरतो.

**उपसभापती** : आपण सहकार्य केले तर लवकरच हे विधेयक पारित होईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, अशाच स्वरुपाचे विधेयक मागील वेळेस पारित करण्यात आलेले आहे त्या अनुषंगाने मला मंत्री महोदयांकडून काही गोष्टींचा खुलासा घ्यावयाचा असल्याने उद्या थोडे सविस्तर बोलणे शक्य होईल. आज सभागृहात प्रस्ताव चर्चेसाठी असल्याने त्यावर बंधन येईल म्हणून ही विधेयकावरील चर्चा उद्याच घेण्यात यावी. तसे पाहिले तर विधानपरिषदेकडे विधेयके प्रलंबित नाहीत.

**उपसभापती** : आजचे एक विधेयक आणि उद्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात येणारे शासकीय विधेयक अशी दोन विधेयके आपल्याला उद्या सभागृहात पारित करावी लागतील.

---------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे

**मु.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे याविषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. केशवराव मानकर, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला खर्चावर आधारित भाव न मिळणे, शासनाने कर्जमाफी वा अल्प दराने कर्जवाटपाच्या घोषणा केल्या तरी बँकाच्या अडवणुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घेणे भाग पडणे, बोगस बियाणे आणि निकृष्ट दर्जाच्या खतामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊन त्यांना दुबार पेरणी करावी लागणे आणि त्याचा मोबदला त्यांना न मिळणे, शेतीसाठी पाण्याची व विजेची सोय नसल्यामुळे त्याचा शेती उत्पन्नावर परिणाम होणे, वीज पंपाची मागणी व विजेची जोडणी यासाठीचे हजारो अर्ज प्रलंबित असणे, विकलेल्या शेतमालाचे पैसे वेळेवर न मिळणे, नैसर्गिक संकटामुळे झालेल्या नुकसानीबाबत मिळणारी मदत दोन-दोन वर्षे न मिळणे, शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये झालेले विविध घोटाळे उघडकीस येणे व त्याअंतर्गत मिळणाऱ्या लाभापासून शेतकऱ्यांना वंचित रहावे लागणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांमध्ये सतत होणारी वाढ, आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासनाची मदत उपलब्ध न होणे, शासनाचे या सर्व परिस्थितीकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या ठिकाणी दर अधिवेशनामध्ये शेतक-याच्या संबंधीचा प्रस्तावावर चर्चा होत असते. महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येची आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्र राज्यातील शेतक-यांनी आत्महत्येमध्ये संपूर्ण देशात उच्चांक गाठला आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शेतक-यांच्या प्रश्नावर निश्चितपणे या अंदाजपत्रकीय अधिवेशनात चर्चा करणे गरजेचे झाले आहे. मी या प्रस्तावाच्या बाहेर जाऊन काहीही विचार व्यक्त करणार नाही. या प्रस्तावात आम्ही जे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्या मुद्याच्या परिघातच मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्रातील 70 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीच्या पुस्तकातील प्रस्तावनेमध्ये शेतक-याच्या शेतीचे वर्णन करण्यात आलेले आहे. यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

तो उल्लेख असा आहे की, पूर्वानुमानानुसार 2009-2010 मधील स्थूल राज्य उत्पन्नामध्ये 8.6 टक्के वाढ अपेक्षित आहे. जी गतीवर्षी 3.4 टक्के होती. कृषि व संलग्न कार्याच्या वृद्धी दरात गतवर्षीच्या 19.3 टक्के ऋण वृद्धीच्या तुलनेत 2009-2010 मध्ये 1.8 टक्के दराने वाढ अपेक्षित आहे. आज शेतीचे उत्पन्न घटले. गेल्या वर्षभरात शेतीचे उत्पन्न 17 टक्क्यापर्यंत आले आहे. मागच्या वर्षी आणि चालू वर्षी फक्त 1 टक्क्याची वाढ अपेक्षित आहे. ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची शोकांतिका आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना पुरोगामी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे शेतीचे उत्पन्न वाढायला पाहिजे होते. परंतु, एकंदर शेतीच्या उत्पादनामध्येच सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आम्हाला तूट दाखवावी लागत आहे, हे खरे म्हणजे आमचे दुर्दैव आहे.

अंदाजपत्रक मांडले गेले. अंदाजपत्रक वाचताना मी विशेषत: शेती संबंधी सरकारचे मत काय आहे, याचे अध्ययन करीत असतो. यावेळच्या अंदाजपत्रकात सरकाराने कर्जासंबंधी खालील घोषणा केल्या. शेतकऱ्यांना 50 हजार रुपयापर्यंत कर्ज शून्य व्याज दराने, 3 लाखापर्यंतचे कर्ज 4 टक्के व्याज दराने देण्यात येईल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 2 टक्के व्याजदराने 3 लाखा पर्यंत कर्ज देण्यात येईल. या धोरणानुसार राज्यातील शेतकऱ्यांना 2015 पर्यंत 20 हजार कोटी पर्यंत कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. असा अर्थसंकल्पात माननीय सरकारने आपला संकल्प जाहीर केला आहे. याला घोषणाही म्हणता येईल. कारण केंद्र व राज्य शासनाच्या मागील कर्जमाफी योजनेतून अजून 2लाख शेतकरी वंचित राहिलेले आहेत. मागच्या वेळी केंद्र शासनाने 70 हजार कोटी रूपयांची कर्ज माफी जाहीर केली. त्यामध्ये याच शासनाच्या पब्लिकेशनमधून असे दिग्दर्शित करण्यात आले होते की, विदर्भातील शेतकऱ्याला 19 टक्के, मराठवाड्यातील शेतकऱ्याला 21 टक्के, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्याला 22 टक्के आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्याला 60 टक्के कर्ज माफी मिळाली. याचा अर्थ असा आहे की, कर्ज माफी देत असताना कुठे तरी भेदभाव केला गेला. यातून विदर्भ, मराठवाडा,कोकण आणि खान्देशातील शेतकरी उपेक्षित राहिला. या कर्जमाफी योजनेचा लाभ सुद्धा पश्चिम

.....2/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

महाराष्ट्राला गेला. दोन लाखापेक्षा जास्त शेतकरी कर्ज माफीपासून वंचित राहिले. सरकार घोषणा करते. खरे म्हणजे सरकारच्या घोषणेवर विश्वास ठेवायचा की नाही हा खरा प्रश्न आहे. 3-4वर्षापासून आम्ही ऐकतो आहे की,शेतकऱ्याला 4 टक्के, 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल. यासंबंधी केंद्रीय कृषि मंत्र्यांनी घोषणा केली की, शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल. राज्य सरकारने घोषणा केली शेतकऱ्यांना 4 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल. पण आज पर्यंत कुठल्याही शेतकऱ्याला 14 टक्क्याच्या आत कर्ज पुरवठा झालेला नाही. घोषणा हवेत विरल्या. आता देखील अंदाजपत्रकात शेतकऱ्याला फार मोठे स्वप्न दाखविण्यात आले आहे. 50 हजार रूपयापर्यंत कर्ज हे शून्य व्याज दराने देण्यात येईल. याला खरे म्हणावे की खोटे म्हणावे हेच कळत नाही. जगातील कुठलीही बँक शून्य दराने कर्ज देऊ शकत नाही. त्यामुळे या व्याज दरासंबंधी सरकारने खुलासा केलेला नाही. 3 लाखापर्यंतचे कर्ज 4 टक्के व्याजदराने देण्यात येईल. म्हणजे बोलाचा भात आणि बोलाचीच कढी असे म्हणता येईल. लबाडाचे आमंत्रण जेवल्या नंतर खरे. जो पर्यंत हे शेतकऱ्याच्या पदरात पडणार नाही तो पर्यंत याला खरे म्हणावे की, खोटे म्हणावे हे मला समजत नाही. जरी घोषणा झाल्या असल्या तरी महाराष्ट्रातील शेतकऱ्याला 14 टक्क्याच्या आत कुठेही कर्ज पुरवठा झालेला नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...........

कर्ज माफी योजनेचा लाभ अजूनही दोन लाख शेतक-यांना मिळालेला नाही आणि हे शेतकरी या लाभा पासून वंचित राहिलेले आहेत. कर्ज माफीची योजना जाहीर करीत असतांना तो शेतकरी अल्पभूधारक असला पाहिजे असे निकष ठरविण्यात आले होते. विदर्भ आणि मराठवाडयात अल्प भू धारक शेतक-यांची संख्या अत्यंत कमी आहे. मात्र पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी हा अल्प भू धारक दाखवला गेला. विदर्भ आणि मराठवाडयातील अल्प भू धारक शेतक-यांची संख्या ज्या प्रमाणे कमी आहे त्या प्रमाणे कर्जवाटपाचे प्रमाण देखील विदर्भ आणि मराठवाडयात कमी आहे.खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा येथे कोरडवाहू शेती आहे. या शेतक-याला एकरी तीन हजार रुपयापर्यत कर्ज दिले जाते. जिल्हा सहकारी बॅका , विविध सहकार सोसायटया यांच्या मार्फत या शेतक-यांना तीन हजारापेक्षा जास्त कर्ज पुरवठा कोणत्याही पिकासाठी केला जात नाही.पाच एकर शेती असणा-या शेतक-याला फक्त पंधरा हजार रुपयापर्यत कर्ज दिले जाते.परंतु पश्चिम महाराष्ट्रातील आकडेवारी जर पाहिली तर पाच एकर शेती असणा-या शेतक-याला 10 लाख रुपयापर्यत कर्ज दिले गेलेले आहे. काही जिल्हाधिकारी कार्यालयातून आम्ही जेव्हा माहिती मागितली होती तेव्हा अशा प्रकारची माहिती आम्हाला मिळाली आहे. असे प्रकार सांगली जिल्हयात झालेले आहेत. त्याच बरोबर माननीय अध्यक्ष श्री.दिलीप वळसे - पाटील यांच्या मतदारसंघात सुध्दा असे प्रकार झाले आहेत. पाच एकर शेती असणा-या शेतक-याकडील दहा लाख रुपयांचे कर्ज माफ झाले होते. परंतु विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांचे पंधरा हजारापेक्षा जास्त कर्ज माफ झालेले नाही. अशा प्रकारे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील
शेतक-यांमध्ये तफावत निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकरीच आत्महत्या का करतात अशा प्रकारचा प्रश्न नेहमीच सभागृहात विचारला जातो. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांमध्ये जी तफावत निर्माण झालेली आहे त्यामुळे विदर्भातील व मराठवाडयातील शेतकरी कर्जपुरवठया पासून आणि कर्जमाफी पासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे विदर्भातील व मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या करीत असतात. कर्ज माफीचे ढोल वाजविण्यात आले,त्या संबंधी ढिंडोरा पिटवला गेला व त्यावर मते मागण्यात आली होती परंतु ख-या अर्थाने कर्ज माफीचा लाभ विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांना झाला नाही. वास्तविक असे व्हावयास नको होते. सध्या महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...........

राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. या सुवर्ण महोत्सवी राज्यामध्ये आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकराच्या भूमीमध्ये समानतेची वागणूक सर्वाना द्यावयास पाहिजे होती परंतु सर्वाना समानतेची वागणूक दिली गेली नाही.

सभापती महोदय, शेतक-यांना पुरेसे कर्ज दिले जात नाही त्यामुळे शेतक-यांना सावकाराकडे जावे लागते. एखाद्या शेतक-याकडे जर एखाद्या बॅकेचे कर्ज थकले तर बॅक त्याला नव्याने कर्ज देत नाही. सहकार राज्यमंत्री श्री प्रकाश सोळंके यांना मी सांगू इच्छितो की तुम्ही सहकार खात्यामार्फत कितीही आदेश दिले तरी बॅका नव्याने कर्ज उपलब्ध करुन देत नाहीत. मी या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करतो की, जी गावे राष्ट्रीयकृत बॅकांना दत्तक दिलेली आहेत त्या बॅकांमध्ये शेतक-यांचा जेवढा अपमान होतो तेवढा अपमान कोठेही होत नाही. या राष्ट्रीयकृत बॅन्काच्या अधिका-यांना कोणीही विचारणारे नाहीत. जिल्हाधिकारी, आमदार, खासदार वा कोणत्याही लोकप्रतिनिधीचे ते ऐकत नाहीत. मन मानेल त्या प्रमाणे हे अधिकारी वागत असतात .शेतक-यांना कर्ज मिळविण्यासाठी अनेकदा बॅकांकडे खेटे घालावे लागतात त्यामुळे शेतकरी थकून जातो व ज्यावेळी त्याच्या लक्षात येते की, या बॅकेकडून आपल्याला कर्ज मिळत नाही त्यावेळी त्यांना सावकाराकडे जावे लागते. सावकाराकडून तो शेतकरी जेव्हा कर्ज घेतो त्यावेळी त्याला शेती विकावी लागते वा आत्महत्या तरी करावी लागते .बॅकातील अधिकारी शेतक-यांबरोबर मन मानेल त्याप्रमाणे वागत असतात त्यामुळे शेतक-यांना दारोदार भटकावे लागते.अशा प्रकारचे चित्र राज्यामध्ये निर्माण झालेले आहे . या शेतक-याचे एखादे दुखणे असेल तर ते ठीक आहे परंतु ज्या ठिकाणी तो शेतकरी जाईल त्या ठिकाणी त्याची अडवणूक केली जाते..एका बाजूला कर्ज मिळविण्यासाठी त्याला अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागतो तर दुसऱ्या बाजूला शेतीसाठी लागणारे बी बियाणे आणि खते चांगल्या प्रकारची मिळत नाहीत .बोगस बी बियाण्यांचा सुळसुळाट झालेला आहे. ज्यावेळी बोगस बियाण्यांची प्रकरणे आम्ही सभागृहात उपस्थित करतो त्यावेळी माननीय कृषी मंत्री उत्तर देतांना असे सांगतात की, केन्द्र सरकारचा कायदा असल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्रात कारवाई करता येत नाही ...

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

खताच्या बाबतीत एखादा प्रश्न उपस्थित केला की, हा केंद्र सरकारचा कायदा आहे. या केंद्राच्या कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारे लायसन्स रद्द करता येत नाही, असे सांगून खत उत्पादकांवर कोणतीही कारवाई करता येत नाही. फक्त त्याचे लायसन्स आठ ते दहा दिवस सस्पेंड केले जाते. आणि मग या बोगस बि-बियाणामधून, खतामधून निकृष्ट दर्जाच्या खताच्या नावाने बॅगांमध्ये माती, राख व रेती भरली जाते. अशाप्रकारचे खत शेतकऱ्याला देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यावेळी तो शेतकरी उद्ध्वस्त होतो. महागडे खत आणि बियाणे घ्यायचे, ते पेरायचे. आणि ते न उगवल्यामुळे दुबार पेरणी करण्याची वेळ आली तर त्याच्यापुढे आत्महत्त्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक रहात नाही. अशाप्रकारची स्थिती या शेतकऱ्याची झाली आहे. नैसर्गिक संकटे येतात. शेतकऱ्याची शेती निसर्गावर अवलंबून आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही विभाग सोडले तर 10 ते 12 टक्क्यांवर इरिगेशन होत नाही, सिंचन होत नाही. विदर्भामध्ये, मराठवाडयामध्ये सिंचनाचा प्रचंड बॅकलॉग निर्माण झाला परंतु तो दूर केला गेला नाही. आणि म्हणून मराठवाडा असो, विदर्भ असो, या विभागामध्ये सिंचनाच्या सोयी नसल्यामुळे त्याला वर आकाशाकडे बघावे लागते. त्याला परमेश्वराच्या भरंवशावर शेती करावी लागते. कधी वादळे येतात, कधी गारपीट होते, कधी अतिवृष्टी होते, कधी दुष्काळ पडतो, कधी रोगराई येते, कधी पिकावर लाल्या, काल्या नावाचा रोग पडतो. यामुळे तो शेतकरी हैराण होतो व त्याचे पिक नष्ट व्हायला लागते.परंतु त्याला नुकसान भरपाई दिली जात नाही. सभापती महोदय, या सभागृहामध्ये पीक विमा योजनेबाबत बऱ्याच वेळा चर्चा होते. परंतु खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला त्या पीक विमा योजनेचा लाभ मिळत नाही. जर एक पाऊस कमी पडला तर शेतकऱ्याचे पीक उद्ध्वस्त होते, आणि एक वेळ अतिवृष्टी झाली तरी पिक जाते. त्याचप्रमाणे अवकाळी पाऊस पडला तरी शेती नष्ट होतें. यावर्षी अवकाळी पावसामुळे केळी, द्राक्षाच्या बागा नष्ट झाल्या, लिंबाचे पिक गेले, गहू-हरभऱ्याचे पीक वाया गेले.परंतु अजूनपर्यंत सरकारने त्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत सूतोवाच केले नाही. तरमग हा शेतकरी जगणार कसा? राज्य सरकारकडून घोषणा केल्या जातात, परंतु दोन-तीन वर्षापासून त्याला नुकसान भरपाई दिली जात नाही. एका बाजूला निकृष्ट दर्जाचे बियाणे तर दुसऱ्या बाजूला बोगस, निकृष्ट दर्जाचे खत घ्यावे लागते.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी राज्य सरकारने अध्यादेश काढून 1 टक्का वॅट वाढविला. त्यांच्यापेक्षा केंद्र सरकार जास्त हुशार निघाले. त्यांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर....

खताची 10 टक्के दरवाढ आधीच करुन ठेवली होती. आता शेतकऱ्याला खताची सबसिडी डायरेक्ट दिली जात होती. परंतु यापुढे ही सबसिडी खत कारखानदारांना सरकार देणार आहे. त्यामुळे खत विकत घेणाऱ्या शेतकऱ्याला यापुढे सबसिडी मिळणार नाही. म्हणजे 10 टक्के भाव वाढ झाली तर शेतकऱ्याच्या खिशामधून जास्तीची किंमत जाणार आहे. माझ्या हातामध्ये दिनांक 11.4.2010 चा "लोकमत" वर्तमानपत्राचा अंक आहे. त्यामध्ये बातमी छापून आली आहे की, "खते महागली, दरात 8 टक्केने वाढ, गोण्यांवर अनुदानासह मूळ किंमत, कृषी आयुक्तालयातून दरसूची दाखल" कृषी आयुक्तांनी यावर्षी खताची 8 टक्के दरवाढ जाहीर केली. कृषी सेवा केंद्रामध्ये येईपर्यंत खताचे आणखी दर वाढत जाणार. शेवटी शेतकऱ्याच्या घरात खत जाईल त्यावेळी त्या खताची किंमत जवळपास 12 टक्क्यांनी वाढणार आहे. राज्य सरकारप्रमाणे केंद्र सरकारने सुध्दा शेतकऱ्यांच्या अडचणीमध्ये भर घातली. केंद्र सरकारने खत कंपन्यांना अनुदान देण्याबद्दल नवीन धोरण आखले. त्यानुसार केंद्राने रासायनिक खतातील मूलद्रव्यांना थेट अनुदान देण्याचे धोरण जाहीर केले. म्हणजे कंपन्यांना खतांचे दर वाढवून देण्याचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे एप्रिल महिन्यात खत कंपन्यांनी विविध खतांच्या किंमतीच्या गोणीमागे 35 ते 40 रुपयांनी वाढ केली आहे. पूर्वीची प्रति 50 किलो यूरीयाची एका गोणीला कमाल किंमत 251.16 रुपये होती. त्यामध्ये 1 एप्रिल 2010 पासून 5 टक्के वॅटसहीत वाढ होऊन ती रु. 278.78 इतकी झाली. डीएपीची किंमत 486 रुपयांवरुन 522 रुपयांपर्यंत गेली..

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

टीएसपी ची किंमत 287 वरुन 422 पर्यंत गेली. 20200 या क्रमांकाच्या खताची किंमत 327 वरुन 361 पर्यंत गेली. 23230 या क्रमांकाच्या खताची किंमत 391 वरुन 354 पर्यंत गेली. 102626 या क्रमांकाच्या खताची किंमत 374 वरुन 409 पर्यंत किंमत गेली आणि 321216 या क्रमांकाच्या खताची किंमत 397 वरुन 432 पर्यंत गेली. केंद्र शासनाच्या मूलद्रव्य आधारित अनुदानामुळे आणि खताच्या किंमती कंपन्यांना ठरविण्याचे अधिकार देण्याच्या निर्णयामुळे कंपन्यांनी एका खताच्या गोणीमागे 35 ते 40 रुपये आताच वाढविलेले आहेत. यासंबंधातील एक वाक्य महत्वाचे आहे की, "खताच्या किंमती ठरविण्याचे अधिकार हे त्या-त्या कंपन्यांना देण्यात आले. खरे म्हणजे शेतकऱ्यांचे मूळ दुखणे हेच आहे की, त्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. हा विषय फार मोठा आहे. या राज्यातील शेतकऱ्यांना पॅकेजेस् जाहीर करण्यात आली. केंद्र शासनाने पॅकेज जाहीर केले, राज्य शासनाने पॅकेज जाहीर केले आणि आता जर माननीय कृषी मंत्री आले तर ते सांगतील की, आम्ही इतकी हजार शेततळी खोदणार आहोत, इतके हजार तलाव करणार आहोत. पण सभापती महोदय, ही मलमपट्टी आहे. गेल्या 50 वर्षामध्ये या शेतकऱ्याचे जे मूळ दुखणे आहे, तेथपर्यंत कोणी गेले आहे काय ? हा खरा प्रश्न आहे आणि हा प्रस्ताव आणण्यामागचा तो मूळ उद्देश आहे. आम्ही याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येची चर्चा करण्यासाठी बसलेलो नाही. आज खताच्या, बियाणांच्या किंमती वाढलेल्या आहेत. शेतकऱ्यावर अनेक नैसर्गिक संकटे येतात. अवकाळी पाऊस येतो, गारपीट होते, रोगराई निर्माण होते आणि ही सगळी संकटे तर शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली आहेत. पण शेतकऱ्यांचे मूळ दुःख आहे. त्याचा आजपर्यंत कोणी विचार केलेला नाही. ज्यादिवशी या देशाला स्वातंत्र्य मिळाले, या देशाची राज्यघटना लिहिण्यात आली, त्यादिवशी या देशातील प्रत्येक माणसाला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समान हक्क दिले,समान स्वातंत्र्य दिले,जगण्याचा अधिकार दिला आणि सर्व बाबतीत समानता आली पाहिजे ही भावना घटनेमध्ये त्यांनी मांडली. परंतु या देशातील अन्नदात्या शेतकऱ्याला तशा पध्दतीची वागणूक आजपर्यंत देण्यात आली नाही.

सभापती महोदय, आम्ही या प्रस्तावाची सुरुवातच या मुद्यापासून केलेली आहे. खरे म्हणजे हा देश शेतकऱ्यांचा, अन्नदात्यांचा देश आहे. या देशातील खरा प्रमुख घटक कोणी असेल तर तो अन्नदाता शेतकरी आहे. या देशाला कृषी प्रधान देश म्हटले जाते आणि या देशातील 70 टक्के

. . . .3 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

लोक शेती करतात असे सांगितले जाते. अशा शेती प्रधान देशामध्ये स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतर आणि या राज्यामध्ये ज्याचा आपण सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत, त्याठिकाणी आज शेतकऱ्यांची अशी अवस्था झालेली आहे की, हे महाराष्ट्र राज्य आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जात आहे. म्हणून सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये खऱ्या अर्थाने महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या पुरोगामी राज्याने खऱ्या अर्थाने या राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीसंबंधी प्रामुख्याने अग्रक्रमाने विचार करावयास पाहिजे. याबाबत देशासाठी धोरण ठरेल किंवा ठरणार नाही, पण निदान या महाराष्ट्रासाठी एक कृषी धोरण, शेतकी धोरण निश्चित करावयास पाहिजे आणि या राज्यात एक विशेष अधिकार वापरुन शेतकऱ्यांच्या शेती धंद्याला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले पाहिजे. ज्यादिवशी या देशातील शेतकऱ्यांच्या शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले जाईल, त्यादिवशी शेतकऱ्यांच्या समस्या आपोआप मिटतील. तुम्हाला तुकडे फेकण्याची गरज रहाणार नाही, तुम्हाला शेतकऱ्यासाठी पॅकेज देण्याची गरज रहाणार नाही आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला मदत करावी असे तुम्हाला ओरडून सांगावे लागणार नाही. या देशात शेतकऱ्याच्या प्रमुख शेती उद्योगाला प्रमुख उद्योगाचे स्थान देण्यात आले नाही म्हणून आज या देशातील, राज्यातील शेतकऱ्यांची अशी अवस्था झाली आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर या घटनाकारांच्या देशामध्ये इतर उद्योगधंद्याला प्रथम दर्जा दिला गेला. उद्योगामध्ये निर्माण होणाऱ्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला. मध्यंतरी खत धोरण आणले गेले. पण खताची किंमत आता कारखानदार ठरविणार आहे. बियाण्याची किंमत कोण ठरविणार तर त्या कंपन्या ठरविणार आहेत. शेतकऱ्यांना ठरविण्याचा अधिकार नाही. इन्सेक्टीसाईडची किंमत कोण ठरविणार, औषधांची किंमत कोण ठरविणार तर त्या कंपनीचा मालक ठरविणार आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, या देशात, उत्पादित मालाची वस्तू ठरविण्याचा अधिकार त्या त्या उत्पादकाला देण्यात आला आहे. कारखान्यात निर्माण होणाऱ्या मालाची किंमत या देशात कारखानदार ठरवितो परंतु शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार त्याला दिला नाही हे आमचे खरे दु:ख आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली. महाराष्ट्र राज्याचा आज सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहोत. या सुवर्ण महोत्सवी वर्षात शेतकरी न्याय मागतो पण शेतकऱ्याला न्याय मिळत नाही. शेतकऱ्याच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम चालू आहे. मलमपट्टी करण्याचे काम चालू आहे पण शेतकऱ्याला न्याय दिला जात नाही. हा या प्रस्तावाचा मूळ गाभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री रावते आणि मी, आम्ही अनेकदा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय या सभागृहात आणला. खाताचे विषय, बियाणाचे विषय अनेक वेळा या सभागृहात आणले. पण आजचा प्रस्ताव यासाठी मांडण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. या राज्यातील अन्नदात्या शेतकऱ्याला या सुवर्णमहोत्सवी वर्षात न्याय मिळणार आहे काय? याच्या बाबतीत काही धोरण आखले जाणार आहे काय? हा प्रश्न या सुवर्णमहोत्सवी वर्षात आमच्या समोर आहे. सभापती महोदय, मी सभागृहाचा फार वेळ घेणार नाही परंतू उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही हे शेतकऱ्यांचे मूळ दुखणे आहे. मी सांगितले की, कारखान्यात निर्माण होणाऱ्या मालाची किंमत कारखानदार ठरवितो परंतु शेतीत उत्पादन होणाऱ्या शेतीमालाची किंमत शेतकऱ्याला ठरविता येत नाही. याचे कारण शेतकऱ्याच्या शेती धंद्याला प्रमुख उद्योगाचे स्थान या देशात दिले गेले नाही. शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले गेले असते तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला न्याय मिळू शकला असता. माझ्या गावात हिंदुस्थान लिव्हरची फॅक्टरी आहे. मी शेतकऱ्यांच्या चळवळीत काम करणारा कार्यकर्ता आहे. मी कोरडवाहू शेतकरी आहे. माझ्याजवळ एक एकर सुध्दा बागायत शेती नाही. माझ्या शेतीतील माल ज्यावेळी मी मार्केटमध्ये घेऊन जातो त्यावेळी माझ्या शेतीमालचा लिलाव करण्यात येतो. ज्याला आम्ही शेतकऱ्याचे पंढरे सोने समजतो तो पांढरा शुभ्र कापूस उत्पादन करण्यासाठी शेतकरी आपले रक्त आटवतो, शेतकरी घाम गाळतो, बैलासारखी मेहनत करणारा आमचा कापूस उत्पादक शेतकरी हा रात्री बैल झोपल्याशिवाय झोपत नाही. कापसाचे एक-एक बोंड गोळा करतो आणि बंडीत भरुन ज्यावेळी तो मार्केटमध्ये घेऊन जातो

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फंडकर....

त्यावेळी त्याचा लिलाव कोणी तरी दलाल करतात, व्यापारी करतात हे आमच्या मनामध्ये दुःख आहे. सभापती महोदय, शेतकऱ्याच्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला नाही. शेतकऱ्याने उत्पादन केलेली ज्वारी असेल, सोयाबिन असेल, तूर असेल,गहू असेल, हरभरा असेल हे फक्त पिकविण्याचा अधिकार शेतकऱ्याला आहे पण त्याचा भाव ठरविण्याचा अधिकार त्याला नाही. सभापती महोदय, शेती हा कारखाना आहे असे मी समजतो. शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणारे खत असेल,बियाणे असतील याला मी कच्चा माल असे समजतो. या शेतीमालाच्या उत्पादनासाठी खत लागतो, बियाणे लागतात, इन्सेक्टीसाईड लागतात. विद्युत पुरवठा लागतो, मजुरी लागते. हे सर्व त्याला महागडया दरात घ्यावे लागते. हे सर्व वापरुन ज्यावेळी शेतीमाल उत्पादन करण्यात येतो त्यावेळी त्या शेतीमालाची किंमत शेतकरी ठरवू शकत नाही. म्हणून मला एक दिवस असे वाटले की, आपण उत्पादन केलेल्या मालाची किंमत आपण ठरवू शकत नाही. पण माझ्याच गावात असलेल्या हिंदुस्थान लिव्हर फॅक्टरीमध्ये जो माल तयार होतो त्याची किंमत ठरविण्याचा अधिकार त्या फॅक्टरीच्या मलाकाला आहे. सभापती महोदय, मी या फॅक्टरीच्या मालकाला फोन केला आणि मला आपली फॅक्टरी बघायची आहे असे सांगितले. सभापती महोदय, मी ज्यावेळी ती फॅक्टरी बघायला गेलो त्यावेळी त्या फॅक्टरीच्या मॅनेजरने माझे स्वागत केले. त्यानंतर मी त्याला सहज प्रश्न विचारला की, तुमच्या फॅक्टरीमध्ये जो साबण तयार होतो त्याची किंमत कोण ठरवितात? त्यावेळी त्या मॅनेजरने साबण तयार करण्याची प्रक्रिया कशी होते हे मला समजून सांगितले. साबण तयार करण्यासाठी कच्चामाल म्हणून तेल लागते. ते तेल बाजारातून मार्केटमधून घेतो त्या तेलाची किंमत साबणाची किंमत ठरविताना धरली जाते. ते तेल गरम केले जाते त्यावर प्रक्रिया केली जाते त्यामध्ये केमिकल टाकले जाते या सर्वांची किंमत त्या साबणाच्या किंमतीत धरली जाते. या साबणावर प्रक्रिया करताना जी इलेक्ट्रिसिटी लागते त्या इलेक्ट्रिसिटीचे बिल धरले जाते. ज्यावेळी तो साबण कारखान्यातून बाहेर येतो त्यावेळी लक्स साबणाचे पॅकिंग केले जाते. त्या पॅकिंग छपाईसाठी जो खर्च येतो ते आम्ही त्यामध्ये टाकतो. पॅकिंग केल्यानंतर एक डझन साबणाचा डब्बा भरला जातो. त्या डब्याची किंमत त्यामध्ये टाकली जाते. मग मोठे पॅकिंग केले जाते. मग त्यावर सेलटॅक्स आकारला जातो. ज्यावेळी या साबणाचे ट्रॅव्हलिंग होते त्यावेळी त्या मालाचे कार्टिंग त्यामध्ये लावले जाते. त्यापुढे जाऊन त्याने मला जे सांगितले ते एकून मला धक्काच बसला.

यानंतर श्री. बरवड.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

त्यांनी सांगितले की, आम्ही एवढा खर्च तर त्यामध्ये टाकतोच पण ज्यावेळी हिंदुस्थान लिव्हरचे डायरेक्टर आणि त्याची बायको मुंबईवरुन अकोल्यापर्यंत विमानाने येतात त्या विमानाच्या तिकिटाचा खर्चही त्यामध्ये टाकतो. अकोल्यावरुन 50 किलोमीटर कारने येतात त्याचा खर्च त्यामध्ये टाकतो. तसेच मजुरी, पगार त्यामध्ये टाकतो आणि सर्व खर्च एकत्र करुन त्या साबणाची किंमत काढतो. ती किंमत कारखान्याची किंमत असते आणि ती किंमत आम्ही त्या साबणाला लावतो. तो साबण ज्यावेळी कारखान्यातून बाहेर पडतो आणि किराणा दुकानात येतो तेव्हा किराणा दुकानदार आपला नफा त्यामध्ये टाकून तो साबण विकतो. त्याचा ग्राहक असतो शेतकरी. ही त्या साबणाच्या किंमतीच्या बाबतीत प्रक्रिया झाली. मग माझ्या सहज लक्षात आले की, माझ्या शेतात माझा बैल खपतो. माझ्या कुटुंबातील सर्व माणसे त्या शेतीमध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत खपतात. कधी आम्ही त्यांच्या खर्च उत्पादन खर्चामध्ये टाकत नाही. शेतकऱ्याची बायको भाकरी घेऊन शेतामध्ये जाते तिचा खर्च त्यामध्ये कधी टाकत नाही. बैलाचा खर्च त्यामध्ये टाकत नाही. खत किती लागले, बियाणे किती लागले, औषधी किती लागली, बियाणे किती लागले याचाच तो शेतकरी विचार करतो आणि तेवढा खर्च टाकतो. पण बाकीचे खर्च शेतकरी कधी टाकत नाही. तरी त्याच्या मालाला खर्चाएवढी किंमत मिळत नाही. त्याला महागडी वीज घ्यावी लागते. विजेची दरवाढ झाली तर ती दरवाढ तो उत्पादन खर्चामध्ये कधी टाकत नाही. तीन तीन वेळा दरवाढ होते. खताची दरवाढ होते. बियाणांची दरवाढ होते. पण ती दरवाढ तो त्यामध्ये टाकत नाही. त्याच्या मालाचे भाव मात्र स्थिरच राहतात. याचा आपण खोलवर विचार करावयास पाहिजे. शेतकऱ्याला जगण्यासाठी आवश्यक त्या वस्तू लागतात. जसे तो शेतीमध्ये माल पिकवतो, माल विकतो तसे जगण्यासाठी ज्यावेळी त्याला काही वस्तू खरेदी कराव्या लागतात त्यासाठी तो जर एखाद्या दुकानात गेला, त्याला जर शर्ट शिवावयाचे असेल आणि कापड घेण्यासाठी दुकानात गेला तर वाराप्रमाणे कापडाची किंमत कापड दुकानदार सांगतो. त्याला साखर लागली आणि तो किराणा दुकानात गेला तर साखरेची किंमत किराणा दुकानदार सांगतो, साबणाची किंमत किराणा दुकानदार सांगतो. पानपट्टीवर जर पान खायला गेला तर पानाची किंमत सांगण्याचा अधिकार त्या पानपट्टीवाल्याला आहे. चप्पल तुटली आणि चपलेला खिळा मारावयाचा असेल, पॉलीश करावयाचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

असेल तर त्या पॉलीशचा भाव तो चांभार सांगतो पण शेतकऱ्याची अवस्था त्यापेक्षाही निपत्तर झाला आहे. या देशामध्ये प्रत्येकाला आपल्या मालाची आणि श्रमाची किंमत सांगण्याचा अधिकार असताना या स्वतंत्र देशातील शेतकरी हा एकच प्राणी असा राहिला की ज्याला आपल्या मालाचा भाव सांगण्याचा अधिकार राहिलेला नाही. ही अवस्था झाल्यामुळे शेतकरी परावलंबी झाला. शेतकरी कर्जबाजारी झाला. जन्मापासून मरणापर्यंत शेतकऱ्याला आज कर्ज काढावे लागते अशा प्रकारची शेतकऱ्याची अवस्था झालेली आहे. एका बाजूला तो कर्जबाजारीपणामुळे हैराण झाला, दुसऱ्या बाजूला निसर्गाने मारले म्हणून हैराण झाला आणि तिसऱ्या बाजूला संसार कसा चालवावयाचा यासाठी तो हैराण झालेला आहे.

मी एका शेतकऱ्याचे उदाहरण सांगणार आहे. एका बाजूला मी सांगितलेले दुष्टचक्र तर त्याच्या भोवती आहेच. जळगाव येथील 'सकाळ' वर्तमानपत्रामध्ये परवा ही बातमी आली. 'पैशाची वाट पाहात पाहातच अखेर त्यांनी त्यागले प्राण' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे.. या बातमीमध्ये असे म्हटले आहे की, "15 वर्षापासून थोडीथोडकी नव्हे तर तब्बल 40 एकर जमीन धरणामध्ये गेली. मध्येच देहाला कर्करोगाने विळखा घातला. उपचारासाठी जमिनीच्या मोबदल्याची रक्कम मिळावी म्हणून सरकारी कचेऱ्याच्या पायऱ्या झिजवल्या. पण ढिम्म प्रशासनाला त्याची कीव आली नाही. आजपर्यंत जमिनीचा मोबदला मिळाला नाही आणि अखेर पैशाची वाट पाहात पाहात त्यांनी आपला देह कर्करोगाच्या हवाली केला. ही व्यथा आहे मोहाडी येथील शेतकरी पुंडलिक शंकर चौधरी, वय 75 वर्षे यांची. साजगाव मोहाडी लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी लघुपाटबंधारे विभागामध्ये 1995 मध्ये चौधरी यांची 40 एकर जमीन संपादित करण्यात आली. तिचा 1 कोटी रुपयांचा मोबदला मिळण्यासाठी चौधरी यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. खंडपीठाने संबंधित कार्यालयावर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश दिले. गुरुवार, तारीख 1 या दिवशी ही जप्तीची कारवाई करण्यात आली. जप्ती झाली पण उपचारासाठी पैसा मिळण्यास खूप उशीर झाला. चौधरी यांच्या नसानसात कर्करोगाने ठाण मांडले आणि शासनाच्या निलाजरेपणावर त्याचा विळखा भारी ठरला. अखेर चौधरी यांनी उपचाराअभावी शुक्रवारी रात्री 8.88 ला देह ठेवला." ही शेतकऱ्याची अवस्था आहे. मी एक उदाहरण सांगितले. अशी 100 उदाहरणे आमच्याकडे आहेत. शेतकरी कशा पध्दतीने मारतो याची उदाहरणे आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

वीज मिळत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहे. अमरावती जिल्हयातील अंजनगाव कार्यालयाची ही घटना आहे. मागील 2 वर्षापूर्वी विजेच्या पंपासाठी त्याने अर्ज केला होता. तो सातत्याने शेतकरी विजेची मागणी करीत होता, त्या शेतक-याने पैसे भरले होते. त्यासाठी त्याने त्या कार्यालयात खेटे मारले. शेतातील उभे पीक वाळून जात होते. विहिरीला पाणी होते, पाणी शेतक-याकडे पहात होते. परंतु वीज नसल्यामुळे शेतीला पाणी देऊ शकत नाही. वीज मंडळाकडे दोन वर्षापासून खेटे मारल्यानंतरही त्याला वीज मिळाली नाही. शेवटी त्याने सांगितले की, साहेब, मला वीज देणार नसाल तर माझ्यासमोर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही, असे सांगून त्याने त्याच ठिकाणी रोगर पिऊन आत्महत्या केली. शेतक-यांच्या आत्महत्यांचा आकडा अशाप्रकारे फुगला आहे. परंतु सभागृहात मात्र आत्महत्यांची चेष्टा केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव एकेरी बोलून घेतले तर सभागृहात गदारोळ केला जातो. परंतु त्याच छत्रपती शिवरायांच्या राज्यामध्ये जो अन्नदाता शेतकरी आहे त्याला कोणकोणत्या कारणांमुळे आत्महत्या करावी लागते, त्याचे आत्मचिंतन करण्यास कोणी तयार नाही. उलटपक्षी त्याची मजाक केली जाते.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी आम्ही शेतक-यांच्या आत्महत्यांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मंत्री महोदय, आपणच सभागृहात उत्तर दिले होते. आपण त्यावेळी असे सांगितले होते की, आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना सन 2006 पासून मदत दिली जात आहे. सन 2006 मध्ये 2335 आत्महत्या झाल्या, त्यापैकी 1307 आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या, सन 2007 मध्ये 1985 आत्महत्या झाल्या त्यापैकी 1395 आत्महत्याग्रस्त कुटुंबिय अपात्र ठरले. सन 2008 मध्ये 1906 आत्महत्या झाल्या त्यापैकी 1200 अपात्र ठरविण्यात आल्या आणि 2009 मध्ये 1560 आत्महत्या झाल्या त्यापैकी 874 आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या. आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना पात्र ठरविण्याचे निकष काय आहेत ? महसूल विभागाच्या तहसीलदारांनी दिलेला अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मान्य केला जातो आणि त्याप्रमाणे संबंधितांना मदत दिली जाते. यासंदर्भात दाखला देण्याची गरज नाही. अमरावती जिल्हयातील एक उदाहरण मी सांगेन. मी हे उदाहरण या सभागृहात दुस-यांदा सांगत आहे. मी त्यादिवशी सुध्दा सांगितले होते की,

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.पांडु रंग फुंडकर....

ज्या आत्महत्या अपात्र ठरविल्या आहेत त्यांची फेरतपासणी करावी. सोनटक्के नावाच्या शेतक-याने आत्महत्या केली होती. मी त्याच्या घरी गेलो होतो. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी त्याने आत्महत्या केली होती. नागपूरला जाण्यापूर्वी त्याच्या घरी भेट देण्यासाठी गेलो होतो. हा शेतकरी सुध्दा 40 एकरवाला शेतकरी होता. त्या शेतक-याला दोन विवाहित मुले आहेत, नातवंड आहेत. मी त्या मुलांना विचारले की, तुमच्या वडिलांनी आत्महत्या का केली ? त्या मुलांनी माझ्याकडे हकीकत सांगितली. दोन वर्षापूर्वी आमची शेती पिकली नाही म्हणून कर्ज काढले होते. ते कर्ज फेडण्यासाठी दोन महिने उशीर झाल्यामुळे जिल्हा सहकारी बँकेचे अधिकारी घरी आले, त्यांनी आमच्या वडिलांचा अपमान केला होता. त्यांनी आयुष्यात कधी कर्ज काढले नव्हते. शेतकरी जरुर गरीब आहे, पण तो स्वाभिमानी आहे. बँकेच्या अधिका-याने केलेला अपमान त्याला सहन झाला नाही, माझे भरलेले घर आहे, आता मला जगण्यामध्ये तथ्य वाटत नाही, मला अपमान सहन झाला नाही असा मजकूर असलेली चिठ्ठी लिहून त्याने आत्महत्या केली. ती चिठ्ठी मी सोबत घेतली. त्यानंतर मी अमरावती जिल्हाधिका-यांकडे चौकशी केली, त्यांना विचारले की, या शेतक-याने आत्महत्या का केली, त्याचा पंचनामा आला आहे काय ? त्यांनी मला असे म्हटले की, साहेब, आपण त्याकडे लक्ष देऊ नका. आत्महत्या करणा-या शेतक-याच्या घरी मी जाऊन आलो आहे हे जिल्हाधिका-यांना माहीत नव्हते. त्यांनी असे सांगितले की, ही आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे झालेली नाही. आत्महत्येचे कारण वेगळे आहे. मी विचारले की, काय कारण आहे ? मी त्यांना असे विचारले की, तहसीलदारांनी दिलेला रिपोर्ट काय आहे असे विचारल्यावर ते मला रिपोर्ट दाखवत नव्हते. नाही, होय म्हणत त्यांनी मला रिपोर्ट दाखविला. त्यात तहसीलदारांनी लिहिले होते, या शेतक-याने कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेली नाही, त्यांचे वय 70 वर्षे होते. शेजारी एक म्हातारी रहात होती, त्या म्हातारीवर यांचे प्रेम जुळले होते पण तिने नकार दिला म्हणून या म्हाता-याने आत्महत्या केली आहे. हा विषय मी सभागृहात उपस्थित करुन सन्माननीय गृहमंत्र्यांना मी सांगितले की, आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या टाळूवरील लोणी खाणारा हा अधिकारी आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर.....

त्या शेतक-याला 1 लाख रुपये त्या अधिका-याला त्याच्या घरुन द्यायचे नव्हते. खरा रिपोर्ट दिला असता तर बिघडले असते काय ? बोगस रिपोर्ट देण्याचे, जास्त लोकांना मदत कशी देता येणार नाही अशा प्रकारचे रिपोर्ट देण्याचे आदेश शासनाने दिले होते काय ? ही बाब मी सभागृहामध्ये उपस्थित केल्यानंतर माननीय मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांनी त्याबाबतची माहिती घेऊन त्या अधिका-याला सस्पेण्ड केले. म्हणून माझी मागणी आहे की, ज्यांना अपात्र ठरविलेले आहे त्याबाबतीत फेर चौकशी करावी, ही चौकशी नि:पक्षपातीपणे करावी. जिल्हाधिका-यांनी जाणीवपूर्वक तसा रिपोर्ट दिला असेल तर त्याचीही नोंद घ्यावी. सभापती महोदय, शेतकरी दारु पितो, असे म्हटले गेले. या देशामध्ये दारु कोण पित नाही ? राजकारणी दारु पितात, पुढारी दारु पितात, उद्योगपती दारु पितात. मग फक्त शेतक-यालाच का बदनाम करता ? शेतकरी दारु पितो म्हणून आत्महत्या करतो असे रिपोर्ट तयार केले जातात. जे लोक दारु पितात त्यांना दारु पिण्यास हे शासन प्रोत्साहन देते. म्हणून ज्वारी पासून, जांभळापासून, करवंदापासून दारु बनवायला हे सरकार निघाले आहे. सर्वच दारु पितात. ते गावठी पित नसतील, विदेशी पित असतील. मग शेतकरी दारु पितो असे सांगून त्याला बदनाम करण्याचा तुम्हाला अधिकार नाही. म्हणून ज्या आत्महत्या झाल्या त्याबाबतीत फेर तपासणी करावी लागणार आहे. हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. मूळ जे दुखणे आहे त्या दुखण्याचा विचार करा. हे पुरोगामी राज्य आहे. देशाला दिशा देणारे हे राज्य आहे. जरी या देशाने धोरण आखले नसले तरी या राज्यात शेतकी धोरण नव्याने आखले गेले आणि शेतक-याच्या शेतीधंद्याला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले. ते देत असताना उद्योजकाला ज्या सवलती दिल्या जातात त्या प्रमाणे शेतीसाठी मागेल त्याला पाणी, मागेल त्याला वीज आणि त्याच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार जर तुम्ही त्याला दिलेत तर सर्व दुखणे बाजूला होऊ शकेल अशा पध्दतीचे विचार व्यक्त करतो आणि सभापती महोदय, आपण मला वेळ दिला त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी राज्यातील शेतक-यांच्या शेतमालाला खर्चावर आधारित भाव मिळण्याच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये शेतमालावर प्रक्रिया करणारे किती उद्योग उभे राहिले आहेत ? त्या पैकी किती उद्योग टिकले आणि किती बुडाले, किती खाल्ले अशा प्रकारचे नानाविध प्रश्न पुढे उभे राहातात. खरे म्हणजे या प्रश्नांच्या संदर्भात प्रामुख्याने चर्चा व्हायला पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या गावाला मी गेलो होते. अकोल्यात गेलो, बुलढाण्यात गेलो, खामगांवला गेला. त्या ठिकाणी एकही उद्योग उभा नाही. विदर्भामध्ये कापूस खूप मोठ्या प्रमाणावर पिकतो परंतु विदर्भामध्ये एकही सूत गिरणी उभी नाही. मी चुकत नसेल तर माझ्या माहिती प्रमाणे विदर्भामध्ये दोन सूत गिरण्या आहेत. एक श्री. सुरेश देशमुख यांची आणि दुसरी पुसद येथील गिरणी. या राज्यामध्ये एका वेळी 200 सूत गिरण्या काढण्याचा निर्णय झाला. 450 कोटीचे कर्ज वाटप झाले. पण एकही सूत गिरणी सुरु झाली नाही.

....नंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

एकही सूत गिरणी उभी राहिली नाही. शेतमालाला योग्य भाव केव्हा मिळेल? ज्यावेळी खऱ्या अर्थाने पक्रिया करणारे उद्योग उभे करुन शेत मालासाठी मार्केट देऊ शकलो तरच हे शक्य होईल. या चर्चेच्या माध्यमातून सरकारने याचे उत्तर दिले तर उद्या शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव देऊ शकतो.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अनेक उदाहरणे दिली. आज परिस्थिती काय आहे? पूर्व विदर्भामध्ये भरपूर पाऊस पडतो. मी काल सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या खामगावला गेलो होतो. बुलडाणा जिल्हयात 22 दिवसानंतर एकदा पाणी पुरविण्यात येत आहे. मी ज्या रेस्टहाऊसमध्ये थांबलो होतो तेथे पाणी नाही. ते म्हणतात, 22 दिवसांनी एकदा पाणी मिळते. शासनाची जलनिती बरोबर आखलेली नाही. या संदर्भात एकदा चर्चा व्हायला पाहिजे. आज या कामासाठी जी कर्जे घेतली गेली त्या निधीचा वापर कसा झाला? कोणी केला? कोणी किती खाल्ले याची चर्चा या निमित्ताने व्हावी अशी मी प्रामुख्याने मागणी करतो. या राज्यामध्ये कायदा होता. शेतकऱ्यांनी विजेची मागणी केल्यानंतर ताबडतोब वीज कनेक्शन मिळत होते. आज काय परिस्थिती आहे? वीज कनेक्शन मिळायला शेतकऱ्यांना दोन दोन वर्षे वाट पहावी लागते. इतकेच नव्हे तर त्यासाठी खर्च किती येतो? वीज कनेक्शन घेण्यासाठी शेतकऱ्यांना ज्या पध्दतीने खर्च करावा लागतो तो विचारात घेतला तर सर्वसामान्य शेतकऱ्यांना वीज कनेक्शन घ्यायला भीती वाटते अशी स्थिती या राज्यामध्ये निर्माण झाली आहे. शासनाने वेगवेगळया आर्थिक संस्था उभ्या केल्या. परंतु त्या संस्थांवर शासनाने नियंत्रण नाही. शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी मार्केट कमिट्या स्थापन केल्या गेल्या. आज मार्केट कमिट्यांची काय परिस्थिती आहे? एक तरी मार्केट कमिटी सक्षम आहे का? मार्केट कमिट्या दलालांचे अड्डे बनल्या आहेत. नाशिकच्या मार्केट कमिटीची काय अवस्था आहे? नाशिकच्या मार्केट कमिटीला 100 कोटी रुपयांचे कर्ज नियमबाह्य पध्दतीने राज्य सहकारी बँकेने दिले. प्रायमरी सोसायटीला राज्य सहकारी बँक कर्ज देत नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर राज्य बँकेवर निवडून आलेले आहेत. राज्य सहकारी बँकेचा संचालक म्हणून मी कर्ज देण्यास विरोध केला होता. 106 कोटी रुपयांचे कर्ज घेतले. आज ते 160 कोटीवर पोहोचले आहे. सगळे कर्ज बुडित झाले आहे. प्रायमरी सोसायटीला राज्य बँकेने कधी कर्ज दिले नव्हते. खास बाब म्हणून कर्ज दिले गेले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

कशाबद्दल दिले गेले? का मागणी केली? आम्हाला सांगितले गेले की, मार्केट कमिटी सक्षम झाली पाहिजे. तेथे गोडावूनची सुविधा असली पाहिजे. आलेला शेतीमाल ठेवण्यासाठी जागा पाहिजे. मार्केटमध्ये आलेला माल विकला गेला तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळेल. भाव कोणाचा वाढला? कोणी किती खाल्ले? कोणाच्या खिशात किती गेले? ही परिस्थिती या राज्यामध्ये आहे. एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. बेकायदेशीर कर्ज वाटले. योग्यरित्या कर्ज दिले नाही म्हणून तेथील संचालकांवर केस दाखल केली आहे.

नंतर 3एक्स.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.......

त्यांनी उच्च न्यायालयातून स्टे आणण्याचा प्रयत्न केला, तो मिळाला नाही म्हणून सुप्रिम कोर्टापर्यंत गेले. पैसा कोणाचा आणि कशासाठी अल्प दराने घेतलेले कर्ज तसेच ज्या मार्केट कमिटयांसाठी हे कर्ज घेतले आहे त्यांची आज काय अवस्था आहे ? आज पणन महासंघाकडे जवळपास 300 कोटी रुपये पडून आहेत. त्या महासंघाचा व्याप आणि वसुली व महासंघाकडे असलेल्या प्रॉपर्टीचे मोजमाप केले तर बरीच तफावत आढळून येईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा सांगितले ती गोष्ट खरी आहे की कर्ज वितरणासंबंधीचे धोरण बरोबर नाही, त्यात सुसूत्रता नाही, कर्ज वेळेवर न फेडणाऱ्यांना झिरो टक्के व्याज आणि कर्ज वेळेवर फेडणाऱ्यांना मात्र 6 टक्के व्याज असे शासनाचे धोरण आहे. तसेच या व्याजाची तरतूद शासन करणार पण त्याचा अंतर्भाव अर्थसंकल्पात मात्र दिसू येत नाही. सभागृहात बजेट सादर करताना सांगण्यात आले, वर्तमानपत्रात सुध्दा बातमी आली परंतु प्रत्यक्षात तरतूद मात्र कुठेही दिसू येत नाही. माननीय अर्थमंत्र्यांनी मंदिरे बांधण्यासाठी तसेच पर्यटनासाठी भरपूर पैसे दिले, त्याबद्दल माझे काहीच म्हणणे नाही. पण ज्या शेतकरी राजासाठी आपण येथे चर्चा करतो त्याच्यासाठी मात्र काहीच तरतूद नाही म्हणून ही केवळ अडीच तासाची चर्चा करुन चालणार नाही, या चर्चेसाठी दोन दिवस लागतील एवढी प्रदीर्घ चर्चा या विषयाची होऊ शकते. त्या अनुषंगाने शासनाला नियोजन करावे लागेल. मी कालच बुलढाण्याहून औरंगाबाद सर्किट हाऊसवर गेलो होतो. तेथे गेल्यानंतर मला माजी आमदार श्री. नितीन पाटील हे देखील भेटले होते. आज मराठवाड्यातील साखर कारखान्यांची परिस्थिती पाहिली तर केवळ 5-6 कारखानेच चालू आहेत. अशी परिस्थिती असेल तर मग आपण या सभागृहात ही चर्चा कशासाठी करीत आहोत हेच मला समजत नाही. मराठवाडयात नांदेड येथे माजी केंद्रीय मंत्री श्रीमती सूर्यकांता पाटील यांच्या कारखान्याकडे 160 कोटीचे कर्ज, माजी मंत्री श्री. सुरेश वरपुडकर यांच्या कारखान्याकडे 140 कोटीची थकबाकी, माननीय श्री.खतगावकारांच्या कारखान्याला 90 कोटीचे कर्ज अशा प्रकारे 1200 कोटीचे कर्ज या भागात थकित आहे. केवळ तीन चार कारखाने सोडले तर माननीय सहकार राज्यमंत्री साहेब आपला कारखाना चालू आहे व इतर बरेच बंद आहेत. अशा परिस्थितीत ही चर्चा करुन रेकॉर्डवर आणून प्रत्यक्षात काय मिळणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. या भागात फक्त चारच कारखाने

....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

चालू आहेत. त्यात माननीय गोपीनाथ मुंडे, माननीय विलासराव देशमुख तसेच ठोंबरे यांचे कारखाने चालत आहेत. अशा प्रकारे शासनाच्या तिजोरीवर एक प्रकारचा दरोडा हे लोक टाकत आहेत, याची चौकशी झाली पाहिजे तरच शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळणार आहे. कितीही प्रक्रिया केल्या आणि नियोजन केले तरी शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळणार नाही. जोपर्यंत प्रत्यक्ष कृती होत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला काहीच मिळणार नाही. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडून आम्हाला काही तरी ठोस उपाययोजना तसेच ठोस पावले उचलून शासनाची भूमिका विशद करावी तरच राज्यातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

---------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, "नेमेचि येतो मग पावसाळा" तशी शेतक-यांची व्यथा मांडण्याची आमची प्रथा निर्माण झालेली आहे. येथे शेतक-यांबद्दल बोललो नाही तर शेतक-यांना वाईट वाटते, आणि बोललो तर हे निर्ढावलेले शासन बोलता तर बोला, उत्तर देतात आणि निघून जातात. हे चक्र असेच सतत सुरु आहे. शेतक-यांच्या व्यथा मांडता मांडता आमचे मित्र श्री. फुंडकर साहेब लक्सच्या साबणामध्ये अडकले. त्यांनी लक्सच्या कारखान्यापासून तर त्या मालकाला अकोल्याला जाण्यासाठी लागणारा सर्व विमानापर्यंतच्या खर्चाची माहिती दिली परंतु ते एक खर्च सांगण्याचे विसरले त्याची फक्त मी आठवण करुन देतो. टीव्ही वर ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चनची एक ॲड दाखवली जाते. लक्स साबण लावल्यानंतर ऐश्वर्या किती मुलायम लागते हे दाखवले जाते परंतु त्या जाहिरातीचा खर्च सांगण्यास ते विसरले. त्यामुळे शेतक-याला कसा न्याय मिळेल ?

सभापती महोदय, मला माझ्या चिंतन ग्रुपचे एसएमएस सतत दोन दोन मिनिटांनी येत असतात. आता माझ्याकडे तासाभरापूर्वी एक एसएमएस आलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की, "6 Vidharbha farmers have reportedly committed suicide in last 48 hours, details at Vidharbha Times blogspot.com" शेतक-यांच्या आत्महत्येचे एक किंवा दोन तरी एसएमएस मला येत असतात. केवळ चिंतन ग्रुपचेच एसएमएस येतात असे नाही तर इतर सुध्दा एसएमएस मला येत असतात. या चर्चेला उभे राहत असतांना 48 तासात 7 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आवडो की, न आवडो, पटो की, न पटो एक अशी पध्दत आहे की, काही झाले तरी आपल्याला सांत्वना ही द्यावीच लागत असते. या विषयाच्या खोलात जाण्यापूर्वी माझ्या हातात दोन पत्र आहेत. पहिले पत्र नागपूरच्या अधिवेशनात गाजले होते. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी7 डिसेंबर,2009 रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांना जे पत्र लिहिले होते ते पत्र माझ्या हातात आहे. त्यामध्ये त्यांनी असे लिहिले होते की, "यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती या जिल्हयांमध्ये शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करतात. विरोधी पक्षाकडून शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्ये वरुन सरकारला बदनामही केले जाते. यासंदर्भात अधिका-यांसमवेत चर्चा केल्यानंतर

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

असे आढळून आले की, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या हे आत्महत्येचे मुख्य कारण नाही तर इतर काही कारणे त्यामध्ये दिसून आली आहेत. अमरावती विभागामध्ये वर नमूद केलेल्या 5 जिल्हयांमध्ये महात्मागांधीच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या दारु बंदी असलेल्या वर्धा जिल्हयातील शेतक-यांना असलेले दारुचे व्यसन हे सुध्दा आत्महत्येचे महत्वाचे कारण आहे." सरकारची शेतक-यांच्याबद्दल काय भूमिका आहे ही बाब जेव्हा पुढे आली तेव्हा सरकारकडून आत्महत्याग्रस्त शेतक-यांना मदत मिळण्याची आपण काय अपेक्षा ठेवायची ? माझ्याकडे आत्महत्या करण्यापूर्वी एका शेतक-याच्या हस्तक्षरातील लिहिलेले पत्र आहे. हे पत्र मागील अधिवेशनात सुध्दा या सभागृहात वाचून दाखवले होते. आत्महत्या केलेला शेतकरी हा भागिरथ लढ्ढा नावाचा असून तो अमरावतीमधील शिकलेला शेतकरी होता. या शेतक-याने माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री तसेच तहसीलदार, पोलीस इन्स्पेक्टर, पोलीस पाटील यांना जे पत्र लिहिले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "एक कृषी पदवीधर शेतकरी, भागिरथ लढ्ढा तर्फे नम्र निवेदन. मी खालील कारणामुळे जलसमाधी घेत आहे.......

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते आता असे म्हणाले की, सन्माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिले. त्या पत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे दिलेली आहे. त्यातील एक कारण म्हणजे शेतकरी दारू पिऊन आत्महत्या करतात. सन्माननीय महसूल मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलेले आहे, त्यात काही संस्थांचे अहवाल हे संदर्भासहीत देऊन असे स्पष्ट केले आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येला अनेकविध कारणे आहेत. त्यापैकी हे एक कारण आहे. शेतकरी हे दारू पिऊन आत्महत्या करतात, असा संस्थांचा अहवाल आहे. ते माननीय महसूल मंत्र्यांचे मत नाही. अनेक संस्थांनी सर्वेक्षण केलेले आहे. त्या अहवालातील ते मत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, इथे आल्यानंतर कर्तव्य बजवावे लागते. ऋण हे फेडावे लागतात. मी माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. मी आता माननीय महसूल मंत्र्यांचे जे पत्र वाचले त्या पत्राची प्रत सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी पाठवून देतो. त्यातील प्रत्येक शब्द हा माझा नसून माननीय महसूल मंत्र्यांचा आहे. या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, "अमरावती विभागामध्ये वर नमूद केलेल्या 5 जिल्ह्यांमध्ये तसेच महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या व दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यामध्ये सुद्धा शेतकऱ्यांना असलेले दारूचे व्यसन हे सुद्धा आत्महत्ये मागचे तेवढेच मोठे कारण असल्याचे आढळून आले आहे." हे पत्रात नमूद केले आहे. त्यांनी असे का लिहिले आहे, याचा खुलासा सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात करावा. येथे टीकेचा भाग म्हणून आपण घेऊ नका. श्री.नारायण राणे ही व्यक्ती नाही. ते मंत्री आहेत. या राज्याचे महसूल मंत्री आहेत. राज्यकर्ते आहेत. एखादा मंत्री जेव्हा बोलतो तेव्हा ते सरकारचे धोरण असते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मनाला लावून घेऊ नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3Z 1

BGO/ SBT/ MMP/ जुन्नरे... 18:05

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, ह्या शेतकऱ्याने जे लिहिले आहे, ते फार गंभीर आहे. हा गमतीचा भाग नाही. एक कृषि पदवीधर भागिरथ लढ्ढा तर्फे नम्र निवेदन. मी खालील कारणांमुळे देहत्याग करीत आहे, जलसमाधी घेत आहे. याची सर्व जबाबदारी आपली आहे. माझी संत्रा झाडे वाळली. त्यामुळे माझी आर्थिक परिस्थिती ढासळली. दुसरे पीक घेतले मका, ज्वारी. रानटी डुक्करांचा फारच त्रास होत असल्यामुळे त्याचे देखील नुकसान झाले. डुक्करांचा बंदोबस्त करावा ही नम्र विनंती. वीज बिल शेतकऱ्यांना शेतीकरिता व घरी सुद्धा कमी आकारावे. पुढे त्याने मी मेल्यानंतर काय करावे यासंबंधी सूचना केल्या आहेत. वीज बिल भरण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये नाही. कापसाचे 3 टक्के रूपये द्यावे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर लावलेले सर्व केसेस मागे घ्याव्यात. मी माझ्या शेतीचा कापूस बाहेर भाव असल्यामुळे विक्री करिता नेला होता. माझ्यावर अजून पर्यंत केस चालू आहे. तरी त्या केसेस मागे घ्याव्यात. माझ्या वाळलेल्या संत्रा झाडांची नुकसान भरपाई माझ्या कुटुंबियांना द्यावी. मी शेतकऱ्यांच्या परिस्थितीमुळे देहत्याग करीत आहे. माझ्या प्रेताचे पोस्ट मार्टेम करू नये. पंचनामा करू नये. कुटुंबाना त्रास देऊ नये. अग्निसंस्कार वगैरे पुढे त्याने लिहिले आहे. एक शिक्षित शेतकरी स्वहस्ताक्षरात चिठ्ठी लिहून आत्महत्या करतो. माणूस हा संवेदनाशील असतो. जनतेने शासनाच्या सर्व चुका पोटात घालून पुन्हा निवडून दिले आहे. जनता सरकारची जाणीव ठेवत असल्यामुळे आपण शासन म्हणून जनतेची जाणीव ठेवणार आहे की नाही ? हा या पत्राचा आशय आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या का करतात ? शेतक-याच्या आत्महत्येसबंधी माझ्याकडे एक ताजे उदाहरण आहे.श्री.बाबाराव पाटील - राऊत हे शिवसेनेचे तालुका प्रमुख असून त्यांनी मला 9 एप्रिल 2010 रोजी एक पत्र पाठवले आहे. एका अपघातामुळे नागपूरला ते मृत्यूशी झ ुंज देत आहेत याचे मला वाईट वाटते. त्यांनी जिल्हाधिका-यांना आणि तहसीलदारांना निवेदन दिले होते. त्या निवेदनात त्यांनी असे म्हटले की , अकोला तालुक्यात 13 हजार 435 शेतक-यांनी हवामान आधारित पीक विमा योजना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेमार्फत तयार केली आहे. विमा कंपनी नियमाप्रमाणे शेंतक-यांना नुकसानभरपाई देण्यास तयार आहे.अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने सादर केलेले क्लेम्स विमा कंपनीने मंजूर केले मात्र प्रिमीयम पोटी महाराष्ट्र शासनाकडून भरणा करण्यात येणा-या रकमेचा भरणा केल्याशिवाय पैसे मिळणार नाहीत असे त्यांनी सांगितले आहे.आतापर्यत राज्य शासनाने 13 हजार 435 शेतक-यांच्या विम्याची रक्कम भरली नाही त्यामुळे त्यांना विम्याची पैसे मिळत नाही. राज्य शासनाच्या हलगर्जीपणामुळे हे शेतकरी आत्महत्या करीत असतात.शेतक-यांच्या सहया सहित आणि शेतक-यांनी भरलेल्या विम्याच्या रक्कमांचा आणि शासनाने न भरलेल्या विम्याच्या रक्कमेचा आकडासुध्दा त्यांनी सागितलेला आहे. माननीय मंत्री महोदय आपण सरकार चालवत आहात तेव्हा शेतक-यांची आपल्याला जाणीव आहे ना? शेतक-यांच्या आत्महत्यामुळे जगात सगळीकडे अधं:पात निर्माण झाला आहे. अजूनही अधिकारी जर जबाबदारीने वागत नसतील तर सरकार कशासाठी चालवत

आहात ? अधिका-यावर जर आपला वचक नसेल तर सरकार का चालवत आहात ? सन्माननीय महसूल राज्यमंत्री श्री.प्रकाश सोळंके यांना मी मी विचारु इच्छितो की, सहकार खाते देखील आपल्याकडेच आहे तेव्हा आज मी जी काही भूमिका मांडलेली आहे त्याबाबतीत आपण

अधिका-यांना विचारणार आहात की नाही ? मी जो मुद्दा मांडलेला आहे तो अधिकृत असून अधिका-यांना त्यासंबंधीची माहिती शोधून काढण्यास आपण आताच सांगावे आणि उत्तराच्या भाषणात आपण त्यासबंधीचा खुलासा करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. मी आता जो मुद्दा मांडला त्या मुद्याबाबत संबंधित अधिका-याविरुध्द तुम्ही कारवाई करणार आहात किंवा नाही ? या शेतक-यापैकी एका शेतक-याने जर आत्महत्या केली तर त्याचा मृतदेह मी मुंबईला तुमच्या दारापर्यत घेऊन येईन. शेतक-याच्या आत्महत्येसबंधी आता तुम्हाला जबाबदारी घ्यावीच लागेल.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

सभापती महोदय, काल ई.टी.व्ही. वर अकोला जिल्हयातील . अकोला, बार्शीटाकळी, अकोट, तेल्हारा, बाळापूर, मूर्तिजापूर, पातूर या तालुक्याशी सबंधित एक बातमी सांगण्यात आली होती. शेतकरी आत्महत्या करतात म्हणून पॅकेज अंतर्गत .शेतक-याच्या विहिरीसाठी 72 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. पहिल्या फेजमधील 5 हजार 773 आणि दुस-या फेजमधील अतिरिक्त 1 हजार 502 विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. पहिल्या फेजमधील 5 हजार 773 विहिरींच्या लाभधारकांची यादी तयार आहे परंतु नंतरच्या विहिरीच्या लाभधारकांची यादी तयार करण्यात आलेली नाही. दुस-या टप्यातील विहिरींचे पैसे अजूनही आलेले नाहीत. पहिल्या टप्यातील विहिरींचा एकच हप्ता दिला गेला होता . 7 कोटी 51 लाख रुपये वाटण्यात आल्याचा अधिकृत अहवाल माझ्याकडे आहे.बाकीचे पैसे अजून का आलेले नाहीत आणि ते पैसे का वाटण्यात आलेले नाहीत ? या संदर्भात आपण अधिका-यांना विचारणा करणार आहात किंवा नाही ?

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. मोजमाप पुस्तिका जिल्हाधिका-यांनी कमी पाठविल्यामुळे विहिरींचे मोजमाप झालेले नाही त्यामुळे पैसे देता आले नाही .तेव्हा हे पाप शेतक-यांचे आहे काय ? ही प्रशासकीय बाब आहे. मी आता भाषण करण्यास उभा असेपर्यत देखील मोजमाप पुस्तिका गेलेल्या नाहीत. या संदर्भात कालच्या ई. टी.व्ही.वर बातमी सांगण्यात आली होती म्हणून मी कालच तातडीने कृषी सभापतींना फोन केला व त्यांच्याशी बोललो होतो. शेतक-यांना मारण्याचा निर्धार शासनाने केला आहे काय ? विहिरीसाठी पैसे लागतात परंतु पैसे न मिळाल्यामुळे शेतकरी कर्ज काढतात ....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तुम्ही आम्हाला सांगा. या परिस्थितीमध्ये काय करायचे?शेतकऱ्यांनी कोणत्या पध्दतीने जगायचे? माननीय विरोधी पक्षनेत्यांनी खताचा विषय याठिकाणी मांडला. मी अडीच तासाची चर्चा या विषयावर ठेवली होती. दिल्लीपासून नेपाळपर्यंत आणि पाकिस्तानमध्ये जाणाऱ्या खताचा याठिकाणी आढावा घेतला होता. काल मी याठिकाणी खते आणि फवारणीची औषधे बोगस मिळतात या संदर्भात माननीय मंत्र्यांना एक प्रश्न विचारला होता. गेल्या पाच-दहा वर्षामध्ये खतांच्या बनवा बनवीमध्ये, फवारणीच्या औषधाच्या बनवा बनवीमध्ये किती जणांवर गुन्हे दाखल केले आणि कुणाला तुरुंगामध्ये पाठविले? हे तुम्ही आम्हाला सांगा. दुर्दैवाची गोष्ट अशी की, आतापर्यंत एकालाही तुरुंगामध्ये पाठविले नाही. कुणाला तरी जुजबी अटक होते, नंतर तो जामिनावर सुटतो. मी सारखा मागे लागलो आहे की, आपण अशी व्यवस्था बनविली आहे की, महाराष्ट्राच्या प्रयोगशाळेने ते नापास केले व केंद्र सरकारच्या प्रयोगशाळेने ते पास केले तर तो गुन्हयातून सुटतो. केंद्र सरकारच्या प्रयोगशाळेने नापास केले आणि महाराष्ट्राच्या प्रयोगशाळेने पास केले तर तो गुन्हयातून सुटतो. मी काय बोलतो त्याबद्दल या शेतकऱ्यांना अजिबात नवल वाटत नाही. त्यांना हे सर्व माहीत आहे.

सभापती महोदय, साताऱ्याच्या कृषी अधिकाऱ्यांचा अहवाल माझ्या हातामध्ये आहे. रासायनिक खतांबाबत श्री. विलास काटकर, शिवसेना विभागप्रमुख यांचे पत्र आहे. मी आपल्याला मघाशी तालुका प्रमुखांचे पत्र दाखविले. कृषी विकास अधिकारी यांनी श्री. चंदूलाल शहा, वढाव, यांना पत्र लिहिले आहे.त्यामध्ये म्हटले आहे की, "उपरोक्त संदर्भीय पत्रामध्ये श्री. विलास काटकर, विभाग प्रमुख , कुक्कुडवाडा यांनी आपल्या विक्री केंद्रातून सुफला 15/15/2 गोणींची मागणी केली होती, तुम्ही त्यांना सुफला शिल्लक नाही, दुसऱ्या तालुक्यातील शेतकऱ्यांना देता येत नाही, त्याऐवजी 18/18/10 खत चांगले आहे, ते घेऊन जा असे सांगितले. तसेच त्यांनी वारंवार विनंती करुन सुध्दा सुफला दिला नसल्याने खत शिल्लक असतांना सुध्दा न देणे व नको ते खत गळयात मारणे असा प्रकार घडत असल्याची कार्यालयात तक्रार आली आहे. त्या तक्रारीनुसार दि.6.10.2009 रोजी सकाळी 10 वाजता या कार्यालयात आपले म्हणणे मांडा." असा खुलासा करण्याकरिता कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी हे पत्र श्री. शांतीलाल चंदूलाल शहा या खत विक्रेत्यास दिले. सभापती महोदय, या पत्रासोबत त्यांचा अर्ज, खत खरेदी केल्याची पावती आणि खत बोगस असल्याचे सिध्द झाल्याचे कंपनीचे टेस्टिंग रिपोर्ट ही सर्व

श्री. दिवाकर रावते...

कागदपत्रे मी मंत्रिमहोदयांकडे पाठवितो. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते आपल्या भाषणामध्ये शेतकऱ्यांची कशी बनवा बनवी होत आहे असे सांगत होते. मी तर आपल्यापुढे पुरावे घेऊन उभा आहे. टेस्टिंग रिपोर्टमध्ये कोणत्याही खत कारखान्याचे नाव नसते. दुसऱ्या "जे" फॉर्ममध्ये या कंपन्यांची नावे आहेत. वर्धमान फर्टीलायझर अँड सीड प्रायव्हेट लिमिटेड, 18/18/10, लिबर्टी पेस्टीसाईड्स कंपनी 18/18/10, लिबर्टी फॉस्फेट्स कंपनी अशी या कंपन्यांची नावे आहेत. त्या साताऱ्याच्या गोडाऊनवर शिवसेनेच्या एका तालुका प्रमुखाने छापा घातला. परंतु अजूनही त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तुमची शेतकऱ्यांशी बांधिलकी आहे काय? सभापती महोदय, मी आपणामार्फत मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, या संदर्भात आपण कोणती कारवाई करणार आहात? या अधिवेशनामध्ये नसेल तर पुढील अधिवेशनामध्ये माहिती पटलावर ठेवा. तुम्ही ही कारवाई केली नाहीतर तुम्हाला कारवाई करावयाची नाही असा त्याचा अर्थ होईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाबाबत आपल्याला विचारणार आहेत. हा अहवाल या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. त्याची आपण उत्तरे न दिल्यामुळे मला याठिकाणी आपल्याला विचारणे भाग पडत आहे. याची उत्तरे या सभागृहामध्ये मिळाली पाहिजेत. आणि ही उत्तरे न देणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाईचा अहवाल आम्हाला मिळाला पाहिजे. थातूरमातूर उत्तरे दिली, चर्चा संपली, ढोल वाजले, आम्ही निघून गेलो कामाला लागलो आणि अधिकारी मजा करण्यास मोकळे झाले. याबाबत कुणावरच जबाबदारी नाही असे होता कामा नये. या सदनाची ती गरिमा आहे, या सदनाची ती जबाबदारी आहे. तुम्हाला झोडपण्याकरिता, तुमच्यावर टिका करण्यासाठी आम्ही इथे आलेलो नाही. ज्या अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे तुम्हाला मान खाली घालावयास लागत असेल तर त्या अधिकाऱ्यांवर आपण अंकुश ठेवा

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ 18:20

श्री.दिवाकर रावते . . . .

मागच्या वेळेला मी सांगितले होते की, आमच्या शेतकऱ्यांना बुडविणाऱ्या सगळया अधिकाऱ्यांच्या घरावर नांगर फिरवावा. पण कोणाच्याच घरावर नांगर फिरला नाही. महसूल व वन विभागाच्या मदत व पुनवर्सनाच्या संबंधातील संक्षिप्त आढाव्यामध्ये काय म्हटलेले आहे ते सांगतो. मी यातील सगळा भाग वाचणार नाही, कारण मला तेवढा वेळ नाही हे मला माहिती आहे. यामध्ये असे म्हटलेले आहे की, एकंदर 13.48 लाख शेतकरी तणावाखाली असल्याचे जाहीर केले गेले. जून 2006 मध्ये महसूल विभागातर्फे सर्व शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले, म्हणजे मघाशी तुम्ही संस्थान वगैरे बोललात,तर तसे नाही, हे वेगळे आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे 13.48 लाख शेतकरी तणावाखाली असल्याचे महसूल विभागाकडून जाहीर करण्यात आले. तथापि ही माहिती अन्य विभागांना पॅकेज कार्यान्वित करताना व लाभार्थी ठरविताना उपलब्ध करुन दिली नाही. ही माहिती का दिली नाही ? म्हणून मग नाईलाजाने माननीय महसूल मंत्री महोदयांना म्हणावे लागले की, शेतकरी दारु पिऊन मरत आहेत. तुमच्याच खात्याच्या अहवालामध्ये म्हटलेले आहे की, शेतकरी तणावाखाली आहेत. पण ते तसे कशामुळे आहेत ? सभापती महोदय, यामध्ये जी बनवाबनवी करण्यात आली आहे त्याचे वाईट वाटते. यामुळे पॅकेजच्या परिणामतेवर विपरित प्रभाव पडला आहे. भारत सरकारने घोषित केलेले पॅकेज 341 कोटी रुपयांनी फुगवून सांगण्यात आले. ही कमाल आहे. याबाबतीत कोणी फुगवून सांगितले ? ही बनवाबनवी का केली? बँकेच्या कजर्माफीच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी उल्लेख केला. बँकाना कर्ज माफीच्या मोबदल्यात पैसे देताना नव्याने कर्ज मंजूर करण्याकडे लक्ष दिले गेले नाही. या राज्यातील शेतकरी का मरत आहेत ? याची कारणे मी मघापासून मोजावयास सुरुवात केलेली आहे. शेतकरी दारु पिऊन मरतो की नाही ? मग तो का मरत आहे ? ते मी सांगतो. शेतकऱ्यांनी ज्या सावकाराकडून कर्ज घेतलेले आहे, त्यांनी स्वत:ला कर्ज मुक्त समजावे असे शासनाने जाहीर केले होते. मात्र ते प्रत्यक्षात येऊ शकले नाही आणि माननीय उच्च न्यायालयाच्या निणर्यानंतर शेतकऱ्याला तो लाभ मिळू शकला नाही. आजही खाजगी सावकारीचा आग्याडोंब त्याच्या मागे लागलेलाच आहे.जाणीवा नसलेले आणि उणीवा असल्याने काही करावयाचेच नाही यासाठी राबणारे शासकीय अधिकारी यांनी सुसाध्य नसलेल्या प्रकल्पांचे प्रस्ताव जाहीर केले म्हणजेच जे प्रस्ताव योग्य नाहीत असे प्रस्ताव सादर केले. सभापती महोदय, ही ऑडीट नोट आहे, हे माझे म्हणणे ...

. . . .4 सी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नाही. एकतर हे प्रस्ताव मार्गी लावावे लागतील. हजीर तो वजीर, शेतकऱ्यांच्या तणावाची तीव्रता जाणून घेण्याकरता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता प्रतिबंधक योजना तयार करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक या चमूने घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाच्या आधारावर 3.34 लाख शेतकऱ्यांचे वर्गीकरण करताना, त्याच्यावर असलेले कर्ज, शेती करण्यासाठी त्याला आवश्यक ती साधनसामुग्री इ.आधारे सर्वाधिक तणावग्रस्त असलेले शेतकरी असे वर्गीकरण करण्यात आले, तथापि अशा शेतकऱ्यांची यादी कृषी, पशुधन, दुग्धविकास इ.विभागांनी मागविली, पण त्यांना देण्यात आली नाही. यामध्ये कार्यान्वय साधाणाऱ्या यंत्रणेने लाभार्थीकडून मागविलेल्या अर्जाच्या आधारावर फक्त त्यांची निवड करण्यात आली ही तुमची सर्व प्रशासनाची शेतकऱ्यांबद्दलची आस्था आहे काय ? सभापती महोदय, हे सर्व पाहिल्यानंतर काय करावे असा प्रश्न पडतो. याठिकाणी सन्माननीय श्री.भाई जगतापसाहेब येथे उपस्थित नाही. आज या सदनामध्ये ते हजर असावयास हवे होते. आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.भाई जगतापसाहेब यांना काहीही माहिती नसताना, ते येथे शासनाची तारीफ अशी काही करतात की, मी त्यांना थांबवित असतो,पण ते ऐकतच नाहीत. ठीक आहे. बोलणाऱ्याचे तोंड कसे धरणार ? ते सतत सांगत असतात की,आम्ही पॅकेज दिले, आम्ही अमुक केले वगैरे.ते सरकार म्हणूनच बोलत असतात, मंत्री म्हणूनच बोलत असतात.मी त्यांना सांगतो की,तुम्ही सन्माननीय सदस्य आहात.केंद्र शासनाच्या पॅकेजच्या संदर्भात सांगावयाचे तर बँकांनी थकीत कर्जावर लावलेल्या दंडनीय व्याजाची रक्कम कर्ज माफ करताना विचारात घेतली जाणार नाही. याबाबत महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकार यांनी याच्यामधील परस्पर विसंगती दूर सारुन एकसारखा दृष्टीकोन बाळगावयास हवा होता, तो बाळगला गेला नाही. त्यामुळे आता माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांनी बँकांच्या बाबतीत काही उणीवा मांडल्या आहेत. त्या यामुळे पुढे आल्या आहेत.

सभापती महोदय,सहा जिल्ह्यांमध्ये वाहनांची खरेदी करण्याबाबत सांगण्यात आले होते. परंतु त्यापैकी एकाही जिल्ह्यामध्ये वाहनांची खरेदी करण्यात आली नाही. वैरण, दुय्यम उत्पादक साधने, खाद्य वैरण, विकास वैरण यासाठी संचालनालयाला 6.12 कोटी प्राप्त झाले.पण ते अखर्चित राहिले.म्हणजे तुमच्यामध्ये किती जाणीवा आहेत ? ते पहा. हा निधी खर्च करण्यासाठी दिला होता, पण तो अखर्चित राहिला. तसेच महाराष्ट्र शासनाने त्यांच्या पॅकेजमधून कृषी व संलग्न

. . . .4 सी-3



APR/ MMP/ SBT/ 18:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

उद्योग असलेल्या घटकांमार्फत जनावरांवर वैद्यकीय उपचार करण्याकरता प्रत्येक जिल्ह्यामध्ये दोन फिरती रुग्णालये स्थापन करण्याबाबत आणि दोन वाहने खरेदी करण्याबाबत निर्देश दिले. परंतु एकही वाहन खरेदी करण्यात आले नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पैसे परत गेले याला कोण जबाबदार? याबाबतची जबाबदारी फिक्स करणार की नाही याचे उत्तर आम्हाला पाहिजे. आम्ही दरवेळेला या सभागृहात उभे राहून शेतकऱ्याच्या बाबतीत बोलायचे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी ते ऐकून निघून जायचे. माननीय मंत्रिमहोदयांचे मला काही कळत नाही. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन....ज्या मिशनला वसंतरावांचे नाव दिलेले आहे त्याची तरी काही लाज, लज्जा, इज्जत बाळगायला पाहिजे की नको?

सभापती महोदय, महाराष्ट्र नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दि.31 मार्च, 2007 च्या अहवालात पृष्ठ 9 वर असे म्हटले आहे की, "पॅकेजमध्ये समाविष्ट केलेले सात घटक हे सहा आत्महत्याप्रवण जिल्हया व्यतिरिक्त अन्य जिल्हयांना उपलब्ध नाहीत." जाहीर केलेल्या पॅकेजची रक्कम 339 कोटी रुपयाने फुगवून सांगण्यात आली, याबाबत मी थोडयावेळापूर्वी बोललो आहे. "आधारभूत सामुग्रीचा पॅकेजच्या कार्यान्वयनात वापर केला गेला नाही. खर्चाच्या सुयोग्य वर्गीकरणा अभावी कळविलेल्या खर्चाचे आकडे संशयास्पद होते. वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशन ही देखरेख करणारी यंत्रणा, त्यांनी स्वत: संकलित केलेल्या खर्चाच्या आकडयांचा कार्यान्वयन करणाऱ्या विभागांनी कळविलेल्या आकडयांशी ताळमेळ घालण्यात अपयशी ठरली." सरकारने ते मानले नाही जुमानले नाही. सभापती महोदय, कर्ज माफीचा बोजवारा या शासनाने उठविलेला आहे. ईआरएच्या सर्वेक्षणात निदर्शनास आणले की, 75 टक्के शेतकऱ्यांना व्याज माफी योजनेची माहिती नव्हती. 44 टक्के शेतकऱ्यांनी सांगितले की, जुने कर्ज परत करण्यास त्यांना बँकांनी आग्रह केला, ही माफी का? 8 टक्के शेतकरी म्हणाले की, बँकांनी कर्जाच्या प्रकरणाची तपासणी करण्याकरिता प्रक्रिया शुल्काची मागणी केली. बँकांनी पैसे मागितले व 67 टक्के शेतकरी म्हणाले की, बँकांनी कर्जा करिता ताराणाची मागणी केली. कर्जमाफी केली, कर्जमाफी केली असे या ठिकाणी ओरडून सांगण्यात येत होते. त्यांना मला सांगावयाचे होते की, आम्ही विदर्भातील व मराठवाडयातील ग्रामीण भागात फिरतो. तेथे काय अवस्था झालेली आहे याचे उत्तर आम्हाला पाहिजे. सभापती महोदय, मी अमरावतीला सावकारांच्या विरोधात आंदोलन केले होते. बाळासाहेब काळमेध आमचा एक कार्यकर्ता तेथे उपोषणाला बसला होता. त्याबाबतचा उल्लेख अहवालात आला आहे त्याबद्दल मला अभिमान आहे. अकोल्यातील उपोषणाच्या वेळी सन्माननीय विरोधी पक्ष नेते

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि मी तेथे होतो. अकोला व अमरावती जिल्हयामध्ये 46 शेतकऱ्यांच्या रुपये 32.96 लाखाच्या जमिनीच्या 43 प्रकरणात, स.नि.स.सं. यांनी निर्णय दिला की, कर्जासाठी नोंदणी केलेले विक्रीपत्र हे अवैध सावकारीची बाब आहे व अशा शेतकऱ्यांना त्यांनी कर्जमुक्त घोषित केले.सभापती महोदय, त्यावेळचे पालक मंत्री श्री. देशमुख यांनी आम्हाला पूर्ण सहकार्य केले ते स्वत: अमरावतीला आले होते. त्यांनी या शेतकऱ्यांची सुटका करण्याकरिता आदेश दिले. त्याबाबत ऑडिटमध्ये गौरवपूर्ण एकच बाब आली आहे. सभापती महोदय, हे आंदोलन आमच्या कार्यकर्त्यांचे होते. श्री. देशमुख साहेबांनी पालक मंत्री या नात्याने मदत केली होती. सभापती महोदय, लग्न बोगस लावलेली आहेत. सर्वांना माहीत आहे की, सोन्याचे दागिने म्हणून पितळेचे दागिने दिले गेले. वाईट एवढेच वाटते की, त्या संस्थेचा एकही पदाधिकारी तुरुंगात गेला नाही. या सगळया संस्था सत्ताधारी पक्षाच्या होत्या काय? हे शासनाचे कोण लागत होते? हे शासनाचे पदाधिकारी होते काय? लग्नासाठी शासनाचे 4 कोटी 43 लाख रुपये वाटण्यात आलेले आहेत. याबाबतीत महालेखापरीक्षकांनी लिहिले आहे की, यातील बहुतांश लग्न ही बोगस होती. अवैध होती. ज्यांचे लग्न झाले होते ते ही कार्यकर्ते आपल्या बायकोला घेऊन आले आणि त्यांनी आपले लग्न लावले व दहा हजार रुपये घेऊन गेले. सभापती महोदय, आपण जेव्हा तळमळीने काम करतो तेव्हा तो कार्यकर्ता विरोधी पक्षाचा असो की, सत्ताधारी पक्षाचा असो चार जणांना तुरुंगात टाकले तर पुढच्यावेळी दहाजण दहावेळा विचार करतील. परंतु यातील एकाही कार्यकर्त्यांवर कारवाई झालेली नाही.

सभापती महोदय, शासनाने रुपये 100 कोटीची विदर्भ पाणलोट मिशनसाठी तरतूद करुन फेब्रुवारी व सप्टेंबर,2006 मध्ये त्यासंबंधीची मार्गदर्शक सूची प्रसृत केली मात्र मार्च 2006 ते फेब्रुवारी,2007 या दरम्यान शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या 97 कोटी रुपयापैकी मार्च 2007 पर्यंत फक्त 17.4 कोटी रुपये खर्च झाले. बाकीचे पैसे खर्च केलेच नाहीत. ते पैसे वळते झाले. शेतकऱ्यांच्या सिंचनाबद्दलची शासनाची ही बांधिलकी आहे काय? सभापती महोदय हा संपूर्ण अहवाल या ठिकाणी वाचण्यासाठी मी आणलेला नाही. पण त्यातील काही मुद्दे मी याठिकाणी वाचले आहेत. विदर्भातील आत्महत्या हा विषय आता गंभीर झालेला आहे. आम्ही इंग्रजी वर्तमानपत्र वाचतो काय? असे याठिकाणी आम्हाला खडसावून विचारण्यात आले होते.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

होय, भाईंनी विचारलेला प्रश्न टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात आलेल्या बातमीवरुन पध्दतशीर निर्माण केलेला प्रश्न होता. सभापती महोदय, मी परवा नागपूरवरुन येत असताना 'आफ्टरनून' पेपर वाचला. 'आफ्टरनून' आणि 'मिड डे' ही मुंबईतील संध्याकाळची वर्तमानपत्रे आहेत. यामध्ये जाहिराती आणि इतर गोष्टी जास्त येतात. यामध्ये कधी ग्रामीण भागातील अशा बातम्या येत नाहीत. मी सहज बघितले. 'लायर्स ऑर गनस्लिजर्स' तसेच 'ॲबंडंड' या शीर्षकाखालील बातम्या वाचल्यानंतर पहिल्यांदाच मला 'आफ्टरनून' सारख्या संध्याकाळच्या एका छोट्या वर्तमानपत्रामध्ये अग्रलेख वाचावयास मिळाला. त्यामध्ये 'विदर्भ सुसाईड' या शीर्षकाखाली अग्रलेख लिहिलेला आहे. या वर्तमानपत्राचे जे कोणी संपादक असतील त्यांना टाईम्स ऑफ इंडियामधून किंवा अनेक ठिकाणी जी माहिती मिळाली त्यावरुन त्यांनी जो अग्रलेख लिहिला तो शासनाची कानउघाडणी करणारा आहे. कोठे आहेत सावकारी कायदे ? आता उद्या परवा सावकारीच्या संदर्भातील बिल येणार आहे. ते बिल शेवटी का आणत आहात. ते बिल सुरुवातीला आणावयास पाहिजे होते. पहिल्या आठवड्यात बिल आणावयास पाहिजे होते. त्यावर आम्ही सविस्तर चर्चा केली असती. आता उद्या घाई करणार. मला संशय आला. आम्हाला दोन्ही बिले पास करुन द्या असे सांगणार. परंतु माझे लक्ष होते. सभापती महोदय, या 'आफ्टरनून' वर्तमानपत्रामध्ये आलेला लेख मला कौतुकाचा वाटतो. त्यांनी या अग्रलेखात असे लिहिले आहे की, "It seems to have started again. There has been a spate of suicides by farmers in Vidharbha. In just 12 days, as many as 25 farmers have committed suicide even as the state continued to pat its own back for its rehabilitation..." हे तुमच्याबद्दल लिहिले आहे. स्वत:चीच पाठ थोपटून कौतुक करीत आहेत. त्यांनी पुढे असे लिहिले आहे की, "... performance in that part of the state. The truth is the government seems to have decided not to see existing actualities in Vidharbha." मी संपूर्ण अग्रलेख वाचणार नाही पण त्यांनी पुढे असे लिहिले

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आहे की, ".. the benefits earmarked for the farmers are being nibbled away down the line. The government has waived only loans farmers have taken from banks. But a huge number of farmers 5,74,000-have taken money from private moneylenders who keep collecting interest mercilessly". यामध्ये त्यांनी 'मर्सिलेस्ली' हा शब्द वापरलेला आहे. मी शेवटी एक ओळ वाचतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "The farmers have to sign for double or treble the loan amount they raise from money lenders." ज्यांनी कधी फार्मर शब्द लिहिला नसेल त्या मुंबईतील संध्याकाळच्या वर्तमानपत्राने तुमच्यावर अग्रलेख लिहिला.

सभापती महोदय, मी शेवटच्या काही अत्यंत महत्वाच्या गोष्टी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी काही गोष्टी मांडल्या. आपणही परवा काही गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला. शासनाचे क्रौर्य मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. शासनाने पहिल्यांदा आत्महत्येची गंभीर नोंदच घेतली नाही. 2001 साली नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार 1071 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्र सरकारने त्यातील फक्त 49 आत्महत्या ग्राह्य धरल्या. हे प्रमाण 4.10 टक्के होते. 2002 मध्येही तसेच घडले. क्राईम रिपोर्ट प्रमाणे 1067 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या पण शासनाने त्यातील फक्त 104 आत्महत्या ग्राह्य धरल्या. याचे प्रमाण 9.7 झाले. म्हणजे आत्महत्या ग्राह्य धरण्याचे प्रमाण दुप्पट झाले. 2003 मध्ये एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी 144 आत्महत्या ग्राह्य धरल्या. अशा पध्दतीने 2006 पर्यंत तशीच लागण राहिली आणि मग प्रचंड ओरडा झाल्यानंतर माझ्या दोन दिंड्या झाल्या, प्रचंड आंदोलने झाली, शेतकरी जागा झाला, प्रचंड मोर्चे निघावयास लागले, आंदोलने निर्माण झाली आणि मग शासन जागे झाले. मग 2006 नंतरचा आकडा आपल्यासमोर आला आहे. म्हणून परवा आपण म्हणाला की, मी 2006 नंतरचे बघतो. कारण आपल्याला माहीत आहे की, 2006 नंतर आपण जवळजवळ 50 टक्के आत्महत्या ग्राह्य घरल्यामुळे ज्यांचे पुन्हा सर्वेक्षण करावयाचे त्यांची संख्या अल्प आहे. उच्च न्यायालयाने सांगितले की, या आत्महत्यांचे सर्वेक्षण करा. त्यांनी हे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

सर्वेक्षण टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने करावे असे सांगितले. हे इतके हुशार. त्यांनी टाटा इन्स्टिट्यूटला सांगितले का ? मग केंद्र सरकारने इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसला नेमले. यामध्ये थोड्याशा गमती आहेत. 2007 साली 81 टक्के आत्महत्या म्हणजे 2 हजार आत्महत्या अपात्र ठरविल्या.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ प्रथम श्री.बरवड 18:35

श्री.दिवाकर रावते....

सर्वात महत्वाचे म्हणजे 2007 साली वाशिम जिल्हयात 176 आत्महत्या झाल्या होत्या, त्या सर्वच्या सर्व अपात्र ठरविण्यात आल्या. त्यामुळे शेतकरी संघटनेचे श्री.अहमदाबादकर तुम्हाला आणि आम्हाला भेटले होते, त्यांनी आंदोलन केले होते. त्यामुळे मी तेथे गेलो होतो. त्यांच्या आंदोलनामुळे दबाव निर्माण झाल्यावर त्या आत्महत्यांपैकी 25 आत्महत्या योग्य ठरविल्या. श्री.अहमदाबादकर यांनी 25 कुटुंबांना न्याय दिला. यापूर्वी पॅकेजची घोषणा झालेली आहे, म्हणजे या हाताने द्यायचे आणि त्या हाताने घ्यायचे. कर्जमाफीवर व पॅकेजवर बोलणारे सन्माननीय सदस्य आता सभागृहात उपस्थित पाहिजे होते. त्याठिकाणी नेमके काय घडते ते मला त्यांना सांगावयाचे होते. पॅकेजसंबंधी वर्तमानपत्रात छापून आल्यावर वाचावयाचे आणि सरकारची पाठ थोपटली जायची. ते तुमचे काम आहे. पण सत्यस्थिती काय आहे ? कापूस उत्पादक शेतक-यांसाठी पॅकेजची घोषणा केली आणि त्याच दिवशी कापूस उत्पादन करणा-या त्या 6 जिल्हयातील कापूस उत्पादक शेतक-यांचा बोनस रद्द करण्यात आला. म्हणजे एका हाताने दिले आणि दुस-या हाताने काढून घेतले. व्याज दर कमी करुन बोनस रद्द केला जातो. कर्जमाफीचा सर्वात फायदा सिंचन शेती असणा-यांना जास्त झाला आणि कोरडवाहू शेतक-यांना कमी झाला आहे. कर्जमाफीचा पैसा कोणकोणत्या शेतक-यांना कसा कसा गेला त्या विषयात मी जात नाही. परंतु शासनाच्या धोरणामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. 1991 ते 2001 या 10 वर्षातील जनगणनेच्या माहितीनुसार 80 लाख शेतक-यांनी शेती व्यवसाय सोडला आहे. आता जी जनगणना होणार आहे त्यातून भयानक अहवाल येणार आहे. मागील अहवालात 80 लाख शेतक-यांनी शेती पिकविण्याचे सोडले होते, यावेळी त्याच्या तिप्पट ही संख्या असण्याची भीती आहे. शासनाच्या धोरणामुळे शेती सोडून जाण्याची पाळी आली आहे हे आगामी अहवालात दिसून येईल असे मला वाटते. हे या शासनाच्या कृषी धोरणाचे परिणाम आहेत. शासन मगरीचे अश्रू किती काळ गाळत राहणार आहे ? दिनांक 15 ऑगस्ट, 2006 रोजी पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी लाल किल्ल्यावरुन शेतक-यांच्या आत्महत्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. 2006 मध्ये दिल्लीमध्ये भरलेल्या दुसऱ्या राष्ट्रीय कृषी परिषदेमध्ये शेतक-यांची अवस्था बिकट आहे, शेतीविषयक व ग्रामीण विकासाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते....

दृष्टीकोनातून मुलभूत बदल करण्याची वेळ आली आहे असे माननीय पंतप्रधानांनी सांगितले. एकाच महिन्यानंतर ते बोलत होते. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयामध्ये शेतीच्या दुरवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली गेली. घसरत्या शेती विकास दराची काळजी केंद्राकडून तोंड भरुन व्यक्त करण्यात आली. आपण त्यांचे कौतुक केले की, आपल्या शेतक-यांची दु:खे केंद्र सरकारला कळली आहेत. 2010-11 या वर्षाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण विकासाची धोरणात्मक आखणी करण्याची गरज असल्याचे नमूद केले आहे, मात्र या अर्थसंकल्पात दिलासा दिला गेला नाही, 4 टक्के अर्थसंकल्पीय तरतूद कृषी क्षेत्रासाठी ठेवली आहे. म्हणून मी म्हटले आहे की, हे सर्व मगरीचे अश्रू होते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी माझ्यावतीने सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगावे. "अभ्यासे प्रकट व्हावे ना तरी झाकोनी असावे, प्रकट होऊनी नासावे हे बरे नव्हे," असे रामदास स्वामींनी सांगितले आहे. त्यावेळी ते केंद्र सरकारने महाराष्ट्रातील शेतक-यांची 72 हजार कोटींची कर्जमाफी केली असे छाती ठोकून सांगत होते. आम्ही बोलत होतो की, थांबा, थांबा, 72 हजार कोटींचे कर्ज माफ केलेले नाही. त्यातील 5-7 हजार कोटी रुपये आपल्याकडे आले आहेत. पण ते थांबण्याच्या मनस्थितीत नव्हते. पण ते या सभागृहात आल्यापासून मीच सरकार आहे अशाप्रकारे बोलत असतात. मी त्यांना रेकॉर्डवर सांगत आहे. शेतक-यांची विवंचना किती भयानक व भीषण आहे हे त्यांना माहीत नाही. देशातील 4 कोटी 29 लाख शेतक-यांना 76 हजार कोटींची कर्जमाफी मिळाली. त्याचा भागाकार केला तर प्रत्येक शेतकरी कुटुंबाला 15 हजार रुपये सरासरी कर्जमाफी मिळाली. त्याचवेळी 50 लाख केंद्रीय कर्मचा-यांना 22 हजार कोटींची वेतनवाढ देण्यात आली. प्रत्येक कर्मचा-यामागे वर्षाला 46 हजार रुपयांची वेतनवाढ मिळाली. शेतक-यांना एकदा 15 हजार रुपये दिले, पुढचे तुझे तू कर्म फोडून घे. पण त्या कर्मचा-यांना 45 हजार रुपये वेतनवाढ कायम स्वरुपी मिळणार आहे. ही आमच्या शेतक-यांची दुर्दशा आहे. शेतक-यांच्या संदर्भात अहवाल लिहिणारे येतात, अहवाल लिहितात. शेतकऱ्यांच्या संदर्भात स्वामीनाथन समितीचा अहवाल आल्यावर त्याच्यावर खूप चर्चा झाली.

यानंतर श्री.शिगम.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

(श्री. दिवाकर रावते...

स्वामीनाथन खासदार झाले. म्हणजे अहवाल लिहिणारे स्वामीनाथन खासदार झाले. डॉ.नरेन्द्र जाधव यांना शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात अभ्यास करुन अहवाल लिहिण्यास सागितले. ते शिवसेना भवनात आले. सर्वांना भेटले, शेतक-यांना भेटले. मला अपेक्षा होती की, डॉ. नरेंद्र जाधव हे या सरकारवर आसूड ओढल्या शिवाय राहाणार नाहीत. त्यांनी अहवाल लिहिला, सरकारने तो वाचला. पण अमलात मात्र आणला नाही. मग ते नियोजन आयोगाचे सदस्य झाले. म्हणजे अहवाल लिहितात ते दिल्लीला जातात. शेतकरी मात्र येथे मरत रहातात.

सभापती महोदय, आता रोज रोज तेच तेच या सरकारला काय सांगायचे ? आत्महत्या केलेल्या शेतक-यांना कसे अपात्र ठरविण्यात आले हे या ठिकाणी सांगण्यात आले. 2006 पूर्वी फक्त 10 टक्के लोकांच्या आत्महत्या मानल्यात आणि 90 टक्के लोकांच्या नाकारल्यात. ही संख्या खूप मोठी आहे. माझी टाहो फोडून या सरकारला विनंती आहे, मेला तो गेला बिचारा, पण त्याचे कुटुंब उघडयावर पडले. त्या कुटुंबाना फक्त एक एक लाख रुपये द्यायचे आहेत. ते देण्यासाठी किती रुपये लागतील ? 20 - 25 कोटी रुपये लागतील. आता आयपीएलचा करार करताना जीव खालीवर होतोय.. ते कुटुंब पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहे. लहान लहान 5 मुले त्या बाईच्या पदारात आहेत. मी त्या विधवा महिलेला भेटलो. मी सांगतो की, त्या शेतक-याची आत्महत्त्या ही शंभर टक्के कर्जबाजारीपणामुळे झालेली आहे. पण तहसीलदाराने विधवा पत्नीला विचारले की, नवरा दारु पित होता काय ? त्यावेळी तिने सांगितले की ते कधी तरी घेत होते. मग तहसीलदाराने "दारु पित होता" असा रिपोर्ट लिहिला. ती बाई रडत रडत मला सांगत होती की माझा नवरा खरच कर्जबाजारीपणामुळे मेला. मला 1 लाख रुपये नको. पण माझ्या नव-याला दारुडा म्हणून म्हटल्याचे दुःख आहे. किती निर्दय आणि वाईट काम हे शासन करीत आहे ? एकदा त्या शेतक-याच्या घरी जाऊन या. या ठिकाणी 7/12ची, वहिवाटीची परिस्थिती सांगायला पाहिजे होती. आत्महत्या करणा-या शेतकरी कुटुंबातील पत्येक शेतक-याला शेतकरी म्हणून मदत द्यावी. बीपीएलमध्ये त्याची नोंद नाही. त्याला बीपीएल कार्ड दिले तर निदान स्वस्तात धान्य घेऊन पोट तरी भरील. शेतक-यांच्या विधवांना अंत्योदय योजना, निराधार योजना लागू करा. या विधवांना अंगणवाडी सेविका म्हणून घेण्यासंबंधी शासनाने जी.आर.काढला. परंतु त्या जी.आर.ची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

(श्री. दिवाकर रावते....

अंमलबजावणी केली नाही. मी अकोल्याला गेलो. तेथील तडफदार आय.ए.एस. महिला अधिकारी श्रीमती जोशी यांनी त्या जी.आर.ची अंमलबजावणी केल्याचे दिसून आले. त्या महिला अधिका-यांना महिलेचे अश्रू दिसले. त्यांनी 50 विधवांना अंगणवाडी सेविका म्हणून सेवेत घेतले. सभापती महोदय, शासनाने 2007मध्ये जी.आर.काढलेला असताना त्या जी.आर.ची अंमलबजावणी इतर जिल्ह्यामध्ये का झाली नाही ? शासनाच्या आदेशांची ज्यांनी पायमल्ली केली त्यांना शासनाने जाब विचारला पाहिजे. शासनाने आदेश काढल्यानंतर शेतक-यांच्या विधवांना अंगणवाडी सेविका म्हणून का घेतले नाही ? अकोल्याच्या सीईओ श्रीमती जोशी यांनी खूप चांगले काम केले. विधवांना त्यांनी अन्नाला लावले. या कामाबद्दल मी त्यांना स्वत: भेटलो आणि त्यांचे अभिनंदन केले. इतर जिल्ह्यामध्ये जी.आर.ची अंमलबजावणी का केली गेली नाही ? मग ज्या अधिका-यांनी जी.आर.ची अंमलबजावणी केली नाही त्यांना शोकॉज नोटीस द्या, नाही तर त्यांच्या सर्व्हिस बुकामध्ये तशी नोंद करा. पण हे सरकार काहीच करायला मागत नाही. सरकार सोकावलेले आहे. 6 जिल्ह्यामध्ये देण्यात आलेल्या पॅकेजच्या संदर्भात विधामंडळाच्या लोकलेखा समितीने अहवालामध्ये श्वेतपत्रिका जाहीर करावी असे म्हटलेले आहे. लोकलेखा समितीला त्यासंदर्भात काही उत्तर गेलेले नाही.

सिंचनाच्या सर्व कामांची सीबीआय चौकशी करा. पॅकेजमधून बांधलेले कोट्यवधी रुपयांचे बंधारे उद्ध्वस्त झालेले आहेत. पॅकेजचे पैसे दिले, बंधारे बांधले पण शेतक-यांना पाणी मिळाले नाही. सिंचन तसेच राहिले, पॅकेज पूर्ण झाल्याचे समाधान मिळाले. पण पाणी कोठे आहे ? सिंचन कोठे आहे ? म्हणून याबाबतीत सीबीआयची नाही, निदान सीआयडीची तरी चौकशी करा. 7252 कोटीच्या पॅकेजचे विवरणपत्र विधानसभेला द्यावे ..........

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 18:45

श्री.दिवाकर रावते.....

एवढी आपल्याकडे मागणी करतो आणि पुन्हा मानवी हृदयाने, संवेदनशीलतेने मरणाऱ्या शेतकऱ्यांकडे पहावे अशा प्रकारची विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो आणि मंत्रीमहोदयांनी मला काल डिवचले म्हणून त्यांना सांगायचे आहे. भाववाढीचा विषय होता. कापसाचा विषय नव्हता. अमुक तमुक बोलले. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, तुम्हाला आंदोलन करायला मिळत नाही म्हणून तुम्ही असे म्हणता. आता एवढेच सांगतो की, यावेळी अमेरिका आणि चीनमध्ये कापसाचे उत्पादन घटले आहे. 80 टक्के उत्पादन घटले आहे म्हणून आपल्या कापसाला व्यापाऱ्यांनी 3000 रुपये भाव दिला. शासनाने भाव दिला नाही. उद्या हाच कापूस चीन आणि अमेरिकेमध्ये जाईल. त्यांच्याकडे प्रचंड सबसिडी आहे. तेव्हा या कापसाला मातीमोल भाव येईल, 2000 च्या खाली भाव जाईल तेव्हा आश्चर्य वाटायला नको. नंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतील. मला वाईट एवढेच वाटते की, ज्यावेळी कापसाला चांगला भाव असतो तेव्हा म्हणजे सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये शासनाने कापूस खरेदी करावयास पाहिजे. त्या काळात खरेदी न करता नोव्हेंबर महिन्यामध्ये खरेदी सुरु होते. अशा वेळी सगळा कापूस व्यापाऱ्यांच्या घशात घालावा लागतो. त्यातूनच शेतकरी कर्जबाजारी होतो. मी सांगणार आहे की, आंदोलने कशी करायची हे आम्हाला समजते. ज्वारीपासून दारु गाळण्याचा तुम्ही निर्णय घेतला. तो आता अंमलात येईल असे वाटत नाही. सगळे आनंदी आनंदात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल म्हणाले, आता आमचा शेतकरी श्रीमंत होणार आहे. ज्वारीला चांगला भाव मिळणार आहे. दारुचे व्यसन वाईट असते. एकच प्यालाचे उदाहरण आपल्यासमोर आहे. शेतकऱ्यांना ज्वारीच्या नादी लावून दोन पैसे मिळणार. सगळी ज्वारी कारखानदार घेणार. एकदा चटक लागली की शेतकरी ऊसाऐवजी ज्वारी लावणार. एकदा ज्वारी लावली की पडेल त्या किंमतीत कारखानदारांना ज्वारी विकणार. त्यातून कर्जबाजारी होऊन आत्महत्या करायला लागेल. कारखानदार भाव देणार नाही. मग होणाऱ्या आत्महत्या या ज्वारीमुळे झालेल्या असतील. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना याबद्दल पश्चाताप म्हणून काय करायचे ते आताच ठरवून टाकावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा ( विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर जी ने किसानों से संबंधित बहुत महत्वपूर्ण प्रस्ताव यहां चर्चा के लिए पेश किया है और इस प्रस्ताव पर बोलते हुए उन्होंने विस्तार से और भावनात्मक ढंग से किसानों की समस्या रखीं. माननीय सदस्य श्री रावते जी ने भी किसानों की समस्या के प्रति सरकार का ध्यान आकर्षित किया. मैं दरअसल किसानों की समस्या के बारे में ज्यादा बोलना नहीं चाहता था क्योंकि मैं किसानों के क्षेत्र में काम नहीं करता हूं, मैं मजदूरों के क्षेत्र में काम करता हूं. लेकिन पिछले कुछ वर्षो से देश के सभी हिस्सों में किसान आत्महत्या कर रहे हैं, महाराष्ट्र में और खास तौर से विदर्भ में किसानों की आत्महत्या के ज्यादा मामले हुए हैं, इस प्रकार से तेजी से किसानों की आत्महत्या के मामले बढ़ रहे हैं इसलिए इस विषय में चिंता व्यक्त करने के लिए मैं खड़ा हूं. यह विषय बहुत गंभीर है और दिन-ब-दिन किसानों की आत्महत्या का मामला गंभीर होता जा रहा है. वर्ष 2006 में इस समस्या के निपटने के लिए राज्य सरकार और केन्द्रीय सरकार ने किसानों को विशेष पॅकेज दिया था ताकि किसानों की आत्महत्या रूक सके. किसानों की आत्महत्या के बारे में, ग्रामीण अर्थ व्यवस्था के बारे में हम जन प्रतिनिधियों का व्यक्तिगत मत कुछ भी हो लेकिन किसानों की आत्महत्या पर बोलते समय हम अपनी पार्टी के प्रतिनिधि के रुप में बात करते हैं. पार्टी लाईन पर ही बात होती है. किसानों की समस्या के बारे में चर्चा जरूर होती है लेकिन उसका समाधान ढूंढने के बारे में कोई एक्शन नहीं होती है, कोई कड़ी कार्यवाही नहीं होती है. कोई भी पार्टी सरकार चलाए, उसे सरकार चलानी पड़ती है. सरकार चलाते समय किस विषय को प्राथमिकता देनी चाहिए यह सरकार तय करती है. सवाल किसानों की आत्महत्या के विषय तक ही सीमित नहीं है. बल्कि किसानों की सारी समस्याओं के प्रति आम सहमति बनाना बहुत आवश्यक है. सम्माननीय श्री फुंडकर जी ने किसानों की समस्याओं के बारे में सारी बातें यहां बताई है, जैसे किसानों की उपज के लिए उचित दाम की व्यवस्था करने के बारे में बताया है, किसानों को उचित दाम पर अच्छे बीज तथा खाद की व्यवस्था करने के बारे में बताया है. सिंचाई के बॅकलॉग के बारे में बताया गया है. कई वर्षो से हम सिंचाई के बॅकलॉग की बात कर रहे हैं. सभी पार्टियों के नेता बॅकलॉग के बारे में बोल रहे हैं लेकिन समाधान कुछ नहीं निकल रहा है. किसानों की आत्महत्या का मामला बहुत गंभीर है. इस समस्या को रोकने के लिए भारत सरकार ने किसानों का कर्ज माफ करने की घोषणा की थी. इस घोषणा का फायदा शायद दूसरे राज्यों के

...2



SGB/ SBT/ MMP/ 18:45

श्री सय्यद ज़मा....

किसानों को हुआ जहां किसानों की आत्महत्या की समस्या तीव्र नहीं थी लेकिन महाराष्ट्र में और विशेष रूप से विदर्भ में जहां अधिक संख्या में किसान आत्महत्या कर रहे हैं, वहां पर किसानों को बहुत ज्यादा फायदा हुआ है, ऐसा नहीं लगता है. सरकार की ओर से बहुत सारे आंकड़े दिए गए. लेकिन कर्ज माफी का फायदा एक तिहाई किसानों के परिवारों को ही मिला है. इस प्रकार की जानकारी यहां सम्माननीय सदस्यों ने दी है. सरकार की ओर से भी यह माना गया है कि तकनीकी कारणों की वजह से राहत पाने वालों की संख्या 30 प्रतिशत से ज्यादा नहीं है. तकनीकी कारणों की वजह से और अन्य कारणों की वजह से कई किसान राहत पाने के लिए अपात्र घोषित किए गए जिससे कई आत्महत्या ग्रस्त किसानों के परिवारों को कर्ज माफी का फायदा नहीं मिला है.

यानंतर श्री शर्मा .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री सय्यद जमा

सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री. फुंडकर जी ने बताया कि मराठवाडा और विदर्भ में प्रति किसान का केवल 15-20 हजार रुपए का कर्जा माफ हुआ है, जबकि महाराष्ट्र के दूसरे हिस्से पश्चिम महाराष्ट्र में यह राशि 5 लाख रुपए से लेकर 10 लाख रुपए तक है. किसानों की आत्महत्या के बारे में मैंने कुछ जानकारी ली है, आंकड़े तो बहुत हैं, लेकिन मैं उसमें जाना नहीं चाहता. मैं आपका ज्यादा समय नहीं लूंगा. मेरे मन में एक भावना है कि सारे प्रयासों के बावजूद विदर्भ में किसान आत्महत्या क्यों कर रहे हैं. सरकार इस बारे में टेक्नीकल रुप से आंकड़े देकर बता देगी कि आत्महत्या की संख्या में कमी आई है या आत्महत्या रुक गई हैं. लेकिन माननीय सदस्य श्री. रावते जी ने यहां पर बताया है कि पिछले कुछ महीनों से किसानों की आत्महत्या बढ़ी है. मुझे ऐसा लगता है कि आत्महत्या के पीछे आर्थिक कारण तो है, लेकिन उसके दूसरे कारण भी हैं. जिस किसान के पास 20 एकड़ जमीन है या जिस किसान के पास 40 एकड़ जमीन है, वह किसान भी आत्महत्या कर रहा है. मुझे ऐसा लगता है कि उसके पीछे उसका सोशल स्टेटस सब से बड़ा कारण है. हमारे शहरी भाग में बहुत से गरीब लोग रहते हैं, रिक्शा चलाने वाले लोग रहते हैं, डेली वेजस पर काम करने वाले मजदूर झोंपड़पट्टी में रहते हैं, लेकिन वहां पर आपने बहुत कम सुना होगा कि झोंपड़पट्टी में रहने वाले किसी गरीब ने आत्महत्या की हो. जो किसान 20 एकड़ जमीन या 40 एकड़ जमीन का मालिक है, वह आत्महत्या के लिए प्रेरित होता है, उसका मुख्य कारण उसका सोशल स्टेटस है. बहुत सालों तक वह सुखी रहा है, वह धनवान रहा है, उसकी सामाजिक प्रतिष्ठा थी, उसने गरीब लोगों की सहायता की है और अब उसको खुद कर्जा लेना पड़ता है और कर्जा लेने के बाद वह कर्जा वापस नहीं कर सकता है. वह अपने बच्चों को पढ़ा नहीं सकता, अपनी लड़कियों की शादी नहीं कर सकता है और इस वजह से उसे एक बहुत बड़ा सदमा लगता है और वह आत्महत्या करने के लिए प्रेरित होता है. मेरा ऐसा मानना है कि जिस किसान की सामाजिक प्रतिष्ठा हो और अब कर्जा लेने के बाद वह अपने बच्चों को पढ़ा नहीं सकता है और अपनी लड़कियों की शादी नहीं कर सकता है तो इस मनोवैज्ञानिक कारण की वजह से ज्यादा संख्या में किसान आत्महत्या कर रहे हैं.

**(सभापतीस्थानी मा. उपसभापती)**

. . . . 4I 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

सभापति महोदय, गांव की अर्थव्यवस्था सुधारने के लिए केन्द्र सरकार और महाराष्ट्र सरकार ने बहुत सारी योजनाएं बनाई हैं. संविधान में संशोधन करके पंचायत राज व्यवस्था को मजबूत किया गया है. किसानों की सहायता करने के लिए उनको खाद और बीज पर सबसिडी दी जाती है, लेकिन उसका पर्याप्त मात्रा में असर दिखाई नहीं देता है. नई अर्थ व्यवस्था पूरी दुनिया में आई है. 1990-91 के बाद जब नई अर्थ व्यवस्था आ रही थी, उस समय बहुत सारे बुद्धिजीवियों ने कहा था कि इसका प्रतिकूल असर हमारे देश की ग्रामीण अर्थ व्यवस्था पर होगा और वह हमें दिखाई दे रहा है. नई आर्थिक व्यवस्था और ग्लोबलाइजेशन के सब से ज्यादा शिकार हमारे किसान हुए हैं. उन लोगों की भविष्यवाणी सही साबित हुई. हमारे किसानों की हालत ठीक नहीं है और गांवों की अर्थ व्यवस्था बहुत कमजोर है. सभी उपाय करने के बावजूद भी मुझे ऐसा नहीं लगता कि किसानों को उनकी उपज का सही मुआवजा मिलता हो. किसान को छोड़कर सभी लोगों को अपने माल का दाम तय करने का अधिकार होता है. किसानों के बारे में मेरे दिल की एक मंशा है कि हम सभी लोग चाहे सामाजिक क्षेत्र में काम करते हों या राजनैतिक क्षेत्र में काम करते हों, हमें कहीं न कहीं राजनीति से ऊपर उठकर इसके बारे में आम सहमति बनानी पड़ेगी. अगर हम राज्य सरकारों को देखें तो सभी राजनैतिक दल किसी न किसी राज्य में सत्ता में हैं.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ ST/ पूर्वी श्री शर्मा 18:55

श्री सय्यद ज़मा....

लेफ़्ट पार्टी हो, राईट पार्टी हो, सेंट्रलाईज्ड पार्टी हो, सभी पार्टी की इस देश में कहीं न कहीं सरकार है. किसी न किसी राज्य में सत्ता है. इसलिए किसानों की समस्या के बारे में दूसरे किसी राज्य में समाधान निकला हो, ऐसा भी नहीं हुआ है. महाराष्ट्र में और खास तौर से विदर्भ में सबसे ज्यादा आत्महत्या हो रही है. इसलिए इस विषय पर बहुत गंभीरता से चर्चा होनी चाहिए. स्वामीनाथन समिति, नरेंद्र जाधव समिति की रिपोर्ट का अभ्यास कीजिए. लेकिन मुझे लगता है कि दिल्ली में बैठकर, मुंबई में बैठकर नीति बनाने वाले प्लानिंग कमीशन के लोग अगर आंकड़ों की बात करेंगे कि पिछले वर्ष कितने किसानों ने आत्महत्या की, इस वर्ष कितने किसानों ने आत्महत्या की और कैसे संख्या कम होती जा रही है, ऐसा अगर बताने की कोशिश हुई तो यह समस्या हल नहीं होगी. ये आंकडों का खेल ब्यूरोक्रेसी के द्वारा बनाया जाता है. इन आंकड़ों के बताने से ग्राऊंड रिआलिटी में कमी नहीं होती. मेरा सभी समाजसेवी संस्थाओं, तमाम राजनीतिक पार्टियों और केन्द्र एवम् राज्य सरकार से अनुरोध है कि इस समस्या से निपटने के लिए गंभीरता से हल खोजे. हम कितनी ही अच्छी योजनाओं की बातें करें लेकिन महाराष्ट्र जैसे प्रगत राज्य में किसान आत्महत्या कर रहे हैं, यह बहुत शर्म की बात है. हम महाराष्ट्र के बड़े-बड़े महापुरुषों का नाम लेकर महाराष्ट्र राज्य का कितना भी गुणगान करें, महाराष्ट्र राज्य का वजन बढ़ाने की बात करें लेकिन महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में किसानों को आत्महत्या करनी पड़ रही है, यह बड़ी शर्म की बात है. किसानों की समस्या पर राजनीति नहीं होनी चाहिए. मेरा यह व्यक्तिगत मत है कि अगर हम सभी पार्टियों के नेता किसानों की समस्या के प्रति ईमानदारी और निष्ठा से बात कर रहे हैं तो सरकार पर दबाव डाले किसानों की समस्या हल करने के लिए. किसानों का फोरम बनाए, नीति बनाई जाए, समयबध्द तरीके से कार्यक्रम बनाए ताकि किसानों की आत्म हत्या रोकी जा सके. इस समस्या पर गंभीरता से विचार किया जाए कि किसानों की आत्महत्या कैसे रोकी जा सकती है. दिल्ली में बैठकर प्लानिंग की जाती है. सदन में बात की जाती है. जनता को गलत बात बताकर अपना बचाव करने की कोशिश की जाती है. ऐसा नहीं होना चाहिए. इसलिए मेरा अनुरोध है कि समाजसेवी संस्था, राजनीतिक पार्टियां और सरकार किसानों की समस्या दूर करने के लिए गंभीरता से पहल करें. हमारे विरोधी पक्ष के सारे नेता पहल करें. किसानों का फोरम बनाए. स्वामीनाथन समिति, नरेंद्र जाधव समिति की रिपोर्ट का अध्ययन करें और उन

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ ST/ पूर्वी श्री शर्मा 18:55

श्री सय्यद ज़मा....

कारणों का पता करें कि किसान आत्महत्या क्यों कर रहे हैं. किसानों की आत्महत्या कैसे रोकी जा सकती है इस पर आम सहमति बनाए. महाराष्ट्र जैसे प्रगत राज्य के लिए किसानों का आत्महत्या करना शर्म की बात है. इन आत्महत्याओं को रोकने के लिए जो कुछ भी उपाय करने हो, वे करने चाहिए. इसी अपील के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

.............

यानंतर श्री रामदास कदम यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय गेली 10 वर्षे या सभागृहात सतत दोन्ही बाजूने सुरू आहे. आता पर्यंत झालेल्या सगळ्या चर्चा ह्या वांझोट्या झालेल्या आपल्याला पहायला मिळत आहेत. मी वांझोट्या हा शब्द मुद्दाम वापरला आहे. तासन्तास आपण सभागृहात बसलो आहोत. बोललो आहोत. या चर्चेला माननीय मंत्रिमहोदय आणि माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी उत्तर देखील दिलेले आहे. दिवंगत पंतप्रधान श्री लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान ही घोषणा दिली. आज त्या किसानाचे काय होत आहे, हे आपण उघड्या डोळ्याने पहात आहोत. म.गांधी बॅरिस्टर झाले तेव्हा ते सुटा-बुटात आले होते. पण ज्यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील शेवटच्या माणसाची अवस्था पाहिली, शेवटच्या माणसाकडे लाज राखण्या इतपत सुद्धा अंगावर कपडा नाही हे त्यांनी पाहिले तेव्हा त्यांनी शपथ घेतली की,जो पर्यंत शेवटच्या माणसाला अंगावर लाज राखण्या इतपत देखील कपडा येत नाही, तो पर्यंत माझ्या अंगावर संपूर्णपणे कपडा घालणार नाही. आज त्याच म.गांधीच्या नावावे आपण सरकार चालवित आहात. त्यांच्या आत्म्याला आता काय वाटत असेल, याचा शासन कधी विचार करणार आहे काय ? त्याचा जाब विचारण्यासाठी मी उभा आहे. दोन दिवसापूर्वी विधान परिषदेत शेतकऱ्यांच्या आत्महत्ये विषयी माझा सहावा प्रश्न होता. त्यावेळी माननीय महसूल मंत्र्यांनी पुन्हा सात हजार दोनशे कोटी रूपयांचे पॅकेज आम्ही दिल्लीमध्ये पाठविले आहे आणि तेथून पैसे येतील अशा प्रकारचे आश्वासन दिले. पॅकेज म्हणजे शेतकऱ्यांच्या फायदाचा भ्रम आणि विकासाची मृत्यूघंटा असे मी म्हटले तर ते चुकीचे म्हटले असे मला वाटणार नाही. पहिल्यांदा आपण 1075 कोटी रूपयाचे पॅकेज दिले. दुसरे पॅकेजे दिले 3075 कोटी रूपयाचे. तिसरे पॅकेज दिले 70 ते 72 हजार कोटी रूपयांचे. आपण पॅकेज दिले. मंत्रिमहोदय आपण ज्यावेळी आमच्याकडे होतात त्यावेळी आपली भाषणे आम्ही ऐकली आहेत. शेवटी सरकार म्हणून आपल्याला येथे उत्तर द्यावे लागणार आहे याची मला कल्पना आहे. जाणीव आहे. पण ज्यावेळी पॅकेज दिले,शेतकऱ्याने दहा हजार रूपयाचे कर्ज घेतले असेल त्यावर बँकेने एक लाख रूपये व्याज लावले. त्या पॅकेजमधून आपण एक लाख रूपये बँकेमध्ये जमा केले. नियमाने आपण व्याजासह, मुद्दलासह आपण दुप्पट रक्कम घेऊ शकतो. दहा हजार रूपयावर बँकेने एक लाख रूपयाचे व्याज

...2

श्री.रामदास कदम ...........

आकारले आणि आपल्या सहकारी बँका वाचविल्या. हे पैसे शेतकऱ्याला मिळाले नाहीत. मी येथे एकच लहानसे उदाहरण दिलेले आहे. बाकीची चिरफाड आमच्या सन्माननीय सदस्यांनी केली आहे. नाशिकला आपण पॅकेजच्या माध्यमातून कृषि पंप दिले होते, पाईप दिले होते, बैलगाड्या दिल्या होत्या, ताडपत्र्या दिल्या होत्या, त्या सगळ्याचे प्रदर्शन मी नागपूर अधिवेशनात माझ्या बंगल्याच्या बाहेर लावले होते. ते माननीय मुख्यमंत्र्यांना आणून दाखविले होते. सगळे पंप,साहित्य बोगस देण्यात आले होते. 8 तास पंप लावला तर तो उडायचा. त्याचा स्फोट व्हायचा. हे पॅकेज शेतकऱ्यांसाठी नव्हते. शेतकऱ्यांपर्यंत हे पॅकेज पोचले नाही. याचे टेंडर घेणारे सर्वजण मंत्र्यांचे नातेवाईक होते. म्हणून मला दुःख होते. वेदना होतात.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ....

म्हणून भाषणाच्या सुरुवातीला मी एक मागणी करणार आहे. नरेंद्र जाधव समितीचा उल्लेख मघाशी करण्यात आला होता ते दिल्लीत नियोजन विभागामध्ये आता गेलेले आहेत. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाच्या संदर्भात राज्यातील सर्व वर्तमानपत्राच्या पत्रकारांना बोलावून माननीय मुख्यमंत्र्यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती व त्या ठिकाणी श्री नरेंद्र जाधव यांनासुध्दा बोलाविण्यात आले होते. माननीय मुख्यमंत्रानी त्या पत्रकार परिषदेत असे जाहीर केले की, हा अहवाल 100 टक्के मी स्वीकारला असून सहा महिन्यामध्ये या अहवालाची 100 टक्के अंमलबजावणी करण्यात येईल. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची जर अंमजबजावणी झाली असती तर एकही शेतक-याची आत्महत्या झाली नसती हे मी दाव्याने आपल्याला सांगतो.

सभापती महोदय, नरेंद्र जाधव समितीचा अहवाल मी आपल्याकडे देतो तो अहवाल आपण वाचून पहावा. शेतक-यांनी आत्महत्या केल्या म्हणून पॅकेज जाहीर केले होते परंतु या अहवालाची अंमबजावणी केली असती तर एकाही शेतक-यांनी आत्महत्या केली नसती. या राज्याच्या सहा महिन्यात नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची 100 टक्के अंमलबजावणी करणार आहे अशा प्रकारचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात देखील दिले होते त्यानंतर जेवढया शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या त्या आत्महत्या नसून महाराष्ट्र शासनाने पाडलेले खून आहेत म्हणून या खूनाच्या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर कलम 302 अंतर्गत खटला दाखल करावा अशी माझी पहिली मागणी आहे. सन्माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी आताच या विभागाचा पदभार स्वीकारलेला असल्यामुळे त्यांचा संबंध मी या ठिकाणी जोडणार नाही.परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी या शेतक-यांचा बळी घेतला असून हे त्यांचेच पाप आहे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.समितीने दिलेल्या अहवालाची जर अंमलबजावणी करावयाची नव्हती तर या समित्या कशाला नेमता ? ही नाटके कशासाठी करता ? समितीच्या अहवालाची अंमलबजावणी जर करावयाची नव्हती तर तशा प्रकारची घोषणा का करण्यात आली होती ? ही समिती कशासाठी नेमण्यात आली होती ? माननीय राज्यमंत्र्यांना मर्यादित अधिकार आहेत याची मला कल्पना आहे.माननीय मुख्यमंत्री जर या ठिकाणी उपस्थित असते तर त्यांना जे काही विचारावयाचे आहे हे मी त्यांना विचारले असते.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ....

सभापती महोदय, शेतक-यांचे बळी या शासनाने घेतले असून शासनाने त्यांचे खून पाडलेले आहेत. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची प्रत माझ्याकडे असून ती प्रत मी आपल्याकडे पाठवतो तो अहवाल आपण वाचून पहावा. त्या समितीने जो सर्व्हे केला होता त्यानुसार अडीच लाख कुटूंबे संवेदनशील आहेत. त्या कुटुबांकडे शासनाने जर लक्ष दिले असते आणि सहा महिन्यापर्यंत प्रत्येक कुटंबामागे 25 किलो धान्य दिले असते तर या कुटुबियांना दिलासा मिळाला असता आणि आत्महत्या झाल्या नसत्या. सभागृहामध्ये सांगावयाचे आणि टाळया मिळवावयाच्या परंतु प्रत्यक्षात त्याप्रमाणे करावयाचे नाही असे दिसून येत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरा मुद्दा मांडणार आहे. शासनाने पी साईनाथ यांची एक समिती नेमली होती. ही समिती नेमावी असे आम्ही आपल्याला सागितले होते काय ? पी साईनाथ समितीने जो अहवाल दिला होता त्याची अंमलबजावणी झाली आहे काय ? या अहवालात असे म्हटले आहे की ,महाराष्ट्र शासन हे शेतक-यांच्या आत्महत्येच्या माध्यमातून स्मशानभूमी झालेली आहे. हा उल्लेख शासनाला झोंबला होता. यासंबंधीचा उल्लेख नरेंद्र जाधव समितीच्या अहवालामध्ये देखील करण्यात आला होता . पी साईनाथ समितीने अशा प्रकारचा उल्लेख केल्याबद्दल शासनाला का वाईट वाटले ? एका दिवसात शेतक-यांचे पाच पाच शव जर स्मशानभूमीत जात असतील तर ही महाराष्ट्राची स्मशानभूमी नाही काय ? पी साईनाथ समितीने काय चुकीचे सांगितले होते ? ही समिती तर शासनानेच नेमली होती ना ? मग या समितीच्या अहवालाचे पुढे काय झाले होते ? नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाचे पुढे काय झाले होते ?
यासबंधीचे उत्तर माननीय मंत्री महोदयांच्या भाषणातून मला मिळाले पाहिजे. माजी महसूल मंत्री श्री भगवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली असून त्या समितीने देखील एक अहवाल दिला होता .त्या समितीच्या अहवालाचे पुढे काय झाले होते ? मी जे प्रश्न विचारले आहेत त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देऊच शकणार नाहीत.

सभापती महोदय, समितीने दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी न करता एक हजार कोटी, तीन हजार कोटी ,सहा हजार कोटी, सत्तर हजार कोटी अशा विविधं पॅकेजेस फक्त जाहीर करण्यात येतात, या पॅकेजस मधील रक्कमा कोणाच्या खिशात जातात.वेळ काढण्यासाठी समित्या

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ....

नेमल्या जातात व पॅकेज जाहीर केले जाते आणि आपल्या ताब्यातील बॅका वाचविल्या जातात . ज्या बॅका वाचविल्या गेल्या आहेत त्या सगळया बॅका राष्ट्रवादी आणि कॉग्रेस पक्षाच्या पुढा-यांच्या आहेत .हे मी अत्यंत जबाबदारीने सांगत आहे. या बॅकांची नावेसुध्दा मी देण्यास तयार आहे.शेतकरी आत्महत्या करतात परंतु त्याबाबतीत सरकारला काहीच वाटत नाही. निवडणुका कशा जिंकावयाच्या हे शासनाला चांगले कळले आहे. निवडणुकांसाठी आता बटन दाबण्याचे मशिन आणले आहे. ते कशा पध्दतीने येते, का येते यासबंधी मी आज काहीही बोलणार नाही...

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय,एक बाब मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे की राज्यामध्ये ज्या सहकारी बॅका आहेत त्या बॅकांची रितसर निवडणूक होत असते आणि निवडणुकीच्या माध्यमातून तेथे प्रतिनिधी निवडून येत असतात. त्यामुळे एका पक्षाच्या बॅका आहेत असे म्हणणे चुकीचे आहे.जे लोक निवडून येतात ते लोकशाही पध्दतीने निवडून येत असतात आणि त्यांच्या या बॅका आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना मला असे सांगावयाचे आहे की तुमच्या मध्ये जर हिंमत असेल तर निशाणीवर शिक्का मारण्याची पूर्वी जी पध्दत होती ती पध्दत पुन्हा आणावी आणि पुन्हा निवडून आणून दाखवावे असे माझे आपल्याला आवाहन आहे. परंतु त्याप्रमाणे होऊ शकणार नाही हे मी पुन्हा या ठिकाणी जबाबदारीने सांगत आहे...

नंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

ते होऊ शकत नाही. मी पुन्हा बोलतो, जबाबदारीने बोलतो. आम्ही निवडणूक आयोगाकडे आक्षेप नोंदविले आहेत...

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पूर्वीची मतदान करण्याची पध्दत आपण काढा असे माननीय सदस्य म्हणत आहेत. . 1972-73 चा काळ त्यांना जर माहीत असेल आणि त्यावेळी ते शिवसेनेकडे असतील तर 1972 च्या निवडणुकीच्या वेळी इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभेची निवडणूक आम्ही जिंकली. त्यावेळी सुध्दा त्यांचा असा ग्रह होता की, "ही बाईची नाहीतर शाईची करामत आहे", असे बोलले गेले होते. त्यामुळे आपण आता जे काही याठिकाणी सांगत आहात ते आपण विसरलेले आहात असे मला याठिकाणी नमूद करावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी सरकारला पुन्हा आव्हान दिले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी माझे आव्हान स्वीकारुन दाखवावे. मी माझ्या मताशी ठाम आहे. मतदानाच्या ठिकाणी त्या मशीनमधील बटन दाबल्यानंतर ते मत कुठे जाते? हे मी माझ्या डोळयांनी पाहिले आहे. एक बटन दाबल्यानंतर तीन मते कुठे जातात? हे मी माझ्या डोळयांनी पाहिले आहे. म्हणून मी याठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. सभापती महोदय, विदर्भामध्ये दिवसाला पाच-पाच मढी उठत आहेत. सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते. मंत्रिमहोदय, आम्ही माणसे आहोत, आम्हालाही संवेदना आहेत, आम्हालाही वेदना आहेत, मागील 10वर्षामध्ये पाच हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होतात, पाच हजार हा आकडा कमी नाही. एखाद्या कुटुंबातील प्रमुख माणूस जेव्हा शेतामध्ये आत्महत्त्या करतो त्यावेळी त्याच्या विधवा पत्नीच्या अंगावर साडी नेसायला मिळत नाही. याची या सरकारला जाणीव नाही. ज्यावेळी कुटुंबातील प्रमुख कर्तबगार माणूस मेल्यानंतर त्याच्या घरामध्ये मुलीचे लग्न होत नाही, त्यांच्या मुलांचे शिक्षण होत नाही. त्यांच्या कुटुंबियांच्या पोटाची आग विझत नाही, त्यांना खायला अन्न मिळत नाही याची शासनाला जाणीव असेल, अनेक आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी वेश्या व्यवसायाला लागल्याची बातमी मी टी.व्ही. वर पाहिली आहे. ही बाब आम्हाला भूषणावह आहे काय?. तरी देखील आम्हाला सभागृहामध्ये आश्वासन दिले की, डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालावर टप्प्या टप्प्याने आम्ही कारवाई करु. याठिकाणी तुम्ही कुणासाठी काम करीत आहात? अन्नवस्त्र, निवारा देण्याची सरकारची जबाबदारी आहे. तुम्ही शेतकऱ्यांवर मेहरबानी करीत नाही. तुम्ही निवडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. रामदास कदम...

आला आहात ना, तुमची जबाबदारी नाही काय? गेल्या दहा वर्षापर्यंत आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबवू शकत नाही. हजारो कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करुन देखील ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही.

सभापती महोदय, गाईंच्या वाटपाबाबत काय झाले? विदर्भामध्ये 16 हजार गाई वाटण्यात आल्या. त्यातील किती जीवंत आहेत हे आपण सांगणार काय? 16 हजार गाईपैकी फक्त 16 गाई आपण आम्हाला दाखवा. सर्व गाई खाटीकखान्यामध्ये पोहोचल्या. महात्मा गांधी बकरीचे दूध प्यायचे, तुम्ही महात्मा गांधींच्या नावाने बकरे कापून खाता. ही तुमची आजची अवस्था आहे. तुम्ही कसल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबविता? त्याकरिता तुमची मानसिकता हवी, तुमच्यापैकी किती मंत्री त्या विदर्भामध्ये जाऊन थांबत आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे आणि आमचे तात्विक मतभेद आहेत. परंतु ही भावना त्यांच्यामध्ये कां निर्माण झाली? कुणी निर्माण केली? कशामुळे निर्माण झाली? त्यांच्यामध्ये ही मानसिकता कुणी निर्माण केली? आपण गेल्या दहा वर्षामध्ये विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही. आपले मंत्री आज विदर्भामध्ये आठ ते दहा दिवस थांबू शकत नाहीत. पॅकेजची अंमलबजावणी होते की नाही हे पाहू शकत नाही. तुमचे तहसीलदार काय पंचनामे करतात हे तुम्ही पाहू शकत नाही. याठिकाणी फक्त मंत्रालयामध्ये, बंगल्यामध्ये ए.सी. लाऊन बसायचे. लाईटचे बिल करायचे, पाण्याचे बिल करायचे. आणि "तुम्ही खाता तुपाशी शेतकरी आहे उपाशी" असे चालले आहे, हे थांबणार कधी? आणि म्हणून "गोंधळलेले शासन आणि ढासळलेले प्रशासन" अशाप्रकारचे या शासनाचे वर्णन केले तर ते चुकीचे आहे असे मी म्हणणार नाही. माननीय खासदार श्री. अर्जुनसिंग गुप्ता यांचा अहवाल माझ्याकडे आहे.त्यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे की, देशामध्ये दरडोई फक्त 20 रुपयांपेक्षा कमी उत्पन्नावर जगणारे जवळ जवळ 83 कोटी लोक आहेत. आज महाराष्ट्र 31 टक्के दारिद्रय रेषेखाली आहे. आम्ही किती वर्षे वाट पाहणार आहोत? पॅकेजचे काय झाले. आज जेवढे पॅकेज आले, त्यातील 80 टक्के पॅकेज पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेले आहे. जे शेतकरी आत्महत्या करतात त्यांच्या नशिबामध्ये पॅकेज कुठे आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . ..

म्हणजे जखम एका बाजूला आणि मलमपट्टी दुसऱ्या बाजूला अशी अवस्था आहे. आमचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर हे मागणी करीत आहेत. त्यांना असे वाटते की, आता आमच्या भागासाठी पॅकेज उपलब्ध झाले आहे. पण प्रत्यक्षात तुम्हाला कुठे पॅकेज दिले आहे, उलट तुमच्या तोंडाला पाने पुसली आहेत आणि ते पॅकेज पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेले ही अवस्था आहे. फक्त मृगजळासारखा मदतीचा आभास निर्माण करावयाचा आणि आपल्याला जे हवे आहे ते घ्यावयाचे अशी स्थिती आहे. फावडे माती आपल्याकडे ओढते, "जिसके हाथ में लाठी उसकी भैंस" हे ऐकले होते, पण प्रत्यक्षात ते पॅकेजच्या माध्यमातून होत असल्याचे पाहिले. ज्याच्या हातात ससा तो पारधी हे ऐकले होते. पण या पॅकेजच्या माध्यमातून आम्ही प्रत्यक्षात पाहिलेले आहे. सगळे काही पश्चिम महाराष्ट्रामध्ये. विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरभाऊ पॅकेजची मागणी करीत आहेत, पण त्यांना काही मिळत नाही. ही आमची आताची अवस्था आहे.माझ्याकडे शेतकऱ्यांच्या संबंधातील आकडेवारी आहे, पण मी ती वाचत नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरग फुंडकरभाऊंनी ती कदाचित वाचली असेल, त्यावेळी मी उपस्थित नव्हतो.

श्री.बबनराव पाचपुते (खाली बसून) : अजून किती वेळ बोलणार आहात ?

श्री.रामदास कदम : अजून पाच-दहा मिनिटे बोलू द्या. शेतकऱ्यांची मढीच्या मढी चालली आहेत आणि तुम्हाला कसली घाई आहे ? जरा थांबा. आपल्याला एवढी कसली घाई आहे ? तुमचा येथे काही विषय आहे काय ? काही नाही ना. तुम्हाला येथे बसण्यासाठी पाठविलेले आहे ना. मग येथे बसा.

श्री.बबनराव पाचपुते (खाली बसून) : विधानसभेमध्ये देखील हे भाषण ऐकले आहे आणि आताही हेच भाषण होत आहे.

श्री.रामदास कदम : नाही, नाही. तुम्ही हे भाषण ऐकलेले नाही. तुम्ही किर्तनकार आहात, शेतकऱ्याला "शेतकरी राजा" म्हटले जाते. पण प्रत्यक्षात शेतकऱ्याला तमाशातला राजा करुन टाकलेला आहे हे तुम्ही ऐकलेले नाही. पण तुम्ही जे ऐकलेले नाही, ते आता तुम्हाला ऐकवतो. शेतकऱ्याला तमाशातला राजा केले आहे, शेतकरी राजा असे म्हटले जाते, पण आता हा राजा भिकेला लागलेला आहे, तो आत्महत्या करीत आहे, आपल्या बायकोचे मंगळसूत्र गहाण ठेवत आहे

. . . .4 एन-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . ..

आणि म्हणे आमचा शेतकरी राजा. तुम्ही तमासगीर आणि शेतकऱ्याला तमाशातल्या राजाचा मुकूट घातलेला आहे.म्हणून विनोदासाठी, भाषणासाठी आणि साहित्यामध्ये रंगविण्यासाठी फक्त शेतकऱ्याला "राजा" असे म्हटलेले आहे.

सभापती महोदय,मला माननीय मंत्री महोदयांना एक उपाययोजना सांगावयाची आहे. विदर्भामध्ये ब्रिटीशांनी खोदलेले 40 हजार मालगुजारी तलाव आहेत. मी विधानसभेमध्ये या विषयावर चार वेळा बोललो आहे.पण आपल्यासारख्या दगडाला कधी पाझर फुटत नाही,त्याला काय करणार? मग पुन्हा-पुन्हा घाव घालावे लागतात. ब्रिटीशांच्या काळामध्ये खोदण्यात आलेल्या 40 हजार मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी फक्त 200 कोटी रुपये देण्यात यावेत अशी मी मागणी करीत आहे. जर विदर्भातील माझ्या शेतकऱ्यांना मालगुजारी तलाव दुरुस्त करण्यासाठी 200 कोटी रुपये दिले असते तर त्यामध्ये पाणी साठले असते आणि माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, जवळजवळ 50 टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या. या तलावांमध्ये पाणी साठवले तर त्याखाली येणारी 10-20 एकर जमीन भिजली असती, मग तेथे मत्स्योद्योग करता आला असता, एकेका तलावावर जर पाच-पाच लोकांना काम दिले असते तर 40000 x 5 = 200000 एवढया लोकांना काम देऊ शकलो असतो. मी हे मान्य करतो की, मी हे चौथ्या वेळेस बोलत आहे. पण तुम्हाला काही उमगत नाही. तुम्हाला फक्त स्वत:ला, तुमच्या नातेवाईकांना खाण्यासाठी पॅकेज पाहिजेत. या राज्यामध्ये कोट्यावधी रुपयांचे पॅकेज आले पण तुम्हाला विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी 200 कोटी रुपये देता येत नाहीत. कारण मग तेथील शेतकरी उभा राहील. याबाबतीत काय करण्यात येणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. म्हणून याठिकाणी एक आभास निर्माण करावयाचा. आम्ही येथे बोलावयाचे, कोकलावयाचे, कमी बोला-जास्त बोला. पण आम्हाला माहिती आहे की, कालचा गोंधळ चांगला होता असे म्हणण्याची आमच्यावर वेळ येणार आहे. पण शेवटी आमच्यामध्ये कुठेतरी जिवंतपणा आहे, आम्हाला संवेदना आहेत म्हणून आम्ही बोलत आहोत आणि त्यामुळेच बोलावे लागत आहे. एकदा बोलून जर काही घडले असते तर आम्हाला पुन्हा बोलण्याची वेळ आली नसती. आमच्यावर तेच-तेच परत बोलण्याची वेळ कोण आणत आहे ? मघाशी सांगितल्याप्रमाणे ब्रिटीशांनी त्या काळामध्ये 40 हजार मालगुजारी तलाव खोदलेले आहेत. त्याच्या दुरुस्तीसाठी आपण 200 कोटी रुपये देणार

. . . .4 एन-3

आहात की नाही ? असा प्रश्न आहे. तुमचे पॅकेज खड्डयात गेले. आता शासनाने सिंचनासाठी 60 हजार कोटी रुपये खर्च केले. कशासाठी ? त्याचा काय उपयोग आहे ? हे सगळे पैसे कुठे गेले ? 40 हजार मालगुजारी तलावांपैकी अनेक तलाव चांगले आहेत. जर त्याठिकाणी थोडी दुरुस्ती केली तर ते उपयोगात येणार आहे. तेथे मत्स्योद्योग चांगल्या प्रकारे होऊ शकतो. त्या तलावातील गोड्या पाण्यामध्ये कोळंबीचा उद्योग होऊ शकतो. पण दुर्दैवाने आज देखील या गोष्टी झालेल्या नाहीत. मी कृषी विभागाच्या बाबतीत मुद्दाम मागील दोन वर्षाची आकडेवारी वाचून दाखवितो. 2001-2002 मध्ये कृषी खात्याचे बजेट 4.28 टक्के होते आणि 2009-2010 मध्ये हे बजेट 2.21 टक्के आहे, म्हणजे दहा वर्षामध्ये आम्ही 50 टक्क्यापर्यंत खाली आलो आहोत आणि दुसरीकडे आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाचवावयास निघालो आहोत. पुन्हा माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुतेसाहेब म्हणतात की, हे काल केलेलेच भाषण आहे. ठीक आहे. तुम्हाला ते ऐकण्याची सवय आहे, त्याला मी काय करणार ? जर तुमच्यामध्ये संवेदना असत्या तर तुम्ही असे बोलला नसता. तुम्ही ताबडतोब कार्यवाही केली असती. मी येथे उपाययोजना सांगत आहे, ते खरे म्हणजे तुमचे काम आहे. पण ते मी सांगत आहे. मी नुसती टिका करीत नाही, तर काय केले पाहिजे ते सांगत आहे. मी उपाययोजना सांगत आहे पण त्या देखील होत नाहीत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

मी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो होतो. मालगुजारी तलावासाठी पाच ते सात कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. त्यातून काय होणार आहे? सभापती महोदय, नरेंद्र जाधव समितीच्या अहवालामध्ये ज्या ज्या योजना सूचविण्यात आलेल्या आहेत त्या सगळया योजनांची अंमलबजावणी शासनामार्फत होईल असे मी समजतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तर माझ्या मते दोन ते तीन महत्वाच्या गोष्टी केल्या तर या सगळया आत्महत्या थांबतील. सिंचनाच्या माध्यमातून प्रत्येक गावात, वाडी, वस्तीत कालव्याने पाणी दिले पाहिजे. दोन वेळा पिके घेतली पाहिजेत, लघुउद्योग निघाले पाहिजेत. दुग्ध व्यवसाय झाला पाहिजे. शेळयामेढयांचा व्यवसाय झाला पाहिजे गायींचे दूध निघाले तर कशासाठी आत्महत्या होतील. पण एका बाजूला भाकड गायी द्यायच्या. त्या गायींना पिण्यासाठी पाणी नाही. खाण्यासाठी खाद्य नाही. त्या गायींचा उपयोग काय? सिंचनाच्या बाबतीत फक्त कालव्यावर खर्च करण्यापेक्षा खऱ्या अर्थाने प्रत्येक गावाला पाणी मिळाले पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याची आज अशी अवस्था आहे की, शेतीमालाच्या उत्पादनासाठी खर्च जास्त होतो आणि त्यापासून उत्पन्न कमी मिळते्. शासनाने आज वेगवेगळे पॅकेज दिले आहेत. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. पण उद्या शेतकरी पुन्हा घाटयात गेला की, पुन्हा कर्ज काढणार आहे. त्यामुळे शासन हे पॅकेज किती वर्षे चालू ठेवणार आहे? शेतकऱ्याला मजबूत करण्यासाठी, सधन करण्यासाठी ज्या उपाययोजना करावयास पाहिजेत त्या उपाययोजना होत नाहीत.

सभापती महोदय, नरेंद्र जाधव समितीच्या अहवालामध्ये खते कुपन पध्दतीने देण्यास सांगितले आहे. कुपन शेतकऱ्याला देण्यात यावे. शेतकरी ते कुपन घेऊन गेल्यानंतर त्याला शासकीय दुकानामधून चांगले खत मोफत मिळाले पाहिजे. त्याला चांगली औषधे मिळाली पाहिजेत. रोजगार हमीची कामे शेतीमध्ये काढण्यात आली पाहिजेत. सभापती महोदय, रोजगार हमीचे वीस हजार कोटी राज्याच्या महसुलात वळविण्यात आले आहेत. जी रोजगार हमी योजना केंद्र शासनाने महाराष्ट्राकडून घेतली. संबंध देशाने चांगली योजना म्हणून ती उचलली. ज्या योजनेचा आदर्श संबंध देशाने घेतला तीच रोजगार हमी योजना संपुष्टात आणण्याचे काम महाराष्ट्र शासनाने केले आहे. या रोजगार हमीचे काम ज्या दिवशी शेतामध्ये होईल, शेततळयांसाठी होईल त्या दिवशी खऱ्या अर्थाने शेतकरी वाचेल.

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, मी याठिकाणी एक घटना सांगू इच्छितो. आदिवासींच्या मुलांचे मोठया प्रमाणात कुपोषण होत होते म्हणून कोर्टाने ते थांबवा अशी शासनाला नोटीस दिली. सभापती महोदय, मी ठाण्याच्या जव्हार, मोखाडा,वाडा या आदिवासी भागात स्वत: गेलो. मी त्याठिकाणी तीन दिवस होतो. माझ्यासोबत जिल्हा प्रमुख होते, तालुका प्रमुख होते. मी त्यांना सांगितले की, ज्या आदिवासी भगिनीचे एखादे मूल कुपोषणाने मेले असेल तिला भेटण्यासाठी मला तिच्या घरी घेऊन चल. सभापती महोदय, जव्हार गावातील एका झोपडयामध्ये एक अर्धनग्न आदिवासी स्त्री काळोखात बसली होती. त्या स्त्रीला मी विचारले की, तुझे मूल कशामुळे मेले? त्या मुलाला काय झाले होते? पैसे नव्हते काय? त्यावेळी त्या स्त्रीने मला जे उत्तर दिले ते हृदय पिळवटणारे होते. त्या स्त्रीने मला असे सांगितले की, सहा महिन्यापासून माझ्या हाताला काम नाही. माझ्या हाताला काम नाही म्हणून माझ्या हातात दाम नाही. माझ्या हातात दाम नाही म्हणून माझ्या पोटात अन्न नाही. माझ्या पोटात अन्न नाही म्हणून माझ्या अंगावर दूध नाही. माझ्या अंगावर दूध नाही म्हणून माझ्या मुलाला मी दूध देऊ शकले नाही. मी माझ्या मुलाला दूध देऊ शकले नाही म्हणून माझे मूल माझ्या समोर तडफडून मेले. आम्ही कोणासाठी काम करीत आहोत? सरकार कोणासाठी काम करीत आहे? ही आजची अवस्था आहे. आदिवासींचा पैसा त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. मागासवर्गीयांचा पैसा त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. शेतकऱ्यांचा पैसा त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. पैसा सगळा जातो कुठे? रोजगार हमीची कामे गरिबांना मिळत नाहीत. रोजगार हमीची कामे बंद करण्यात आलेली आहेत. 100 दिवसांची रोजगार हमी योजना आहे. या योजनेवर किती पैसा खर्च झाला हे सांगण्यात यावे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीतील पान क्रमांक 124 वर "महाराष्ट्रात आज देखील 2 लाख 88 हजार कृषी पंपांची विद्युतीकरण करण्याची मागणी प्रलंबित आहे असे म्हटले आहे."

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा वाचतील ? त्याच्या शेतामध्ये कृषी पंप लागले आहेत त्याला विजेची जोडणी द्या असे शेतकरी सांगत आहेत. 2 लाख 88 हजार कृषी पंपांना विजेचे कनेक्शन प्रलंबित आहेत. शेतकरी आपली शेती फुललेली पाहतो. त्यांच्या विहिरीमध्ये पाणी आहे पण वीज नाही. शेतकरी उघड्या डोळयांनी आपली शेती उद्ध्वस्त होताना पाहतो. दुसऱ्या दिवशी आपल्या शेतात येऊन शेतातील झाडाला गळफास लावून आत्महत्या करतो. ही परिस्थिती आपल्याला पहावयास मिळते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कापसाबाबत उल्लेख केला. गुजरात सरकारने कापसाला जास्त भाव दिला. खेड्यातील कापूस गुजरात सरकारने खरेदी केला. गुजरातमध्ये व्यापाऱ्याचा भाव 3300 रुपये होता. शासनाचा भाव 2855 रुपये होता. स्थानिक बाजारातील भाव 3100 रुपये होता. खेडाखरेदी म्हणून गुजरात शासनाने कापूस खरेदी केला. मला या ठिकाणी खेदाने सांगावेसे वाटते की, आतापर्यंत मराठवाड्यातून 15 लाख कच्च्या गाठी कापूस गुजरातमध्ये गेला. आज मराठवाड्यातील जवळजवळ 500 जिनिंगपैकी 100 ते 150 जिनिंग सुरु झाल्या नाहीत. सर्व कच्चा माल गुजरात राज्यात गेला. आंधळं दळतय आणि कुत्रं पीठ खातय अशी अवस्था पहावयास मिळते. जनावरांच्या बाबतीत शासनाने अधिक लक्ष द्यावे अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जनावरे खाटीकखान्याकडे जात आहेत. हे पशुधन महाराष्ट्र सरकारने सांभाळावे. कवडीमोल भावाने हे पशुधन विकले जात आहे. त्यांना कडबा नाही, पाणी नाही. त्यामुळे कवडीमोल भावाने हे पशुधन विकले जाते आहे ते शासनाने थांबवावे.

सभापती महोदय, जे अत्यंत अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांच्या गरिबीचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणात सावकार, नेते, पुढारी त्यांच्या जमिनी विकत घेत आहेत. मी हे विधान फार जबाबदारीने करीत आहे. माझ्याकडे कागदपत्रे आहेत. एकाएका मंत्र्यांनी 500 एकर, एक हजार एकर अशा जमिनी विकत घेतलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आपल्या राजापूरमध्ये एका परप्रांतीय मंत्र्याने 1 हजार एकर जमीन घेतली. हे थांबले पाहिजे. माझी अशी मागणी आहे की, जे अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांची जमीन विकण्यासाठी शासनाने अधिकृत बंदी आणावी. त्यांच्या गरिबीचा फायदा फक्त सावकारच घेत आहेत असे नाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. रामदास कदम ......

तर पुढारी. मंत्री, नेते सुध्दा त्यांच्या जमिनी घेत आहेत. शासनाने याची चौकशी करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. या जमीन विक्रीच्या बाबतीत कायद्याने बंदी आणावी अशी मी मागणी करतो. सावकारशाहीला पूर्णपणे आळा घातला पाहिजे. एका बाजूला आपण मोठ्या प्रमाणात कर्जमाफी करीत आहोत असे दाखवतो पण दुसऱ्या बाजूला मी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. विजय वडेट्टीवार यांना सांगू इच्छितो की, आपल्या भागातील 54 टक्के लोक खाजगी सावकारांकडून कर्ज घेतात. त्यांच्या बाबतीत शासनाने काय निर्णय घेतला ? आज आपण या ठिकाणी मंत्री म्हणून बसला आहात पण काल आमच्या बाजूला असताना त्यावेळची भाषणे आपण काढून वाचावीत. मला या ठिकाणी राजकीय भाषण करावयाचे नाही. पण 54 टक्के लोकांनी खाजगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाबाबत आपली काय भूमिका असणार आहे हे माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणामध्ये स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे. शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचे संरक्षण देण्याच्या बाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे, शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना आणणार की नाही, याबाबत सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणातून आम्हाला कळावे अशी अपेक्षा आहे. जे साठेबाज आहेत, शेतकऱ्यांचा माल घ्यावयाचा, तो माल साठवावयाचा आणि नंतर जास्त दराने विकावयाचा अशा साठेबाजाना मोक्काखाली अटक करणार की, नाही याबाबत सांगावे अशी माझी मागणी आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत न्यायालयाच्या आदेशानुसार वितरण होणार आहे की नाही, सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे निकषाप्रमाणे 13 वस्तू कमी भावामध्ये देणार की नाही याचे देखील उत्तर भाषणातून द्यावे अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, यानंतर मी राज्यातील साखर सम्राटांबद्दल बोलणार आहे. सभापती महोदय, विदर्भामध्ये कापूस पिकतो. परंतु तेथे सूत तयार केले जात नाही. विदर्भात कापूस तयार होतो आणि सूत गिरण्या मात्र पश्चिम महाराष्ट्रात आहेत. कापूस पिकविणारा आत्महत्या करतो, कापड तयार करणारा आत्महत्या करीत नाही. राज्यातील साखर सम्राटांना माझ्या माहितीप्रमाणे 20 हजार कोटी रुपयांची मदत शासनाने केली आहे, शेतक-यांना मदत दिली जात नाही. साखर कारखाने तोटयात गेले की, त्यांना शासन पैसा देते. त्यामुळे साखर सम्राट गब्बर झाले आहेत, पण साखर महाग झाली आहे. त्याची चौकशी शासन करणार आहे की नाही, त्याच्या मूळामध्ये जाणार आहे की नाही, या साखर सम्राटांना शासन किती दिवस पोसणार आहे ? साखर सम्राट कोण आहेत, ते आपल्यापैकीच नेते मंडळी आहेत. सर्वसामान्य माणसांचा पैसा या सम्राटांना देत आहे, ही सरळ सरळ लूट आहे. या साखर कारखान्यांना 2 लाख 89 हजार कोटींचे कर्ज दिले आहे. आम्ही अनेक वर्षांपासून श्वेतपत्रिकेची मागणी करीत आहोत, हा पैसा कोणाला दिला, कसा दिला त्याची माहिती प्रसिध्द करावी अशी अनेकदा मागणी केली, परंतु हे सरकार श्वेतपत्रिका काढू शकत नाही, कारण सरकारमधील नेते मंडळी उघडी पडतील. या साखर सम्राटांना आळा घालण्याचे काम शासनाकडून झाले पाहिजे.

सभापती महोदय, सबंध देशामध्ये 52 टक्के सिंचनाचे प्रमाण आहे, महाराष्ट्रामध्ये 18 टक्के सिंचनाचे प्रमाण आहे, त्यापैकी 90 टक्के सिंचन पश्चिम महाराष्ट्रात झाले आहे, राज्याच्या तुलनेत कोकणात केवळ 1 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सिंचनाच्याबाबतीत कोकणाची विदर्भापेक्षा वाईट अवस्था आहे. विदर्भात 9 किंवा 10 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यापैकी 40 टक्के पाऊस एकटया कोकण विभागात पडतो. परंतु सगळयात जास्त दुष्काळी परिस्थिती कोकणातच आहे. शिवशाही सरकार होते त्यावेळी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.रामदास कदम....

कोकणासाठी 35 पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले होते, परंतु शिवशाहीचे सरकार गेल्यावर पाटबंधारे प्रकल्पाची परिस्थिती जैसे थे झाली आहे. त्यामुळे राज्याच्या तुलनेत कोकणामध्ये केवळ 1 टक्का सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. आमच्या हातामध्ये काय आहे ? मघाशी कोणी तरी म्हटल्याप्रमाणे फावडे आपल्यासमोरच माती ओढते. ही गोष्ट खरी आहे. कोकणातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शासनाने भरीव कामगिरी करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. कोकण वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढवून द्यावी. दिल्लीला जाऊन या मंडळाच्या मुदतवाढीला मान्यता घ्यावी अशी विनंती मी सर्व कोकणवासीय सदस्यांच्या वतीने करतो. मी पुन्हा एकदा सांगतो की, शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत ते शासनाने केलेले खून आहेत, त्यामुळे या शासनाविरुध्द कलम 302 चे खटले भरुन महाराष्ट्रातील जनतेला न्याय द्यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि येथेच थांबतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

**तालिका सभापती ( श्री.रमेश शेंडगे )** : या प्रस्तावावर बोलू इच्छिणा-या एकूण 13 सन्माननीय सदस्यांची नावे आली होती, त्यापैकी केवळ 5 सदस्यांची भाषणे झालेली आहेत. अजून 8 सदस्यांची भाषणे होणार आहेत. त्यामुळे प्रत्येक वक्त्यांनी आपले भाषण मर्यादित वेळेमध्ये करावे. या प्रस्तावासाठी अडीच तास वेळ आहे. ही वेळ केव्हाच संपलेली आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेसाठी अडीच तासाची वेळ होती. या वेळेमध्ये केवळ 5 सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत.

श्री.रामदास कदम : या महाराष्ट्रामध्ये यापुढे एकही शेतक-याची आत्महत्या होणार नाही असे शासनाच्यावतीने मंत्री महोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सन्माननीय सदस्यांच्या सूचना ऐकलेल्या आहेत. अजून दोन अर्धा-तास चर्चा आहेत.

श्री. दिवाकर रावते : अर्धा-तास चर्चा उद्या किंवा परवा घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये शेतक-याच्या प्रश्नासाठी फक्त अडीच तास देणार असाल तर ते योग्य नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी आपले भाषण सुरु करावे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी राज्यातील शेतक-यांच्या शेतमालाला खर्चावर आधारित भाव मिळण्याच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त एकाच विषयावर बोलणार आहे. बाप दाखवायचा नाही तर श्राद्ध करुन मोकळं व्हायच. शेती संबंधात सतराशेसाठ विषयावर चर्चा झाली. पण आत्महत्या काही थांबत नाहीत. खूप अहवाल आले, पण आत्महत्या थांबत नाहीत. मग काय करावे लागणार आहे ? माझ्या समोर एक पान आहे. उत्पादन खर्चावर आधारित चर्चा करावयाची असल्यामुळे त्या पानाचा आधार घेऊन मी बोलणार आहे. शेतमालाला भाव मिळत नसल्यामुळे देशातील सर्व शेतकरी आत्महत्या करायला लागले आहेत. गावे उद्ध्वस्त व्हायला लागली आहेत आणि शहरे फुलायला लागली आहेत. मी माझे भाषण थोडक्यात संपविणार आहे.

सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी की शेतमालाच्या उत्पादन खर्चामध्ये 23 बाबीची चर्चा झालेली आहे. यातील पहिली बाब म्हणजे रोजंदारी. आम्ही ज्वारी पिकविणा-या भागातील असल्यामुळे त्या पिकाच्या संदर्भात बोलतो. माझ्याकडे जी माहिती आहे त्यामध्ये असे सांगितलेले आहे की, पुरुषाची रोजंदारीची मजुरी 84 रुपये आणि महिलेची मजुरी 50 रुपये. सतराशेसाठ गोष्टींची चर्चा करण्या पेक्षा, पोट हालत नाही, पाय हालत नाही, हासत नाही, बोलत नाही, असे सांगण्या पेक्षा सरळ मेलं म्हणून सांगा. तेव्हा काय झालं, ते मी सांगणार आहे. सभापती महोदय, कारखान्यामध्ये, सरकारी नोकरीमध्ये शेती सोडून कोणत्याही व्यवसायामध्ये चतुर्थश्रेणी कामगाराला जी मजुरी दिली जाते ती मजुरी जर शेतीमध्ये काम करणा-या मजुराला दिली गेली तर गावामध्ये पैसे येतील. नाही तर गावामध्ये पैसे येणार नाहीत. गावामध्ये पैसे आले तरच गाव राहील, शेती राहील आणि माणसे जगतील. नेमके तेच होत नाही. रोजंदारीवरची मजुरी 84 रुपये धरलेली आहे. शेतामध्ये ज्वारीच्या चार ओळी आणि तुरीच्या दोन ओळी पेरण्या होतात. ज्वारीचा उत्पादन खर्च काढताना मजुराची मजुरी 84 रुपये धरलेली आहे आणि तुरीचा उत्पादन खर्च काढताना 79 रुपये मजुरी धरलेली आहेत. रान तेच, माणसे तीच, दिवसभर तेच काम करतात. मग मजुरीच्या दरात फरक कशाला करता ? महाराष्ट्रामध्ये 79 रुपये मजुरी कोठे आहे ? या देशातील गावे उद्ध्वस्त करण्याचे पाप घडत आहे. गावे उद्ध्वस्त झालेली आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 19:40

श्री.पाशा पटेल....

आता जे 70 सैनिक, 64 सैनिक, 14 सैनिक नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामुळे मरायला लागले ते यातूनच मरायला लागले आहेत. उद्या कुठपर्यंत येईल सांगता येत नाही. लोकांच्या भुकेची हाक ऐकली पाहिजे. तुम्ही उत्तर देणार आहे. उत्तर लांबवा. हे खरे आहे की खोटे आहे बघा. तुमचीच आकडेवारी. कशा पध्दतीने केली याचा विचार करा. मी आमदार होऊन आलो. परंतु चार वर्षापासून प्रत्येक अधिवेशनात एक गोष्ट सांगत आहे. आजपर्यत महाराष्ट्रात, देशात कमीत कमी एक हजार सभांमध्ये, अख्ख्या गावाच्या सभेमध्ये, शेतकऱ्यांच्या सभेमध्ये सांगतो. वर्षाला बैल किती लागतात? आमचा अंगठे बहाद्दर माणूस सुध्दा म्हणतो, 365 दिवस बैल लागतात. तुम्ही शेतकरी. मी शेतकरी आहे. शेतामध्ये बैल वर्षभर लागतात. सन्माननीय राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर यांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही फक्त 13 दिवस धरले आहेत. बाकी काळामध्ये बैलाचे करायचे काय ते सांगा. जर या राज्याचा एक कॅबिनेट मंत्री हे खरे सांगत असेल की, त्याला खायला लागते, राखायला माणूस लागतो, पेंड द्यावी लागते. तुम्ही 13 दिवसाची मजुरी धरली तर बाकीच्या दिवसात बैलाचे करायचे काय? का कुंभाराच्या गाढवासारखे दिवसभर काम करुन घ्यायचे आणि रात्री वाऱ्यावर सोडायचे? तुम्ही मरेपर्यंत मंत्री रहा. मुख्यमंत्री व्हा. आमच्या शुभेच्छा आहेत. परंतु हे पाप करुन ठेवले आहे आमच्या पूर्वजांनी. आमच्यात खुट्टी घातली. ती काढू नका. परंतु एवढे तरी सांगा की, ही चूक झाली. हे मान्य करा. शेती व्यवसाय जगवायचा का? शेती पिकवायची का? हे पाप कोणी केले? 13 दिवस बैल लागतो म्हणे. हा शास्त्रज्ञ समोर आणा हो. हक्कभंग दाखल करु. या राज्यातील, या देशातील कोण अधिकारी सांगतो, 13 दिवस बैल लागतो. कोण शास्त्रज्ञ आहेत? आणा त्याला. मारा फटके. आपण त्याच्या जिवावर याठिकाणी आलो. सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना मी सांगू इच्छितो की, आपण यांच्या जिवावर निवडून आलो. त्यांच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळाली. आपण त्याच्या जिवावर उभे आहोत. त्याच्याबद्दल अशी बेईमानी होत आहे याचा विचार करण्याची गरज आहे. या दोन गोष्टी झाल्या. तिसरी गोष्ट म्हणजे सेंद्रिय खत. ज्वारीला एका हेक्टरला 2.34 क्विंटल खत. कोणत्या कॅल्क्युलेटरवर मोजले हो. एका हेक्टरला 2.34 क्विंटल शेणखत लागते? काय सांगितले? यांनी सांगितले की, एका हेक्टरला 2 क्विंटल 34 किलो शेणखत लागते. किंमत 243 रुपये प्रती बैलगाडी. मी घेतो. एक हजार ट्रक घेतो. 243 रुपयात मिळते का? याला फासावर लटकवा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 19:40

श्री.पाशा पटेल....

कोण आमचे नरडे दाबतो आहे? कोण आमच्या शेतकऱ्याला उद्‌ध्वस्त करायला लागले आहे? त्या पाप्याला, त्या नालायकाला शोधा. त्या दुश्मनाला शोधा. त्याने सांगितले की, एका हेक्टरला 2.34 क्विंटल खत लागते. एका हेक्टरमध्ये. काय काय प्रकार आहे? बैलगाडीसाठी सांगितले, 243 रुपये. एका बैलगाडीमध्ये टोपल्या 40 बसतात. 40 टोपल्या टाकल्या की बैलगाडी भरते. 2.5 हेक्टरसाठी 100 टोपल्या. 2.5 हेक्टरसाठी किंमत किती झाली? एक लाख चौ.फूट. एक लाख चौ.फुटासाठी 100 टोपल्या टाकायच्या. कोण आहे गबरु? कोण आहे हा महामानव? हे सँपल दाखवतो का? टोपलीला टोपली चिकटून टाकावी लागते......

(नंतर 4टी.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ........

....अडथळा......पाच मंत्री जरी आपल्यासारखे असले या राज्यात तरी लोक तुमचे फोटो डोक्यावर घेऊन फिरतील.पण यात जे असत्य स्वरुपाचे दिलेले आहे हा नेमका काय प्रकार आहे ? मला असे वाटते की, या अधिकाऱ्यांना माहीत नसेल आणि माहीत असून जर त्यांनी केले नसेल, शेतकऱ्यांचा फायदा होऊ देत नसतील तर त्यांना देशद्रोहीच म्हणावे लागेल एवढे हे मोठे पाप आहे. आता 500 रुपये गाडीप्रमाणे शेतकऱ्याला शासनाने भाव ठरविला आहे त्याप्रमाणे फक्त 2.34 किलो एवढेच शेणखताचे प्रमाण शासनाने ठरविले. परंतु एका हेक्टरला किमान 20 गाडया तरी शेणखताच्या लागतात ते प्रमाण शासनाने एवढे कमी ठरविलेले आहे, याबाबत मंत्री महोदयांनीच उत्तर द्यावे आणि सांगावे की कशाच्या आधारे या पुस्तकात हे प्रमाण ठरविलेले आहे ? कसा काय हिशेब केला आहे याचे स्पष्टीकरण दिले पाहिजे. हे आकडेवारी कोण काढते ? हे सुध्दा त्यांनी उत्तरात सांगावे. नाही तर मंत्री महोदयांनी सांगावे की, आमची चूक झालेली आहे की गेली 60 वर्षे या शेतकऱ्यांवर, खेड्या-पाड्यांवर आम्ही गाढवाचा नांगर फिरविण्याचे काम केले आहे. हे राज्य, हा देश आपल्याला वाचवावयाचा असेल, गावातील लाखो लोक, जे तुमच्या आमच्यावर प्रेम करतात त्यांना वाचवावयाचे असेल, त्यांचे व्यवसाय वाचवावयाचे असतील तर ही झालेली चूक सुधारावीच लागेल.

यानंतर याच पुस्तकातील 15 व्या नंबरवर जो मुद्दा दिलेला आहे तो म्हणजे जमिनीचे भाडे. मी थोडेच मुद्दे सांगणार आहे, सर्वचे सर्व म्हणजे 23 मुद्दे सांगत बसलो तर मग वाटच लागणार आहे. आज राज्यात कोठेही खंडाने जमीन मिळत नाही. या पुस्तकात मात्र जमिनीच्या खंडापोटी जो आकडा दिलेला आहे तो 3839.98 रुपये एका हेक्टरला सांगितले आहे. असे असेल तर मी उद्या एक हजार हेक्टर जमीन खंडाने घेतो. वास्तवात मात्र किमान 5 हजार रुपये एका एकराला म्हणजेच हेक्टरसाठी 12 हजार रुपये द्यावे लागतात, एवढे दर आहेत. अशा प्रकारे माझ्या मतदाराला, माझ्या नातेवाईकाला, माझ्यावर प्रेम करणाऱ्याला या शासनाने आयुष्यातून उठविण्याचे काम केले आहे. दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे.......अडथळा.........मी इकडचे-तिकडचे काहीच बोलत नाही, टाईम पास करीत नाही त्यामुळे सभापती महोदय आपल्याला ऐकावेच लागेल, बेल वाजवून चालणार नाही. मला काहीच माहीत नाही, मी आंधळा, बहिरा आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ..........

मुका आहे. माझ्या बापावर, माझ्या गावातील लोकांवर, खेड्या-पाड्यातील लोकांवर जो अन्याय झालेला आहे त्या सर्वांच्या खाली शासनाने हा टाईम बॉम्ब लावलेला आहे. अन्यथा एक दिवस अशी वेळ येईल की, जळगांव जिल्ह्यातील किनगांवच्या शेतकऱ्याने ज्याप्रमाणे लिहून ठेवले होते की, एक दिवस हे नांगर दाबणारे हातच या पुढाऱ्यांची नरडी दाबल्याशिवाय राहणार नाही.

महोदय, यानंतरचा मुद्दा म्हणजे कौटुंबिक मानवी श्रम हा मुद्दा तर अतिशय भयानक आहे. समजा एका शेतकरी कुटुंबात पाच माणसे आहेत. त्याच्या घरातील माणसे मजुरीवर जात नाहीत तर ते आपल्याच शेतावर काम करतात, वर्षभर ढोरावाणी तिन्ही शिफ्टमध्ये आपल्याच शेतात काम करतात.......अडथळा........मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते सुध्दा खरं सांगत आहेत.....अडथळा.....आमच्याजवळ यायला ते अजून बरेच लांब आहेत. मराठवाड्यात यायला अजून वेळ आहे....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

सभापती महोदय, मला आपल्याला अजून एक गोष्ट सांगावयाची आहे ती अशी की, या पुस्तकात 20.38 दिवस पुरुषाची मजुरी आणि 14.63 दिवस कौटुंबिक मजुराची मजुरी पकडलेली आहे. पुरुष मजुराची मजुरी 84 रुपये धरलेली आहे तर बाईची मजुरी 50 रुपये धरलेली आहे. परंतु आपल्या रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुराची मजुरी 125 रुपये आहे. रोजगार हमी योजनेच्या मजुरापेक्षा आमच्या शेतक-याची अवस्था तुम्ही वाईट करुन टाकलेली आहे, हालत खराब करुन टाकलेली आहे. त्यामुळे राज्यातील शेतक-याला कसे काय चांगले दिवस येतील ? हे शासन शेतक-याच्या शेतमालाला योग्य भाव देत नसल्यामुळे शेतकरी विनाशाकडे फेकला जात आहे. या कौटुंबिक मजुराची मजुरी ही 365 दिवस पकडली तरच जमेल नाही तर मुळीच जमणार नाही. आम्हाला विमा वगैरे तर काहीच मिळत नाही. आता विमा सुध्दा राजकीय झाला आहे. ज्या जिल्हयाचा नेता पॉवरफूल त्याच जिल्हाला विमा मिळतो आणि ज्या जिल्हयाचा नेता पॉवरफूल नाही त्या जिल्हयाला विमा मिळतच नाही.

सभापती महोदय, चार वर्षातूनच एकदा तरी दुष्काळ पडतो, ओला दुष्काळ पडतो, सुका दुष्काळ पडतो, अवेळी पावसामुळे शेतीचे नुकसान होते, कधी रोगराईमुळे शेतीचे नुकसान होते. त्यामुळे चार वर्षातून एखाद्या वर्षी तरी शेतक-याच्या शेतीचे पूर्ण नुकसान होत असते . चार वर्षातून एखाद्या वर्षी तरी शेतक-याच्या शेतीचे पूर्ण नुकसान होत असते. समजा एखादी बल्ब बनवणारी कंपनी असेल व या कंपनीमध्ये जर दिवसाला 100 बल्ब तयार होत असतील व त्यातील 25 बल्ब फुटले तर मालक असे म्हणत नाही की, फुटले तर फुटू दे. तर हा कंपनी मालक फुटलेल्या 25 बल्बचे पैसे उरलेल्या 75 बल्बवर आकारतो, त्यामुळे शेतक-याच्या चार वर्षातील एका वर्षात जे नुकसान होत असते ते नुकसान चार वर्षात लावले पाहिजे. ज्या वर्षी दुष्काळ असेल, शेतात काम नसेल त्यावर्षीचे नुकसान त्या चार वर्षामध्ये धरले पाहिजे. तुम्हाला साखर कारखाना कसा चालतो हे माहिती आहे कारण तुम्ही साखर कारखान्याचे संचालक आहात. साखर कारखाना 12 महिन्यातून चार महिने सुरु असतो व 8 महिने साखर कारखाना बंद असतो. बंद असलेल्या 8 महिन्यामध्ये साखर कारखान्यातील यंत्राला ऑईलींग, ग्रिसींग, रिपेअरिंग केले जात असते. तसेच आमच्या शेतीचेही धरले पाहिजे व त्यादृष्टीने भाव काढला पाहिजे.

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

सभापती महोदय, माझ्याकडे 40 एकर जमीन आहे तरी सुध्दा मला 1972 च्या दुष्काळात रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करावे लागले होते. शेतक-याकडे 50-100 एकर जमीन असली आणि दुष्काळ पडला तर त्या शेतक-याला रोजगार हमी योजनेच्या कामावर जाऊन मजुरी केल्याशिवाय गत्यंतरच नसते. आमच्या शेतक-याला भविष्य निर्वाह निधी मिळत नाही, आरोग्य भत्ता मिळत नाही, मुलाला शिकवण्यासाठी पैसे मिळत नाही, हक्काची रजा नाही परंतु तुमच्या सर्वांची मजा आहे. तुम्हाला शनिवारची रजा मिळते, रविवारची रजा मिळते, ओव्हर टाईम मिळतो. परंतु माझ्या शेतक-याला ओव्हर टाईम नाही की, कोणतीही सुट्टी मिळत नाही.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

एका आईच्या पोटी जन्मलेला दोन मुलांपैकी एकाला नोकरी लागली. दुसरा निवडून आला. म्हणजे मजाच मजा. जो गावात राहिला त्याची वाट लागली. ती वाट लागायची नसेल तर आपल्याला शेती मालाच्या उत्पादन खर्चामध्ये विचार करणे गरजेचे आहे. मी येथे आता वाचून दाखविले आहे. यातील सर्वात मोठा हरामीपणा मी आपल्याला वाचून दाखविणार आहे. हा भयानक हरामीपणा आहे.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : काही असंसदीय शब्द आपल्या भाषणात येत आहेत ते मी कामकाजातून काढून टाकतो.

श्री.पाशा पटेल : आपल्याला जे काही काढायचे ते काढून टाकावे. आमचे काय राहिलेले आहे ? मी येथे दोन तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगणार आहे. आपले पाप किती भयानक आहे ते पहा. मी भयानक प्रकरण सांगणार आहे. आपण बैलामध्ये मारले, खतामध्ये मारले, विम्यात मारले, कौटुंबिक मजूर म्हणून मारले, मजुरीत मारले. मारून मारून भाव जाहीर झाले. ते किती झाले. मी या वर्षाचे म्हणजे 2009-2010 चे भाव सांगतो. राज्य सरकारने धानाला भाव द्यावा असे मारून मारून केंद्र सरकारला सांगितले. त्यांनी किती दिला ते सांगणार आहे. धानाला 1190 रूपये भाव द्यावा असे सांगितले. एवढे करून सुद्धा केंद्र सरकारने 950 भाव दिला. ज्वारीसाठी 1101 रूपये भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 840 रूपये भाव दिला. बाजरीसाठी 1224 रूपये भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 840 रूपये भाव दिला. मकासाठी 765 रूपये भाव द्यावा असे सांगितले पण केंद्राने 840 रूपये भाव दिला. फक्त याच्यातच उलटे झाले. त्याने यात कशी काय चूक केली आणि भाव वाढवून दिले. हे देताना अधिकारी कोण होता. भूईमूगासाठी 2753 भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 2100 भाव दिला. तूर साठी 2769 रूपये भाव द्यावा असे सांगितले पण केंद्राने 2300 भाव दिला. मूग साठी 3414 रूपये भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 2760 रूपये भाव दिला. उडिदसाठी 3400 रूपय भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 2520 रूपये भाव दिला. सोयाबीनसाठी 1990 रूपये भाव द्यावा असे सांगितले पण केंद्राने 1390 रूपये भाव दिला. सूर्यफुलासाठी 2383 रूपये भाव द्यावा असे सांगितले, पण केंद्राने 2250 रूपये भाव दिला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

तीळसाठी 3555रूपये भाव द्यावा असे सांगितले पण केंद्राने 2850 रूपये भाव दिला. मी सगळ्या पिकाचे भाव सांगत बसणार नाही. अशा प्रकारे कमी भाव काढण्यात आले आहेत. मी आपल्या मार्फत सरकारला सांगणार आहे की, गाव वाचवा, शेतकरी वाचवा. बोलून बोलून माझी जीभ झिजली आहे. मी फक्त एकच सांगणार आहे की, ऐकणाऱ्यांनी लाजावे नाही तर सांगणाऱ्यांनी लाजावे. लाज आहे का कुणाला तरी. मी माझ्या मनाचे काहीही एक सांगितलेले नाही. मी शासनाच्या पुस्तकातीलच माहिती दिलेली आहे. ही पुस्तके मी जाऊन आणली. ही पुस्तके आणायला गेल्यानंतर मला तिथले सगळे जण म्हणाले की, इथे आलेला हा पहिल्याच आमदार आहे. ह्या पुुस्तकाचा कागद आपण बघावा. किती निकृष्ट आहे. श्री.देवकर साहेब आपण निवडून आला आहात. आपण नवीन आहात. जास्त वेळा निवडून येतात ते घोटून घोटून तयार होतात. त्यांना काहीही वाटत नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ SBT/ प्रथम श्री.भारवि 20.00

श्री.पाशा पटेल .........

तुम्ही कृषी राज्यमंत्री म्हणून नव्याने आलेला आहात, तेव्हा मी ज्या काही बाबी सांगितल्या आहेत त्यातील दोन चार बाबीसबंधी अंमलबजावणी करता येते काय, याचा आपण प्रयत्न करावा.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरी एक महत्वाची गोष्ट साांगावयाची आहे. त्याबद्दल मी काही बोलणार नव्हतो परंतु श्री.बबनराव पाचपुते यांनी मला ज्वारीसबंधी उल्लेख करण्यास सगितले होते. त्यामुळे त्यासंबंधी मी उल्लेख करणार आहे. ज्वारी हा माझा आवडता विषय आहे पंजाबमध्ये मोठया प्रमाणावर गहू पिकतो आणि पंजाबमधील सरदारजी जगभर गेला आणि जातांना तंदुरी घेऊन गेला. त्यामुळे त्या ठिकाणी गहूसुध्दा गेला. महाराष्ट्रातील 80 टक्के हॉटेल्स अशी आहेत की, ज्या ठिकाणी ज्वारीची भाकरी मागितली तर असे सांगितले जाते की येथे ज्वारीची भाकरी मिळणार नाही. अशी महाराष्ट्रातील 80 टक्के हॉटेल्स आहेत. मराठी माणसाने काही बोलले तर राग येतो. परंतु जो हॉटेलवाला ज्वारीची भाकरी मिळणार नाही, असे सांगतो त्याला एक लगावली पाहिजे. परंतु तसे कोणीही करीत नाही. आता ज्वारीचे पीक देखील कमी कमी होत चालले आहे. जो ज्वारी पेरतो आणि खातो तोच ज्वारीसंबंधी बोलतो बाकीचे मात्र त्यासंबंधी काहीही बोलत नाही. सभापती महोदय, परवाच्या दिवशी पुण्यातील एक पुस्तक पंडिताने असे सांगतले की राज्यामध्ये ज्वारीचा पेरा वाढला आहे. 1960 सालापासून कोणत्या जिल्हयात ज्वारीचा पेरा किती आहे, याची माहिती देणारी राज्य शासनाची एक पुस्तिका शोधून काढली होती. त्या पुस्तकेत दिलेल्या माहितीमध्ये कोणत्याही जिल्हयात ज्वारीचा पेरा वाढला असल्याचे मला दिसून आलेले नाही. उलट दिवसेंदिवस ज्वारीचा पेरा कमी कमी होत चालला आहे. 1951 साली 17 कोटी हेक्टर्सवर ज्वारीचा पेरा होता आणि आता हे प्रमाण 7 कोटी हेक्टर्सवर आलेले आहे. त्याचे मला अतिशय वाईट वाटते. गावामध्ये कडबा मिळत नाही. त्यामुळे कोणताही शेतकरी जनावरे ठेवण्यास तयार होत नाही. सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम बोलतांना असे म्हणाले की, ग्रामीण भागात जनावरे नाहीत. मी त्यांना सांगू इच्छितो की, कडबा नाही म्हणून जनावरे नाहीत. 400 आणि 500 रुपये जर ज्वारीला भाव मिळत असेल तर शेतकरी ज्वारी कशी काय पेरतील.?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (बसून) : पेंढीसुध्दा मिळत नाही

श्री.पाशा पटेल : अगोदर शेतकरी ज्वारीच्या पिकाकडे लक्ष देतील आणि त्यानंतर पेंढी मिळेल. परंतु ज्वारीच जर पेरली नाही तर पेंढी मिळणार नाही. ज्वारीला योग्य भाव मिळत नसल्यामुळे ज्वारीचा पेरा कमी होत चालला आहे. एखाद्या शेतक-याने जर ज्वारी लावली तर त्याला मुलीचे लग्न करता येत नाही, चांगले कपडे घालता येत नाही. त्यामुळे या चर्चेच्या निमित्ताने मी एका गोष्टीचा शासनाला गंभीर इशारा देऊ इच्छितो. ज्वारीपासून काय निर्माण करावयाचे हे शास्त्रज्ञांनी वा अन्य कोणीही ठरवावे. परंतु ज्वारीपासून काही तरी तयार केलेच पाहिजे. याचे कारण असे की सध्या ज्वारीपासून काहीही तयार होत नाही. म्हणून ज्वारी पोरकी आहे. या ज्वारीपासून दारुच तयार करण्यात यावी, असे माझे म्हणणे नाही. आपल्या राज्यात आज दारुचे शॉर्टेज आहे काय ? राज्यामध्ये एवढी दारु तयार झालेली आहे की, त्याचा साठा कोठे करावा हे कळेनासे झाले आहे. जर दारुचे शॉर्टेज असते आणि ज्वारीपासून दारु करावी, असे जर मी म्हटले असते तर मला गोळी घालायला पाहिजे होती. परंतु दारुचे शॉर्टेज अजिबात नाही. जे कोणी दारु पितात त्यांची खूपच मजा आहे. ऊसाच्या मळी पासून तयार केलेली दारु जर प्यायलो तर आतडयांना त्रास होतो आणि ज्वारीपासून तयार केलेली दारु प्यायल्यानंतर मात्र मजा येते असे सांगितले जाते. म्हणून जे कोणी दारु पितात त्यांचे भले व्हावे. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, ऊसापासून तयार होणा-या मळीचा वापर इथेनॉल वा अल्कोहोल म्हणून केला जावा आणि पेट्रोल वा डिझेलमध्ये ते मिसळावे. विविध कारखान्यांमध्ये तसेच सौंदर्य प्रसाधनांमध्ये त्याचा वापर करावा, त्याबद्दल आमचा काहीही विरोध नाही. परंतु त्यासबंधीचा राग धरुन ज्वारीच्या इतर उत्पादनाला कोणीही विरोध करता कामा नये. ही माझी शासनाला कळकळीची विनंती आहे. मी काल येऊन येथे बोलतो अशातला भाग नाही. मी काही उपटसुंभ्या नाही. गेली तीस वर्षे शेतकरी आंदोलनासाठी मी रक्त सांडले आहे. जेथे जाऊन मी शेतीसबंधीचे अर्थशास्त्र मांडलेले नाही, असे देशातील एकही राज्य राहिलेले नाही. मी शासनाला या चर्चेच्या निमित्ताने अशी विनती करतो की माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्याचे कोणी पाप करता कामा नये, तसेच या गोष्टीची

..3...



VTG/ MMP/ KGS/ SBT/ 20.00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल .........

मजा घेण्याच्या भानगडीतसुध्दा कोणी पडता कामा नये. 'आपणाशी जे जे ठावे ते इतरांना सांगावे, शहाणे करुन सोडावे सकळजण' याप्रमाणे मी सांगितले आहे. ज्यांना शहाणे व्हावयाचे असेल त्यांनी शहाणे व्हावे बाकीच्यांनी एंड्रीन वा इंडोसल्फान प्यावे. आपल्याकडील ज्ञान दुस-याला देणे हे माझे काम आहे.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी शासनाला अत्यंत नम्रपणे विनंती करतो की, या चर्चेच्या निमित्ताने मी जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्याचे उत्तर माननीय मत्री महोदयांनी दिले पाहिजे. श्री. नरेंद्र जाधव यांची एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. मी पाऊण तास सगळे मुद्दे आणि कागदपत्रे श्री नरेंद्र जाधव यांच्या समोर मांडले होते. मात्र माझ्याकडील सगळया मुद्दा पैकी एकाही मुद्यांचा त्या अहवालात उल्लेख केलेला नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

माझे बिघडले कुठे ? हे तर आरशासारखे स्वच्छ आहे. हे जर सुधारले तर मी सुधारणार आहे, शेतकरी वाचणार आहे. अन्यथा शेतकरी वाचणार नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना निवेदन करणार आहे की, हा गंभीर विषय आहे. मी जे याठिकाणी बोललो त्याचे पुरावे माझ्याकडे आहेत, आपण हवे तर ते खोटे आहेत असे म्हणा. किंवा "येस" तरी म्हणा, परंतु आपण काहीतरी म्हटलेच पाहिजे. आज जर तुम्ही बोलला नाहीतर माझे काम पूर्ण वेळ बोंबलण्यचे आहे. मी तुमचे नाव घेऊन महाराष्ट्रभर हिंडेन. हे तुमचे मारेकरी आहेत असे सांगेन. तुम्ही आज एक गोष्ट सांगा, हे जे काही लिहिलेले आहे ते सर्व खरे आहे. यामुळेच शेतीचे नुकसान झाले आहे, एवढेच म्हणा. आम्हाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव देऊ नका. फक्त आमचे चुकले एवढे तरी म्हणा. तरीसुध्दा महाराष्ट्रातील जनता तुमचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही, एवढेच मी याठिकाणी आपल्या माध्यमातून निवेदन करतो आणि इथेच थांबतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, देशाच्या उन्नतीसाठी काहीतरी उपाय केले पाहिजेत अशाप्रकारचे विधान या देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहनसिंग यांनी दोन-तीन वर्षापासून अनेक वेळा केले आहे. त्याचप्रमाणे नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. अहलुवालिया यांच्या "एनएनएस पहाणी व निष्कर्ष" या अहवालामध्ये भारतामध्ये 45 वर्षावरील शेतकऱ्यांनी शेतीचा व्यवसाय सोडल्याचे व अन्य जगण्याचे साधन शोधण्याचे काम केले आहे. असा हा केंद्र सरकारचा अहवाल आहे. सर्वप्रथम या कोरडवाहू शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे,ओलिताच्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. त्यामुळे केंद्राची व राज्याची 60 टक्के मदत पश्चिम महाराष्ट्राकडे गेलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालावरील खर्चावर आधारीत भाव मिळण्याबाबत माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यानी ज्वारीचे उदाहरण सांगितले. विदर्भाच्या पूर्व भागामध्ये आणि कोकणामध्ये मोठया प्रमाणावर भात शेती होते. धान उत्पादक शेतकऱ्याचा एक एकराला येणारा खर्च किती येतो? साधारणत: नर्सरी टाकल्यानंतर, रोपे टाकल्यानंतर शेतावर बैलजोडी फिरविण्याचे, नांगरण्याचे काम करतो त्याला आम्ही चिराटा म्हणतो, दुनाळा म्हणतो. त्यानंतर चिखल करुन व रोपे काढून ती लावली जातात त्याठिकाणी रासायनिक मिश्रखते टाकली जातात. आणि 15 दिवसानंतर यूरीया खताचा त्यावर मारा केला जातो. त्यानंतर जो कचरा येतो त्याचे निदान केले जाते. या सर्व प्रक्रियेनंतर धान हळू हळू वाढायला लागते, उत्पन्न यायला लागते. त्यानंतर धान कापणे, मळणी करणे, चोळणी करणे या सर्व गोष्टी करीत असतांना त्यामध्ये किटकनाशकांचा वापर केला जातो. धानाचा ऱ्हास झाला असेल तर थिमेटचा वापर केला जातो, करपा रोग झाला असेल तर करप्याचे औषध दिले जाते, लष्करी अळी आली असेल तर त्यावरील औषधांची फवारणी केली जाते. हे सर्व केल्यानंतर प्रत्यक्षात शेतकऱ्याला एका एकरामध्ये कमीत कमी 15 क्विंटल उत्पादन मिळते. सरकारचा भाव 950 रुपये क्विंटल आहे, त्यामध्ये 50 रुपये बोनसचे जरी धरले तरी आज एक हजार रुपये क्विंटल या भावाने 15 क्विंटलचे 15 हजार रुपये होतात. आणि एका एकराला येणारा उत्पादन खर्च किमान 15 ते 20 हजार रुपये असतो. याचा अर्थ हा धान उत्पादक शेतकरी तोटयामध्ये शेती करीत आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. केशवराव मानकर....

हे खरे आहे. परंतु शेती शिवाय त्याच्याकडे दुसरा धंदा नाही. जोपर्यंत उत्पादन खर्चावर आधारीत शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळणार नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

तोपर्यंत शेतकऱ्यांचा उद्धार होऊ शकत नाही, तो रसातळाला जाईल. आज पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ज्याप्रमाणे आत्महत्या करतो, त्याप्रमाणे विदर्भातील आणि कोकणातील शेतकरी देखील आत्महत्या केल्याशिवाय रहाणार नाही.

सभापती महोदय, रासायनिक खताच्या बाबतीत सांगावयाचे तर अजून मे महिन्यामध्ये रोहिणी नक्षत्र सुरु झाल्यावर रासायनिक खतांची गरज भासणार आहे. पण सध्या महाराष्ट्रात किती साठे उपलब्ध करुन दिलेले आहेत. किती मिश्र युरिया आणि डीएपी.चा भार उचलला आहे. मला सांगावयाचे आहे की, रासायनिक खताचे दहा टक्क्यांनी भाव वाढलेले आहेत. आज युरिया खताची एक बॅग 275 रुपयांना असून, त्यावर आता वॅट लागणार आहे. 250 रुपये भाव होता, तेव्हा एका बोरीवर होलसेलरला फक्त 9 रुपयांचा मुनाफा होत असे. आता भाव वाढलेले आहेत. जेव्हा युरियाचा भाव 72 रुपये होता, तेव्हा 90 रुपये मिळत होते. आज 280 रुपयांची बोरी होईल तरीही त्याला 90 रुपये इतकाच मुनाफा मिळणार आहे. मात्र दरवर्षी खर्च वाढत आहे. मग काळाबाजार होणार नाही तर काय होणार ? ही कोणती नीती आहे ? मी यापूर्वीही माझ्या भाषणामध्ये उल्लेख केलेला होता की, यासंबंधात विचार केला पाहिजे.जर रासायनिक खत घ्यावयाचे असेल तर त्या शेतकऱ्याला दुकानदार कसा न्याय देणार आहे ? तो ब्लॅक करणार नाही तर काय करणार ? नाहीतर तुम्ही दोन-चार-पाच दुकानदार सीज् करुन पहावे, मी तुम्हाला आवाहन करतो. मी त्यांच्यावतीने हाय कोर्टामध्ये जाऊन जनहित याचिका दाखल करीन आणि त्यांना न्याय मिळवून देईन. अरे, किती अन्याय करणार आहात ? त्याला सेल्स् टॅक्स भरावा लागतो, इन्कम टॅक्स भरावा लागतो. तो कुठून देणार आहे ? कारण जेव्हा ऑडीट होते, तेव्हा पाच टक्के मुनाफा जोडला जातो. परंतु प्रत्यक्षात आपण पाच टक्के काय तर एक टक्का सुध्दा देत नाही आणि ही गोष्ट खरी आहे. मी जे बोलत आहे, ते माझ्या प्रॅक्टीकल अनुभवातून बोलत आहे. कारण माझाही स्वत:चा हा व्यवसाय आहे आणि 1978 पासून मी हा व्यवसाय करीत आहे. कशा प्रकारे विकावयाचे ? कोणत्या इमानदारीने विकावयाचे ? मग 100 रुपये ब्लॅकमध्ये विकणार नाही तर काय करणार ? अशी होलसेलरची अवस्था आहे, तर रिटेल दुकानदारांची काय अवस्था असेल? जर त्यांनी होलसेलर कडून माल घेतला आणि रिटेलसाठी दिला . . ..

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

. . . .4 वाय-2

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माझे भरपूर मुद्दे आहेत आणि एवढया लवकर भाषण पूर्ण होणार नाही. नाहीतर उद्या सकाळी ही चर्चा पुढे सुरु करावी. हा अत्यंत महत्वाचा प्रस्ताव आहे आणि आम्ही याचे प्रस्तावक आहोत तर आम्हाला याठिकाणी बोलण्याची संधी दिली पाहिजे. सर्वांना बोलण्याची संधी दिली, मग माझ्याबाबतीत असे का ? मी शेवटचा वक्ता असून माझ्या मुद्यांबाबत लवकरात लवकर भाषण करीत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकरसाहेब, आपल्याला ही चर्चा अडीच तासामध्ये संपवावयाची आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, दीड तासाची चर्चा चार-चार तास चालते. मग अडीच तासाची चर्चा पाच तास चालली तर काय वाईट आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पाच तास संपलेले आहेत.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, पाच तास होऊ द्या. हा शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्याला वाचवावयाचे असेल तर मग रासायनिक खताच्या विक्रेत्याला लाभांश मिळाला पाहिजे, होलसेलरला, रिटेलला मिळाला पाहिजे आणि आपण काळाबाजार थांबविला पाहिजे. नाहीतर शासनाने सर्व दुकानांचे परवाने रद्द करुन, स्वत:हूनच शेतकऱ्याला फर्टीलायझर दिले पाहिजे असे मला याठिकाणी आवाहन करावयाचे आहे. शेततळी . . . .

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सदनामध्ये सांगत आहेत की, खताच्या व्यवहारामध्ये . . ..

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, ते शेतकऱ्यासाठीच आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ते ब्लॅक मार्केटने विकल्याशिवाय परवडत नाही असे माननीय सदस्य सांगत आहेत. परंतु असे रेकॉर्डवर येऊ नये.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, ते प्रॅक्टीकली . . ..

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य येथे सांगत आहेत आणि ते याचे समर्थन करीत आहेत की, ब्लॅकने विकल्याशिवाय ते खतवाल्याला परवडतच नाही. तर ते रेकॉर्डवर राहू नये.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, कारण शेवटी लागणारा वॅट,गोडाऊनचे भाडे तसेच जेवढे दिवस रक्कम वापरली तेवढया दिवसांचे व्याज, ट्रान्सपोर्ट या सर्व गोष्टींचा विचार करावा.



APR/ SBT/ MMP/ 20:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (खाली बसून) : मग ते करताच कशासाठी ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, याबाबतीत मूल्यनिर्धारण करा. व्यापाऱ्यांना योग्य मुनाफा द्या आणि चांगल्या भावामध्ये, उचित भावामध्ये शेतकऱ्यांना रासायनिक खत मिळाले पाहिजे हे खरे आहे . . . .

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : सन्माननीय सदस्यांनी . . . .

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, आपण मला डिस्टर्ब करीत आहात. मी काय करणार.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, मी शेतकऱ्यांच्या हितासाठी बोलत आहे. मी माझ्यासाठी बोलत नाही. शेतकऱ्यांना ब्लॅकमध्ये फर्टीलायझर मिळू नये म्हणून जर दुकानदार देऊ शकत नसतील तर राज्य शासनाने आपल्यामार्फत शेतकऱ्यांना खते पुरवावीत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

किटकनाशके पुरवावीत, यामध्ये मी काय वाईट बोललो. जर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल तर हे केले पाहिजे. नाही तर वितरण प्रणालीमध्ये सुधारणा कली पाहिजे अशी माझी सूचना आहे.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, सभागृहाच्या माहिती करिता सांगतो की, शेतकऱ्यांच्या खताच्या बाबतीत 110 हजार कोटी रुपयाची सबसिडी केंद्र सरकार देते. वाहुकीपर्यंतची सगळी सबसिडी देऊन दुकानदारापर्यंत खत पोहचविण्याचे काम सरकार करीत आहे. त्यामुळे काळा बाजार केला पाहिजे असे सांगणे गैर आहे.

श्री. केशवराव मानकर : मी काळया बाजाराच्या विरोधात आहे. मी त्याचे समर्थन करीत नाही.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून बघावे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी संगितले की, मागच्या अनेक वर्षापासून ते खत विक्रीच्या व्यवसायामध्ये आहेत. स्वत: तो व्यवसाय करतात त्यामुळे खत काळया बाजारात विकल्या शिवाय परवडत नाही हे सिध्द करुन देतो असे बोललेले आहेत. म्हणून हे रेकॉर्डवर राहू नये अशी सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** (श्री. रमेश शेंडगे ) : तपासून रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. हे खत होलसेलरपासून गेल्यानंतर त्याचे ब्लॅक मार्केट होते त्याला आपण थांबविले पाहिजे असे मी म्हटले. सभापती महोदय, माझे चुकले असेल तर मी आपली क्षमा मागतो. माझे चुकले असेल तर मी माझे शब्द परत घ्यायला तयार आहे.

**तालिका सभापती** : जे चुकीचे असेल ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल्.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझ्या म्हणण्याचे तात्पर्य असे होते की, मी म्हणजे जे दुकानदार लायसन्स होल्डर दुकानदार खताची विक्री करतात (वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली) सभापती महोदय, मी विषयांतर करीत नाही. रासायनिक खते शेतकऱ्यांना मुबलक दरात मिळाली पाहिजेत. तसेच शेततळी शेतामध्ये बांधले जातात . या शेततळयांची कामे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

एमआरजीएसच्या माध्यमातून करण्याची आवश्यकता आहे. कारण शेतमजुराला 100 दिवस काम देण्याचे अभिवचन या शासनाने दिलेले आहे त्यामुळे माझी मागणी अशी आहे की, एमआरजीएसच्या माध्यमातून शेततळयाची कामे मोठयाप्रमाणात घेतली पाहिजेत.

सभापती महोदय, मी या सभागृहात एक तारांकित प्रश्न विचारला होता. आमगावनवे तलावचा पाण्याचा पाट दुरुस्त करण्याच्या संबंधात लघुपाटाबधारे विभागाने मार्चमध्ये करण्याच्या बाबतीत संगितले होते. आजही या पाटातून पाणी वाहात आहे आणि ते पाणी वाया जात आहे. त्या पाण्याचा शेतकऱ्याला वापर करता येत नाही. त्याबाबतचा विचार करण्यात यावा, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयामध्ये शेतकऱ्यानी धानाचे पीक घेतले पण याठिकाणी दोन-तीन वेळा अकाली पाऊस पडलेला आहे. धानाचे पीक साठविण्यासाठी त्याठिकाणी गोदामे नाहीत त्यामुळे शेतकऱ्याचे धानाचे पीक सडत आहे. त्यामुळे राज्य शासनाचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. यासंदर्भात ट्रान्स्पोर्टची पॉलिसी दुरुस्त करुन तेथील शेतकऱ्यांचा माल उचलण्यात आला तर राज्य शासनाचे भले होईल आणि जनतेचेही भले होईल. सभापती महोदय, अन्यथा पाखड तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीतून आम्हाला खावा लागणार आहे. सामान्य जनतेला खावा लागणार आहे.

सभापती महोदय, माझी एक शेवटची सूचना आहे. गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त झाला असल्यामुळे येथील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले पाहिजे तसेच शेतसारा माफ केला पाहिजे. जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवला पाहिजे एवढीच विनंती करुन मी थांबतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यास वेळ दिल्या बद्दल धन्यवाद.

------

...3..



SMT/ SBT/ MMP/ 20:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानसभा परिसरात काही पोलीस कर्मचारी पत्त्यांचा जुगार खेळताना आढळणे.

**मु.शी.**: विधानसभा परिसरात काही पोलीस कर्मचारी पत्त्यांचा जुगार खेळताना आढळणे या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा परिसरात काही पोलीस कर्मचारी पत्त्यांचा जुगार खेळताना आढळणे या विषयाच्या संदर्भात निवेदन करीत आहे.

( प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे

**मु.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे याविषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. केशवराव मानकर, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु )

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात बोलत असताना सर्वच सन्माननीय सदस्यांनी सविस्तर मांडणी केलेली आहे त्यामुळे मी थोडक्यात बोलणार आहे. परंतु असे वाटले की, जवळजवळ 1 लाख शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या काही वर्षात झालेल्या आहेत आणि या कुटुंबांचा आधार गमावला गेल्यावर खरे तर आत्महत्या ही नैसर्गिक आपत्ती समजून या कुटुंबांसाठी मदत, समुपदेशन, सल्ला, मार्गदर्शन, पुनर्वसन यासारखा एक मोठा कार्यक्रम घेणे गरजेचे होते. आज सुध्दा या कुटुंबांना नुकसानभरपाईची काही रक्कम मिळते त्याच्यानंतर त्या कुटुंबाचे काय होते याबद्दल जर का आपण त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती बघितली तर मला असे वाटते की, एवढे लक्षावधी रुपये, कोट्यवधी रुपये खर्च करुन सुध्दा या कुटुंबांची पूर्णत: दुर्दशा झालेली आपल्याला दिसते. आम्ही नेहमीच पुरवणी मागण्यांच्या वेळी पाहतो की, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात जी काही रक्कम दिली जाते ती रक्कम सुध्दा लोकांना वेळेवर मिळत नाही. मी अशी मागणी करते की, आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल एवढे बोलतो पण या कुटुंबातील ज्या स्त्रिया आहेत त्यांच्यासाठी एखादी पुनर्वसनाची योजना सरकारने सुरु करावी. याचे कारण असे की 4 वर्षापूर्वी, 5 वर्षापूर्वी ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत त्या कुटुंबातील मुलामुलींचे शिक्षण, मुलींची लग्ने त्याचबरोबर घरातील सुनांचे प्रश्न याबद्दल महिला व बालकल्याण खाते किंवा कोणीही काही काम करीत नाही. त्याबद्दल मला शेकडो ठिकाणी खात्री पटलेली आहे. आपण सुध्दा आपल्या स्वत:च्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

जिल्ह्यात तपासणी केली तर दिसेल की, एकदा 1 लाख रुपये, 2 लाख रुपये मिळाल्यानंतर या कुटुंबाचे काय होते याच्या आढाव्याचा अहवाल सुध्दा आपण केलेला नाही. आपल्या सगळ्या अहवालांमध्ये जरी समुपदेशन सेवा आणि मदत सेवा संघटना असे म्हटले असले तरी कोठेही महिला व बालकल्याण विभाग असो किंवा कृषी विभाग असो यांच्यामार्फत या महिलांना मार्गदर्शनाचा कार्यक्रम चालू नाही याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, मला दुसरा उल्लेख करावयाचा आहे की, मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे त्यानुसार शासनाने 10 हजार 627 कुटुंबांना फायदा मिळाला असा दावा केला असला तरी प्रत्यक्षात 2924 एवढेच खरे गरजू होते आणि त्यात अनेक आमदारांची नावे त्यांनी घेतलेली आहेत. सन्माननीय श्री. शिवाजीराव मोघे यांचाही त्यामध्ये उल्लेख आहे की, त्यांच्या कुटुंबाला सुध्दाशेतकरी पॅकेजमधून मदत मिळाली. या जनहित याचिकेच्या संदर्भात देखील शासनाने लक्ष घातले पाहिजे आणि जर का असे चुकीचे लाभार्थी असतील तर त्यासंदर्भात सरकारने दुरुस्ती करुन त्यांच्याकडून पैशाची वसुली करुन घेतली पाहिजे. सातारा जिल्हा बँकेकडे शासकीय लेखा परीक्षणात असे निष्पन्न झाले आहे की, की 3940 लाभार्थ्यांना 10 कोटी 4 लाख रुपये चुकीच्या पध्दतीने, नियमबाह्य कर्जमाफीचे प्रमाणपत्र दिले गेले आहे आणि सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने दुहेरी लाभ देऊन सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विश्वासार्हतेबद्दल प्रश्न निर्माण केलेला आहे

सभापती महोदय, शेतीमध्ये आज देखील श्रमिकांमध्ये महिलांची संख्या जास्तीतजास्त आहे आणि या श्रमिक महिलांचे कष्ट कमी करण्याच्या दृष्टीकोनातून आपण श्रमापासून मुक्तता, यंत्रांची मदत, शेतकरी महिलांचे प्रशिक्षण त्यांना याबद्दलची माहिती देणे यासंदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाच्या फूड अँड ॲग्रीकल्चरल इन्स्टियूटचे चे अहवाल केंद्र सरकारने स्वीकारलेले आहेत त्यातील चित्र जर बघितले तर या महिलांची दुरावस्थाच दिसून येते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

याठिकाणी अनेक भाषणे झाली आहेत. परंतु शेतक-यांच्या कुटुंबियांबद्दल बोलत असताना महिला शेतक-यांचे जे प्रश्न आहेत त्याचा उल्लेखच होत नाही. म्हणून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांसाठी पुनर्वसन योजना घ्यावी अशी विनंती करते आणि येथेच थांबते.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.भगवानराव साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत सभागृहात जे मुद्दे मांडले आहेत त्या एकाही मुद्याची पुनरावृत्ती न करता कमीत कमी शब्दामध्ये मी बोलण्याचा प्रयत्न करणार आहे. भारताच्या विद्यमान राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील आणि तत्कालीन राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलम या दोघांनीही दुस-या हरित क्रांतीची आपल्याकडून अपेक्षा व्यक्त केलेली आहे. वाढती लोकसंख्या आणि अन्नधान्याची गरज या अर्थाने ते केलेले आवाहन लक्षात घेतले पाहिजे. हे आवाहन जर लक्षात घेत असू तर मग शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतक-याला समर्थ बनविण्यासाठी, त्याला ताकद देण्यासाठी काही योजना कराव्या लागतील त्या अर्थाने मी या प्रस्तावाचे स्वागत करीत आहे. मी एका वेगळयाच अँगलने बोलणार आहे.

माझ्या दृष्टीने शेतक-यांचे 4 वर्ग आहेत. 7/12 वरील शेतक-यांचा एक वर्ग आहे. ज्याचे नाव 7/12 वर होते, वडिलांचे आणि आजोबांचेही नाव 7/12 वर होते. पण हा शेतकरी शेतात कधी गेलाच नाही, शेती कोठे आहे आणि किती आहे ती त्याने बघितलेलीच नाही. पण शेतीवर तो मोठे भाषण देत असतो. तो पक्का राजकीय पुढारी असतो. 7/12 वरील शेतकरी म्हणजे कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असलेला शेतकरी आहे. कारण त्याने शेती कसलेली नाही. दुसरा वर्ग बांधावरील शेतक-यांचा आहे. हा शेतकरी ज्या विदर्भाचा अनुशेष भरुन काढावयाचा आहे त्या विदर्भात आहे, मराठवाडयातही आहे. हा शेतकरी गावात राहतो, पण शेतीवर मात्र हिरो होंडावरुन जातो, बांधावर गाडी लावतो, पाण्यात एक दगड टाकतो, आवाज आल्यावर शेतीने पाणी प्यायले आहे असे समजून मागे येतो. तो शेतीवर कधी रहातच नाही. हा बांधावरील शेतकरी सुध्दा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असणारा शेतकरी आहे. तिसरा शेतकरी हा शरीराने शेतात असतो पण मनाने मात्र गावात राहतो. कारण शेतीच्या अर्थ शास्त्रामध्ये शेतीला प्रतिष्ठा नसल्यामुळे आणि शेतकरी कर्जबाजारी होत असल्यामुळे, शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे हा तिसरा शेतकरी दुर्दैवाने मी शेतकरी आहे, असे न सांगणारा लाजणारा शेतकरी आहे. मग तो

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.भगवानराव साळुंखे....

सुशिक्षित असेल किंवा अशिक्षित असेल, पण तो लाजणारा शेतकरी आहे. चौथ्या प्रकारचा शेतकरी हा तन मन धनाने राबणारा शेतकरी आहे. शेतीसाठी झोकून देणारा शेतकरी आहे. शेतीतील सगळया गोष्टींचे कौशल्य संपादन करणारा शेतकरी आहे. हा शेतकरी जर प्रमाण मानला तर सगळयांच्या लक्षात येईल की, कोणत्याही प्राप्त परिस्थितीमध्ये येणा-या सर्व अडचणींवर मात करुन उत्तम प्रकारची शेती करताना तुम्हाला, आम्हाला आढळून येतो. याबाबत अर्थशास्त्र मांडण्यात आलेले आहे, की कृष्णा-कोयना काठचा शेतकरी ग्रीन बेल्टमधील आहे. असे बोलले जाते की, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी सुखी आहे. येथील एका चांगल्या शेती तज्ज्ञाने केलेले हे विधान आहे. एक माणूस बागायती शेती असली तरी तो किती कसू शकतो ? त्याचे उत्तर असे आहे की, फक्त 11 गुंठे शेतीतून त्याला वर्षभर काम मिळू शकते. 12 गुंठे सुध्दा कामासाठी उपलब्ध होत नाही. माझ्या नावावर जर 50 एकर शेती आहे, पण त्या शेतीला जर न्याय देऊ शकत नसेन तर मी राष्ट्रीय नुकसान करीत असतो. एक व्यक्ती किती काम करु शकते, किती शेती करु शकते याचेही गणित निर्धारित केले पाहिजे. आपण टेनन्सी ॲक्ट आणून कसेल त्याची जमीन हे तत्व लागू केले. जे जमिनदार जमीन कसत नव्हते ती जमीन कसणा-यांच्या ताब्यात दिली. स्व.यशवंतराव मोहिते यांनी कमाल जमीन धारणा कायदा केल्यावर अनेकांनी स्वत:कडे जादा असलेली जमीन शासनाकडे सरंडर केली. मी शेती करु शकत नाही, अशी शेती धारण करण्याचा मला नैतिक अधिकार नाही. ही मानसिकता आमच्या शेतक-यांची आहे काय ? एका बाजूला एक शेत मजूर म्हणून जन्माला येतो, पिढयान्पिढया शेत मजूर म्हणून राहतो, त्याला एक गुंठा, दोन गुंठा जमिनीचीही मालकी घेता येत नाही. एक एकर, दोन एकर जमिनीतून उत्पादन घेण्याचे त्याचे स्वप्न असते. पण त्याला जमीन मिळत नाही. दुस-या बाजूला 100 एकरवाले, 200 एकरवाले जमिनीचे मालक आहेत. पण जमिनीच्या चतु:सीमा त्यांना माहीत नाहीत.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 20:30

(श्री. भगवान साळुंखे...

असा शेतकरी वर्ग दुस-या बाजूला आहे. तो शेतकरी वर्ग हा या देशाच्या अर्थकारणाला खीळ घालणारा आहे. त्याला कोठेतरी दुरुस्त करावे लागेल. शासनाने या शेतीच्या प्रश्नांसंबंधी अतिशय गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. माझी या निमित्ताने शासनाने कळकळीची विनंती आहे की, तुम्हा आम्हाला या महाराष्ट्राबद्दल खरी कणव असेल तर आपण सर्वांनी राजकीय अभिनिवेश आणि मतभेद विसरुन शेतीच्या विकासाच्या दृष्टीने, शेतक-यांच्या आत्महत्या कशा होणार नाहीत यादृष्टीने आपले राज्य हे शेतीप्रधान म्हणून राज्य उदयास आणावयाचे असेल तर महाराष्ट्रातील जलसिंचन योजना चांगल्या पध्दतीने राबवून सर्व जमीन सिंचनाखाली आणावी आणि विकास साधावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

**तालिका सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विनंती केल्यावरुन आपण ही चर्चा येथे थांबवित आहोत. उद्या लक्षवेधी सूचनांनंतर या चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांची झालेली दुरवस्था

**मु. शी.** : आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांची झालेली दुरवस्था यासंबंधी श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाने आश्रमशाळा आणि वसतीगृहांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ करण्यात यावी तसेच वसतीगृहातील शासकीय नियमांच्या व सुविधांच्या बाबतीत निर्माण झालेले प्रश्न सोडवावेत. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वसतीगृहात राहणारे विद्यार्थी अत्यंत बिकट परिस्थितीत राहत असून त्या परिस्थितीत शिक्षण घेत असणे, शासकीय यंत्रणेचे कुठल्याही प्रकारचे नियंत्रण या वसतीगृहावर नसल्याने विद्यार्थी शिक्षण घेण्याच्या गरजेपोटी सर्व अडचणींना सामोरे जात असणे, तसेच शासकीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी फक्त कागदावरच दिसून येणे, शहापूर व डहाणू तालुक्यातील मुलांच्या वसतीगृहातील भयावह परिस्थितीबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल न घेतल्याने साप चावून/अन्य विषारी प्राण्यांच्या दंशाने विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यु, प्रकल्प अधिकारी यांनी वसतीगृहाला भेट न देणे, शासनाने अशा प्रकल्प अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई न करणे, अनेक ठिकाणी भोजनाचा निकृष्ट दर्जा, अस्वच्छ पाणी, मोडकळीस असलेल्या इमारती, खेळाच्या मैदानाची जागा उपलब्ध नसणे, वसतीगृह अधिक्षकाने मोठया प्रमाणावर गैरव्यवहार करणे, त्याकडे शासनाने दुर्लक्ष करणे, झालेले गैरव्यवहार विद्यार्थ्यांनी समोर आणू नये म्हणून त्यांना दबावाखाली ठेवणे, इत्यादी विविध प्रश्नांची दखल घेऊन राज्यातील वसतीगृहाचे सर्वेक्षण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही.

सभापती महोदय, नियम ९२ अन्वये आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. मी अतिशय थोडक्यात माझे मुद्दे मांडणार आहे. कारण याच विषयावर अनेक अधिवेशनामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

..२..

(श्री. संजय केळकर....

गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाने आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ केलेली आहे. परंतु एका बाजूला ही वाढ करीत असताना त्या आश्रमशाळांमधून जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांचे हाल फार बिकट झालेले आहेत. अनेक आश्रमशाळांना मी स्वत: भेटी देऊन परिस्थिती पाहिलेली आहे. ठाणे जिल्ह्यातील १८ आश्रमशाळांना मी भेटी दिलेल्या आहेत. त्या ठिकाणची परिस्थिती पाहिली तर मुले तेथील आश्रमशाळेमध्ये, वसतिगृहामध्ये कशी राहातात हा प्रश्नच पडतो. अनेक आदिवासी पालक अशा आश्रमशाळांतून आपल्या मुलाला किंवा मुलीला शिकायला पाठवाचे की नाही या संभ्रमात आहेत. या आश्रमशाळेमध्ये केवळ निकृष्ट दर्जाचे अन्नच मिळत नाही तर पिण्यासाठी स्वच्छ पाणीही मिळत नाही. स्वच्छतागृहे नाहीत.

सभापती महोदय, सांगायला अतिशय दु:ख होते की, या आश्रमशाळेतील ५ मुले सर्पदंशाने मेली. डहाणू तालुक्यातील मेंडवण आश्रमशाळेमध्ये आणि जव्हार तालुक्यातील आश्रमशाळेमध्ये अशा सर्पदंश होऊन विद्यार्थी मृत्यू पावल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या विद्यार्थ्यांना वेळीच उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झालेला आहे. या घटना घडल्यानंतर प्रकल्प अधिकारी देखील त्या आश्रमशाळांमध्ये गेले नाहीत. म्हणजे एवढा हलगर्जीपणा या आश्रमशाळेच्या बाबतीत पहावयास मिळतो. या वसतिगृहातील मुलांसाठी येणारे अन्नधान्य हे वसतिगृह अधीक्षक किंवा त्यांच्या बरोबरीचे इतर कर्मचारी यांच्या संगनमताने काळ्याबाजारात विकले जाते आणि मुलांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. वसतिगृहांच्या इमारती जीर्ण आणि पडक्या अवस्थेत आहेत. दुरुस्तीबाबत विचारणा केली तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पैसे दिलेले आहेत असे आदिवासी आयुक्तालयाकडून सांगितले जाते. सभापती महोदय, विद्यार्थ्यांना साप चावण्याच्या घटना जेथे घडल्या त्याठिकाणी विद्यार्थी जेथे झोपत होते तेथील भिंत पडलेली होती, दारे खिडक्या कुजलेल्या स्थितीत होत्या, बांधकाम देखील निकृष्ट दर्जाचे होते. अशा अवस्थेमुळे या सर्पदंशाच्या दुर्दैवी घटना घडल्या. दुसरी गोष्ट अशी की, या आश्रमशाळांमधून प्रत्यक्ष असलेल्या क्षमतेपेक्षा तिपटीने विद्यार्थी घेतलेले आहेत. या मुलींसाठी स्वच्छतागृह नाही. अनेक अधिवेशनामध्ये मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे, प्रकल्प अधिका-यांना सांगितलेले आहे. परंतु यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी की, सरकारने या आदिवासी विद्यार्थ्यांना वा-यावर सोडलेले आहे. एका बाजूला असे म्हणायचे की, आदिवासीसाठी आम्ही काम करतो,

...नंतर श्री. भोगले....

अग्रिम प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

आदिवासींसाठी आम्हाला हे करायचे आहे, त्यासाठी आम्ही हा निधी देतो. दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षपणे आपण बघतो त्यावेळेला आदिवासी मुलांना सरकारने वाऱ्यावर सोडले आहे अशी स्थिती निर्माण झालेली दिसते. माननीय मंत्रीमहोदयांनी हे सांगावे, मागील अधिवेशनात सांगितले होते की, बांधकाम विभागाकडे बांधकामासाठी निधी दिला आहे. आता आदिवासी विकास विभागामार्फत बांधकाम केले जाणार आहे. त्यासंबंधीची माहिती सभागृहाला द्यावी. 2008-09 आणि 2009-10 या वर्षात आश्रमशाळांसाठी किती निधी दिला, किती वापरात आला? आश्रमशाळा म्हणजे केवळ वसतिगृहे नाहीत. त्याठिकाणी विद्यार्थी शिकत आहेत. आदिवासी भागात आपण स्लोगन जाहीर केले आहे. खूप खूप शिक पोरी, ताठ मानेने जगायला शिकशील. आज त्या मुलींसाठी आंघोळीची व्यवस्था नाही. संडास-बाथरुमची व्यवस्था नाही. आदिवासी प्रकल्प योजनेतून ही व्यवस्था करणार आहात का? यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणार आहात का? केवळ आश्रमशाळासाठी, उद्याच्या पिढीसाठी, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी यंत्रणा उभी करुन त्या यंत्रणेद्वारे आश्रमशाळांचे नियंत्रण करणार असे सरकारला म्हणावयाचे आहे का? या पुढच्या काळात एकही आश्रमशाळा अशी राहणार नाही, ज्याठिकाणी पाणी नाही, स्वच्छतागृह नाही, चांगली इमारत नाही, चांगले अन्नधान्य नाही अशी एकही आश्रमशाळा राहणार नाही अशा प्रकारची व्यवस्था करण्यासाठी आपल्याकडे कालबध्द कार्यक्रम आहे. प्रत्येक वेळी आम्ही बोलायचे, प्रत्येक वेळी तुम्हाला सांगायचे आणि तुम्ही उत्तर द्यायचे. यातून त्या मुलांचा विकास होणार नाही. त्यामुळे आदिवासी आश्रमशाळांच्या माध्यमातून मी याठिकाणी काही महत्वाचे विषय उपस्थित केले आहेत.

शेवटी एवढेच सांगेन की, चार-पाच महिन्यांपूर्वी ठाणे जिल्हयात आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव आले होते. त्यांच्या लक्षात आले त्यावेळी त्यांनी दौरा अर्धवट सोडला आणि ते निघून गेले. प्रत्यक्ष परिस्थितीला सामोरे जायला पाहिजे. प्रत्यक्ष परिस्थितीला सामोरे जाऊन आश्रमशाळांना भेटी दिल्या पाहिजेत, विद्यार्थी आणि पालकांना दिलासा दिला पाहिजे ते न करता ही मंडळी परत आली. आश्रमशाळांच्या संदर्भात अनेक विषय आहेत. त्यांना जे मटेरियल पुरविले जाते, त्यातील घोटाळयाचा विषय आहे, तो विषय अत्यंत क्लेषकारक आहे, धोकादायक आहे. त्यापेक्षा आश्रमशाळा चालविता कशाला? केवळ मलमपट्टी करणार असाल, आदिवासींच्या

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भल्याकरीता करीत आहोत असे दाखविणार असाल आणि प्रत्यक्षात आदिवासींचा विकास होणार नसेल, साप चावून आदिवासी मुले मरणार असतील, योग्य ती व्यवस्था त्याठिकाणी होणार नसेल तर आश्रमशाळांमध्ये आदिवासी पालक आपल्या मुलांना पाठविण्याचे बंद करतील. त्यामुळे हा आदिवासी भागातील गंभीर विषय बनला आहे. अर्धातास चर्चेच्या माध्यमातून मी याठिकाणी हा विषय उपस्थित केला आहे. मंत्रीमहोदयांनी या संदर्भात ठोस अशा प्रकारची उत्तरे द्यावीत अशी अपेक्षा करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सन्माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आदिवासी आश्रमशाळांच्या संदर्भात जी अर्धातास चर्चा उपस्थित केली आहे, त्या चर्चेच्या अनुषंगाने त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे मी समर्थन करतो. त्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही.

सभापती महोदय, हे खरे आहे की, ठाणे जिल्हयातील तलासरी, वाडा, डहाणू, पालघर हे आदिवासी तालुके आहेत. या आदिवासी तालुक्यांमध्ये गोरगरीब आदिवासी मुलांना शिक्षण मिळावे यासाठी फार मोठ्या प्रमाणावर आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा शासनाने सुरु केल्या ही चांगली बाब आहे. परंतु खऱ्या अर्थाने या आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना चांगल्या प्रकारचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जी व्यवस्था व्हावयास पाहिजे, ज्याचे वर्णन सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी केले, त्यामध्ये खरोखर सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांसाठी स्नानगृहाची व प्रसाधनगृहाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. ज्या मुली आहेत त्यांच्यासाठी ही स्वतंत्र व्यवस्था असणे आवश्यक आहे. काही ठिकाणी अशी व्यवस्थाच नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु एका दिवसात हे वातावरण बदलणार नाही. काही दिवसात याचा आढावा घेऊन ज्या ज्याठिकाणी अशी व्यवस्था नाही त्याठिकाणी तातडीने ही व्यवस्था उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

नंतर 5इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

कर्मचाऱ्यांना तेथे राहण्याची सक्ती केली जाते. वास्तविक त्यांची राहण्याची इच्छा असते परंतु त्यांची निवासाची व्यवस्था नसते, ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तसेच डोंगर-कपारीतून व दुर्गम भागात हे कर्मचारी काम करीत असतात त्यांचे खरे तर अभिनंदनच करायला हवे. काही कमी जास्त बोनाफाईड चुका होऊ शकतात, मालाफाईड चुका असतील तर त्यांची जरुर दखल घ्यावी व शिक्षा करावी. पण प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याची खरी गरज आहे. शहरी भागात राहणारा कर्मचारी आणि आदिवासी भागात काम करणारा कर्मचारी यांची परिस्थिती भिन्न भिन्न स्वरुपाची असते. म्हणून अशा आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याची, त्यांच्या पाठीवर थाप मारण्याची गरज आहे. आदिवासी भागातील अधिकारी अशा शाळांमध्ये जातात आणि विद्यार्थ्यांसमोर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अवमान करतात, त्यांची अवहेलना करतात. मी खरे व अत्यंत स्पष्ट शब्दात सांगतो की, शिवीगाळ सुध्दा हे अधिकारी करतात, अशा अनेक शिक्षकांच्या तक्रारी आहेत. अशा प्रकारे कर्मचाऱ्यांना शिवीगाळ होणार असेल तर त्यांनी कोणत्या परिसिथतीत, कोणत्या मानसिकतेत काम करावयाचे याचा विचार होणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी याची दखल घेऊन काय करता येईल याची माहिती सभागृहाला द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने फक्त एकच मुद्दा उपस्थित करणार आहे तो म्हणजे यापूर्वी धुळे जिल्ह्यातील बर्डी येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये एका आदिवासी मुलीवर बलात्कार झाला होता. त्यासंबंधीची चर्चा सभागृहात झाली व माननीय माजी मंत्री डॉ. विमल मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभा व विधान परिषदेतील सदस्यांची एक समिती नेण्यात आली होती. या समितीवर अधिकारी म्हणून उप सचिव श्री. यू.के.चव्हाण साहेब यांनी काम पाहिले होते. या समितीने प्रत्यक्ष आश्रमशाळेत जाऊन पाहणी केली व विचारपूस करुन शासनाकडे अनेक शिफारशीसह आपला अहवाल सादर केला होता. या अहवालात ज्या शिफारशी करण्यात आल्या होत्या त्यांची अमलबजावणी कशा प्रकारे झाली, कोणत्या प्रकारे दखल घेण्यात आली हे समजत नाही. अन्यथा अशा प्रकारे चर्चा करावयाची, भेट देऊन अहवाल द्यावयाचा पण त्याची दखल घेतली जात नसेल, अमलबजावणी काय झाली याची माहिती मिळत नसेल तर उपयोग नाही. माझी अशी सूचना आहे की, ज्याप्रमाणे आपण यापूर्वी वन मंत्री असताना आपल्या दालनात बैठका घेऊन काही अडचणीतून मार्ग काढत असत त्याच धर्तीवर अशा प्रश्नांच्या बाबतीत सुध्दा आदिवासी भागातील आश्रमशाळांची परिस्थिती सुधारावी व आदिवासी मुलींच्या आश्रमशाळांना सर्वतोपरी मदत करण्याच्या अनुषंगाने काय करता येईल यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपविते.

---------

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे : (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या अनुषंगाने फक्त दोनच मुद्दे मी मांडणार आहे. आपण शासनाच्या तिजोरीतून या आदिवासींसाठी बऱ्यापैकी तरतूद करतो पण ही तरतूद त्यांच्यापर्यंत पूर्णांशाने पोहचत नाही. त्याचप्रमाणे शासनाचे अधिकारी सुध्दा ही तरतूद त्यांच्यापर्यंत पोहचू देत नाहीत. काही खाजगी शिक्षण संस्था तर अशी मिळणारी ग्रँट हडप करतात. कारण 50 एकर बागायती शेती असेल आणि त्यात जेवढे उत्पन्न मिळत नसेल तेवढे एका आदिवासी आश्रमशाळेच्या माध्यमातून मिळते अशी या लोकांची धारणा आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, त्यांनी थोडीसी यंत्रणा टाईट केली आणि सर्व अनुदान आदिवासींपर्यंत पोहचविले तर त्यांचा चांगला विकास होईल, अशी सूचना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांना मी धन्यवाद देतो की त्यांनी अत्यंत दुर्लक्षित व उपेक्षित विषयाकडे सभागृहाचे लक्ष केंद्रित केले आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे व सन्माननीय श्री. भगवानराव साळुंखे यांनीही याकडे लक्ष वेधले आहे, त्यांचे मी आभार मानतो.

महोदय, अत्यंत दुर्लक्षित विषयाकडे खरे तर गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, ही वस्तुस्थिती आहे. खरे पाहिले तर आदिवासी सुधारावयाचे असतील, त्यांना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. शिक्षण हा अत्यंत चांगला पर्याय आहे. राज्यात 87.74 लाख आदिवासींची एकूण संख्या असून त्यापैकी 6 ते 18 वयोगटातील संख्या 20 टक्के एवढी आहे. म्हणजे 17-18 लाख मुले शाळेत जात आहेत....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

या ठिकाणची वस्तुस्थिती विदारक आहे. शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आश्रमशाळांची संख्या 551 आहे. शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांची संख्या 1100 च्या वर आहे. या 1100 आश्रमशाळांमध्ये 4.32 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेत साधारणत: 8 ते 8.5 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अजून सुध्दा या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. काही आश्रमशाळांचा कारभार चांगला नाही परंतु काहींचा कारभार खूप चांगला आहे, रिझल्टसुध्दा चांगले येत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे सर्व आश्रमशाळांची सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी आश्रमशाळा या दुर्गम भागात आहेत आणि येथेच आमची थोडी चूक झालेली आहे. आश्रमशाळा दुर्गम भागात काढण्यापेक्षा शहराच्या जवळ काढल्या असत्या तर त्याचा फायदा झाला असता म्हणून आता आम्ही निर्णय घेतला आहे की, येथून पुढे आश्रम शाळा काढावयाच्या असतील तर त्या दुर्गम भागात काढण्यापेक्षा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शहरात आणून, शहराच्या जवळ आणून त्यांना शिक्षण द्यावयाचे आहे. यामुळे शिक्षक कामावर जात नाहीत, मध्येच निघून येतात, हजेरी घेत नाहीत असे जे होते त्याला पायबंद बसणार आहे. आश्रमशाळांना इमारती चांगल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. परंतु आश्रमशाळा सुरु करण्याची आपली गरज होती त्यामुळे इमारतीच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी देत आहोत. चांगल्या इमारतींसाठी आम्ही 3 वर्षाचा कार्यक्रम तयार केला असून या 3 वर्षात एकही शाळा पडकी राहणार नाही अशा प्रकारचा आम्ही कार्यक्रम तयार करीत आहोत. काही ठिकाणी तर विद्यार्थी बुडून मरण पावलेले आहेत, साप चावून मृत्यू झालेले आहेत. सापदंशाने मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या 2008 मध्ये 32 होती व 2009 मध्ये 24 व सन 2010 मध्ये 13 विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे ही गोष्ट आपल्याला नाकारुन चालणार नाही. आपले विक पॉंईट कोणते आहेत याचा पहिल्यांदा विचार करुन प्रथम ते आपल्याला दुरुस्त करावे लागणार आहेत व त्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहे.

शाळेमध्ये कर्मचा-यांची उपस्थिती कमी असते. शिक्षकांच्या उपस्थितीचा खरे म्हणजे संशोधनाचा भाग आहे. प्राध्यापक मोते साहेब प्राध्यापक म्हणून बोलले आहे. शिक्षक किती हजर असतात यावर अजूनही प्रश्नचिन्ह आहे. मी वन मंत्री असतांना धारणी भागात गेलो तेव्हा त्या ठिकाणच्या शाळेला भेट दिली असता मला असे आढळून

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

आले की, त्या ठिकाणी चौथी पर्यंत शाळा होती. त्या शाळेतील पटावर 72 मुले होती व प्रत्यक्षात हजर 9 मुले होती. त्या शाळेतील एकाही मुलाला "भारत माझा देश आहे" हे लिहिता आले नाही. शिक्षकाला रागावलो तेव्हा शिक्षकाने मला हात जोडून सांगितले की, माझा काही दोष नाही, मी बदली शिक्षक म्हणून आलेलो आहे. मी त्या शिक्षकाला विचारले मुख्य शिक्षक कोठे आहेत तेव्हा त्याने सांगितले की, मुख्य शिक्षक अमरावतीमध्ये राहतात. त्या मुख्य शिक्षकाचा पत्ता घेतला व अमरावतीला त्या शिक्षकाच्या घरी गेलो. मी त्या शिक्षकाच्या घरी गेलो त्यावेळेस हा शिक्षक टी.व्ही. बघत होता. मंत्री आलेले आहेत म्हटल्यावर बदाम, पिस्ता, काजू पाच मिनिटात आले. मी त्या शिक्षकाला विचारले तुम्ही कोठे काम करतात तेव्हा त्या शिक्षकाने सांगितले मी धारणीला असतो. मी शाळेत बघितले तेव्हा पटावर 72 मुले होती व प्रत्यक्षात 9 मुले हजर होती. त्या शिक्षकाकडे जे हजेरी पुस्तक होते त्या पुस्तकात त्या दिवशी धारणीच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या 68 होती. या मुख्यशिक्षकाला 17-18 हजार रुपये पगार मिळत होता व त्या मुलाला 1200 रुपये देत होते आणि या 1200 रुपयातून तो दोनशे रुपये सरपंचाला देत होता, ही वस्तुस्थिती आहे. हे फार विदारक चित्र आहे. त्यामुळे आपल्याला शाळांमध्ये सुधारणा करावयाच्या आहेत. सुधारणा करावयाची असेल तर कर्मचा-यांची उपस्थिती चांगली रहावी म्हणून मी आता प्रत्येक शाळेत बायो मेट्रीक सिस्टीम बसवण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासकीय शाळेत हा निर्णय घेतला असून त्याचबरोबर ज्या अनुदानित शाळा आहेत त्या ठिकाणी सुध्दा बायोमेट्रीक सिस्टम लावून दिवसातून तीन वेळा शिक्षकाची हजेरी घेतली जाणार आहे. आमचा शिक्षकावर विश्वास आहे परंतु मला आदिवासी मुलांसाठी तुमच्यावर काही बंधने घालावयाची आहेत.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

काही जणांनी सांगितले की, आमच्यावर बंधने आणू नका. बंधने नाही आणली तर आम्हाला रिझल्ट मिळाला पाहिजे. मागे दोन वर्षापूर्वी आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा निकाल वाढवा असा फतवा एटीसी यांनी काढला. त्याने निकाला वाढला. 5 ते 10 टक्के निकाल लागायचा तो 90 टक्क्यांवर गेला. एवढा निकाल कसा वाढला ? हा संशोधनाचा विषय आहे. मुलांना शिकवलेच नाही. पण कॉपी वाढली. शिकवायचा त्रासच घ्यायचा नाही. असा प्रकार केला तर 9 टक्के काय 100 टक्के बजेट दिले तरी काही बदल होणार नाही ही वस्तुस्थिती आहे. आम्ही ठरविले निकाल वाढले पाहिजेत. त्याप्रमाणे ते वाढले. पण ते कसे वाढले. गुणवत्ता वाढली का ? नाही. ही वस्तुस्थिती आहे. मी याचा आधी आणि आता देखील अभ्यास केलेला आहे. त्यामुळेच आम्ही बायोमॅट्रीक अटेन्डन्स सिस्टीम सुरू करणार आहोत. शिक्षकांना देखील सकाळ, दुपार, संध्याकाळ नोंद करावी लागणार आहे. ही सिस्टीम सुरू करणार असल्यामुळे शिक्षकांचा आमच्यावर राग आहे. आमच्या माजी मंत्र्यांनी सकाळ, दुपार या दोन सत्रामध्ये शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. पण याबाबत संबंधितांचा राग आहे. त्यांनी सांगितले की, हे सगळे बंद करा. त्यात आम्ही बदल करत असून सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत शाळा ठेवणार आहोत. यासाठी बायॉमॅट्रीक अटेन्डन्स सिस्टीम सुरू ठेवणार आहोत. सकाळ, दुपार, संध्याकाळ अशी नोंद शिक्षकांना करावी लागणार आहे. त्या हजेरीप्रमाणे आम्ही पगार देणार आहोत. आम्हाला कुठे तरी बंधन घालावे लागणार आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची हजेरी देखील महत्त्वाची आहे. 900 विद्यार्थी वर्षभर हजर राहतात का ? त्यांना आम्ही खाण्यापिण्याचे अनुदान देतो. कपडा देतो ठीक आहे. बूट देतो ठीक आहे. तो विद्यार्थी हजर नसताना जेवण कसे द्यायचे ? काही गोष्टी सांगायला लावू नका. पण त्या सांगितल्या पाहिजेत. कारण मला सुधारणा करायची आहे. मी दोन शाळांमध्ये माझ्या खाजगी लोकांना पाठविले आणि सांगितले की, आश्रमशाळेतील शिक्षकाने वर्षभरात किराणा मालाच्या दुकानातून काय काय खरेदी केले आहे ते पहा. चौकशी केली. एकाही शिक्षकाने वर्षभर किराणा दुकानातून किराणा नेला नाही. टूथ पेस्ट सुद्धा नाही. बाकीचे आपण समजून घ्यावे. त्यामुळे आम्ही विद्यार्थ्यांसाठी देखील बायॉमॅट्रीक अटेन्डन्स सिस्टीम या शैक्षणिक वर्षापासून सुरू करणार आहोत. या विद्यार्थ्याला देखील चार वेळा हजेरी द्यावी लागणार ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

त्यामुळे विद्यार्थी किती आहेत हे आम्हाला कळेल. 600 विद्यार्थी असतील तर त्यांच्या आहार, पोषणावर आपल्याला लक्ष देता येईल. उरलेले पैसे आपल्याला दुसरीकडे वापरता येतील. त्यामुळे बेसिक गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. आहार देखील कोणत्या दिवशी कोणता द्यावा हे ठरविणार आहोत. यासाठी आम्ही महिला बचत गटांची मदत घेणार आहोत. त्या गावातील महिलांना आहार बनवायला देणार आहोत. सुरूवातीला आम्ही धान्य देऊ आणि त्यांना सांगू की, मुलांना जेऊ-खाऊ तू घालावे किंवा आपणच धान्य आणावे आम्ही आपल्याला सात दिवसांचा मेनू ठरवून देऊ. त्या पद्धतीने त्यांना जेऊ घालावे. अशी पद्धत सुरू करणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे मी निर्णय घेतलेला आहे आणि काम करणार आहे. एवढेच नव्हे तर त्यात कोणतीही अडचण येणार नाही. मुलांना आंघोळीसाठी पाणी नसते, पिण्यासाठी पाणी नसते. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे की, प्रत्येक आश्रमशाळांना पिण्याच्या पाण्याची सोय असली पाहिजे. तसेच गरम पाणी देखील मिळाले पाहिजे म्हणून आम्ही बॉयलर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. हे काही एका वर्षात होणार नाही. पण दोन वर्षात नक्की पूर्ण करू. सगळीकडे बॉयलर बसविले पाहिजेत, आंघोळीसाठी चांगले पाणी मिळाले पाहिजे. पिण्याचे पाणी देखील चांगले देण्याची आवश्यकता आहे. आजारी पडण्याचे 90 टक्के कारण पाणी आहे. पाणी जर चांगले नसेल तर मुले आजारी पडणारच. कारण डॉक्टरांचे देखील तेच म्हणणे असते की, सर्व रोग हे पाण्यापासूनच होतात. म्हणून पाणी चांगले दिले पाहिजे, आहार चांगला असला पाहिजे. पाणी ठेवण्याची जागा चांगली असली पाहिजे. या सगळ्या गोष्टी करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे निर्णय घेतलेला आहे. तो करण्यासाठी काही अडचण येणार नाही, असे मला वाटते. शेवटी आपल्याला यातील दोष बाजूला काढायचे आहेत. पोटभर जेवण मिळायला पाहिजे. ही गोष्ट काही चुकीची नाही. आज पोटभर जेवण मिळत नाही ही गोष्ट खरी आहे. आम्ही अनुदान वाढवून दिल्यामुळे त्याला पोटभर जेवण मिळणार आहे काय ? जे देतो आहे ते त्याला मिळाले पाहिजे. आजही मला खाजगी अनुदानित



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शाळांतील लोक भेटले आणि मला सांगितले की, 650 रूपये आपण विद्यार्थ्यांना देत आहात. या 650 रूपयात आम्ही विद्यार्थ्यांना जेवण देऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यामागचे अनुदान वाढवून द्यावे अशी मागणी केली. यावेळी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी देखील होते. आम्ही 650 रूपये अनुदान वाढवून देऊ. त्यात अडचण नाही. लागेल तेवढे पैसे दिले पाहिजेत. पण जेवढे पैसे देऊ त्याप्रमाणे संबंधितांच्या पोटात अन्न तरी गेले पाहिजे की नको.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

अशा प्रकारे वेगवेगळया ठिकाणी जी गळती होत असते त्या दृष्टीने काही उपाययोजना करावी लागणार असून ही उपाययोजना साधी परंतु अत्यंत कडक व व्यवस्थितपणे करण्यात येणार आहे.आश्रमशाळातील आजारी विद्यार्थ्यावर वैद्यकीय उपचार करणे हा देखील महत्वाचा मुद्दा आहे. विद्यार्थ्यांना मिळणारा आहार, त्यांची राहण्याची आणि झोपण्याची सोय चांगल्याप्रकारे नसल्यामुळे हे विद्यार्थी आजारी पडतात . मी एका आश्रमशाळेत भेट दिली असता मला असे आढळून आले की शाळेमध्ये तो विद्यार्थी जे कपडे घालतो तेच कपडे रात्री घालून झोपत असतो .विद्यार्थ्यांना गणवेश ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात दिला जातो. या वर्षी तर या महिन्यात विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आला आहे. मी आजच असा निर्णय घेतला की, जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात वा पंधरवाडयात विद्यार्थ्यांना एक ड्रेस दिला पाहिजे आणि 15 ऑगस्टच्या आत दुसरा ड्रेस दिला गेला पाहिजे. एवढेच नव्हे तर या मुलांना आणि मुलींना नाईट ड्रेससुध्दा दिला गेला पाहिजे म्हणून त्याना नाईट ड्रेस देण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे. सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत शासनाने असा एक निर्णय घेतला आहे की आश्रमशाळासाठी डॉक्टरांची एक टीम तयार करण्यात येणार असून त्यांनी व्हिजीट केल्यानंतर त्यांना पैसे देण्यात येणार आहेत.त्याचबरोबर या डॉक्टरांनी खरोखर व्हिजीट केली आहे किंवा नाही हे पहाण्यासाठी त्यांची नोंद देखील बायोमॅट्रीक पध्दतीने ठेवण्यात येणार आहे. अशा प्रकारे त्यांनी किती वेळा व्हिजीट केली आहे याचे रेकॉर्ड ठेवण्यात येणार आहे. डॉक्टरांनी व्हिजीट केल्यानंतर त्यांना जरुर मोबदला देण्यात येईल परंतु कोणालाही हा मोबदला फुकट मिळणार नाही. गरीब माणसाचा पैसा कोणाच्याही खिशात जाणार नाही याकडे लक्ष देण्यात येणार आहे. औषधोपचार वेळेवर केला नाही किंवा ओषधोपचार केला नाही म्हणून विद्यार्थी दगावले जातात याकडेसुध्दा लक्ष देण्यात येईल त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ज्या साहित्याचे वाटप करावयाचे असते ते उत्तम प्रकारचे आहे व त्याबाबतीत देखील नियोजन करण्यात आलेले आहे.या विद्यार्थ्यांना हे साहित्य खरोखर मिळते किंवा नाही हे मी स्वत: जाऊन पाहिले आहे. विधान सभेचे अध्यक्ष माननीय श्री. दिलीप वळसे - पाटील यांच्या मतदारसंघात मी 18 एप्रिलला जाणार आहे.यापूर्वी देखील मी गेलो होतो तेव्हा कदाचित मी येणार असल्याचे समजले असल्यामुळे सगळी तयारी व्यवस्थित करुन ठेवली होती. कोठही कसलीही कमी नव्हती.

2..

15-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5H 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

मुलाना आणि मुलींना प्रश्न विचारल्यानंतर सर्वांनी चांगली उत्तरे दिली होती.त्यानंतर मी विद्यार्थ्यांना म्हणालो की, तुम्हाला वाटप करण्यात आलेले साहित्य घेऊन या. विद्यार्थ्यांनी साबण आणून दिल्यानंतर त्याचे कव्हरसुध्दा काढण्यात आलेले नव्हते. टूथपेस्ट आणि तेलाची बाटली देखील तशीच होती. तेव्हा मी संबंधितांना असे म्हणालो की," या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे साहित्य दिलेले आहे परंतु ते वापरण्यासाठी दिले की पूजा करण्यासाठी दिले आहे जर ते पूजा करण्यासाठी दिले असेल तर त्याला हळद कुंकू वाहा " असे मी म्हटल्यानंतर अधिका-याच्या लक्षात आले की यामध्ये आपली चूक झालेली आहे. तेव्हा अशा प्रकारच्या चुका काही वेळेला होत असतात.

सभापती महोदय,पी.ओ.पाातळीवर ज्या सामित्या असतात त्या समित्या गेल्या अनेक वर्षापासून स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. आता या समित्या स्थापन करुन त्यांना अधिकार देण्यात येणार आहेत. या समितीला अधिकार दिल्यानंतर त्यांच्यावर किती विश्वास ठेवावयाचा असा देखील प्रश्न निर्माण होत असतो परंतु कोठे तरी विश्वास हा ठेवलाच पाहिजे. काही जणांनी मला असे सांगितले की , " ते सुध्दा वाटेकरी होती म्हणून अशा प्रकारच्या समित्या तयार करु नका". तेव्हा हा संशोधनाचा विषय आहे. परंतु ही बाब सत्य असल्यामुळे कोठे तरी ती बोललीच पाहिजे ज्यांच्यावर विश्वास ठेवावयाचा तो जर असा प्रकार करु लागला जर कुंपणच शेत खावयास लागते. आदिवासीच्या विकासासाठी जे पैसे मिळतात ते पैसे खाण्याचे प्रकार सुरु असतात हे प्रकार थांबावेत म्हणून सतत प्रयत्न केला जात आहे. माझ्या कडे आदिवासी विकास विभाग आल्यापासून प्रत्येक महिन्याला नाशिक येथे बैठक घेण्यात येत असते त्याचबरोबर मुंबईलासुध्दा बैठक घेण्यात येत असते त्या बैठकीत अधिका-यांचे ब्रेन वॉश केले जाते. विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारची वागणूक मिळाली पाहिजे हे देखील तितकेच महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी त्यांच्या भाषणात विद्यार्थ्याच्या संदर्भात एक मुद्दा मांडला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की हा रिपोर्ट मी त्यावेळीसुध्दा वाचला होता आणि त्याप्रमाणे आता आम्ही कार्यवाही करीत आहोत. प्रत्येक आश्रमशाळेमध्ये स्त्री अधिक्षीका ठेवलीच पाहिजे असा निर्णय घेण्यात आला आहे. स्त्री अधिक्षीका

3..



VTG/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.भारवि 20.55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

ठेवल्यानंतर त्यांच्यावर काही बंधने येतात ती बंधने त्यांनी पाळण्याची आवश्यकता आहे.मुद्दाम होऊन कोणी चूक केली असेल तर त्याला शिक्षा झाली पाहिजे परंतु जर ती चूक टाळता येणार नसेल तर मी अधिका-यांना सांगितले अशा वेळी जर चूक झाली असेल तर तुम्हाला माफ करण्यात येईल. परंतु तुमचा हेतू चांगला असला पाहिजे. जर हेतू चांगला असेल आणि चूक झाली असेल तर तुम्हाला बाजूला काढण्याचे काहीही कारण नाही. आश्रमशाळेच्या इमारती, पाणी ,आरोग्य आहार व्यवस्थ्ां इत्यादीबाबीकडे लक्ष देण्यात येईल. आश्रमशाळेमध्ये ज्या ठिकाणी स्वयंपाक केला जातो त्या ठिकाणी वेगवेगळी इक्वीपमेन्टस देण्यात काही अडचण नाही, कणिक मळण्यासाठी लहान मशिनचा वापर करण्यास काहीच अडचण नाही. आदिवासी विद्यार्थ्याना जर पुढे आणावयाचे असेल तर त्यांच्या शाळा आणि आश्रमशाळा  अत्यंत महत्वाच्या आहेत त्यामुळे त्यांच्याकडे अधिक लक्ष देण्यात येत आहे.या शाळेतील शिक्षकांना काही दिले पाहिजे अशी देखील सूचना करण्यात आलेली आहे. मी आपल्याला सांगतो की, या शिक्षकांना जरुर काही देऊ. विद्यार्थ्याचे दहावीपर्यतचे  गळतीचे प्रमाण 48 टक्के एवढे आहे त्यामुळे हे प्रमाण कमी करावयाचे नाही तर हे प्रमाण शुन्य टक्क्यावर आणावयाचे आहे असे आम्ही सांगितले आहे.....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

आणि म्हणून राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त येत्या जून महिन्यापासून जे आश्रमशाळेचे विद्यार्थी आहेत आणि जे आश्रमशाळेचे विद्यार्थी नाहीत त्यांच्यासाठी सानुग्रह अनुदान देण्याची एक वेगळया प्रकारची योजना तयार करीत आहोत. यामध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत 1 हजार रुपये, इयत्ता पाचवी ते सातवीपर्यंत 2 हजार रुपये, आणि इयत्ता आठवी ते दहावीपर्यंत 3 हजार रुपये मुलांना देणार आहोत. यामध्ये जे विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये नाहीत, वेगळया शाळेमध्ये आहेत त्यांनी सुध्दा शाळेमध्ये यावे याकरिता देणार आहोत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना वाटते की, आपला मुलगा थोडा मोठा झाला त्यामुळे कमविण्याचे साधन झाले आहे. त्यांच्या गरजा खूप कमी आहेत. त्यांच्या गरजा आपण भागवायच्या आहेत. त्यांच्याकडे जर दोन मुले असतील तर वर्षाकाठी त्यांना 4 ते 5 हजार रुपये यामधून मिळतील. त्याचप्रमाणे जो शिक्षक 100 टक्के मुलांना शाळेमध्ये आणण्याचे काम करील, त्या गावच्या परिसरातील 6 ते 8 वर्षामधील एकही मुलगा शाळेबाहेर राहणार नाही त्या शिक्षकांना आम्ही एक वेतनवाढ देणार आहोत. आणि त्या शाळेमध्ये मुलांची गळती सहा महिने होऊ दिली नाही तर आणखी एक वेतनवाढ देण्यात येईल. जो काम करतो त्याला संधी दिली पाहिजे. तशाप्रकारचा निर्णय झाला असून लवकरच परिपत्रक काढण्यात येईल. अशाप्रकारे मुलांचे गळतीचे प्रमाण 100 टक्के थांबले पाहिजे, शाळेचा निकाल चांगला लागला पाहिजे. त्या मुलाला संगणकाचे, इंग्रजीचे शिक्षण मिळाले पाहिजे. आता इंग्रजी शाळेची सुरुवात केल्याबरोबर अनेक लोकांनी सरकारवर टिका केली की, या मुलांना मातृभाषेमधून शिक्षण मिळत नाही तर इंग्रजी कशासाठी पाहिजे? आज फक्त 2500 आदिवासी मुले इंग्रजी शिकत आहेत. एकूण साडे 13 ते 14 लाख आदिवासी विद्यार्थी आहेत. त्यामध्ये 2500 मुलांचे प्रमाण काहीच नाही. त्यामुळे वेगवान असलेल्या एकविसाव्या शतकामध्ये या मुलांना इंग्रजीचे, संगणकाचे शिक्षण, विज्ञानाचे शिक्षण यापैकी काहीच द्यावयाचे नाही काय? त्यांना स्पर्धेमध्ये उतरविण्यासाठी इंग्रजीचे शिक्षण देण्याचा आपण निर्णय घेतला आहे. याप्रमाणे 66 तालुक्यांपैकी प्रत्येक तालुक्यात एक निवासी इंग्रजी शाळा काढणार आहोत. त्याचप्रमाणे त्याठिकाणी शिक्षकांची सुध्दा राहण्याची सोय केली पाहिजे. शिपायाची सुध्दा राहण्याची सोय केली पाहिजे. तशाप्रकारे तालुक्याच्या ठिकाणी 12 कोटी आणि जिल्हयाच्या ठिकाणी 16 कोटी रुपयांचे एस्टिमेट केले आहे. केंद्र सरकारकडून 3600 कोटी मिळाले आहेत अजून आम्ही 360 कोटी रुपये मागितले आहेत. पुढील 2 वर्षामध्ये 15 जिल्हयांमधील 66 तालुक्यांमध्ये या सर्व शाळा आम्ही सुरु करणार आहोत. यामुळे आदिवासींच्या 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/ SBT/

श्री. बबनराव पाचपुते....

लाख मुलांना इयत्ता पहिली पासून म्हणजे "के.जी. टू पी.जी. पर्यंत" इंग्रजीचे चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे याकरिता थोडेसे निकष आपल्याला बदलावे लागतील. त्याकरिता तेथील शिक्षक घेण्यापेक्षा बाहेरचे सुध्दा चांगले शिक्षक आणले नाहीतर कसे चालेल? तुमचा मुलगा चांगल्या शाळेमध्ये शिकला पाहिजे याकरिता या मुंबई शहरामध्ये सुध्दा के.जी. च्या वर्गात प्रवेश घेण्याकरिता पाच-पाच लाख रुपये द्यावे लागत आहेत. आणि त्यामुळे आम्ही त्यांना जास्त देत नाही.परंतु त्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे याकरिता शिक्षकांना सुध्दा वेळेवर पगार मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. हा संपूर्ण विषय मी गांभीर्याने घेतला आहे.

मी माझ्या नेत्यांचे पहिल्या दिवसापासून यासाठी आभार मानत आहे की, माझ्या सारख्या एका कार्यकर्त्याला आदिवासी विकास सारखे महत्वाचे खाते दिले आहे. माझ्या सारख्या नॉन ट्रायबल माणसाला ट्रायबलचे खाते मिळाले आहे. मी वारकरी पंथाचा आहे. आता जर सभागृह चालू नसते तर मी घाटकोपरला माझ्या प्रवचनाला जाणार होतो. माझे आजोबा, वडील हे प्रवचनकार होते मी सुध्दा स्वत: प्रवचन करीत असतो, वारीला जात असतो. त्यामुळे "जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले,". या देशाच्या माननीय राष्ट्रपतींनी शपथ घेतली त्या दिवशी संत तुकाराम महाराजांचा अभंग सांगितला गेला. रंजल्या गांजल्यांसाठी काम करण्याची जर मला संधी मिळाली असेल तर मला अतिशय उत्तम खाते मिळाले आहे असे मी सांगतो, यामध्ये शंकेला कुठेही जागा नाही. यापूर्वी माझ्याकडे वन खाते होते, त्यावेळी मी जंगलात होतो. आता सुध्दा जंगलात आहे. त्यावेळी जनावरांबरोबर होतो, आता माणसांबरोबर आहे. आपल्याला निधी मिळणार आहे, त्याबाबत माननीय सदस्यांनी काळजी करु नये. गेल्या वर्षी या खात्याला 2340 कोटी रुपये मिळाले होते यावर्षी 3020 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारकडून सुध्दा आपल्याला निधी मिळत आहे. माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग यांनी यामध्ये स्वत: लक्ष घातले आहे. या इंग्रजी शाळेच्या प्रोजेक्टची माहिती देण्यासाठी नामदार श्री. कांतीलाल हुरिया साहेबांकडे गेलो होतो. त्यांना माझा प्रोजेक्ट आवडल्याबरोबर पुढील आठ दिवसामध्ये त्यांचा मला फोन आला आणि त्यांनी मला दिल्लीला बोलावून घेतले. दिल्लीला गेल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, तुमचा प्रोजेक्ट या देशाच्या माननीय पंतप्रधानांसमोर मांडला. आणि त्यांना तो आवडल्याबरोबर त्यांची अंमलबजावणी संपूर्ण देशामध्ये करण्यास सांगितले. एवढी चांगली योजना केवळ महाराष्ट्रात नाही तर संपूर्ण देशामध्ये राबविली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते . . .

मी न मागता मला त्यांनी 36 कोटी रुपये मंजूर करुन दिले आणि सांगितले की, तुमचा सगळाच्या सगळा प्रोजेक्ट मी बजेटमध्ये ठेवतो आणि तुम्हाला सगळे पैसे मंजूर करुन देतो. म्हणजेच केंद्र शासनामध्ये देखील अशा प्रकारचा विचार करणारे लोक आहेत. सन्माननीय सदस्यांनी येथे आपले विचार मांडले आणि मी सुध्दा अनेक वर्षे विरोधक म्हणून काम केलेले आहे. मी सहा वेळेला निवडून आलो, त्यापैकी तीन वेळेस विधानसभेमध्ये होतो आणि तीन वेळेस लोकसभेमध्ये होतो, एवढाच फरक आहे. त्यात सुध्दा काम केल्याशिवाय कोणी निवडून देत नाही. मी सहा वेळेस सहा चिन्हांवर निवडून आलो आहे. मी काम करीत आहे आणि जे काही मिळेल त्यामध्ये समाधान असावयास पाहिजे आणि समाधान हे कामामध्ये आणि कामाच्या पूर्तीमध्ये मिळते. मला स्वत:ला आनंद आहे की, आम्ही वेगवेगळया पध्दतीने वेगवेगळया योजना करीत आहोत. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मृत झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत सांगितले. त्याच्या घरातील लोकांना 15 हजार रुपये देत आहोत. साप चाऊन कोणी मेले किंवा आजाराने मरण पावले तर यासाठी देण्यात येणारी रक्कम सुध्दा आपल्याला वाढवावयाची आहे. आम्ही एकत्र बसणार आहोत. साधारणपणे ती 25 हजार रुपयापर्यंत करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, खूप गमतीशीर गोष्टी आहेत. मी नाशिक जिल्ह्यामध्ये सटाणा तालुक्यात गेलो. तेथे सामुहिक विवाह सोहळा होता. तसा माझा याच्याशी कधी संबंध आलेला नाही. पण मी तेथे गेलो, तेव्हा 350 मुला-मुलींचे सामुहिक विवाह होते. त्यावेळी मी पाहिले की,या सर्व मुला-मुलींना फक्त मुंडावळया लावल्या होत्या आणि सर्वांच्या अंगावर जुने कपडे होते आणि 90 टक्के मुलींच्या पायामध्ये चपला नव्हत्या आणि 12-15 टक्के मुलांच्या पायामध्ये चपला असतील आणि विशेष म्हणजे त्यांच्या शेजारी त्यांची मुले उभी राहिली होती. माझ्याकडे संबंधित विभागाचा कार्यभार आल्यानंतर पहिली सही कशावर केली असेल? तर आमची जी कन्यादान योजना आहे, त्यानुसार 18 ते 35 वर्षापर्यंत जे वधु-वर आहेत, त्यांना पैसे देऊ. पण जर लग्नाच्या अगोदर मुले झाली असतील तर त्यांचे अंडरस्टॅण्डींग तसे असते. मग त्यांना सुध्दा लग्नासाठी दहा हजार रुपये द्यावयाचे. आता दहा हजार रुपयावरुन ही रक्कम 15 हजारापर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. एखाद्याचे लग्न जमल्यानंतर आमच्या विभागाला कळविले की, मुलाला 2500 आणि मुलीला 2500 रुपये अगोदर देण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. यामुळे याबाबतीत बारीक-सारीक

. . . .5 जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते . . .

सुधारणा कराव्या लागतील. त्याचबरोबर कुटुंबाच्या बाबतीत सांगावयाचे तर आम्ही तेथील माणसे पाहून मदत देत होतो. पण या योजना देखील आता बंद करुन कुटुंब हा घटक ठरविण्याचे ठरलेले आहे. कुटुंबाला वरती आणवयाचे आहे. अशा प्रकारे खूप मोठया योजना आहेत, त्या आम्हाला राबवावयाच्या आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी जी अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली आहे, त्याचा विषय मर्यादित असला तरी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकरसाहेब आपण संगितलेल्या बऱ्याचशा गोष्टी खऱ्या आहेत. पण यामध्ये लगेच बदल होणार नाही. पण बदल करण्याची आमची तयारी आहे. त्या दिशेने चालावयाचे आहे. वेग वाढवावयाचा आहे. सध्या वेळ नाही. जर आपल्याला पुण्याकडे जावयाचे असेल तर आमचा चालण्याचा वेग हा पुण्याच्या दिशेनेच असला पाहिजे. जर आपण दुसरीकडे गेलो तर पुण्यापर्यंत जाणार नाही. तेव्हा आमची दिशा ठरलेली आहे. आम्हाला विकासाकडे जावयाचे आहे,सुधारणा करावयाच्या आहेत. त्यामुळे या गोष्टींवर जास्त लक्ष द्यावयास पाहिजे. याबाबतीत पैशाची सुध्दा अडचण रहाणार नाही. पैसे कसे वाचवावयाचे , ते कसे उपलब्ध करावयाचे यासंदर्भात आपण सर्वांनी पुढाकार घेऊ या. म्हणून बऱ्याच अंशी एकदम सगळे प्रश्न सुटणार नाहीत, पण प्रश्न सोडविण्याची तयारी करु आणि यामध्ये आम्ही सर्वात महत्वाचा पहिला नंबर शिक्षणासाठी दिलेला आहे. जर आपल्याला बदल करावयाचा असेल तर शिक्षण, शिक्षण आणि शिक्षण आणि ते उत्तम प्रकारचे मिळेल किंवा शिक्षणाचे वय असताना आदिवासींचा एकही मुलगा किंवा मुलगी शाळेच्या बाहेर रहाणार नाही, शाळा सोडून जाणार नाही.तो शाळेमध्ये येईल आणि तेथे आल्यावर त्याला उत्तम प्रकारचा आहार आणि उत्तम प्रकारच्या सुविधा कशा उपलब्ध करता येईल याचा विचार करु. यासाठी थोडासा वेळ लागेल, यामध्ये काही अडचणी आहेत.आमच्या अधिकाऱ्यांची मानसिकता देखील बदलावी लागेल. काही जणांची मानसिकता बदललेली आहे आणि ज्यांची मानसिकता बदलत नसेल, त्याला आम्ही हात जोडून सांगितले की, तुम्ही तुमच्यात जर सुधारणा करीत नसाल तर तुम्ही परत जा किंवा दुसऱ्या विभागांमध्ये जा. येथे काही थांबू नका. काही लोकांना मी डायरेक्ट सांगितलेले आहे की, आता तुमचे येथे काम नाही. तुम्ही तुमच्या पध्दतीने तुम्हाला जिकडे नोकरी करावयाची असेल तेथे करा. माझा स्वभाव तसा नसल्यामुळे मी अशा लोकांना सांगितले की, बस् तुम्ही आता तुमच्या खात्यामध्ये

. . . .5 जे-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

परत जावे. चला, माघारी चला. ज्या खात्याकडून आलेले आहात, तिकडे जा. आमच्याकडे रहाण्याची आवश्यकता नाही. मी येथे सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो की, त्यांनी एका चांगल्या विषयाला वाचा फोडलेली आहे. मी येथे जास्त बोलू शकत नाही, कारण आम्हाला वेळ कमी असतो. आदिवासी विभाग म्हटल्यानंतर यासाठी प्रश्न कमी असतात, इतरही गोष्टी कमी असतात. पण तसे बोलावयाची काही आवश्यकता नाही. सभागृहामध्ये अनेक वर्षे बोलत राहिलो आहे. सभागृहामध्ये मी विरोधी पक्षामध्ये होतो, तेव्हा आता सन्माननीय सदस्य जेवढे बोलले, त्या पेक्षा जास्त बोलत होतोच. कारण त्यावेळेस फक्त बोलण्याचाच कार्यक्रम होता. दुसरे काही कामच नव्हते. आता बोलण्यापेक्षा आपल्या हातामध्ये काही करण्याची इच्छाशक्ती आहे, आपल्याला अधिकार आहे आणि तो वापरण्याचे काम करु या. हा अधिकार योग्य दिशेने वापरला पाहिजे तशा प्रकारचे काम सुरु आहे.म्हणून सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ही चर्चा उपस्थित केल्या बद्दल आणि या चर्चेमध्ये सर्वांनी भाग घेतल्याबद्दल मी सर्वांचे धन्यवाद मानतो आणि याठिकाणी चर्चेला पूर्ण विराम देतो.

-----

. . . .5 जे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची पुढील बैठक उद्या शुक्रवार दिनांक 16-04-2010 रोजी सकाळी 10 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 9 वाजून 09 मिनिटांनी शुक्रवार दिनांक 16-04-2010 रोजीच्या सकाळी 10 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही